स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय ...
सं. क. ...

स्त्रीजाणिवेचा आविष्कार :

एकोणिसावे शतक

मृणालिनी जोगळेकर

भाग २

बाई रानडे

REFBK-0026531

सेवा सदन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

16 MAY 1992

16 MAY 1992

18 JUL

8 DEC 1996

(कु. मा. पहा)
१००००–११–८९

संदर्भ
निबंध
३५८
२६३७
ध३।१२



1266
12

स्त्रीअस्मितेचा आविष्कार
एकोणिसावे शतक

भाग २

रमाबाई रानडे

अभ्यासमालिका

स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

संपादिका : **सुमा चिटणीस**

निर्मिती : **छाया दातार**

१. **संत कवयित्री**
   - इंदुमती शेवडे

२. **राज्यसत्तेच्या फटींमधून पेशवेकालीन स्त्रिया**
   - नीलिमा भावे

३. **स्त्रीप्रश्नांची चर्चा : एकोणिसावे शतक**
   - प्रतिभा रानडे

४. **स्त्रीअस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक**
   भाग १ : पंडिता रमाबाई
   भाग २ : रमाबाई रानडे
   भाग ३ : ताराबाई शिंदे, जनाक्का शिंदे
   - मृणालिनी जोगळेकर

५. **स्त्रीस्वातंत्र्यवादिनी : विसाव्या शतकातील परिवर्तन**
   - विनया खडपेकर

रमाबाई रानडे

स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

स्त्रीअस्मितेचा आविष्कार

एकोणिसावे शतक

भाग २

रमाबाई रानडे

मृणालिनी जोगळेकर

REFBK-0026531

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

स्त्री अस्मितेचा आविष्कार
एकोणिसावे शतक
भाग २ : रमाबाई रानडे
(म- ७६६)
पॉप्युलर प्रकाशन
ISBN 81- 7185 - 599 - 7

STREEASMITECHA AVISHKAR
Ekonisave Shatak
Bhag 2 : Ramabai Ranade
(Marathi Social Science)
Mrinalinee Joglekar

© १९९१, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस

पहिली आवृत्ती : १९९१ / १९९३

प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, पं. मालवीय मार्ग, ताडदेव
मुंबई ४०००३४

मुद्रक :
पी. एस. सहस्रबुद्धे
बालोद्यान प्रेस
१३७२, शुक्रवार पेठ
पुणे ४११००२

अक्षरजुळणी :
सौ. नूतन ढवळे
४२, तुळशिबागवाले कॉलनी
सहकार नगर - २
पुणे - ४११००९

एकोणिसाव्या शतकात जगण्याच्या नव्या वाटा चोखाळणाऱ्या
या स्त्रियांच्या सहवासाचा आनंद
ज्यांच्या समजूतदार सोशिकपणामुळे घेता आला
त्या माझ्या कुटुंबीयांस -

अनुक्रमणिका

प्रास्ताविक		नऊ
१.	एक बालिका	१
२.	बालवधू	८
३.	स्नेहपर्व	२९
४.	सहचरी	३५
५.	कर्मयोगिनी	५५
६.	कर्मभूमी - सेवासदन	७०
७.	सामाजिक व राजकीय जाणिवा	८७
८.	रमाबाईंची शब्दसृष्टी	९९
९.	रमाबाई - एक स्त्री	१११
१०.	समारोप	१३५
११.	दोन रमाबाई	१४८

प्रास्ताविक

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील बदलत्या सामाजिक परिस्थितीने प्रेरित होऊन स्वतः बदलत गेलेल्या व स्त्री-जीवनाच्या चौकटी थोड्याशा मोकळ्या करत गेलेल्या स्त्रियांपैकी पं. रमाबाईनंतरची आणखी एक महत्त्वाची स्त्री म्हणजे रमाबाई रानडे.

भारतीय परिवर्तनाचे एकोणिसाव्या शतकातील प्रभावी शिल्पकार न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, ह्यांच्या त्या पत्नी. न्या. रानड्यांसारख्या महापुरुषाची पत्नी म्हटले, की त्यांच्या परिवर्तनाच्या प्रेरणा व प्रभाव ह्यांचा काहीसा उलगडा होतो. रमाबाईंविषयी जी माहिती उपलब्ध आहे ती पाहता, त्यांच्या जगण्याचा गाभा त्या काळातील दुसऱ्या एका आत्मकथनाच्या (लक्ष्मीबाई टिळकांच्या) इंग्रजी अनुवादाच्या "I follow after" ह्या शीर्षकातून नेमकेपणाने व्यक्त होतो, असे वाटते. असे जरी असले, तरी न्या. रानड्यांच्या सहवासात व त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे व्यक्तिमत्व उलूहळू विकसित झाले व त्यांचे 'स्व'त्व त्यांना सापडत गेले, असे दिसते.

पुढे वेळोवेळी चौकटीबाहेर पडताना त्यांनी दाखवलेला निर्धार व मनाचा कणखरपणा, न्या. रानडे निवर्तल्यावरही त्यांनी स्त्री-जागृतीसाठी निष्ठेने केलेले कार्य व शोधलेल्या वेगवेगळ्या दिशा, याचा विचार केल्यास त्यांच्या जीवनसरणीत, त्या काळातील स्त्रियांत तुरळकपणे उमटू लागलेल्या 'स्वत्वा'च्या प्रेरणा, स्त्री मुक्तीच्या प्रेरणा निश्चितपणे जाणवतात. मात्र ह्या प्रेरणांचा आविष्कार पं. रमाबाईंच्या तुलनेत फार भिन्न तऱ्हेने झालेला आढळतो.

रमाबाई रानड्यांच्या जीवनाचा अभ्यास करायला पं. रमाबाईंच्या तुलनेत उपलब्ध साहित्य मर्यादित आहे. फार पूर्वी श्री. उमाकांत ह्यांनी लिहिलेले एक छोटेखानी चरित्र, रमाबाईंनी स्वतः लिहिलेल्या 'आमच्या आयुष्यातील आठवणी', काशीबाई कानिटकरांच्या आत्मचरित्रातील 'रमाबाई रानडे' हे प्रकरण रमाबाईंविषयी वेळोवेळी विविध विशेषांकांतून त्यांचे नातू श्री. माधवराव विद्वांस व इतर परिचितांनी लिहिलेले लेख व आठवणी, ज्ञानप्रकाश, टाईम्स,

इंदुप्रकाश वगैरे विविध वृत्तपत्रांतून आलेल्या बातम्या व त्यांच्या व्याख्यानांचे अंश एवढी सामग्री उपलब्ध होती.

नुकतेच रमाबाईंचे नातू श्री. माधवराव विद्वांस यांनी आपल्याजवळील सामग्रीच्या आधारे त्यांचे एक सविस्तर चरित्र लिहून प्रसिद्ध केले आहे.

या सर्वांचा ह्या लेखनाला आधारभूत म्हणून उपयोग केलेला आहे. या उपलब्ध साहित्यातून रमाबाई रानड्यांचा 'स्वत्व सापडलेली डोळस स्त्री' म्हणून होत गेलेला विकास मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

या संदर्भात रमाबाई रानड्यांच्या 'सेवासदन' ह्या संस्थेत जाऊन शोध घेतला, पंण फारसे वेगळे आधारभूत साहित्य लाभू शकले नाही. मात्र, श्री. माधवराव विद्वांसांबरोबर केलेल्या चर्चेतून बरेच मार्गदर्शन लाभले. त्यांना आपल्या श्रद्धेय 'आई'बद्दलच्या ह्या वेगळ्या अंगाने लिहिलेल्या पुस्तकाने निश्चित आनंद झाला असता. कारण रमाबाईंविषयी फारसे लिहिले गेले नाही ही खंत त्यांनी बोलून दाखविली होती. पण दुर्दैवाने नुकतेच ते दिवगंत झाले. तथापि, अत्यंत थकलेल्या अवस्थेतही त्यांनी जे सहकार्य दिले त्याबद्दलचे ऋण व्यक्त करणे मला अगत्याचे वाटते.

श्री. विद्वांसांनी रमाबाईंविषयी संग्रहित केलेली पत्रे, कात्रणे वगैरे साहित्य त्यांनी मुंबई विद्यापीठातील मराठी विभागाला दिले आहे. ते पाहण्यासाठी मला उपलब्ध करून दिल्याबद्दल मी मराठी विभाग प्रमुख प्रा. सरोजिनी वैद्य ह्यांचीही ऋणी आहे.

ह्या व्यतिरिक्त श्री. भास्करराव कर्वे, श्रीमती कावेरीबाई कर्वे, श्रीमती गंगूताई पटवर्धन इत्यादि पुण्यातल्या वयोवृद्ध व्यक्तींशी झालेल्या भेटींतून व प्रश्नोत्तरांतून त्या काळातील पुण्यातील वातावरणाचे भान येण्यास मदत झाली, ह्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

रमाबाईंच्या रूढ चरित्रापेक्षा जरा वेगळ्या दृष्टिकोणातून लिहिलेल्या ह्या पुस्तकामुळे एकोणिसाव्या शतकातील जागृत स्त्री-जाणिवेचे एक रूप व त्याचा आजच्या काळातील स्त्री-जाणिवांशी असलेला अतूट धागा थोडाफार स्पष्ट होईल, असे वाटते.

मृणालिनी जोगळेकर
एफ-५, नवसमाज सोसायटी
नेहरू रोड, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई ४०००५७.

प्रकरण १ ले

एक बालिका

रमाबाईंचा जन्म १८६२ साली (पंडिता रमाबाईंनंतर चार वर्षांनी) सातारा जिल्ह्यात देवराष्ट्र गावी, कुर्लेकर सरदार घराण्यात झाला. त्यांचे वडील, आजोबा वगैरे अतिशय करारी व धर्मशील होते, असे सांगतात. रमाबाईंचा विशिष्ट व्यक्तिमत्त्व असलेली स्त्री म्हणून जेव्हा आपण विचार करतो, तेव्हा त्यांच्या आईच्या व्यक्तिमत्त्वाचा पण विचार महत्त्वाचा वाटतो.

रमाबाईंची आई ही मिरजेचे राजवैद्य करमरकर यांची मुलगी. रमाबाई आपल्या 'आठवणीं'त सांगतात- "आमच्या आईचा स्वभाव अतिशय मायाळू, सोशिक व भिडस्त. वडील स्वभावाने अतिशय तापट व करारी होते... आईने पूर्ववयात बराच जाच सोसला. पण आपल्या मर्यादेच्या वागणुकीने व शांत स्वभावाने तिने वडिलांची मर्जी सदोदित प्रसन्न ठेवली. तिची समजूत अशी असे, की बायकांना देव व गुरु, सर्व काही पती आहे. म्हणून तिने गुरूमंत्रही माझ्या वडिलांकडून घेतला होता .... दुष्काळात वडिलांची फार ओढाताण झाली तेव्हा तिने.. गाऱ्हाणे न करता शांतपणे व धीराने आलेले दिवस काढले... ती आम्हा मुलांशी मोकळ्या मनाने, अगदी प्रेमळ मैत्रिणीसारखी वागे. आम्हांला रोज संध्याकाळी पुराणातील देवादिकांच्या कथा सांगे... म्हणायची, चांगले बी आपण पेरीत असावे, जशी जमीन मिळेल तसे ते मूळ धरील." रमाबाई पुढे म्हणतात, "त्या गोष्टी आम्हां लहान मुलांना काय कळणार, असे आत्याबाईला वाटे. पण चमत्कार असा, की तिने सांगितलेल्या एकूण एक गोष्टी नुकत्या ऐकल्यासारख्या मला आठवतात."[१]

अशा ह्या सोशिक, प्रेमळ व सुजाण आईकडून रमाबाईंना आणखीही एक वारसा मिळालेला दिसतो. रमाबाईंच्या आईने आपल्या वडिलांकडून वैद्यकीचे ज्ञान संपादन केले होते. रमाबाई सांगतात-

"घरातल्या कामातून मोकळीक झाली, की औषधे, गोळ्या वगैरे काही ना काही करण्यात ती गुंतलेली असायची. आमच्या आईला वैद्यकक्रिया उत्तम येत असे. किती वर्षांचे जुने रोगी

ती हटकून बरे करी. त्यामुळे आमच्या गावच्या आसपासच्या दहा-बारा खेड्यांतील लोक मोठ्या श्रद्धेने तिच्याकडे औषधे घेण्यात येत. सर्व रोग्यांना आपल्या खर्चाने व आपल्या हाताने ती औषधे तयार करून देत असे. वेळी-अवेळी रोगी आले, तरी ती लागलीच उठून औषध द्यायची... गरीब असेल तर त्याला चार-आठ दिवस देवडीवर ठेवून- पथ्यपणी, औषध करायची. वायूने बेफाम झालेल्या व वेड लागलेल्या रोग्यांना ती डागीतही असे. या सर्व कामांत तिला माझ्या वडिलांची संमती व मदत असे. .रण त्यांना हे परोपकाराचे काम आवडे. याबद्दल होणारा खर्च खुशाल कर, हा खरा धर्म आहे, असे ते तिला प्रोत्साहन देत."[२]

हे वर्णन वाचताना लक्षात येते, की त्या काळच्या तुलनेत रमाबाईंच्या आईला स्वतःचे वेगळे कर्तृत्व घडवायला थोडेफार स्वातंत्र्य व प्रोत्साहन वडिलांकडून तसेच पतीकडूनही मिळाले होते. त्या सर्वस्वी चार भिंतीआड दडपल्या गेलेल्या दिसत नाही. सरदार घराण्याचा वारसा असूनही त्यांना (आजारी का असेना पण) परपुरुषांत काम करण्याची मोकळीक मिळाली होती व त्या कामासाठी गरजेनुसार खर्च करण्याची मुभापण लाभली होती असे, दिसते. एकंदरीत रमाबाईंचे वडील, पत्नीबाबत थोडेसे उदार होते, असे दिसते.

रमाबाईंचा विवाह चारचौघींप्रमाणे वयाच्या अकराव्या वर्षी झाला, असे चरित्रातून दिसते. तसेच त्यांना अक्षरओळख होण्याइतपतही शिक्षण लग्नाच्या वेळेपर्यंत दिलेले दिसत नाही. वस्तुतः त्या काळी सामान्य सुखवस्तू ब्राह्मण घरांतून मुलींना थोडेफार लेखन-वाचन शिकवीत असत. न्यायमूर्तींच्या वडिलांनी देखील आपल्या द्वितीय पत्नीला व मुलीला लिहावाचायला शिकवले होते. पण रमाबाईंच्या घरात स्त्रियांच्या शिक्षणाविषयी विरोध दिसतो.

याबद्दल रमाबाई आपल्या 'आठवणीं'त सांगतात-

"माझी वडील आत्या स्तोत्रे वगैरे वाचावयास शिकली होती. तिला पुढे दुर्दैवाने वैधव्य आल्यापासून आमच्या वडील चुलत्यांनी ठरविले, की- आमच्या घरांत बायकांनी लिहिणे-वाचणे, शिकणे धार्जिणे नाही. असे ऐकल्यावर नुसता लिहिण्यावाचण्याचा विचारही मनात आणला तर पाप लागेल की काय, अशी बायकांची समजूत होण्यास काय उशीर ! त्यामुळे आम्हा मुलींना लिहिण्यावाचण्याचा गंधही नसणे स्वाभाविकच आहे."[३] *

मुलाच्या निवडीबाबत मुलीची इच्छा विचारात घेण्याचा त्या काळात प्रश्नच नव्हता. कुळशील चांगले पाहून, मुलीच्या कल्याणाची आपल्या कल्पनेप्रमाणे खात्री वाटली, की लग्न ठरवून टाकायचे, ही त्याकाळची पद्धत होती. लग्न पक्के करण्यापूर्वी रमाबाईंचे वडील न्या. रानड्यांना भेटले. तेव्हा रानड्यांनी स्वतःविषयी स्पष्टपणे जे सांगितले, ते रमाबाईंनी आपल्या

---

* ह्या समजुतीच्या जोडीला आणखी एक शक्यता जाणवते. कुर्लेकर घराणे हे सरदार घराणे होते. रमाबाई स्वतःच वरील आठवणीत म्हणतात- "माझ्या माहेरची माणसे म्हणजे जुने मराठमोळा ठेवणारे जहागिरदार." त्यामुळे मराठा परंपरेचा पंथ थोडा-फार प्रभाव त्यांच्या जीवनशैलीवर असावा का ?

** 'पेशवेकालीन स्त्रिया' या शोधप्रबंधात नीलिमा भावे म्हणतात की - "पेशवे घराण्यातील स्त्रिया या शिकलेल्या व स्वतः पत्रे लिहिणाऱ्या दिसतात. तर राजघराण्यातील मराठा स्त्रिया कारकुनाकडून पत्रे लिहवून घेताना दिसतात."

'आठवणीं'त नोंदवले आहे. त्या लिहितात-

"तेव्हा 'स्वतः' म्हटले- 'आपण मला काय पाहून मुलगी देण्याचा विचार केला आहे ? आपण जुन्या घराण्यातील जहागिरदार आहात व मी सुधारक असून पुनर्विवाहाच्या पक्षाचा आहे. तसेच मी शरीराने घट्टाकट्टा दिसतो तरी डोळ्यांनी व कानाने अधू आहे. शिवाय मला विलायतेतून जाऊन यावयाचे आहे. तेथून परत आल्यावर मी प्रायश्चित घेणार नाही. तेव्हा आपण ह्या सर्व गोष्टींचा विचार करून काय तो निर्णय घ्यावा.'

माझ्या वडिलांनी उत्तर दिले- 'भाऊसाहेबांचा व माझा जुना परिचय आहे. त्यांनी मला सर्व सांगितले आहे. माझा आपल्यांला मुलगी देण्याचा निश्चय झाला आहे.' "[४]

हे वाचताना लक्षात येते, की रमाबाईंच्या वडिलांनी जावयाची निवड केली तेव्हा प्रामुख्याने न्यायमूर्तींचे चांगले घराणे, न्यायमूर्तींच्या वडिलांशी असलेली आपली मैत्री, न्यायमूर्तींची विद्वता व हुद्दा हे पाहिले असावे. मुलामुलींच्या वयातील एकवीस वर्षांचे अंतर, मुलाचे बिजवरपण, न्यायमूर्तींचे कानाडोळ्यांचे अधूपण ह्या गोष्टींना महत्त्व दिलेले दिसत नाही. न्यायमूर्तींच्या सुधारणावादी मतांची पण त्यांनी धास्ती घेतलेली दिसत नाही. मात्र मुलीला दाखवण्याबाबत त्यांनी घेतलेली भूमिका कुलीनतेच्या पारंपरिक कल्पनेतून आली असली, तरी मुलीच्या प्रतिष्ठेला जपणारी वाटते. रमाबाई लिहितात- "माझे वडील मामंजींना म्हणाले- 'आमच्या मुलींना लग्न ठरल्याखेरीज नुसत्या पाहण्यासाठी पाठविण्याची चाल नाही. ...आपला कोणी मनुष्य आमच्या गावी मुलगी पाहण्यास पाठवा. त्यांना मुलगी पसंत पडली, तर तिला तेथून हलवू.' "[५]

रमाबाईंचे लग्नपण घाईत व खूप साधेपणाने झालेले दिसते. मुलगी पसंत असल्याचे कळल्याबरोबर रमाबाईंचे वडील मुलीला घेऊन, लग्न पक्के करण्यासाठी पुण्याला आले. न्यायमूर्तींच्या वडिलांनी मुलगी पाहिली व पसंत पडल्यावर त्यांनी ताबडतोब लग्न करून टाकण्याचे ठरवले. ह्याविषयी रमाबाई आपल्या आठवणीत सांगतात- "न्यायमूर्ती हे सुधारक व पुनर्विवाह पक्षाचे असल्यामुळे त्यांना हा विवाह अजिबात मान्य नव्हता. केवळ वडिलांच्या दडपणामुळे व कुटुंबप्रेमामुळे ते नाइलाजाने ह्या लग्नाला तयार झाले होते. त्यामुळे मधेच त्यांच्या मित्रमंडळीकडून काही दबाव येऊन लग्नात घोटाळा होऊ नये, म्हणून वडिलांनी लवकर लग्न उरकून टाकण्याचे योजिले." [६] पुढे रमाबाई लिहितात- "तिथीनिश्चय झाल्यावर आई, भाऊ, भावजया वगैरेंना तारा करून बोलवायचा विचार होता. पण मामंजींनी मुहूर्त जवळचा धरल्याने तसा अवधी मिळाला नाही. शिवाय वेदोक्त विधीखेरीज कोणताही उपचार करून घेणार नाही असे 'स्वतः' निक्षून सांगितले असल्यामुळे मुद्दाम बायकामुले आणून त्यांचा विरस करणे माझ्या वडिलांना पसंत पडले नाही."[७]

लग्नाच्या दिवशीपण माधवरावांनी रजा घेतली नव्हती. न्यायदानाचे काम रोजच्यासारखे करून ते कोर्टातून निघाले. घरी आल्यावर रोजच्याप्रमाणे फिरायला न जाता ते लग्नघरी गेले, असे त्यांचे चरित्रकार सांगतात. प्रत्यक्ष लग्नविधीविषयी रमाबाई आठवणीत सांगतात- "माझे लग्न.... गोरज मुहूर्तावर लागले. लग्नासंबंधी वेदोक्त विधी आटपून सुमारे साडेदहा वाजता

आमची वरात घरी आली, असे म्हणण्यापेक्षा आम्ही दोघेही आपल्या घरी पायी चालत बरोबर आलो.... इतके खरे. लग्न झाल्यावर घरी येतेवेळी 'स्वतः' माझ्या घरी जेवण वगैरे काही केले नाही. घरी आल्यावरसुद्धा कोणाशी काही न बोलता व काही न खाता एकदम आपल्या खोलीत जाऊन आतून कडी घालून घेतली होती. ह्या दिवशी मनाला असह्य ताप झाला होता." [८]

रमाबाईंच्या लग्नाची ही एकूण हकीगत वाचताना मनात काही कुतुहलवजा प्रश्न उभे राहतात.

त्या काळातील लग्ने आठ-आठ दिवस चालत. वरात, बँड, जेवणावळी, मिरवणुका, विहिणीचे मानपान, नवऱ्यामुलीचे कौतुक, चेष्टामस्करी नानाप्रकारे लग्न गाजत असे. त्या पार्श्वभूमीवर ह्या निरुत्साही लग्नाबाबत रमाबाईंना त्यावेळी काय वाटले असेल ? कारण त्या वेळी रमाबाईंचे वय अकरा वर्षांचे म्हणजे नटणे-मुरडणे, हौस-मौज ह्यांचे आकर्षण वाटण्याचेच होते. तसेच आपले लग्न कोणत्या परिस्थितीत होत आहे, ह्याचे गांभीर्य कळण्याचेही त्यांचे वय नव्हते.

त्या वेळची रमाबाईंच्या मनाची झालेली प्रतिक्रिया मी उत्सुकतेने शोधली. पण त्यांच्या स्वतःच्या 'आठवणीं'तही ती कुठे नोंदलेली आढळली नाही.

ह्या प्रसंगाविषयी भाष्य करताना रमाबाईंचे नातू मा.श्री.विद्वांस म्हणतात- "माधवरावांना आपल्या द्वितीय विवाहाचा दिवस अत्यंत तापदायक वाटला. आपल्या अकरा वर्षे वयाच्या पत्नीला गृहप्रवेशानंतरच्या आपल्या वागण्याने काय वाटेल याचा विचारही त्यांच्या मनात त्यावेळी आला नाही." [९]

नवऱ्याच्या इच्छेविरूद्ध आपण त्याच्या जीवनाशी बांधले गेलो आहोत, हे सत्य रमाबाईंना त्या वेळी कळले नसावे. पण लग्नापूर्वीची ही सर्व हकीगत रमाबाईंना मागाहून त्यांच्या नणंदेच्या सहज उद्‌गारावरून कळून आली,[१०] असे त्या म्हणतात.

त्या वेळी रमाबाईंना काय वाटले ते ठाऊक नाही. पण पतीचा हा विरोध तत्त्वाचा होता, व्यक्तिगत नव्हता, हे त्यांनी समजून घेतलेले दिसते. ह्या प्रसंगाविषयी न्यायमूर्ती गेल्यावर लिहिलेल्या आठवणींत त्यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया पाहण्यासारखी आहे.

त्या लिहितात- "वडिलांचा शब्द मोडायचा नाही आणि त्यांच्या कुटुंबसुखामध्ये आपण विघातक व्हावयाचे नाही; म्हणूनच बरेच दिवस स्वीकारलेल्या व योग्य वाटलेल्या मताला (पुनर्विवाह पक्षाला), जुन्या जिवलग मित्रांना, आपल्या स्वाभिमानाला व त्यामुळे मिळणाऱ्या सुखाला आणि धन्यवादाला झुगारून देऊन.... त्याबद्दल जगाकडून आलेले उपहासाचे शब्द व दोषारोप सदैव सोसण्याचे पत्करले.... याकरिता ही रात्र असह्य संकटाची वाटली यात शंका नाही व ते वाटणे अगदी बरोबरच होते. कारण अजूनही काही लोकांकडून 'स्वतः'च्या सर्व आयुष्यक्रमामध्ये गौण व कमीपणाचा जर काही भाग असेल, तर तो हाच असा आरोप करण्यात येतो.... पण यासंबंधाने मला तर उलट असे वाटते, की सर्व चरित्रामध्ये खऱ्या स्वार्थत्यागाचा व मनाच्या मोठेपणाचा जो काही भाग असेल, त्यामध्ये अत्यंत उदात्त व महत्त्वाचा भाग हाच आहे. यासंबंधी कोणी कितीही आपापल्या दृष्टीप्रमाणे नावे ठेवली, तरी मला तर याबद्दल

अत्यंत आदर वाटतो."[११]

इथे रमाबाई 'स्व'च्याही पलीकडे जाऊन ह्या प्रसंगाचे मूल्यमापन करताना दिसतात. न्यायमूर्तींची निस्सीम पितृभक्ती तोपर्यंत त्यांच्या अनुभवास अनेकवार आली होती, हे 'आठवणीं'त त्यांनी नोंदवलेल्या अनेक प्रसंगांतून लक्षात येते.

रमाबाईंचे नातू मा.श्री. विद्वांस म्हणतात त्याप्रमाणे- "रमाबाईंचा हा अभिप्राय सर्वांनाच मान्य झाला वा होईल, असे म्हणता येणार नाही."[१२] तथापि, आज त्यांचे आयुष्य बघताना वाटते, की पतीला समजून घेण्यातली रमाबाईंची क्षमता व मनाची ठेवण लक्षणीय आहे.*

अर्थात न्यायमूर्ती माधवराव रानडे हे मोठ्या मनाचे असल्यामुळे आपल्यावर झालेल्या जबरदस्तीचा राग त्यांनी बायकोवर जराही काढलेला दिसत नाही. उलट त्यांचे चरित्रकार म्हणतात त्याप्रमाणे- "त्यांनी रमाबाईंशी पहिल्यापासून सतत प्रेमाची, आस्थेची व सहानुभूतीचीच वागणूक ठेवली."[१३]

न्यायमूर्तींच्या पुनर्विवाह प्रकरणाविषयीची रमाबाईंची ही प्रतिक्रिया भाबड्या पतिभक्तीतून आलेली आहे, असे वाटत नाही. कारण न्यायमूर्तींना ओळखणाऱ्या त्या वेळच्या दोन महान कृतिशील समाजसुधारकांनी असाच दृष्टिकोन व्यक्त केला आहे. श्री अण्णासाहेब कर्वे आपल्या आत्मवृत्तात म्हणतात- "समाजाच्या दृष्टीने कर्तव्य व वृद्ध आप्तांच्या दृष्टीने कर्तव्य ही भिन्न झाली असता जर मनुष्याच्या हातून इष्ट वर्तन घडले नाही, तर त्याला फारसा दोष लावता येणार नाही. कित्येक अशा लोकांवर फार टीका करतात. पण ती करणे योग्य नाही, असे मला वाटते."[१४]

प्रसिद्ध समाजसुधारक श्री. वासुदेवराव केळकर 'प्रार्थना समाजाचा इतिहास' ह्या पुस्तकात न्यायमूर्ती रानड्यांविषयी म्हणतात- "या कार्यास (विधवा पुनर्विवाह) फार उत्तम रीतीने साहाय्य करण्याचा प्रसंग ईश्वरेच्छेने आला होता. पण तो जरी त्यांनी दवडला व ह्यामुळे अनेक लोकांकडून उलट टीका करून घ्यावयास पात्र झाले, तरी मूळपासून ते आजपर्यंत यांचा या कामी उद्योग सतत चालू होता. कोणास विवाहकर्तव्य झाल्यास आज साहाय्य मागण्यास प्रसिद्ध असे हेच एक स्थान आहे."[१५]

न्यायमूर्तींची कार्याविषयी कळकळ, पण वैयक्तिक जीवनातील कोंडी रमाबाईंप्रमाणेच ह्या थोर सत्पुरुषांनी सुद्धा जाणलेली दिसते.

लग्नानंतर रमाबाई ज्या कुटुंबात आल्या, ते रानडे कुटुंब खूप मोठे होते. सावत्र आई, आईसमान चुलती, विधवा बहीण, इतरही चुलत नात्यातल्या अनेक विधवा स्त्रिया व माधवरावांची चुलत भावंडे, वगैरे मंडळी माधवराव सर्वांत मोठे असल्याकारणाने त्यांच्याकडेच राहत. अशा प्रकारे कुटुंब जरी मोठे होते, तरीपण सर्व स्त्रिया विधवा व प्रौढ

---

* १८७३ साली वडीलांचे मन राखण्यासाठी न्यायमूर्तींनी स्वतःची तत्वे बाजूला सारली. तर १८९२ साली कर्व्यांनी रॅ. परांजपेना उपदेश केलेला दिसतो की- "आपल्या सुधारणावादी तत्त्वांमुळे वडिलांचे मन दुखवले जात असेल, तर नाइलाज समजून आपल्याला योग्य वाटतो तो मार्ग स्वीकारावा." वीस वर्षांत एवढा फरक झालेला दिसतो.

असल्याने, रमाबाईंना तिथे समवयस्क अशी स्त्री सोबत नव्हती असे दिसते.

थोडक्यात, देवराष्ट्रासारख्या लहानशा गावी बाळबोध वातावरणात वाढलेल्या लहानग्या निरक्षर रमाबाईंचा प्रवेश, पुण्यासारख्या मोठ्या शहरी, नव्या वातावरणात वाढलेल्या, सुधारणावादी मनाच्या प्रौढ, विद्वान व कर्तृत्ववान अशा न्यायमूर्तींच्या जीवनात झाला.

* *

संदर्भ सूची

१. आमच्या आयुष्यातील आठवणी : रमाबाई रानडे - पृष्ठ १८ ते २०
२. कित्ता- पृष्ठ १८ ते २०
३. कित्ता पृष्ठ २८
४. कित्ता पृष्ठ २४
५. कित्ता पृष्ठ २०
६. कित्ता पृष्ठ २६
७. कित्ता पृष्ठ २७
८. कित्ता पृष्ठ २०
९. श्रामती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस- पृष्ठ ३१,३२
१०. आमच्या आयुष्यातील आठवणी : रमाबाई रानडे- पृष्ठ २६
११. कित्ता पृष्ठ २१
१२. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस - पृष्ठ १
१३. कित्ता पृ.३२
१४. धो.के.कर्वे.आत्मचरित्र व चरित्र : कर्वे,पटवर्धन,पृष्ठ १६०
१५. प्रार्थना समाजाचा इतिहास : पृष्ठ १६२

* *

प्रकरण २ रे

बालवधू

लग्नानंतर दोन-तीन दिवसांतच माधवरावांनी रमाबाईंना घराच्या गच्चीवर बोलावून त्यांच्या चौकसपणाची व धीटपणाची चाचणी घेण्याच्या हेतूने त्यांना विचारले- "तुझे माझ्याशी लग्न करून दिले आहे. पण मी कोण, माझे नाव काय, हे तुला माहीत आहे काय ?"

तेव्हा रमाबाईंनी माधवरावांना त्यांचे सबंध नाव, इतर लोक जसे म्हणत तसेच 'महादेव गोविंद रानडे, सदर अमीन, असे सांगितले *असे त्यांचे चरित्रकार मा. श्री. विद्वांस सांगतात[१]. ते पुढे म्हणतात - "पहिल्या भेटीतच रमाबाईंचा धीटपणा व तरतरीतपणा माधवरावांच्या ध्यानात आला..."

. ह्या प्रसंगाविषयी रमाबाई आपल्या 'आठवणी'त म्हणतात- "मी सर्व नाव सांगितले तेव्हा मला लाजेचा भाग जसा समजावा तसा समजत नव्हता. पण ते ऐकून एक प्रकारचे समाधान झाल्यासारखे दिसले, असे मला पक्के आठवते*...नंतर माझ्या लिहिण्यावाचण्याची चौकशी केली. पण मला काही येत नव्हते, म्हणून त्याच रात्री एक पाटी-पेन्सिल आणवून श्रीगणेशाचा पहिला सात अक्षरी धडा घालून दिला... दुसरे दिवसापासून दररोज रात्री दोन तास मला शिकवण्याकडे घालवायचा क्रम ठेवला. मुळाक्षरे, बाराखड्या वगैरे शिकवून सुमारे पंधराव्या दिवशी माझ्याकडून पहिल्या पुस्तकाचा पहिला धडा वाचविला. त्या दिवशी पुष्कळ बरे वाटलेले दिसते."

या प्रगतीविषयी मा. श्री. विद्वांस म्हणतात- "रमाबाईंची कुशाग्रता, एकाग्रता आणि क्षमता पाहून माधवरावांचा आनंद द्विगुणित झाला. नंतर माधवरावांनी रमाबाईंचा इयत्तेप्रमाणे क्रमिक अभ्यास सुरू केला."[२]

इथे एक प्रश्न मनात येतो, की 'स्त्रियांनी लिहिणे-वाचणे वैधव्यकारक आहे,' अशा

---

* अकरा वर्षांच्या नव्या नवरीचे हे धीट निरीक्षण लक्षणीय आहे.

संस्कारातून आलेल्या रमाबाईंना प्रथम लिहायला लागताना मनात भय, शंका आल्या नसतील का ? का पतिनिष्ठेचा संस्कार जास्त प्रभावी ठरला असेल ?*

रमाबाईंचा अभ्यास सरू झाल्यावर थोड्याच दिवसांत माधवरावांना परगावी जावे लागल्याने त्यांनी फिमेल हायस्कूलमधील एका तरुण शिक्षिकेला रमाबाईंना शिकवायला ठेवले. त्याविषयी रमाबाई आपल्या 'आठवणीं'त लिहितात- "मास्तरीण ठेवल्यावर अभ्यासाचा आनंदच. तिला भिते कोण ? ती आल्यावर पाटी-पुस्तके शोधण्यात अर्धा तास घालवायचा. ती तरी लहान वयाचीच. तिचा दाब कितपत राहायचा... एक-दोन पाने वाचून होतात, न होतात तो तास भरे... मग झाला अभ्यास. पाटी, पुस्तके यांची व माझी दुसरे दिवशी मास्तरीण येईपर्यंत दृष्टिभेटसुद्धा नाही."[४]

माधवराव परत आल्यावर अभ्यासातील शून्य प्रगती पाहून त्यांना नवल वाटले, तेव्हा ती मास्तरीण म्हणाली- "मुलगी काय खेडवळ ! सांगितलेले समजत नाही... आपण स्वतः शिकवून पहा म्हणजे समजेल !" वगैरे बोलून ती मी उद्यापासून येणार नाही, असे सांगून निघून गेली.

"स्वतः काही न बोलता... शांतपणे वाचण्यास आरंभ केला... पण मला मात्र पहिल्यानेच यावेळी वाईट वाटले... त्या दिवसापासून माझा हूडपणा कमी झाला असावा असे वाटते !"[५]

ह्या प्रसंगातून रमाबाईंच्यातला बालपणीचा अवखळपणा दिसून येतो. पं. रमाबाईंप्रमाणे बालपणापासून शिक्षणाची सवय नसल्याने विद्येची गोडी त्यांच्यात त्यावेळी जागी झालेली नसावी, असे वाटते. त्या स्वतःही आपल्या वागण्याचे वर्णन हूडपणा असेच करतात.

पुढे त्या एके ठिकाणी लिहितात- "स्वतःची झोप तीन-साडेतीन तास झाल्यावर मला उठविण्यास आरंभ होई. तेव्हा उठण्याचा कंटाळा म्हणून मनातल्या मनात राग येई व केव्हा केव्हा त्रास वाटून मी रडकुंडीला येई. पण यापैकी काही बाहेर दाखवीत नसे... तरी 'स्वतः'च्या लक्षात येई. पण हे आपल्याला समजले नाही, असे दाखवून मी उठून नित्यक्रमाला लागेपर्यंत मला जागी करण्याचा क्रम चालावयाचा. मी एकदा उठून दिवा जवळ घेऊन वाचण्याचे पुस्तक हातात घेतले, म्हणजे मग अमुक वाच म्हणून सांगावयाचे.'[६]

मास्तरणीच्या प्रसंगावर भाष्य करताना रमाबाईंचे चरित्रकार मा. श्री. विद्वांस म्हणतात- "मास्तरणीला विद्यार्थिनीचे मन गोडीगुलाबीने अभ्यासाकडे वळवण्याची कला नसली पाहिजे. विद्यार्थिनीवर दाब .... ठेवण्याइतकी प्रौढता व गंभीरपणा आला नसावा, हे माधवरावांनी ओळखले... ते रमाबाईंना काही बोलले नाहीत. मात्र सुरवातीच्या काळात... माधवरावांकडून प्रशंसा मिळवली. त्यांच्याच समोर मास्तरणीचे कटू, निराशजनक शब्द ऐकण्याचा प्रसंग आल्याने रमाबाईंना रडू आले.'[७]

---

* आपल्या विद्वान नवऱ्याच्या इच्छेनुरूप वागून त्याला शोभेशी पत्नी बनायची, एक अबोध इच्छा त्यामागे असावी. त्या काळातील आनंदीबाई जोशी, काशीबाई कानिटकर इत्यादी स्त्रियांच्या बाबतीत पण 'आपल्यातील व पतीतील मोठे अंतर मिटवून टाकण्याची' हीच प्रेरणा कार्यरत होती, असे वाटते.

प्रकरण २ रे

बालवधू

लग्नानंतर दोन-तीन दिवसांतच माधवरावांनी रमाबाईंना घराच्या गच्चीवर बोलावून त्यांच्या चौकसपणाची व धीटपणाची चाचणी घेण्याच्या हेतूने त्यांना विचारले- "तुझे माझ्याशी लग्न करून दिले आहे. पण मी कोण, माझे नाव काय, हे तुला माहीत आहे काय ?"

तेव्हा रमाबाईंनी माधवरावांना त्यांचे सबंध नाव, इतर लोक जसे म्हणत तसेच 'महादेव गोविंद रानडे, सदर अमीन, असे सांगितले *असे त्यांचे चरित्रकार मा. श्री. विद्वांस सांगतात. ते पुढे म्हणतात - "पहिल्या भेटीतच रमाबाईंचा धीटपणा व तरतरीतपणा माधवरावांच्या ध्यानात आला..."

. ह्या प्रसंगाविषयी रमाबाई आपल्या 'आठवणीं'त म्हणतात- "मी सर्व नाव सांगितले तेव्हा मला लाजेचा भाग जसा समजावा तसा समजत नव्हता. पण ते ऐकून एक प्रकारचे समाधान झाल्यासारखे दिसले, असे मला पक्के आठवते*...नंतर माझ्या लिहिण्यावाचण्याची चौकशी केली. पण मला काही येत नव्हते, म्हणून त्याच रात्री एक पाटी-पेन्सिल आणवून श्रीगणेशाचा पहिला सात अक्षरी धडा घालून दिला... दुसरे दिवसापासून दररोज रात्री दोन तास मला शिकवण्याकडे घालवायचा क्रम ठेवला. मुळाक्षरे, बाराखड्या वगैरे शिकवून सुमारे पंधराव्या दिवशी माझ्याकडून पहिल्या पुस्तकाचा पहिला धडा वाचविला. त्या दिवशी पुष्कळ बरे वाटलेले दिसते."

या प्रगतीविषयी मा. श्री. विद्वांस म्हणतात- "रमाबाईंची कुशाग्रता, एकाग्रता आणि क्षमता पाहून माधवरावांचा आनंद द्विगुणित झाला. नंतर माधवरावांनी रमाबाईंचा इयत्तेप्रमाणे क्रमिक अभ्यास सुरू केला."[३]

इथे एक प्रश्न मनात येतो, की 'स्त्रियांनी लिहिणे-वाचणे वैधव्यकारक आहे,' अशा

---

* अकरा वर्षांच्या नव्या नवरीचे हे धीट निरीक्षण लक्षणीय आहे.

संस्कारातून आलेल्या रमाबाईंना प्रथम लिहायला लागताना मनात भय, शंका आल्या नसतील का ? का पतिनिष्ठेचा संस्कार जास्त प्रभावी ठरला असेल ?*

रमाबाईंचा अभ्यास सरू झाल्यावर थोड्याच दिवसांत माधवरावांना परगावी जावे लागल्याने त्यांनी फिमेल हायस्कूलमधील एका तरुण शिक्षिकेला रमाबाईंना शिकवायला ठेवले. त्याविषयी रमाबाई आपल्या 'आठवणीं'त लिहितात- "मास्तरीण ठेवल्यावर अभ्यासाचा आनंदच. तिला भिते कोण ? ती आल्यावर पाटी-पुस्तके शोधण्यात अर्धा तास घालवायचा. ती तरी लहान वयाचीच. तिचा दाब कितपत राहायचा... एक-दोन पाने वाचून होतात, न होतात तो तास भरे... मग झाला अभ्यास. पाटी, पुस्तके यांची व माझी दुसरे दिवशी मास्तरीण येईपर्यंत दृष्टिभेटसुद्धा नाही."[४]

माधवराव परत आल्यावर अभ्यासातील शून्य प्रगती पाहून त्यांना नवल वाटले, तेव्हा ती मास्तरीण म्हणाली- "मुलगी काय खेडवळ ! सांगितलेले समजत नाही... आपण स्वतः शिकवून पहा म्हणजे समजेल !" वगैरे बोलून ती मी उद्यापासून येणार नाही, असे सांगून निघून गेली.

"स्वतः काही न बोलता... शांतपणे वाचण्यास आरंभ केला... पण मला मात्र पहिल्यानेच यावेळी वाईट वाटले... त्या दिवसापासून माझा हूडपणा कमी झाला असावा असे वाटते !"[५]

ह्या प्रसंगातून रमाबाईंच्यातला बालपणीचा अवखळपणा दिसून येतो. पं. रमाबाईंप्रमाणे बालपणापासून शिक्षणाची सवय नसल्याने विद्येची गोडी त्यांच्यात त्यावेळी जागी झालेली नसावी, असे वाटते. त्या स्वतःही आपल्या वागण्याचे वर्णन हूडपणा असेच करतात.

पुढे त्या एके ठिकाणी लिहितात- "स्वतःची झोप तीन-साडेतीन तास झाल्यावर मला उठविण्यास आरंभ होई. तेव्हा उठण्याचा कंटाळा म्हणून मनातल्या मनात राग येई व केव्हा केव्हा त्रास वाटून मी रडकुंडीला येई. पण यापैकी काही बाहेर दाखवीत नसे... तरी 'स्वतः'च्या लक्षात येई. पण हे आपल्याला समजले नाही, असे दाखवून मी उठून नित्यक्रमाला लागेपर्यंत मला जागी करण्याचा क्रम चालावयाचा. मी एकदा उठून दिवा जवळ घेऊन वाचण्याचे पुस्तक हातात घेतले, म्हणजे मग अमुक वाच म्हणून सांगावयाचे."[६]

मास्तरणीच्या प्रसंगावर भाष्य करताना रमाबाईंचे चरित्रकार मा. श्री. विद्वांस म्हणतात- "मास्तरणीला विद्यार्थिनीचे मन गोडीगुलाबीने अभ्यासाकडे वळवण्याची कला नसली पाहिजे. विद्यार्थिनीवर दाब .... ठेवण्याइतकी प्रौढता व गंभीरपणा आला नसावा, हे माधवरावांनी ओळखले... ते रमाबाईंना काही बोलले नाहीत. मात्र सुरवातीच्या काळात... माधवरावांकडून प्रशंसा मिळवली. त्यांच्याच समोर मास्तरणीचे कटू, निराशजनक शब्द ऐकण्याचा प्रसंग आल्याने रमाबाईंना रडू आले."[७]

---

* आपल्या विद्वान नवऱ्याच्या इच्छेनुरूप वागून त्याला शोभेशी पत्नी बनायची, एक अबोध इच्छा त्यामागे असावी. त्या काळातील आनंदीबाई जोशी, काशीबाई कानिटकर इत्यादी स्त्रियांच्या बाबतीत पण 'आपल्यातील व पतीतील मोठे अंतर मिटवून टाकण्याची' हीच प्रेरणा कार्यरत होती, असे वाटते.

ते कसेही असो, पण न्यायमूर्तींच्या सहवासात पुढे त्यांना अभ्यासाची गोडी लागली हे खरे. ते जे शिकवीत ते त्या कुशाग्रपणे भराभर शिकत गेल्या, असे त्यांच्या चरित्रावरून दिसते. पुढे तर आपले दीर इंग्रजी शिकताहेत हे पाहून आपणपण इंग्रजी शिकावे असे रमाबाईंना वाटू लागले. त्या आपल्या 'आठवणीत' सांगतात-"याबद्दल एके दिवशी मी जवळ हळूच गोष्ट काढली. मी होऊन इंग्रजी शिकण्याबद्दल गोष्ट काढलेली पाहून, स्वतःस बरेच नवल, पण समाधानही वाटले."[८]

अशा प्रकारे लग्नाच्या सुरवातीसच माधवराव व रमाबाई ह्यांच्यातील नातेसंबंधांचा पाया अशा गुरु-शिष्या भूमिकेतून घडलेला दिसतो व जवळ जवळ माधवरावांच्या आयुष्यातील अखेरीची काही वर्षे वगळता तेच नाते थोडा थोडा कोन बदलून आविष्कृत होताना दिसते.

स्त्रियांनी थोडीफार अक्षरओळख करून घेण्याची परंपरा रानडे घराण्यात होती, हे आपण पाहिलेच आहे. त्यामुळे रमाबाईंच्या सुरवातीच्या शिक्षणात कुणी आक्षेप घेतलेला दिसत नाही. पण पुढे पुढे त्यांचे शिक्षण वाढू लागले. क्रमिक पुस्तकाप्रमाणे या अभ्यास करू लागल्या, हे घरातील प्रौढ स्त्रियांना रुचलेले दिसत नाही. त्यांना वाटे, की स्त्रियांनी शिकावे ते पोथ्यापुराणे वाचण्यापुरते; हिशोब करण्यापुरते. पण रमाबाई त्याच्या पलीकडे जाऊन क्रमिक अभ्यास करू लागल्या, पेपर वाचू लागल्या; फार काय, इंग्रजीपण शिकू लागल्या, हे तत्कालीन सामान्य स्त्री-जीवनाच्या चौकटीबाहेरचे होते. त्यामुळे घरातील स्त्रियांना ते मानवलेले दिसत नाही. त्यांच्याकडून रमाबाईंना खूप विरोध सोसावा लागला. अबोला धरणे, आडून टोमणे मारणे, घालूनपाडून बोलणे, बहिष्कृतासारखे वागवणे वगैरे प्रकारांमुळे त्यांना त्या वेळी किती मानसिक त्रास होत होता, ह्याचे सविस्तर वर्णन त्यांनी आपल्या आठवणींत केलेले आहे.[९]

वस्तुतः ही रमाबाईंची पायरी पायरीने चाललेली शिक्षणातली प्रगती माधवरावांच्या इच्छेनुसारच व प्रोत्साहनानेच चालू होती. पण घरातल्या प्रौढ स्त्रियांना ते रुचत नसे. त्या रमाबाईंना म्हणत -"पुरुषांना आवडले तरी एखादेवेळी वाचावे, पण यात घरातील वडील मंडळींचा अपमान होत नाही का? .... ते दहा वेळ सांगतील, आपण ऐकलेच नाही म्हणजे झाले, कंटाळून आपणच सोडून देतील."[१०]

सामान्य माणसाच्या मनावर धर्मातील मूल्य कल्पनापेक्षाही रूढींचा पगडा किती असतो, ते इथे पाहावयास मिळते. 'पतीच्या इच्छेनुरूप वागणे ह्या पातिव्रत्य मूल्य कल्पनेपेक्षा स्त्रियांनी शिक्षण घ्यायचे नाही' ह्या रूढीला अग्रक्रम मिळालेला दिसतो. 'रूढीपालन' ही भारतीय समाजजीवनातील एक जबरदस्त प्रेरणा असून, समाजजीवनाला तीच अधिक वळण देत होती असे दिसते. त्यामुळे शिक्षणावरून रमाबाईंना खूप बोलणी खावी लागलेली दिसतात. त्याबाबतचा एक प्रसंग रमाबाई आपल्या 'आठवणीं'त सांगतात-

"दुपारचे जेवण झाल्यावर सगळ्या बायका मागल्या सोप्यांत बसल्या होत्या. मी माजघरात केर काढत होते. केरांत इंग्रजी वर्तमानपत्राचा एक कपटा सापडला. आधीच माझा पोरपणा, त्यामुळे उतावीळपणे मी हातातील केरसुणी खाली ठेवून तो कपटा वाचीत उभी राहिले. पंधरा दिवसांत वाचता काय देणार होते? मी नुस्ती अक्षरे पाहात उभी होते .... ह्यावेळी

आजेसासूबाईंची नजर माझ्याकडे गेली. त्यांनी जवळच्या बायकांना खूण केली. ते पाहून वन्संना फारच राग आला. त्या मोठ्याने ओरडून म्हणाल्या, तुमचे हपीस माडीवर आहे. तिथे वाचा की नाचा, आमचा अपमान केला तर खबरदार ! आमची पहिली वहिनी नव्हती कां ? दादांनी तिला लिहिण्यास वाचण्यास शिकवले होते, पण तिने आमच्या देखत एक अक्षर वाचले नाही. तिला इंग्रजी शिकण्याबाबत जंग जंग पछाडले, पण त्या माऊलीने तिकडे लक्ष दिले नाही ....तिच्यात असा नाचरेपणा नव्हता !"[११]

पुढे रमाबाई लिहितात - "अशा तऱ्हेची बोलणी पदोपदी चालत. त्यामुळे इंग्रजीला कुठून आरंभ केला, असे वाटून घटकेघटकेला मी रडकुंडीला येई."

ह्या इंग्रजी शिकण्याच्या निमित्ताने पुढे आणखी एक घटना घडलेली दिसते. आणि त्यामुळे आगीत तेल पडल्याप्रमाणे घरातील असंतोषाचा आणखी एक तीव्र उद्रेक झालेला दिसतो.

१८८१ मध्ये पुण्याला बदलून आल्यावर माधवरावांना फिरतीवर जावे लागे. त्या वेळी रमाबाईंच्या इंग्रजी शिक्षणात व्यत्यय येऊ नये, म्हणून त्यांनी वानवडीच्या झनाना मिशनमधील मिस हरफर्ड नावाच्या एका बाईला रमाबाईंना इंग्रजी शिकवण्यासाठी नेमले. ह्या परधर्मीय स्त्रीची शिवाशिव घरातील जुन्या मताच्या स्त्रियांना रुचण्यासारखी नव्हती. त्यामुळे मिस हरफर्डचे शिकवणे झाले, की रमाबाईंना दरवेळी गार पाण्याने अंघोळ करून घरात यावे लागे. न केल्यास 'मडमेला शिवून अंग न धुता नुसते वस्त्रांतर करून घरांत बेधडक शिवतेस हे आम्हांला खपायचे नाहीं ....तू आपली माडीवर बसून रहा. आता इंग्रजी शिकून मडम व्हायचेच आहे .... घरातील कष्ट करावयास दासीबटकी आम्ही आयत्या मिळाल्याच आहोत."[१२] असली लाघट बोलणी ऐकावी लागत होती असे दिसते.

मन मोकळे करायला जवळ नवरा नाही. मग रडवेल्या रमाबाई मुकाट्याने स्नान करीत. ... परिणामी त्या आजारी झाल्या. शेवटी दिराकरवी माधवरावांच्या कानावर हे जाऊन एक दिवस त्यांनी घरातल्या स्त्रियांची समजूत काढली असावी व त्यामुळे रमाबाईंची ह्या प्रकारातून सुटका झालेली दिसते.

ह्याबद्दल रमाबाई सांगतात - "दुपारी हरफर्ड गेल्यावर आता अंग धुवावे की नको, अशा विचारांत पाच-दहा मिनिटे तशीच बसले. तो वन्संकडून निरोप आला, - 'तिला म्हणावं आडावर जाऊन अंगबिंग धुऊन आमच्याभोवती आणखी दुखणी आणू नको.' हा निरोप ऐकल्यावर मला एक प्रकारचे समाधान वाटले."[१३]

स्वतः रमाबाई जुन्या संस्कारातच वाढलेल्या होत्या. तथापि, एव्हाना त्यांच्या मनावरील सोवळ्या-ओवळ्याची बंधने सैल झालेली असावीत, असे त्यांच्या वरील उद्गारांवरून दिसते. त्यामुळे माधवरावांनी सुचवलेला 'मध्यममार्ग' त्यांनी सहजपणे स्वीकारलेला दिसतो.

मात्र या अशा मनस्तापाच्या वेळी, समवयस्क असणाऱ्या दोन सावत्र दिरांची रमाबाईंना खूपच मदत झालेली दिसते. त्या आपल्या 'आठवणीं'त लिहितात - "आम्ही तिघेही सख्ख्या भावंडाप्रमाणे आनंदाने, प्रेमाने, एकोप्याने वागत होतो. घरातील वडील माणसे कोणी कितीही

बोलली तरी आमची जूट मोडत नसे."[१४] आणखी एके ठिकाणी त्या लिहितात- "या शिकण्याच्या पायी मला घरातील सर्वच बायकांकडून जाच सोसावा लागला. पण मी अभ्यास सोडला नाही. हे सर्व सोसतांना माझे दोघे दीर.... माझ्याशी प्रेमाने वागून, वडील बायका रागावल्या तर तू भिऊ नकोस, असे म्हणून मला धीर देत व माझा कैवार घेऊन त्यांच्याशी बोलत." [१५] त्या काळातील समवयस्क दीर-भावजयीतील हे नातेसंबंध लक्षणीय वाटतात. न्यायमूर्तीपण वेळोवेळी रमाबाईंची अशीच समजूत काढून त्यांना धीर देताना दिसतात. आपल्याला कितीही मनस्ताप झाला तरी नवऱ्याजवळ त्यांची चहाडी करणे रमाबाईंच्या संस्कारात बसत नसल्याने त्या सांगत नसत. पण त्या म्हणतात - "घरातील वडील बायकांचा स्वभाव 'स्वतः'ला पक्का माहीत असल्यामुळे खऱ्या प्रकाराची त्यांना कल्पना येई .... तेव्हा धीर देऊन सांगावयाचे, की- थोडे सोसावयास शिकावे. उत्तर दिले नाही म्हणजे झाले. मी तुला कधी बोलत नाहीना ? इतर कोणी बोलले तरी रडत जाऊ नकोस" .... रमाबाई म्हणतात --- "त्या प्रेमपूर्वक व शांत शब्दांचा मनावर इतका परिणाम होई .... की झालेला त्रास मी केव्हांच विसरून, माझ्यासाररखी सुखी कोणी नाही .... असे वाटून आनंदात असे."[१६]

रमाबाईंचा अभ्यास जसजसा वाढू लागला, तसतसा त्यांचा माडीवर जास्त वेळ जाऊ लागला. कारण खाली कुणासमोर हातात पुस्तक धरणे अशक्यच होते. पण ही दोघे नवराबायको वर एकत्र बराच वेळ राहतात हेपण घरातल्या वृद्ध स्त्रियांना सहन होत नव्हते असे दिसते. "तू माडीवर काय हवे ते कर, पण आमची अमर्यादा केलेली आम्हांला खपणार नाहीं."[१७] हे घरातील स्त्रियांचे संतापाने उच्चारलेले शब्द फार सूचक वाटतात. माडीवर तुमचे नवराबायकोचे वेगळे विऱ्हाड. तिथे काय हवे ते करा, असा जणू विभक्तपणाचा इशाराच त्यातून डोकावतो. कुटुंबाला तडा जाऊ द्यायचा नाही, ह्या पतीच्या धोरणाने वागणाऱ्या सालस स्वभावाच्या रमाबाईंना अशा दुजाभावाचा चांगलाच मनस्ताप झाला असणार हे जाणवते.

इथे एक प्रश्न सहजच मनात येतो, की रमाबाईंच्या शिक्षणाला घरातल्या स्त्रियांचा एवढा विरोध का असावा ? कारण ह्या स्त्रिया स्वतः थोडेफार शिकलेल्या होत्या. बरे, ह्या सास्वा-नणंदांपैकी कोणी स्त्रिया स्वभावतःच खाष्ट वा कोत्या बुद्धीच्या होत्या, असेपण रमाबाईंच्या 'आठवणी' वाचताना दिसत नाही. मग हा रागाचा उद्रेक पदोपदी का होत असावा ? विचार करता असे वाटते, की ह्या विरोधभावनेत तत्कालीन परिस्थितीतून निर्माण झालेल्या अनेक भयगंडांचे पदर मिसळले असावेत.

एकतर स्त्रीचे शिक्षण आणि वैधव्य ह्यांचे समीकरण कदाचित ह्यांच्यापण मनात दडलेले असण्याची शक्यता आहे. दुसरे म्हणजे मत्सराची पण सूक्ष्म भावना त्यामागे असू शकते. जे आपल्याला मिळाले नाही, जमले नाही ते हिला लाभले आहे, ह्याचेही वैषम्य वाटत असावे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे शिक्षणाने ह्या नव्या मुली उद्धट होतील, घरात आपली आब वा किंमत राहणार नाही, अशी असुरक्षितता पण त्यांच्या मनात असण्याची शक्यता वाटते. स्वतःचे घर, नवरा, अपत्य, पैसा, प्रतिष्ठा काहीच नाही. भावाने, मुलाने किंवा पुतण्याने मोठेपणाने आधार दिला आहे. घरात थोडा मान आहे. उद्या ही शिकली आणि नवऱ्याला मुठीत घेऊन आपल्यावर

अधिकार गाजवू लागली तर ? असे भय निराधार प्रौढ विधवांच्या मनात नसेलच, असे म्हणता येत नाही.

कारणे काहीही असोत, पण रमाबाईना खूप त्रास होत होता हे खरे ! पण त्या म्हणतात -- "कोणी काहीही बोलले तरी मी कुणाला उत्तरे देत नसे .... ते खरे असो वा खोटे, फक्त ऐकून घ्यायचे ... मात्र मला करायचे, ते मी मुकाट्याने करी."[१८]

सुदैवाने ह्या सुमारास माधवराव रानड्यांची काही काळाकरता नाशिकास बदली झाली. त्यामुळे आपोआपच एकत्र कुटुंबातले हे विरोधाचे ताण नाहीसे होऊन स्वतंत्र बिऱ्हाडातील मोकळ्या वातावरणाचा लाभ त्यांना झाला. ह्या काळात त्यांचे शिक्षण निर्वेधपणे व वेगाने पुढे गेलेले दिसते. कामाचा वेळ वजा जाता त्यांना माधवरावांचा सहवास व मार्गदर्शनपण अधिक मिळू लागले. एकत्र कुटुंबात वडील स्त्रिया असल्यामुळे कुटुंब चालवण्याचा अनुभव मात्र त्यांना नव्हता. स्वैपाकपण स्वतःच्या जबाबदारीवर स्वतंत्रपणे करण्याची वेळ आली नव्हती. तेही आता त्या शिकताना दिसतात.

नाशिकच्या वास्तव्याच्या कालखंडात ह्या सर्व दिशेने रमाबाईंची प्रगती माधवरावांच्या सुजाण मार्गदर्शनाखाली झपाट्याने होत गेलेली दिसते. कामाव्यतिरिक्त वेळात गावातील अनेक माणसे रानड्यांकडे तक्रारी घेऊन, समस्या घेऊन मार्गदर्शनासाठी येत. ते सर्व बोलणे जवळपासच असल्याने रमाबाईंच्या कानावर पडत होते. त्याचाही फायदा रमाबाईंच्या जीवनविषयक जाणिवा विकसित होण्यात झालेला आढळतो.

ह्या सर्वांचे मनोज्ञ दर्शन 'नाशिकास बदली' ह्या 'आठवणी'तील प्रकरणात वाचकास घडते.

ह्या कालखंडातील आपल्या शिक्षणाविषयी रमाबाई लिहितात-- "ह्या वेळी हॉवर्डचे पहिले पुस्तक संपून दुसरे घेतले होते. आता 'स्वतः'स रोज दोन-अडीच तास माझे वाचन घेण्यास, शब्द व स्पेलिंग विचारण्यास व नवीन धडा देण्यास वेळ मिळत असे. सकाळी तास-दीड तास अभ्यास झाल्यावर व संध्याकाळी बाहेरून फिरून आल्यावर एक तास जेवणापूर्वी मराठी वर्तमानपत्राचे वाचन घेऊन मग जेवणास उठावयाचे. जेवण झाल्यावर दहा-साडेदहा वाजेपर्यंत पुण्याहून दक्षिणा प्राईज कमिटीची पुस्तके आली असतील त्यांचे वाचन माझ्याकडून घ्यावयाचे, असा पाठ ठेवला होता. पुन्हा पहाटेचे चार-साडेचार वाजता ... 'केका-आर्या,' एखादे वेळेस नवनीत किंवा प्रार्थना, संगीतातले जे काय म्हणावयास सांगणे होईल ते वाचून दाखवायचे....एखादेवेळस आपण स्वतःच संस्कृत श्लोक म्हणून ....त्यातला अर्थ सांगावयाचा व श्लोक पाठ करायला द्यायचे. पुन्हा केव्हा पाठ करावयास दिलेले श्लोक म्हणवून घ्यायचे व पूर्वी सांगितलेले अर्थ कितपत लक्षांत आहेत ते पाहावयाचे .... पहिले वाढप वाढून घेऊन बरोबरच बोलत चालत जेवीत असू .... दुपारी फराळाचा डबा कोर्टात पाठवल्यावर मी अभ्यासाला बसे. साडेचार वाजेपर्यंत, संध्याकाळी वाचून दाखवण्याकरता धडा तयार करी व शब्दही अगदी तोंडपाठ करून ठेवी. कारण प्रथम शब्दाचे स्पेलिंग व अर्थ चांगले पाठ झाले आहेत, असे पाहून मग धडा वाचून घ्यायचा असे. नाहीतर राग येई .... राग

म्हणजे ओरडणे नसे, उलट मुग्ध व उदासीन बसायचे .... हा राग कितीतरी वेळ टिके. म्हणून मला फार भय वाटे व वाईट वाटून चैनही पडत नसे. म्हणून होता होईतो तसा प्रसंग न येऊ देण्याविषयी मी फार जपे."[१९]

वरील वर्णनातील एकत्र गप्पागोष्टी करीत जेवणारे माधवराव व रमाबाई हे दांपत्य म्हणजे, त्या काळात अत्यंत दुर्मिळ असणाऱ्या मोकळ्या सहजीवनाची दृष्टरूप नांदीच वाटते. त्या काळातील सुशिक्षित तरुण अशाच प्रकारच्या सहजीवनाची स्वप्ने पाहू लागले असावेत, हे पुढे लवकरच लिहिल्या गेलेल्या हरि नारायण आपट्यांच्या कादंबऱ्यांवरून लक्षात येते.

अशा प्रकारे रमाबाईंची शैक्षणिक प्रगतीपण इथे विविध अंगाने पुढे चाललेली दिसते.

रमाबाई लिहितात-"याप्रमाणे इंग्रजी दुसरे बुक संपून त्याचा सेकंड पार्ट संपल्यावर इसापनीती व तिच्याबरोबरच, भाषा सुलभ व वाक्ये लहानलहान म्हणून बायबलचे न्यू टेस्टामेंट वाचावयास घेतले .... अशा प्रकारे अभ्यासाची व्यवस्था नीट चालू झाल्यावर मला सांगितले, की आता दररोज होणारा कच्चा खर्च तू आपल्या हाताने मांडून ठेवत जा."[२०]

माधवरावांच्या देखरेखीखाली शालेय शिक्षणाबरोबरच रमाबाईंचे जीवनशिक्षणही चालले होते, असे दिसते. ह्या बालवधूला स्वैपाक शिकण्यासाठी रानड्यांनी सूपशास्त्राचे एक पुस्तक आणून दिल्याचा उल्लेखपण इथे आढळतो.[२१] सर्व पगार रमाबाईंजवळ देऊन त्यांना हिशेबठिशेब, जमाखर्च, Home management इत्यादीचे पण शिक्षण ह्या काळात रानड्यांनी दिलेले दिसते.

घरातल्या वडिलधाऱ्या माणसांशी कसे वागावे ह्याचे धोरण घालून देणारे माधवराव, रमाबाईंना हळूहळू नोकरमाणसांशी, सभेत, संमेलनात, शेजाऱ्यांशी, इतर बायकांशी कसे वागावे, स्वतःचा विकास करतानाच इतर स्त्रियांना कसे मोकळे करत जावे, ह्याचेपण शिक्षण प्रसंगाप्रसंगाने देताना 'आठवणीं'त दिसतात. एके ठिकाणी त्या सांगतात --

"रा.ब. देशमुख व 'स्वतः' असे दोघेही स्त्री-शिक्षणाचे अभिमानी असल्यामुळे आपल्या बायकांनी हळदीकुंकवाच्या निमित्ताने कां होईना, पण गावांतील बायकांना वारंवार एके ठिकाणी जमवून सीता, सावित्री यांच्यासारख्या प्राचीन साध्वींची चरित्रे त्यांना वाचून दाखवावी व शिक्षणाकडे त्यांचे मन वळवावे, तसेच गावांतील मुलींच्या शाळा पाहाव्यात, त्यांना उत्तेजन देण्याकरिता काही अल्पस्वल्प बक्षिसे द्यावीत, वगैरे गोष्टी आवडत असत व त्याबद्दल आमच्या मागे तगादा असे."

माधवरावांच्या पुरोगामी विचारसरणीमुळे व प्रतिष्ठेच्या फिरतीच्या नोकरीमुळे ह्या कालखंडात रमाबाईंना लोकहितवादी, भांडारकर यांच्यासारख्या सुशिक्षित घरांतील, सुसंस्कृत स्त्रियांचा सहवास लाभलेला दिसतो. लहान गावांतील समारंभाच्या निमित्ताने मुलकी वा शिक्षण खात्यांतील वरिष्ठ इंग्रजी अधिकाऱ्यांच्या बायकांशी पण परिचय होण्याची संधी लाभलेली दिसते. त्यामधून मित्रमंडळीत वावरणे, सभासमारंभांना जाणे, वेळ पडल्यास चार शब्द बोलणे, इंग्रजी संभाषण, रीतीरिवाज ह्या सर्वांचा परिचय होऊन त्यांचा आत्मविश्वास व व्यक्तिमत्व विकसित होत गेलेले जाणवते.

नाशिकातील व धुळ्यातील वास्तव्याचा रमाबाईंना जसा हा चतुरस्र लाभ झालेला दिसतो, तसाच पुढे साताऱ्याकडे झालेल्या दुसऱ्या फिरंतीच्या वास्तव्यातही होऊन, त्यांचे व्यक्तिमत्व अधिक प्रगल्भ झाल्याचे जाणवते. त्या काळातील रमाबाईंच्या दिनक्रमाचे त्यांनीच आपल्या आठवणीत केलेले वर्णन पाहण्यासारखे आहे. त्या लिहितात--

"स्नान व जेवण झाल्यावर त्याच पाटावर बसून सर्व माणसांची पूसतपास व्हावयाची. आदले दिवशी मला जी कामे सांगितली असतील ती कशी व कितपत झाली आहेत, याची चौकशी करावयाची. रोजच्या टपालात नवीन पत्रे कोणाची आली, ती पाहून त्यांना उत्तरे काय लिहावयाची ते सांगून -- 'मी जरा विश्रांती घेऊन उठेपर्यंत तू, ही सर्व पत्रांची उत्तरे लिहून ठेव व मी उठल्यावर मला वाचून दाखीव' असे मला सांगून ... विश्रांती घ्यावयाची ... मी तिथेच उशाशी पत्रे लिहीत बसे. झोप झाल्यावर लिहिलेली पत्रे वाचून दाखवी व बंद करून टपालात टाकण्यासाठी शिपायापाशी देई. मग मी रघुवंशातील नवीन दोन श्लोक ... नीट समजावून घेई .... म्हणजे ते दुसऱ्या दिवसाला तयार करून ठेवण्यास बरे पडे ... 'स्वतः' ऑफिसात जाणे होई ... मग मी मराठी वर्तमानपत्रे घेऊन वाचीत पडे किंवा गावातील कोणी बायका आल्यास त्यांशी बोलत बसे किंवा गावांत जे कांही पहाण्यासारखे असेल ते पहाण्यास जाई.... संध्याकाळी जेवावयास बसले म्हणजे, दुपारी मी जी मराठी वर्तमानपत्रे वाचून ठेवली असतील त्यात कशांत काय कमजास्त असेल ते तोंडाने सांगावे लागे.... निजण्यापूर्वी कारकुनांपैकी कोणीतरी येऊन इंग्रजी वर्तमानपत्र वाचीत असे. त्यावेळी मी 'स्वतः'च्या पायास तूप चोळत असे ... एखादे वेळेस वाचन नसेल त्या दिवशी आम्ही उभयता बुद्धिबळे खेळत असू."[२२]

अकराव्या वर्षी एक निरक्षर व खेडवळ म्हणून रानड्यांच्या घरात प्रवेश केलेल्या ह्या बालवधूचे 'कुशल सहचरी'त हळूहळू होत चाललेले स्थित्यंतर वरील उताऱ्यातून स्पष्टपणे जाणवून जाते.

त्याचा सुखद परिणाम माधवराव व रमाबाई ह्यांच्या नातेसंबंधात पण झालेला आढळतो.

आतापर्यंत एखाद्या अजाण विद्यार्थिनीप्रमाणे वावरणाऱ्या रमाबाई आता हळूहळू मैत्रीच्या पातळीवर येऊ लागल्या असाव्यात, असे वाटते. त्यामुळे न्यायमूर्तींच्या बोलण्यात नर्म थट्टा-मस्करी, छुपे कौतुक डोकावू लागलेले दिसते. त्या दृष्टीने १८८२ सालच्या सातारा स्वारीतील रमाबाईंनी सांगितलेले काही प्रसंग पाहाण्यासारखे आहेत. भजनात तल्लीन झालेल्या न्यायमूर्तींचे भक्तिपूर्ण मुख पाहून आदराने त्यांच्याकडे पाहणाऱ्या व मनातील पूज्य भाव बोलावे की न बोलावे कसे सांगावे ह्या संभ्रमात असणाऱ्या रमाबाईंना माधवराव म्हणतात--

"काही टीका करायचा विचार मनात घोळत होता वाटतं ? असेल तर चालू दे .... आम्ही भोळी भाबडी माणसं, कांही तरी भजन करतो. तुम्ही इंग्रजी शिकलेल्या बायका. तुम्हांला हे थोडेच रुचणार !"[२३]

ह्यातील हद्य मैत्र स्पष्ट करून दाखवण्याची आवश्यकता नाही. किंवा एकदम मुलींच्या शाळेचे मास्तर शाळा पाहावयास निमंत्रण करण्यास येतात. त्यांना माधवराव-'हे काम

बायकांचे.त्यांस आमंत्रण करा म्हणजे त्या येतील,'असे सांगतात.रमाबाई स्वतंत्रपणे कार्यक्रम, भाषण वगैरे हाताळू शकतील इतका विश्वास माधवरावांच्या मनात आलेला असावा.रमाबाईंनी निमंत्रण स्वीकारल्यावर न्यायमूर्ती म्हणतात,"मघा कामाच्या धांदलीत कांही ऐकल्यासारखे वाटते खरे.... रस्त्याने जाणारे काही लोक बोलत होते,की येथे भल्या जाड्या विद्वान बाई आल्या आहेत.उद्या त्यांचे मुलींच्या शाळेत व्याख्यान आहे,वगैरे !" [२४]

रमाबाईंचे विकसित होत चाललेले व्यक्तिमत्व न्यायमूर्तींच्या कौतुकपूर्ण शब्दांतून डोकावताना जाणवते.

माधवरावांच्या प्रोत्साहनाने व मार्गदर्शनाने रमाबाई एकीकडे सुशिक्षित होत होत्या. इंग्रजी शिकणे, वृत्तपत्र वाचणे, पुस्तके वाचणे, पतीबरोबर चाललेल्या चर्चा ऐकणे, पुस्तक परीक्षणे लिहून घेणे,माधवरावांना आलेल्या पत्रांना उत्तरे लिहिणे इत्यादी गोष्टी माधवरावांच्या जोडीने त्या करताना दिसतात.त्यामुळे त्यांच्या मूळच्या हुशारीला धार येत गेलेली दिसते.तर दुसरीकडे,पतीबरोबर ज्या गावी जातील तिथे हळदीकुंकवाच्या वा तत्सम निमित्ताने बायकांना एकत्र करणे,त्यांना शिवणकाम करण्यास,काही विषयांवर बोलण्यास प्रवृत्त करणे,त्यांच्यात नवीन काळाला अनुरूप असे विचार जागृत करणे,मुलींच्या शाळांना भेटी देणे,स्त्री-शिक्षणाचे महत्त्व समजावून देणे,अशा पायऱ्यांनी स्वतःच्या सामाजिक जीवनाचा व स्त्रीविषयक कार्याचा पाया हळूहळू रचताना दिसतात.

तासगाव येथील शाळेच्या बक्षीस समारंभात रमाबाईंनी प्रमुख म्हणून पहिल्यानेच स्वतंत्र भाषण केले.तेव्हाचा अनुभव पाहा-

"तासगाव येथे मुक्काम असताना तेथील डे.ए. इन्स्पेक्टर बक्षीस समारंभासाठी निमंत्रण देऊन गेले.... 'स्वतः' रात्री मला सांगितले,'मुलींच्या शाळेचा बक्षीस समारंभ आहे. तुला काही बोलण्याच्या तयारीने गेले पाहिजे ....नुस्ते खुर्चीवर बसावयास जायचे नाही ....बोलता येत नसेल तर लिहून काढ .... माझ्याकडून लिहून घेऊन तू तिथे वाचणार हे मला आवडत नाही. आपल्याला जे काय वेडेवाकडे येईल ते लिहून काढावे,त्यांत एखादे वाक्य कमी-जास्त करता येईल ....तुम्ही बायका बायकांत असला की टकळी सुरू असते तसेच तेथे बोलायचे,' अशा रीतीने पुष्कळ सांगितले.

"दुसरा दिवस माझा विचारांत व काळजीत गेला.पण काय लिहावे तो निश्चय झाला नाही ....नेमलेल्या वेळी मी तिथे गेले .... मास्तरांनी रिपोर्ट वाचल्यावर .... माझी वेळ आली.मी उठून उभी राहिले.दम लागल्यासारखे होऊन हातपाय कापू लागले .... तरीही मी बोलण्यास सुरवात केली व कोण जाणे कसे झाले,पांच-पंचवीस वाक्ये मी झपाट्याने न अडखळता बोलून गेले खरी ! सभेत उभे राहून प्रमुखपणाने बोलण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग होता.हा समारंभ तेथील बायकांना आवडला असे दिसते."[२५]

ह्या भाषणाविषयी त्यांचे चरित्रकार उमाकांत म्हणतात,की- "हे भाषण करून रमाबाईंनी सार्वजनिक कार्यातील नेतृत्वाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली !"[२६]

रमाबाईंना लाभलेल्या स्वातंत्र्याचा व संधीचा त्यांच्यावर कसा इष्ट परिणाम होत गेला,

हे ह्या प्रसंगातून सहजपणे दिसून येते.

त्या वेळी त्यांनी केलेले छोटेसे भाषणपण लक्षणीय आहे. त्यांच्या कल्पनेतील स्त्री-मुक्तीचा आदर्श नकळत त्यातून सूचित होतो. त्या भाषणात म्हणाल्या--

"आपल्या लोकांत स्त्री-शिक्षणाविरुद्ध जो आक्षेप घेण्यात येतो तो हा, की बायका शिकल्या म्हणजे दांडग्या, बेपर्वा व मर्यादारहित होतील... तेव्हा शिकलेल्या मुलींनी या आक्षेपाला जागाच देता कामा नये. मनुष्याने उद्धट व्हावे हा सुशिक्षणाचा परिणाम खचित नव्हे. सुशिक्षणाचा परिणाम मनुष्याला दिनयसंपन्न व नम्र करावयाचा असाच असतो."

पुढे फळभाराने विनम्र झालेल्या केळीचे उदाहरण देऊन रमाबाईं म्हणतात--- "यावरून आपण असा बोध घ्यायचा, की विद्या, संपत्ती, अधिकार यांसारखे कोणतेही वैभव प्राप्त झाले असता आपण अधिक नम्र व विनयशील होऊन आपल्या पतीशी व वडील माणसांशी आदराने व आज्ञाधारकपणे वागावे. त्यांत आपले कल्याण आहे." [२७]

आपल्या भाषणात नम्रता हा शिक्षणाचा स्वाभाविक परिणाम असावा (स्त्री-पुरुषांवर), असे जरी त्या म्हणतात, तरीपण स्त्रीच्या शिक्षणाला समाजात मान्यता मिळवायची असेल, तर विशेषकरून तिने जाणीवपूर्वक विनयशील राहले पाहिजे, असे त्या सुचवताना दिसतात. शिक्षण घेणे आपला हक्क आहे, म्हणून समाजाकडून ते अधिकाराने खेचून घेण्याऐवजी, शिक्षणामुळे स्त्रिया उद्धट न होता उलट सर्व कुटुंबाचा फायदा कसा करतात, हे आपल्या आचरणाने दाखवून ते युक्तीने प्राप्त करून घ्यावे असे त्यांचे तडजोडीचे धोरण दिसते. अर्थात हे धोरण न्यायमूर्तींकडूनच त्यांनी उचलले होते. म्हणूनच त्यांच्या भाषणाचा सारांश ऐकल्यावर रमाबाई म्हणतात-- 'त्यांना संतोष वाटला असे दिसते.'

पण अधूनमधून लाभणारा हा स्वतंत्र बिऱ्हाडातील सुखी सहजीवनाचा काळ न्यायमूर्तींची पुण्याला बदली झाली की संपून जाई आणि पुन्हा एकत्र कुटुंबातील विचारविरोधामुळे होणाऱ्या जाचाला रमाबाईंना सामोरे जावे लागलेले दिसते.

तशाही परिस्थितीत कुणाला न दुखावता रमाबाई आपले शिक्षण नेटाने पुढे नेताना दिसतात. पण त्याच सुमारास आणखी एक चौकट ओलांडण्याचा प्रसंग रमाबाईंवर आला आणि त्यामुळे घरातील विरोधाला आणखी एक निमित्त मिळालेले दिसते.

रमाबाईंचे शिक्षण घरातच चाललेले होते. बाहेर कुठे गेल्या तरी बायकांच्या समूहात वा मुलींच्या शाळेत. परंतु त्यांच्या ह्या मर्यादित जीवनाच्या कक्षा रुंदावण्याची संधी ह्या सुमारास आली.

१८८१ जानेवारीमध्ये न्या. रानडे तीन महिन्यांसाठी मुंबईला होते. त्यावेळी मुंबईत, प्रार्थना समाजातील उत्साही सभासद डॉ. सखाराम अर्जुन राऊत ह्यांच्या पुढाकाराने स्त्रियांत ज्ञानप्रसार करण्याच्या हेतूने एक स्त्री-सभा भरवण्यात येत असे. सभेला बहुतेक प्रार्थना समाजाच्या सभासदांच्या बायका जमत असत व त्यांना शास्त्रीय विषयाचे ज्ञान, सोप्या शब्दांत करून दिले जात असे. मुंबईत आल्यावर रमाबाई रानडेपण ह्या सभांना नेमाने जाऊ लागल्या, असे त्यांचे चरित्रकार व नातू मा. श्री. विद्वांस लिहितात. पुढे ते म्हणतात--- "१८८१ च्या

पहिल्या तीन महिन्यांत रमाबाईंनी सभेपुढे स्त्रियांना अवश्य विद्या कोणती ? व स्त्रियांचे संसारातील कर्तव्य, असे दोन निबंध वाचले. पहिल्या निबंधात त्या म्हणतात-- "विद्या म्हणजे ज्ञान. ज्ञान सर्व माणसांस हवे." पुढे विविध विषयांच्या अभ्यासाने स्त्रियांचे सामान्य ज्ञान कसे वाढेल ते सांगून त्या म्हणतात- "प्रत्येक स्त्रीस बहुतकरून मुलाची आई व्हावे लागते ....आईस जर चांगले शिक्षण नसेल तर मुलास कोठून येईल ? मूल चांगले किंवा वाईट निपजणे हे बहुतकरून आईच्या सुशिक्षितपणावर अवलंबून आहे, म्हणून स्त्रियांस उत्तम शिक्षण मिळणे आवश्यक आहे."[२८] स्त्री-शिक्षणाविषयीचा तत्कालीन समाजाचा दृष्टिकोण 'उत्तम गृहिणी बनणे' -- रमाबाईंच्या ह्या उद्गारांतून जाणवतो.

"पुण्यास येऊन राहिल्यावर काही दिवसांनी वाटू लागले, की या वेळी नवीन शिकणाऱ्या बायकांकरिता एखादी सभा असावी व त्यांत आपल्यापैकी कोणी अनुभवी व पोक्त गृहस्थांनी या बायकांस समजेल असा सोपा विषय ....समजावून सांगावा ....त्यानुसार कै. केरोपंत नाना आम्हांला ग्रहण, नक्षत्र, तारे, भूगोल ह्या विषयी आकृती काढून माहिती सांगत .... विषय कोणाला किती समजला हे पाहाण्याकरता आम्हांला ....जितपत समजले असेल तितपत लिहून आणायला सांगत .... लिहून आणल्यास नानांना खूप कौतुक वाटे ....प्रशंसा करत .... चूक लिहिले असल्यास हसून पुन्हा समजावून सांगत व पुन्हा लिहून आणायला सांगत .... त्या सांगण्याचा कंटाळा कधी कधी आम्हांस येई, पण 'स्वतः'ला राग येईल म्हणून नानांनी सांगितलेले मला लिहावे लागे." २९

"दहा-वीस ओळी लिहिण्याचे वा चार शब्द बोलण्याचे काम नाना करून घेत ....सभेत ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिकत असलेल्या मास्तरणी होत्या. त्या अधिक शिकलेल्या .... मी एक कमी शिकलेली व शहरातील रीती-भातींविषयी बरीच अजाण होते. तथापि नानांचा लोभ माझ्यावर विशेष होता. ते काहीही प्रश्न विचारीत असले किंवा काही समजावून सांगत असले, तरी मला सांगत."[३०]

इथे रानड्यांच्या प्रेमळ धाकामुळे रमाबाईंच्या अभ्यासाला नेट येताना दिसतो. त्याप्रमाणे रमाबाईंच्या गुरूंकडून जे खास प्रोत्साहन मिळताना दिसते, तेपण रानड्यांच्या मोठेपणामुळे असावे असे वाटते. की रमाबाईंच्या हुशारीचेच ते गुरूंकडून व्यक्त झालेले कौतुक होते ? ह्याबाबत रमाबाईंचे चरित्रकार मा. विद्वांस म्हणतात-- "छत्रे व माधवराव यांचे गुरु-शिष्याचे नाते होते. त्यामुळे प्रो. छत्रे रमाबाईंना स्वतःच्या मुलीप्रमाणे मानत. म्हणून व्याख्यानानंतर विशेष माहिती सांगावयाची असल्यास रमाबाईंना सांगत."[३१]

ते काहीही असो, पण रमाबाई स्वतःच म्हणतात, त्याप्रमाणे 'सभा म्हणजे काय ? तेथे कसे वागावे ?' ह्याबद्दलची पुष्कळशी माहिती या सभेमुळे त्यांना झाली.[३२]

मात्र ह्या सभेचा फारसा बोभाटा झाला नसल्याने रमाबाईंच्या घरच्यांना ह्या शनिवारच्या संभेला जाण्याचा पत्ता लागलेला दिसत नाही. परंतु ह्याच सुमारास पं. रमाबाई पुण्यास आल्या व त्यांच्या सभांमुळे रमाबाईंच्या घरातील जाचाला पुन्हा धार चढलेली दिसते. त्याचे असे झाले--

पुण्यातील सुधारकांनी स्त्रियांना शिक्षित करण्यासाठी जे हे प्रयत्न सुरू केले होते त्या कामात पं. रमाबाईंसारखी सुशिक्षित स्त्री प्रेरणादायी ठरू शकेल हे ओळखून, सुधारकांनी पं. रमाबाईंना प्रोत्साहन दिले.

पं. रमाबाईंचे पहिले व्याख्यान तर माधवरावांनी स्वतःच्याच घरी घडवून आणल्याचे रमाबाई रानडे आपल्या 'आठवणी'त सांगतात. इतकेच नव्हे, तर दर शनिवारी त्यांचे जिथे भाषण, प्रवचन असेल तिथे रानडे दांपत्य आवर्जून जात असे, हे त्यांच्या चरित्रावरून दिसून येते. त्याविषयी त्या लिहितात -- "प्रार्थना समाजाच्या मुख्य शाळेत 'आर्य महिला समाज' नावाची संस्था पंडिता रमाबाई यांनी स्थापन केली होती.... सभेला आठ-दहा बायका व चार-सहा पोक्त पुरुष येत. कोणीतरी एखाद्या विषयावर .... कांही लिहून आणीत.... सभेत हजर असलेली पोक्त मंडळी ....आम्हांला उत्तेजन यावे म्हणून चांगले लिहिले आहे, पण आता यावर कोणी काही बोला- असा आग्रह करीत व कोणालाही बोलण्याचे धैर्य झाले नाही, तर आपणच चारदोन सोपी व लहान वाक्ये बोलून दाखवीत व 'असे बोलावे' असे सांगत."[३३]

ह्यातून रमाबाईंचा 'पंडिताबाईंशी' विशेष स्नेह जुळलेला दिसतो. त्या आपल्या 'आठवणी'त लिहितात--

"स्वतःच्या सांगण्यावरून मी पंडिताबाईंकडे एक दिवसाआड बसावयास जाऊ लागले. सहज बोलण्यात त्या म्हणाल्या, 'मी हॉवर्डचा सेकंड पार्ट शिकत होते. पण येथे आल्यापासून जमत नाही.' मी म्हटले ....'जनाना मिशनमधली एक मडम मला शिकविण्यास येत असते.'[३४] तुम्हीही वाटल्यास येत जा.' त्यांना ते पसंत पडले .... व त्या आमच्या घरी शिकावयास येऊ लागल्या. आधीच त्या बाईचा तिटकारा आमच्या घरी बायकांना आलेला, तशात त्या माझ्याशी हसत बोलत तेत्यांना आवडले नाही."

रमाबाईंविषयी रानड्यांच्या घरातील जुन्या मंडळींना राग होता. वयाच्या २२ व्या वर्षापर्यंत लग्न न करणारी, पुढे परजातीच्या माणसाशी विवाह केल्याने बाटगी ठरलेली, तशात विधवा असून भर पुरुषांच्या सभेत बोलणारी म्हणून पं. रमाबाईंविषयी पुराणमताभिमानी लोक तिटकाऱ्याने बोलत, वाटेल त्या कंड्या उठवत. त्यामुळे रमाबाईंचे त्यांच्याकडे जाणे-येणे घरच्यांच्या क्रोधाला कारणीभूत झाल्यास नवल नव्हते. त्याबद्दल रमाबाई आपल्या 'आठवणी'त सांगतात -- "मी सभेला जाऊ नये, पंडिताबाई आमच्या घरी आल्या, तर मी त्यांना शिवू नये .... पुरुषांना ह्या गोष्टी हव्या असल्या तरी आपण दुर्लक्ष करावे, म्हणजे कंटाळून नाद सोडून देतील ....' तुझ्या माहेरची जुनी घरंदाज माणसे. त्यांना तरी तुमचे ढंग आवडतील कां ? त्यांच्या घरी तर बायकांनी मराठीसुद्धा शिकायची चाल नाही .... पण तुझे पाहावे तर मडमेवर ताण !' अशा तऱ्हेने त्या माझी समजूत घालीत .... त्या बोलत असतांना त्यांचे सर्व बोलणे खरे वाटे व त्या म्हणतात तसेच वागावे, असे मी ठरवी .... पण वेळ आली, की तशी कृती हाताने घडत नसे. कारण 'स्वतः'ला ज्या गोष्टी पसंत असत .... त्या केल्या नाहीत तर राग येईल, हे मला पक्के माहीत असल्यामुळे 'स्वतः'ला हवी असेल तीच गोष्ट करण्यास मी चुकत नसे ... जे माझे खऱ्या सुखाचे व समाधानाचे ठिकाण त्यात अंतर येऊ नये .... ही एक समाधानाची

बाजू बळकट असेल तर इतर कोणत्याही माणसाकडून होणारा जाच सोसण्याला मला अधिक बळ येईल अशी माझी पक्की समजूत होती."[३५]

रमाबाईंचे पूर्वसंस्कार व पतीने दिलेल नवा विचार ह्यांत रमाबाईंच्या मनात थोडीफार ओढाताण होत असावी, असे वरील वक्तव्यातून वाटते. तथापि, आत्मसामर्थ्याचा स्रोत त्यांना पतिनिष्ठेत गवसला असल्यामुळे, त्या आपल्या नेहमीच्या धोरणानुसार घरच्यांच्या मताकडे दुर्लक्ष करू शकलेल्या दिसतात. पं. रमाबाईंच्या व्याख्यानाला रमाबाई जात राहिल्याच, पण पुढे त्यांनी काढलेल्या आर्य महिला समाजातही त्या उत्साहाने सहभागी होताना दिसतात. त्यासाठी त्यांना दरवेळी घरच्या स्त्रियांकडून कशी बोलणी खावी लागत होती व मनस्ताप सोसावा लागत होता, त्याचे वर्णन त्यांनी आपल्या 'आठवणीं'त केले आहे. त्या लिहितात-- "मी सभेला जायची. पण संध्याकाळी घरी आल्यावर मला कितपत त्रास सोसावा लागेल.... हा नेहमीचा अनुभव असल्यामुळे तेच विचार मनात घोळून सभेच्या इमारतीत जाईपर्यंत माझे मन खिन्न असे. पण बरोबरीच्या बायकामंडळीत गेल्यावरोबर त्यांच्याशी हसण्या-बोलण्यात व माझ्याकडे जे काम नेमले असे, ते करण्यात मी हे सर्व विसरून जाई. पण पुन्हा घरी परत आल्यावर सभेतील आनंद व तो धीटपणा मावळून जाऊन मी भेदरल्यासारखी उभी रहायची ....मला कडक ताकीद व्हायची- तुम्ही सभेला जाऊन आला आहात. लुगडे बदलले तरीसुद्धा आमच्या घरात शिरून वाढायला घ्यायचे नाहीं.... नाहीतरी सभेला जाणाऱ्या बायकांनी असली हलकीसलकी कामे करूच नयेत. वर जाऊन पुरुषांच्या मांडीला मांडी लावून बसावे. म्हणजे छान दिसेल."[३६]

रमाबाई लिहितात- "असे हे वाळीत टाकणे, टोमणे मारणे, शनिवारच्या सभेनंतर दोन-चार दिवस चाले. गुरुवारपर्यंत त्यांचा राग निवळून, थोडा थोडा घरकामात सहभाग घ्यायला मिळे." ह्याचा आनंद व्यक्त करताना रमाबाई पुढे म्हणतात- "मेळ्यातून टाकून दिलेल्या प्राण्याला पुन्हा मेळ्यात घेतल्याने जसा आनंद होतो, तसा मला होई... पण तेवढ्यात शनिवार दत्त म्हणून उभा व्हायचा !"[३७]

मिळवत्या व कर्तृत्ववान पतीचा प्रेमळ आधार असूनही रमाबाई किती ताणाखाली हे दिवस घालवत होत्या, हे इथे जाणवते. पण हे सर्व रमाबाई निमूटपणे सोसत होत्या असे दिसते.

रमाबाईंच्या सभेला जाण्याने घरात जो रागाचा उद्रेक होताना दिसतो, त्यामागे परंपरागत रुजलेले बऱ्या-वाईटाबाबतचे संस्कार जसे आहेत तशीच मागे म्हटलेली असुरक्षिततेची भावना पण असावी. ही भयाची भावना रागाच्या भरात बोलल्या जाणाऱ्या शब्दातून सहजपणे डोकावते. रमाबाई सभेहून आल्या की त्यांच्या वन्सं म्हणत-

"सभेला जाण्याचा नाचरेपणा हिलाच पाहिजे. आमच्या पहिल्या वहिनींनी... आमच्या मर्जीकरता कितीतरी रागे भरणे सोसले, पण जुन्या रीतीला सोडले नाही. म्हणून आम्ही पंचवीस माणसांनी मानाने दिवस काढले. मी यजमानीण हा विचार तिच्या अष्टांगीही शिवला नाही... ती जहागिरदाराची मुलगी नसली तरी काही एवढी भिकाऱ्याची नव्हती. दादांनी एक गोष्ट

करावयास सांगितली, की हिची तीन गोष्टी करायची तयारी आहे. अशा ठिकाणी आमचा मान कसा राहावा व टिकाव कसा लागावा ?"[३८]

वरील संतापातून विधवा स्त्रियांच्या मनातील असुरक्षितता स्वच्छपणे जाणवते. तसेच परिस्थितीने लादलेल्या परस्वाधीनतेतून ही पझेसिव्ह वृत्ती घडत असावी, हेपण जाणवते.

ह्या विरोधात आणखीपण काही गैरसमजुतींचे पदर अडकलेले दिसतात, आणि हिराबागेतील सभेनंतरच्या उद्रेकातून त्याचे दर्शन घडते. त्याचे असे घडले--

मुलींच्याकरता हायस्कूल पाहिजे म्हणून हिराबागेत स्त्री-पुरुषांची एक सभा भरली होती. त्या वेळी माधवरावांच्या सांगण्यावरून त्यांनीच लिहून दिलेला व तयारी करून घेतलेला इंग्रजी ॲड्रेस रमाबाईंनी प्रथमच सभेत वाचला. ही बातमी घरी गेल्यावर घरात जणू स्फोटच झालेला दिसतो. सासू, नणंद वगैरेंनी रमाबाईंवर टीकेचा, आरोपांचा भडीमार केला. दुसरेपणाची बायको म्हणून फार लाडावलेली आहे, परपुरुषांसमोर सभेत बोलले म्हणजे अब्रू सोडून देणे आहे, वगैरे आरोप केले गेले. शेवटी स्वतः माधवरावांना उद्देशून ताई सासूबाई म्हणतात--

"येवढ्या दोन हजार मंडळींत बायकोने इंग्रजी वाचले त्याची लाज कशी वाटली नाही ? डोक्यावरचे पागोटे तरी राहिले कसे ?.... बायकांना शिकवले म्हणजे त्या उद्धट होतात. त्यांच्या डोळ्यांस पाणी राहात नाही.... पुरुषांसारखे इंग्रजी शिकून काय चाकरी करावयाची आहे ? कोणतीही गोष्ट मर्यादेबाहेर गेली, की त्याचा परिणाम असाच व्हायचा ! आता तरी ते इंग्रजी सोडून द्या. आजच्या मुलींनी बेताने वागले नाही, तर त्या आळ्यांत रहावयाच्या नाहीत."[३९]

वरील भाषणातून तत्कालीन स्त्रीच्या मनातील काही समजुतींची कल्पना येते. एकतर अर्थार्जन हे पुरुषांनीच करायचे. नोकरी करून पैसे कमावणे हे बाईचे काम नव्हे, ही ठाम समजूत दिसते. दुसरे म्हणजे शिक्षण घ्यायचे ते केवळ पोटापाण्याच्या उद्योगासाठीच. शिक्षणातून व्यक्तित्व विकासाची, वाचनाच्या आनंदाची प्राप्ती होऊ शकते, ही कल्पना तत्कालीन बहुसंख्य स्त्री-पुरुषांना आलेली दिसत नाही. त्यामुळे रमाबाईंच्या सभाधीटपणाचे, हुशारीचे कौतुक वाटण्याऐवजी त्याची बोळवण स्वेच्छाचारात केलेली दिसते. सून मडमेसारखी शिकून, वागून कुळाला बट्टा लावणार, असेच भय त्यांना वाटू लागलेले दिसते.

डॉ. आनंदीबाई जोशी जेव्हा सुरुवातीला नवऱ्याच्या आग्रहाने शिकू लागल्या, तेव्हा त्यांच्या सासऱ्याने पण असेच भय प्रगट केलेले दिसते. ते म्हणतात-"बायकांच्या जातीला स्वतंत्रता व विद्या काय कामाची ? त्यांना विद्या शिकल्यावर पुरुषांनी काय करायचे ? मग घरातले काम कुणी करायचे ?"[४०]

शिक्षणाने स्त्रिया चवचाल बनतील; घर, कुटुंबाची मर्यादा ठेवणार नाहीत; घरकाम करणार नाहीत; अर्थार्जन करू लागल्या तर पुरुषांना कामधंदा उरणार नाही, अशा प्रकारच्या अनेक आशंका त्या काळी शिक्षणाविषयी स्त्री-पुरुषांच्या मनात दिसतात. ह्याची कल्पना असल्यामुळे पुढे रमाबाई आपल्या वागण्यातून अशा आरोपांना वाव मिळणार नाही, ह्याबद्दल

जागरूक राहिल्या असे दिसते व इतर स्त्रियांना पण त्या तसा उपदेश करत असत.

अभ्यासानिमित्त नवराबायकोचे एकत्र बराच वेळ काढणे, सभेच्या निमित्ताने एकत्र बाहेर वावरणे, ह्यातून पति-पत्नीतील जवळीक वाढेल व परिणामी घरातील कर्त्या पुरुषाचे हे वाढते सहजीवन एकत्र कुटुंबातील स्थैर्याला घोकादायक ठरेल, ही जाणीव तीव्रपणे कुटुंबातील आश्रयकर्त्यांना होऊ लागलेली दिसते.

ह्याचा प्रत्यय पुढे घडलेल्या प्रसंगातूनही येतो.

रानड्यांच्या घरात गरीब विद्यार्थी शिकायला राहात असत. हिशेब, खरेदी वगैरे वरकामे करत. अशांपैकी एका विद्यार्थ्याने दोन-चारशे रुपयांची अफरातफर करून तो पळून गेला. जेवायची वेळ झाल्यावर ही गोष्ट मागाहून कानावर घालायची, असे घरातल्या कर्त्या स्त्रियांनी ठरवले. रमाबाईंना हे लक्षात न आल्याने त्यांनी लगेच ती गोष्ट रानड्यांच्या कानावर घातली. ह्यावरून संतापलेल्या ताई सासूबाई म्हणतात-"अगं बिजवराच्या बायका....अशाच चहाड्या सांगून मर्जी संपादन करायच्या...दिवसेंदिवस एकेक गुण येत चालला आहे....इतके दिवस कितीही बोलले तरी राग येत नसे, आता तोही येत चालला आहे. उत्तर देत नाही, पण आठरल्यासारखी होते. एकेक होते आहे ते बरेच होत आहे. सभेला जाऊ लागल्या आहेत, इंग्रजी शिकत आहेतच. दोनचार म्हाताऱ्या घरात आहेत, त्या टाकून दे म्हणावं...मग साहेब आणि मडम हातात बुके घेऊन....बसा म्हणावे....दिवसेदिवस तिला वाटू लागले आहे की आपण घरची यजमानीणच आहोत...नफा नुकसान जे काय होते आहे ते आपलेच होत आहे. पण तिला म्हणावं अशी फुशारून जाऊ नकोस. आम्ही जिवंत आहोत तोपर्यंत तुझे काही चालू देणार नाही... चोरी झाली ते हिच्या बापाला पैसे भरावे लागले की काय ?"[४१]

वरील रागावण्यात भयाच्या जाणीवेबरोबरच एकत्र कुटुंब पद्धतीतील स्त्रीच्या कुचंबणेचे काही पैलू व्यक्त होताना दिसतात. एकतर शेवटच्या वाक्यातून असे दिसते, की बाहेरून येणाऱ्या सुनेचे 'सासर' हे तिचे हक्काचे घर मानले जात नव्हते. ती अद्याप माहेरच्याच घराचा भाग मानली जात असावी. तिचा नवरा मुख्य मिळवता व कर्ता पुरुष असला, तरी सासरच्या घरच्या नफा-नुकसानीत तिला रस घेण्याचे स्वातंत्र्य नव्हते. म्हणजे बायकोला अर्धांगी म्हणायचे ते नावापुरते. नवऱ्याच्या मिळकतीशी तिचा सरळ हक्क, संबंध नाही. त्या घरात अनेक वर्षे खस्ता काढल्यानंतर...ती घरातली म्हणून सामावली जात असावी.

दुसरे म्हणजे शिक्षणाने, हुशारीने स्त्रीची अस्मिता जागी होणार, तिला आपल्या हक्काची जाणीव होणार, ती मुकाट्याने अपमान, अन्याय सोसणार नाही, असे इतरांना भय वाटत होते. आणि हे त्यांना नको होते. पूर्वी रमाबाई बोलणी ऐकताना उलट उत्तर न देता एकीकडे जाऊन मुळूमुळू रडत बसत. आताही त्या उलट उत्तरे देत नसल्या, तरी त्यांना आतून ह्या अन्यायाचा राग येऊ लागला होता व तो त्यांच्या 'आठरल्या वागण्यातून' ध्वनित होऊ लागला होता, हे दिसून येते. रमाबाईंमधल्या जागृत होत चाललेल्या अस्मितेचे हे द्योतक मानावे काय ? कसेही असो, पण रमाबाई किती मनस्ताप झाला तरी वडिलधाऱ्यांना कधीही प्रत्युत्तर करताना दिसत नाहीत. त्यांच्या सासूबाई ह्याबद्दल नवलाने म्हणतात- "रागवलो तरी एक चकार काढत नाही.

घरात किती गरीब दिसते, पण बाहेर पडा.... तिला इतका कुठला घीटपणा येतो !"[४२]

"फार झाले म्हणजे आपल्याशी मुळूमुळू रडून मनाला असह्य झालेला भार हलका करावयाचा, एवढाच मार्ग मला माहीत होता," असे रमाबाई म्हणतात.[४३] त्याचप्रमाणे नवऱ्याजवळ पण त्यांनी कधी तक्रार केलेली दिसत नाही.

ह्याचे कारणपण त्यांनी एके ठिकाणी सांगितले आहे. त्या म्हणतात- "सासरी निघताना माझ्या वडिलांनी मला जवळ बोलावून उपदेश केला होता, की.... तू माझी मुलगी आहेस. आपल्या कुलीन घराण्याला शोभेल असे वाग. तुला कितीही त्रास झाला तरी सोस... कोणाचीही चहाडी नवऱ्याजवळ सांगत जाऊ नकोस. चहाडीने कुटुंबाचाच नव्हे, तर राज्याचा नाश होतो... सोशिकपणा हा तुझा गुण झाला म्हणजे खऱ्या किमतीला चढशील... उलट वागलीस तर मी फिरून तुला माहेरी आणणार नाही."[४४]

ह्यातील गर्भित धाक व अनुभवातून आलेले शहाणपण रमाबाईंच्या आयुष्यावर प्रभाव टाकून होते, असे दिसते. पुढे धाकाचा भाग मागे पडला तरी माहेरचे नाव खराब होऊ न देणे, ह्या संस्काराचा धाक तत्कालीन स्त्रीवर सदैव राहात असावा, असे दिसते. लग्नानंतर सासर हेच स्त्रीचे खरे घर. तिथे तिने आपल्या आवडीनिवडी, व्यक्तिविशेष सर्व विसरून त्या घराचे एकत्रपण टिकवले पाहिजे, ही वडिलांची शिकवणूक दिसते. त्यामुळेच की काय, पं. रमाबाईंसारखी प्रखर व्यक्तिनिष्ठा... रमाबाई रानड्यांच्यांत रुजलेली दिसत नाही.

पण रमाबाई जरी सांगत नसल्या तरी त्यांना होणारा मनःस्ताप न्यायमूर्तींच्या लक्षात येत असे, हे आपण पाहिलेच आहे. 'आज तू अशी का दिसतेस ? तुला काही होतंय का ?' अशा आस्थेच्या स्वरात ते रमाबाईंची चौकशी करत. त्यांनी स्वतः उडवाउडवीची उत्तरे दिली तरी मग ते त्यांची वेळोवेळी समजूत काढत. म्हणत- "त्यांच्या वेळेच्या समजुतीप्रमाणे त्या बोलतात. त्यांत त्यांचा दोष नाही. आपण त्यांना दुखवायचे नाही. उत्तर द्यायचे नाही, वाटेल ते बोलणे एकूण घेणे हे त्रासाचे आहे हे मी समजतो, पण आपण सोशिकपणात व धीमेपणाने ते सहन केले पाहिजे. हा सोशिकपणा जन्मभर आपल्याला उपयोगी पडेल.... काही न बोलता खरे व योग्य दिसेल ते मात्र करायचे सोडायचे नाही, हे पक्के लक्षात ठेव !"[४५]

आपल्या पुढील आयुष्यात व कर्तृत्वास रमाबाईंनी कडकडीत तत्त्वनिष्ठेपेक्षा नरमाईच्या धोरणानेच आपले इष्ट ध्येय पुढे नेले, त्यामागे हीच भूमिका ठेवलेली दिसते.

इथे एक प्रश्न मनात येतो, की नवऱ्याच्या इच्छेखातर रमाबाई ह्या सर्व गोष्टी करू लागल्या होत्या... त्याबद्दल त्यांना वेळोवेळी बोलणी खावी लागत होती. अशा वेळी रानड्यांनी कधीही त्यांची बाजू घेतलेली किंवा मोठ्या बायकांची समजूत काढलेली दिसत नाही. ह्याबद्दल रमाबाईंना कधीच वैषम्य वाटले नसेल का ?

ह्या दृष्टीने शोध घेता त्यांच्या 'आठवणीं'त फक्त एके ठिकाणी त्यांच्या मनाची प्रतिक्रिया व्यक्त झालेली दिसते. रमाबाईंच्या हिराबागेतील ॲड्रेस वाचण्याबद्दल घरात गहजब झाला. ती आठवण लिहून झाल्यावर रमाबाई लिहितात- "तिने आपण होऊन वाचले नाही. मी सांगितले म्हणून वाचले, इतके जरी स्वतःम्हटले असते, तरी मला पुरे होते. पण तसे काही झाले नाही."[४६]

वाक्य फार बोलके आहे. रमाबाईंची पतिभक्ती पाहता ह्याहून अधिक स्पष्ट शब्दांत त्या आपली खंत व्यक्त करण्याची शक्यता वाटत नाही. पण आपल्यावर निष्कारण होणाऱ्या आरोपाचे निराकरण पतीकडून व्हायला हवे होते, असे त्यांना एकदा तरी वाटून गेलेले दिसते.

परंतु ह्या बाबतीतली रानड्यांची भूमिकापण लक्षणीय दिसते. मुळात रानड्यांचा स्वभाव अहंकारी नव्हता. स्वतः रमाबाई म्हणतात- "माझ्या बायकोने अमुक तऱ्हेने वागावे किंवा अमुक मला पसंत नाही, असे मालकाच्या डौलाने मीपणाचा शब्द कधीही उच्चारावयाचा नाही, असा नियम होता."[४७]

त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे आपल्या मध्ये पडण्याने, रमाबाईंचा जाच कमी होण्याऐवजी कदाचित आणखीनच वाढेल हेपण त्यांना जाणवले असावे. त्या काळी बायकोची बाजू घेणे दूरच, पण चारचौघात बायकोशी बोलणे हेदेखील संमत नव्हते. तसे करणे म्हणजे कुटुंबात असंतोष व कटुता वाढविणेच होते व हे रानड्यांच्या वृत्तीत बसण्यासारखे नव्हते. तसा काहीसा अनुभव त्यांनी घेतला होता. मागे पाहिलेल्या विद्यार्थ्यांच्या अफरातफरी प्रसंगाच्या वेळी घरातील वडील बायकांचे अकारण संतापणे ऐकल्यावर, किंचित तोल गमावून रानडे प्रथमच बायकोची कड घेऊन एक-दोन वाक्ये बोलले. त्या वेळी रमाबाईंच्या सासूबाई घरातून निघून जाण्याची भाषा बोलू लागल्या. तेव्हा रानड्यांना कसे अपराधी वाटून त्यांनी त्यांची क्षमा मागितली व परोपरीने विनवणी करून त्यांचा राग शांत केला, ह्याचे सविस्तर वर्णन रमाबाईंनी आपल्या 'आठवणीं'त केलेले आहे.[४९] पुढे त्या लिहितात- "आमच्या घराण्यात बायकामाणसांना मानाने व मर्यादेने वागविण्याची पहिल्यापासून चाल आहे. त्यात वडील बायकांना... उत्तर देऊन अमर्यादा करावयाची नाही, अशी मामंजींची व 'स्वतः'ची ताकीद असे."[४९]

त्यामुळे बायकोची बाजू घेऊन तिला आधार देण्याऐवजी तिची सौम्यपणे समजूत काढून, तिला बळ देणेच त्यांना अधिक श्रेयस्कर वाटलेले दिसते. घरातील स्त्रियांचे रागावणे मुकाट्याने ऐकून वर माडीवर आल्यावर ते त्यांना समजावीत- "ताईचा, अक्काचा स्वभाव कडक आहे. त्याला उपाय नाही. अशा माणसांना उत्तर ने देणे बरे. मीसुद्धा त्यांचे बोलणे ऐकून घेतो, हे तू पाहात नाहीस का?... इतर मंडळी कितीही बोलली तरी मी तुला आहे ना?"[५०]

रानड्यांच्या ह्या बोलण्यातून त्यांच्या जीवनदृष्टीची काहीशी कल्पना येते. एकदा आपली माणसे म्हटली, की त्यांच्या गुण-दोषांसकट त्यांचा स्वीकार करायला हवा, असे त्यांचे धोरण दिसते. त्यामुळे जो त्रास होईल तो ते स्वतः मुकाट्याने सोसताना दिसतात. त्याचबरोबर घरातील कर्ता पुरुष ह्या नात्याने, पत्नीला होणाऱ्या त्रासात तिलापण प्रेमाचा आधार देताना दिसतात.

रानड्यांच्या ह्या शब्दांतून रमाबाईंना पण पतीच्या प्रेमाची ग्वाही मिळालेली दिसते आणि त्यामुळे त्यांच्या मनात नाराजी रेंगाळलेली जाणवत नाही. आपल्या 'आठवणीं'त त्या सांगतात- "असे प्रसंग वारंवार येत गेल्यामुळे वडील बायका कितीही बोलल्या, तरी ते सर्व सोसून 'स्वतः'ला आवडत असत त्याच गोष्टी करण्याचा मी क्रम ठेवला."[५१]

एकंदरीत पाहता रानड्यांचे धोरण त्या काळाच्या संदर्भात उभयपक्षी फायद्याचे ठरलेले

दिसते. मात्र रानड्यांच्या स्वभावातील गंमतीची अशी एक गोष्ट इथे नोंदवावीशी वाटते. आपल्या बायकोने अमुक तऱ्हेने वागावे, असे जरी त्यांनी स्पष्टपणे कधी सांगितलेले दिसत नसले तरी, रमाबाई म्हणतात- "आपण न बोलता, न सांगता आपल्या माणसाने (मी) मात्र आपल्याच धोरणाने वागले पाहिजे, अशी स्वतःच्या मनाची अट असे."[५२]

त्यांच्या ह्या वृत्तीचे दर्शन घडवणारे अनेक प्रसंग आपल्याला त्यांच्या 'आठवणीं'त भेटतात. एके ठिकाणी रमाबाई लिहितात- "रोज दुसरे प्रहरी ताजी फळे, बदाम मीच घेऊन गेले पाहिजे असे असल्यामुळे मीच नेऊन देत असे."[५३]

किंवा पं. रमाबाईंची व्याख्याने जेव्हा चालत तेव्हा रानडे पत्नीला आठवण देताना म्हणतात- "आज शनिवार आहे. सभेला जायची तुला आठवण आहे ना ? वेळ चुकवू नकोस– काही सबब सांगितलीस तर मला खपायचे नाही. सुरवातीला त्रास होणारच. पण तो सोसला पाहिजे."

रमाबाई पुढे लिहितात- "असे बजावल्यावर मी लागलीच खाली जाऊन... 'मी जाऊन येते', असे जीव मुठीत धरून वन्संला सांगून एकदम बाहेर पडायची."[५४] किंवा, "खर्च जास्त करायचा झाला तर विचारल्यावर कधी नाही म्हटले नाही, पण विचारल्याशिवाय अधिक खर्च केला तर खपत नसे... व त्याप्रमाणे चालण्यात मीही कधी कसूर केली नाही. त्यामुळे आम्हा उभयतांत राग किंवा असंतोष उत्पन्न होण्याचा प्रसंग येत नसे."[५५]

अशी वाक्ये रमाबाई आपल्या आत्मकथनात सहजपणे लिहून जाताना दिसतात. त्यातली पुरुषसत्ता त्यांना बोचताना दिसत नाही. रानडेसुद्धा, विचाराने सुधारक व उदारमतवादी असूनही पत्नीच्या बाबतीत थोडीशी पारंपरिक नवऱ्याची भूमिका घेताना दिसतात.

इथे एक पुन्हा कुतुहलवजा प्रश्न मनात उभा राहातो, की माधवराव एवढे थोर दृष्टीचे सत्पुरुष नसते तर रमाबाईंनी आपली पतिभक्ती, पतीला रुचेल तेच करण्याचे व्रत, कसे स्वीकारले असते ? आनंदीबाई जोश्यांप्रमाणे त्यापण पतिनिष्ठेच्या मर्यादेतच का होईना, पण वेगळा विचार मांडू लागल्या असत्या का ?

अर्थात अशा प्रश्नांना उत्तरे नसतात.

एवढे मात्र खरे, की रमाबाईंनी व्यक्तिनिष्ठा व कुटुंबाचे स्थैर्य ह्यांत समतोल राखण्यासाठी आपल्या भारतीय मानसिकतेला धरून निषेधाच्या व पर्यायाने संघर्षाच्या वाटा टाळलेल्या दिसतात.

* *

संदर्भ सूची

१. श्रीमती रमाबाई रानडेः मा.श्री.विद्वांस,पृष्ठ ३३
२. आमच्या आयुष्यातील आठवणीः रमाबाई रानडे,पृष्ठ २७,२८
३. श्रीमती रमाबाई रानडेः मा.श्री.विद्वांस,पृष्ठ ३५
४,५,६. आमच्या आयुष्यातील आठवणी : रमाबाई रानडे, पृष्ठ ३१,९५
६. श्रीमती रमाबाई रानडेः मा.श्री.विद्वांस,पृष्ठ ३६
७. आमच्या आयुष्यातील आठवणीः रमाबाई रानडे,पृष्ठ ४०
८. कित्ता : पृष्ठ ४० ते ४४
९. कित्ता : पृष्ठ ४१
१०. कित्ता : पृष्ठ ४१,४२
११. कित्ता : पृष्ठ ७७
१२. कित्ता : पृष्ठ ७९
१३. कित्ता : पृष्ठ ३९
१४. कित्ता : पृष्ठ ४४
१५. कित्ता : पृष्ठ ४१
१६. कित्ता : पृष्ठ ४३
१७. कित्ता : पृष्ठ ४०
१८. कित्ता : पृष्ठ ४३
१९. कित्ता : पृष्ठ ५२
२०. कित्ता : पृष्ठ ५४
२१. कित्ता : पृष्ठ ९५
२२. कित्ता : पृष्ठ ९६
२३,२४ कित्ता : पृष्ठ ९७ ते ९९

२५. रमाबाई रानडे: उमाकांत, पृष्ठ ३२
२६. आमच्या आयुष्यातील आठवणी: रमाबाई रानडे, पृष्ठ १००
२७. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री. विद्वांस- पृष्ठ - ५४
२८. आमच्या आयुष्यातील आठवणी: रमाबाई रानडे, पृष्ठ ७४
२९. आमच्या आयुष्यातील आठवणी: रमाबाई रानडे, पृष्ठ ७५.
३०. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री. विद्वांस, पृष्ठ ५६
३१. आमच्या आयुष्यातील आठवणी: रमाबाई रानडे, पृष्ठ ७५.
३२. ही घटना 'आठवणीं'त रमाबाईंनी चुकून मुंबईच्या वास्तव्यात घातली आहे, असे त्यांचे नातू म्हणतात. आपल्या पुस्तकातही त्यांनी त्याप्रमाणे बदल केलेला दिसतो.
३३. आमच्या आयुष्यातील आठवणी: रमाबाई रानडे, पृष्ठ ८१.
३४. कित्ता : पृष्ठ ८३
३५. कित्ता : पृष्ठ ८६
३६. कित्ता : पृष्ठ ८७
३७. कित्ता : पृष्ठ ८४
३८. कित्ता : पृष्ठ ८९,९०
३९. रमाबाई रानडे: उमाकांत पृष्ठ, २१
४०. कित्ता : पृष्ठ ९०,
४१. कित्ता : पृष्ठ १०५
४२. कित्ता : पृष्ठ ४२
४३. कित्ता : पृष्ठ ८६
४४. कित्ता : पृष्ठ ९०
४५. कित्ता : पृष्ठ ९१
४६. कित्ता : पृष्ठ ८४
४७. कित्ता : पृष्ठ १०५
४८. कित्ता : पृष्ठ १०५,१०६
४९. कित्ता : पृष्ठ ९१
५०. कित्ता : पृष्ठ ९१
५१. कित्ता : पृष्ठ ५०,५१
५२,५३,५४. कित्ता : पृष्ठ ८५,८७



प्रकरण ३ रे

स्नेहपर्व

रमाबाईंची जडणघडण ही मुख्यतः न्यायमूर्ती रानड्यांच्या व्यक्तिमत्त्वाने व भोवती निर्माण झालेल्या सुधारकी वातावरणातून झालेली दिसते. तथापि पं. रमाबाईंचा सहवास हादेखील त्यांच्या व्यक्तिमत्व घडणीत परिणामकारक झालेला असावा असे वाटते. म्हणून त्यांच्या व पंडिताबाईंच्या सहवासाचा थोडा आणखी आढावा घेऊ.

पं. रमाबाई १८८२ मध्ये महाराष्ट्रात आल्या व पुढे १८८३ मध्ये इंग्लंडला गेल्या. ह्या एक दीड वर्षातील त्यांचा व रमाबाईंचा सहवास व त्यातून निर्माण झालेल्या स्नेह आपण पाहिला आहे.

पं. रमाबाई महाराष्ट्रात येईपर्यंत कोणत्याही प्रकारचे घराबाहेरच्या कर्तृत्त्वाचे दरवाजे स्त्रियांसाठी उघडलेले नव्हते. त्यामुळे स्त्रिया स्वतंत्रपणे काही जाहीर कर्तृत्वं करताना दिसत नाहीत. पुराणे सांगणाऱ्या नाशिकच्या अनुसूयाबाईसारख्या एखाद-दुसरा अपवाद ऐकू येतो.

पण पं. रमाबाईंनी स्त्रियांच्या जागृतीसाठी स्थापन केलेल्या 'आर्य महिला समाजा'मुळे कुटुंबाबाहेरील स्त्री-समुदायाशीही, स्त्रीची काही बांधिलकी असू शकते, हा विचार समाजात थोडाफार रुजण्यास मदत झाली असावी.

रमाबाई रानडे ह्या 'आर्य महिला समाजा'तील सभांना, भाषणांना जाऊ लागल्या होत्या. 'समाजा' चे पडेल ते काम करू लागल्या होत्या, हे आपण पाहिलेच आहे. ह्या संबंधात एक आठवण काशीबाई कानिटकरांनी सांगितली आहे. त्या म्हणतात- "पं. रमाबाईंच्या आर्य महिला समाजाच्या स्थापनेच्या वेळी घरोघर जाऊन रमाबाई जातीने बायकांना निमंत्रित करीत होत्या. त्यावेळी एका पुढाऱ्याच्या पत्नीने, 'तुम्ही सुधारक बायकांनी आता तोंडाला रंग लावून समाजात नाच करण्याचे तेवढे राहिले आहे. तेवढे करून टाका म्हणजे तुमचे हात गगनाला पोहोचतील' असे मनाला झोंबणारे, डोळ्यात टचकन् पाणी आणणारे शब्द उच्चारले, परंतु बरोबरची खमंगबाई [स्वतः काशीबाई] काही भांडण काढेल म्हणून चटकन तिथून बाहेर

पडल्या."[१] वरील प्रसंग रमाबाईंच्या स्वभाव व धोरणावर प्रकाश टाकतो, असे वाटते.

पुढे १८८३ मध्ये पं. रमाबाई इंग्लंडला निघून गेल्या व सहा महिन्यांतच त्यांनी धर्मांतर केले. त्या वेळी अनेक बाजूंनी त्यांच्यावर कसे टीकेचे काहूर उठले होते, ते आपण पाहिले आहे. त्या टीकेत शत्रू आणि मित्र दोघेही सामील होते. अशा वेळी मन मोकळे करून आपली बाजू मांडणारे सविस्तर पत्र पंडिताबाईंनी रमाबाई रानड्यांनाच लिहिले होते, तेही आपण पाहिले आहे.

रमाबाई रानड्यांच्या समजूतदार, उदारमनस्कतेची खात्री पंडिताबाईंना वाटली असावी, असे दिसते. स्त्री-उद्धाराच्या जाणिवेने भारलेल्या ह्या दोन स्त्रियांमधील हे जिव्हाळ्याचे नाते पुढे शेवटपर्यंत सर्व प्रकारच्या वादळांत टिकलेले दिसते.[२]

पुढे सहा वर्षे इंग्लंड व अमेरिकेत काढून १८८९ मध्ये रमाबाई मुंबईस परत आल्या. परतल्यावर त्यांनी लगेच मार्चमध्ये मुंबईत तरुण विधवा स्त्रियांसाठी 'शारदाश्रम' ह्या शाळेची स्थापना केली. त्या शाळेच्या सल्लागार समितीत रानडे व प्रार्थना समाजातील इतर काही मंडळी सामील झाली होती. पं. रमाबाई ख्रिश्चन झालेल्या होत्या. पण त्याचा बाऊ न करता, त्यांच्या स्त्री-उद्धाराच्या कार्यावर नजर ठेवून ही मंडळी त्यांना पाठिंबा देताना दिसतात. रमाबाईंनी पण पं. रमाबाईंशी स्नेहाचे संबंध ठेवलेले दिसतात. पुढे काही दिवसांतच शारदासदन मुंबईहून पुण्यास गेले. १८९२ मध्ये शारदासदनाची स्वतःची वास्तू पुण्यात उभी झाली. त्यांच्या उद्घाटन सोहळ्यात रमाबाईंनी जे भाषण केले ते वाचण्यासारखे आहे. त्या वेळच्या समारंभाचे वृत्त 'ज्ञानोदया'त सविस्तर आले आहे. बातमीदार लिहितो- "त्या समारंभात डॉ. भांडारकर बोलले, रमाबाई रानडे अध्यक्षा होत्या. त्या म्हणाल्या- 'सहा वर्षांनंतर अमेरिकेतील मित्रमंडळींशी रमाबाईंनी केलेला करार संपेल. तर त्यापूर्वीच आपण आतापासून या सदनास मदत करण्याचे उद्योगास लागले पाहिजे. आपण एखादी वस्तू बाजारातून उधार आणली व तिची किंमत लवकर पोहोचवण्याची तजवीज जर केली नाही, तर उधारीची मुदत संपल्यावर एकदम सर्व रक्कम देणे आपणास जड जाते. तसे सहा वर्षांनंतर जी गोष्ट आपणास करावी लागणार आहे, तिची तरतूद आतापासून थोडी थोडी करू लागले पाहिजे.... एखाद्या लहान मुलीचा खर्च भागविण्याचे एकेकाने मनात आणले, तरी आपणास थोडा खर्च होऊन पंडिताबाईंस मोठी मदत होईल.' "[३]

ह्या भाषणातून दिसणारी रमाबाईंची कळकळ ही केवळ माधवरावांच्या इच्छेचा निव्वळ प्रतिध्वनी वाटत नाही. शाळा जरी पं. रमाबाईंनी स्थापन केली होती तरी तो एकूण स्त्रियांच्या उन्नतीसाठी चाललेला प्रयत्न असल्याने रमाबाईंना ते आपलेच काम वाटत होते, हे त्यांच्या उद्गारांतून दिसून येते. पुढे शारदासदनावरील धर्मांतराचे किटाळ पराकोटीला जाऊन न्यायमूर्ती रानडे, आगरकर वगैरे सुधारकांनी पण शारदासदनाशी असलेला आपला प्रत्यक्ष संबंध तोडून टाकला.

पुढील सात वर्षांच्या कालखंडात पं. रमाबाईंच्या शारदासदनावर विविध प्रकारचे आरोप, टीका, विरोध सातत्याने चालले होते. त्याबाबत माधवरावांची नेमकी भूमिका काय

होती, हे स्पष्टपणे नमूद झालेले आढळले नाही. पं. रमाबाईंच्या कार्याला अनुकूल वा प्रतिकूल कोणतेच भाष्य माधवरावांनी केलेले दिसत नाही.

धर्मांतराच्या ह्या वादळात पं. रमाबाई एकाकी पडल्या होत्या. अशा काळात देखील रमाबाई रानड्यांनी मात्र पं. रमाबाईंशी असलेला स्नेह तोडून टाकलेला दिसत नाही. उलट त्या शारदासदनात उरलेल्या अनाथ विधवांना आठवणीने दिवाळीचे फराळाचे घेऊन जाताना दिसतात. ह्याबाबत पं. रमाबाईंनी सिस्टर जिराल्डिनला पत्रातून कळवलेल्या हकीगतीत शेवटी लिहितात- "ज्या समाजात सणावारी विधवांचे दर्शन अशुभ म्हणून टाळले जाते, त्याच समाजातील एक स्त्री दिवाळीच्या दिवशी गोडधोड घेऊन आवर्जून बहिष्कृत अशा संस्थेतील विधवांना भेटायला जाते, ही घटना फार आश्चर्यकारक आहे. विधवांना मिळालेली ही पहिलीच मान्यता होय."[४]

इथे सामाजिक रूढींनी विधवेचे केलेले अवमूल्यन रमाबाईंनी नाकारलेले दिसते. त्या स्वतः निरपराध दुर्दैवी विधवांना भेटायला जाताना दिसतातच. पण त्याही पुढे जाऊन, शारदा-सदनात गेलेल्या मुली ख्रिश्चन धर्माकडे वळतात हे ठाऊक असूनही, एका अनाथ विधवा मुलीला सासरच्या जाचातून सोडवून नेण्यासाठी पं. रमाबाईंनाच त्यांनी विनंती केलेली दिसते व त्यांनी विधवेला ह्या साहसात मदतही केलेली दिसते.

ही हकीगत सिस्टर जिराल्डिनला कळवताना पं. रमाबाई लिहितात- "रमाबाई दिवाळीला आल्या त्या नुस्ते फराळाचे व भेटी घेऊन आल्या नाहीत, तर त्याहून गोड बातमी घेऊन आल्या. एका तरुण विधवेला आमच्याकडे यायचे आहे... त्यांच्या सांगण्याप्रमाणे आम्ही दुसऱ्या दिवशी सूर्यास्त झाल्यावर त्यांच्या घरी गेलो. रमाबाईंनी आमचे जिव्हाळ्याने स्वागत केले. आम्ही आनंदात गप्पा मारत असताना रमाबाईंच्या दोन नणंदा त्या तरुण विधवेला आणायला गेल्या. दहा मिनिटांतच अठरा वर्षांच्या सावळ्या, चेहऱ्यावर सोसलेल्या दुःखाच्या स्पष्ट खुणा वागवणाऱ्या एका मुलीला घेऊन आल्या. तिच्या हातात चार महिन्यांचे मूल होते. तिला बसायला सांगून रमाबाईंनी तिला बोलावण्याचा उद्देश व आमच्या शाळेची सर्व परिस्थिती तिला समजावून सांगितली व मग तुला तिथे जायचंय का म्हणून विचारले. तिने तात्काळ आतुरतेने होकार दिला. त्यावर रमाबाईंनी तिला पुन्हा विचारले, की 'आपण काय निर्णय घेतोय ह्याचा नीट विचार केला आहेस का ? घरी जाऊन रात्रभर पुन्हा एकदा फेरविचार करायचा आहे का ? घरून काही कपडे किंवा इतर काही लागणारे सामान घ्यायचंय का ?' पण त्या गरीब गांजलेल्या मुलीने तत्काळ नकार देऊन, 'मला घरी जायचेच नाही. मला शाळेत जाऊ द्या,' असे म्हटले."[५]

त्या दुर्दैवी ब्राह्मण मुलीची सविस्तर हकीगत देऊन पुढे पं. रमाबाई लिहितात- "रमाबाई रानड्यांनीच ह्या दुर्दैवी मुलीला आमच्या शाळेची माहिती दिली. तथापि, तिला एकटीला शाळेत येणे जमेना. तेव्हा शेजारच्या काही जुन्या मताच्या बायकाच तिला रमाबाई रानड्यांकडे घेऊन आल्या व मग रमाबाईंनी तिला शारदासदनात पोहोचविले."

'रमाबाई रानड्यांच्या, अत्यंत सनातनी विचाराच्या, विधवा सासू व नणंदेला पण ती

आमच्याकडे सुरक्षित पोहोचल्यावर फार आनंद झाला,' ही हकीगत वाचताना, पं. रमाबाईंनी पत्राच्या शेवटी म्हटल्याप्रमाणे खरोखरच आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नाही. मनात प्रश्न येतो, त्या तरुण विधवेच्या करुण अवस्थेमुळेच ह्या जुन्या विचारांच्या स्त्रियांच्या मनात हा उदार विचार आला, की रानडे पतिपत्नींच्या समजूतदार वागण्यामुळे हे मतपरिवर्तन घडून आले ? पंडिता रमाबाईंच्या नावाने तिटकाऱ्याने बोलणाऱ्या ह्या घरातील विधवा स्त्रिया आपणहून एका विधवेला पं. रमाबाईंच्या विवाद्य शाळेत पाठवण्यास मदत करतात, ही घटना खरोखरच विचार करण्यासारखी वाटते.

रमाबाईंच्या दृष्टीने तिच्या संभाव्य धर्मांतरापेक्षा एक व्यक्ती म्हणून तिची सन्मानाने जगण्याची संधी जास्त महत्त्वाची ठरली होती, असे दिसते.

ह्या कृतीला न्या. रानड्यांची प्रेरणा व संमती होती किंवा कसे ह्याविषयी निश्चित माहिती आढळत नाही. तथापि, रमाबाई रानड्यांची पतिश्रद्धा पाहता हा निर्णय घेण्यापूर्वी त्यांनी न्या. रानड्यांचा सल्ला घेतला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. विधवा स्त्रियांच्या दुर्दैवी अवस्थेविषयी रानड्यांची सहानुभूती व कणव रमाबाईंना परिचित होती. एकदा रानड्यांच्यासमोर मेडोज टेलरचे 'तारा' हे पुस्तक वाचताना घडलेला प्रसंग, त्यांनी आपल्या 'आठवणी'त सांगितला आहे.

त्या लिहितात- "या वेळच्या वाचनाच्या भागांत, तारेची वैधव्यस्थिती व तिच्या आईबापांच्या मनाची विव्हलता हे वर्णन वाचताना मला फार वाईट वाटून गहिवर आला आणि हुंदक्यामुळे पुढील वाचन बंद ठेवावे लागले. नंतर विधवांच्या एकंदर अत्यंत दुःखद व शोचनीय स्थितीबद्दल बोलणे निघाले. त्यात आमच्या समाजात काही चाली फार निर्दयपणाच्या व घातुक आहेत. त्यांचा परिणाम पर्यायाने दिवसेंदिवस जनतेवर घडून फार अहित होत आहे. पण हे समजेल तेव्हा खरे... हळूहळू समजेल, वगैरे गंभीरपणाचे व कळकळीचे न्यायमूर्तींचे भाषण चालले."

रमाबाईंची पण विधवेवरच्या करुण अवस्थेबाबतची प्रतिक्रिया कवि गिरीशांच्या 'अभागी कमल' ह्या काव्याच्या प्रस्तावनेत व्यक्त झाली आहे. त्या म्हणतात- "हिंदू विधवा म्हणजे घरातील पोतेरे ! त्यांनी घरातील कामे करत लोकांचे कर्णकटू हृदयभेदक टोमणे ऐकतच राहिलेले आयुष्य संपविले पाहिजे, अशी रूढी आहे. तिला घरातील कारभारांत कोणताही अधिकार नाही व घरातील एकाही वस्तूवर तिची सत्ता नाही. अशी परिस्थिती रूढीने पाठिंबा दिलेल्या व धर्म म्हणून स्तोम माजविण्यात आलेल्या नियमांनी उत्पन्न झालेली आहे."[६]

विधवेविषयी अशी सहानुभूती दोघांच्या मनात असल्यामुळे त्यांना पं. रमाबाईंच्या कार्याविषयी निर्विकल्प विश्वास वाटत असावा, असे दिसते. पुढे पं. रमाबाई केडगावला निघून गेल्या.

ह्यानंतर मात्र रमाबाई रानडे व पं. रमाबाई ह्यांच्यातले प्रत्यक्ष संबंध तुटल्यासारखे दिसतात. मात्र दोघीजणी मनातून एकमेकींविषयी आदर व स्नेह बाळगून असाव्यात. पुढे १९२१ मध्ये पं. रमाबाईंची कन्या मनोरमा अकाली मरण पावल्याचे वृत्त कळताच, रमाबाई

त्यांच्या सांत्वनासाठी म्हणून केडगावी गेल्या होत्या. त्यावेळी घडलेला प्रसंगपण दोघींच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणारा आहे.

ह्याविषयी त्यांचे नातू श्री. विद्वांस यांनी रमाबाईंच्या डायरीतील नोंद दिली आहे. ती अशी; "आनंदोबाई भट व मी पंडिताबाईंच्या समाचारास गेलो होते. त्या वेळी पंडिताबाईंनी मला विचारले, की 'मी तुमच्यासाठी प्रार्थना करू का ? हे ईश्वरा, माझ्या ह्या भगिनीला प्रकाशात आण !' त्यावर रमाबाईंनी ठामपणे उत्तर दिले, की 'मी प्रकाशातच आहे,' आणि मग सतत जवळ बाळगत असलेली न्यायमूर्तींच्या धर्मपर व्याख्यानाची प्रत बाहेर काढून त्याची प्रस्तावना वाचून दाखविली."[७] प्रस्तावनेत रमाबाईंनी पतीच्या ह्या व्याख्यानांना नंदादीपाची उपमा दिली आहे. परस्परांत स्नेह असला तरी श्रद्धेच्या बाबतीत दोघी आपापल्या भूमीवर पक्क्या स्थिर दिसतात.

पं. रमाबाईंच्या एकाकी जीवनात त्यांच्या येशूभक्तीने त्यांना जे मनोबल दिलेले दिसते, तसेच बळ रमाबाईंना त्यांच्या अविचल पतिभक्तीतून लाभले असावे असे वाटते. पुढे लवकरच पं. रमाबाई ख्रिस्तवासी झाल्या व ह्या स्नेहसंबंधाचा शेवट झाला.

पं. रमाबाईंच्या मृत्यूनंतर त्यांच्या चिटणीस मिस फुल्लर ह्यांना रमाबाईंनी तात्काळ सहानुभूतीपर पत्र पाठविले. त्यात त्यांनी आपल्या मैत्रिणीने, धर्म कोणताही स्वीकारलेला असो, पण स्त्रियांच्या उन्नतीसाठी जे कार्य केले, त्याबद्दल गौरव केला आहे.

स्त्री-जातीविषयी असणारा कळवळा व आपलेपणा हा ह्या दोघींच्या व्यक्तिमत्त्वांतील एक समान बंध होता असे दिसते.

* *

संदर्भ सूची

१. रमाबाई रानडे- उमाकांत,प्रस्तावना- पृष्ठ -११
२. पंडिता रमाबाई मॅकनिकॉल- पृष्ठ- ५३
३. ज्ञानोदय - ४ ऑगस्ट १८९२
४. लेटर्स अँड कॉरस्पांडँन्स ऑफ पंडिता रमाबाई : सिस्टर जिराल्डिन- पृष्ठ- २७५.
५. कित्ता : सिस्टर जिराल्डिन- पृष्ठ- २७६
६. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस- पृष्ठ - २८४
७. कित्ता : मा.श्री.विद्वांस- पृष्ठ- २९१

प्रकरण ४ थे

सहचरी

न्यायमूर्तींची ही बालवधू जसजसी वयाने, ज्ञानाने, वाचनाने व अनुभवाने मोठी होत गेली, तसतसे तिला स्वतंत्रपणे वावरण्याचे प्रसंग येऊ लागले. बदलीच्या गावी असताना शाळांना भेटी देणे, समारंभांना हजर राहणे, बायकांना हळदीकुंकू वा अन्य समारंभांनिमित्ताने घराबाहेर काढणे, प्रसंगी चार शब्द बोलणे घडू लागले. ह्या सर्व ठिकाणी वावरताना रमाबाईंचे वागण्याचे, विचारांचे वळण हे न्यायमूर्तींच्या शिकवणुकीला अनुसरून होताना दिसते. त्यांनी स्वतः घेतलेले निर्णय न्यायमूर्तींना पसंत न पडल्यास, असे पुन्हा वागायचे नाही असा निर्णय रमाबाई तत्काळ घेऊन टाकताना दिसतात.

ह्या दृष्टीने अनुसूयाबाईंच्या पुराणाला जाण्याचा प्रसंग पाहण्यासारखा आहे. त्या प्रसंगाचे वर्णन स्वतः रमाबाईंनी आपल्या आठवणीत सविस्तरपणे केले आहे. त्या लिहितात- "एके दिवशी अनुसूयाबाईंचे पुराण ठरले. त्यावेळी देवळात नेहमी येणाऱ्या बायकांनी कट केला, की या सुधारकांच्या बायकांना आज आपण बसावयास जागा द्यावयाची नाही... म्हणजे त्यांना मंडपाच्या मध्ये पुरुषांच्या शेजारीच जाऊन बसावे लागेल. ह्या सभेला जातात तेव्हा पुरुषांच्या खुर्च्यांना खुर्च्या लावून बसतात. मग येथेच तेवढी वेगळी जागा कशाला पाहिजे ? हा त्यांचा बेत मला एक-दोन मैत्रिणींकडून कळला. कारण मी जुन्या व नव्या प्रकारच्या बायकांशी मिळून मिसळून राहण्याचा प्रयत्न करीत असल्याने दोन्हीकडे माझ्या मैत्रिणी होत्या. ऐकून मला वाईट वाटले व अपमानही वाटला... आधीच मला देवळात जायला उशीर झाला होता... पं. रमाबाई व आमच्या दुसऱ्या बायका बसल्या होत्या तिथे मी जाऊन बसले. पण मला चैन पडेना. पुराणाला आरंभ होऊन दहावीस मिनिटे झाल्यावर लागलीच मी पं. रमाबाईंच्या कानात, 'मला बरे वाटत नाही, मी घरी जाते,' असे बोलून मी घरी आले.

"येतेवेळी आपण जे काम केले ते चांगले केले, त्यात आपला पराक्रम आहे असे वाटत होत.... माझ्या समजुतीप्रमाणे ताई सासुबाईंना ही गोष्ट पसंत पडलीच. म्हणाल्या- पाहिलंस,

हा असाच तर्क ठेवला पाहिजे, म्हणजे लोक नावे ठेवत नाहीत. ह्या नव्या शिकलेल्या पोरांना व्यवहार समजत नाही... पण म्हणून ते सगळे करून आपले कसे चालले ?"

रमाबाई पुढे लिहितात- "पण हा माझा आनंद पुरता दोन तासही टिकला नाही. इतकेच नाही, पण अशी चूक पुन्हा करण्याचा धीटपणा माझ्याकडून पुढे कधीच झाला नाही."

त्याचे असे झाले, की माधवरावांना जेव्हा रमाबाईंच्या उठून येण्याचे खरे कारण कळले तेव्हा ते फार नाराज झाले. त्यांच्या संयमी स्वभावाला अनुसरून ते रागावले नाहीत, पण त्यांनी रमाबाईंशी अबोला धरला व त्याचाच जास्त त्रास रमाबाईंना झालेला दिसतो. त्या लिहितात-

"मला चैन पडेना. मला वाटलं, की... मी केलेले जर आवडले नाही तर सगळ्यांना कळेल, असे उघड तरी रागवायचे होते... हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार झाला आहे. मला ह्या अबोल्याने अतिशय वाईट वाटले. मी बराच वेळ रडलेसुद्धा. 'चूक असल्यास एक वेळ क्षमा करावी', असे मोकळ्या मनाने म्हणावे, असा मनाशी विचार केला. पण मन अगदी लीन झाले, तरी लहानपणातील मानी स्वभावाला अशा रीतीने तोंडातून उद्‌गार काढणे जड जात होते."[२]

पण शेवटी हा मनस्ताप असह्य होऊन रमाबाईंनी माधवरावांची क्षमा मागितलेली दिसते. त्यावर माधवराव म्हणाले- "आपले माणूस आपल्या धोरणाने वागले नाही तर ते कोणाला बरे आवडेल ? एकदा आपल्या माणसाच्या आवडीची दिशा समजली म्हणजे तीच बळकट धरावी, म्हणजे दोघांनाही त्रास होणार नाही. पुन्हा असे करू नको."[३]

रमाबाई लिहितात- "ह्या प्रसंगानंतर स्वतःला न आवडणारी गोष्ट पुन्हा म्हणून करायची नाही, असा माझ्या मनाने निश्चय केला."[४]

ह्या प्रसंगातून रमाबाईंची पतिपरायणता जशी जाणवते तद्वत हेपण लक्षात येते, की माधवरावांना हव्या असलेल्या सुधारणा अंगी रुळवताना रमाबाईंच्या शालीन स्वभावाला त्रास होत होता. चारचौघींतून वेगळे पडण्यात त्यांना मनस्ताप होत होता. पं. रमाबाईंप्रमाणे त्या ह्या सुधारणा स्वतःच्याच प्रेरणेतून अमलात आणताना दिसत नाहीत.

माधवरावांनी पण, आपल्या माणसाने आपले धोरण मुकाट्याने अंगवळणी पाडून घेऊन अनुसरावे, अशीच अपेक्षा ठेवलेली दिसते. रमाबाईंनी ती मानलेलीपण दिसते.

रमाबाईंच्या पतिपरायणतेचा एक मजेशीर आविष्कार त्यांच्या कलकत्त्याच्या मुक्कामातील बंगाली शिकण्याच्या प्रसंगातही दिसून येतो. वस्तुतः तोपर्यंत रमाबाई मिश्र समाजात थोड्याफार वावरू लागल्या होत्या. प्रसंगोपात पुरुषांशी संभाषणही घडत असणार. तथापि, परपुरुषाजवळ बंगाली शिकण्याची शक्यता येताच त्यांनी ती शिताफीने टाळलेली दिसते. त्याबाबत आपल्या 'आठवणीं'त त्या लिहितात-[५]

"बंगाली शिकण्याची टाळाटाळ करण्याकरिताच 'मला स्वतः शिकवले तर मी शिकेन. दुसऱ्याजवळ शिकणार नाही,' असा माझ्या बोलण्याचा हेतू होता. कारण मी नुसते होय म्हटले असते, तर बंगाली मास्तर कोणीतरी आणिला असता. पण मला ते आवडले नाही. कारण एकतर मला लहानपणापासून शाळा ठाऊक नव्हती. 'स्वतः' शिवाय कोणत्याही पुरुषाजवळ शिकण्याचा प्रसंग नव्हता. शिकविण्यास कोणीतरी मनुष्य ठेवण्याची वेळ येईल ती टाळावी

ह्या बुद्धीनेच मी बोलून केले."

इथे नाशिक येथे बक्षीस समारंभानिमित्त घडलेल्या दुसऱ्या एका प्रसंगाची आठवण येते. सेशन्स जज्ज कागलन व त्यांचे कुटुंबिय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्या सर्वांना हार घालण्यास रमाबाईंना विनंती केली गेली. कागलन साहेबाच्या कुटुंबिय स्त्रियांना हार घालून झाल्यावर स्वतः साहेबाला हार घालायचा प्रसंग रमाबाईंवर आला होता. तो अवघड प्रसंग आपण कसा टाळला व तो आपल्यावर खवचटपणे डेप्युटी इन्स्पेक्टरने आणला होता, असे वाटून आपणाला कसा राग आला होता, ह्याचे वर्णन 'आठवणी'त त्यांनी सविस्तरपणे केले आहे.[६] परपुरुषांविषयी रमाबाईंना वाटणारा हा संकोच व अवघडलेपणा हा त्यांच्या पारंपरिक पातिव्रत्य भावनेचाच एक आविष्कार वाटतो.

ह्या संदर्भात पं. रमाबाईंचे, पतीला रुचत नसतानाही ज्ञानसाधना हा आपला व्यक्तिगत हक्क मानून ख्रिश्चन मिशनरी श्री. ॲलन यांचेबरोबर धर्मचर्चा करणे वेगळेपणाने लक्षात येते.

परपुरुषांशी रमाबाई थोड्या संकोचाने वावरत असल्या तरी स्त्रियांच्यात मोकळेपणा निर्माण करण्याच्या दृष्टीने मात्र रानड्यांच्या प्रेरणेने त्यांचे कार्यक्रम उत्साहाने चालताना दिसतात. त्याविषयी रमाबाई लिहितात- "स्त्रियांच्या शिक्षणाला चालना देण्याच्या दृष्टीने हिराबागेत एक-दोन सभा झाल्या. त्या वेळी नव्याजुन्या अशा बऱ्याच बायका जमत. हौसेने एकमेकींशी वागत. हे पाहून त्यांच्या परस्पर भेटींचे वारंवार प्रसंग जुळवून आणले, तर या बायकांतील... संकुचितपणा कमी होऊन त्यांस शिक्षणाची गोडी आपोआप लागेल. तेव्हा हळदीकुंकू किंवा पार्टीसारखे समारंभ स्वतःच्या खर्चाने करावेत असे मला 'स्वतः' सांगितले. त्याप्रमाणे पुढे आम्ही दोघी-चौघी मैत्रिणींनी लेडी रे (त्या वेळच्या गर्व्हनरची बायको) यांना पार्टी दिली."[७]

पुढे पार्टीचे सविस्तर वर्णन देऊन रमाबाई म्हणतात - "खाणे झाल्यावर हिंदू रिवाजाप्रमाणे पानसुपारी, हळदीकुंकू ठेवले असल्यामुळे आमच्या बायकांना ही पार्टीची चाल परकी न वाटता उलट पसंत पडली."

१८७३ साली माधवरावांची बालवधू म्हणून त्यांच्या जीवनात प्रवेश केलेल्या रमाबाई, हळूहळू माधवरावांच्या सहचरी बनण्याच्या वाटेवर चालू लागल्याचे दिसते.

१८८६ साली माधवरावांची हिंदुस्थानच्या फायनान्स कमिटीवर नेमणूक झाली. त्या निमित्ताने त्यांना सिमला, मद्रास, कलकत्ता वगैरे ठिकाणी चार-चार महिने राहावे लागले. ह्या सर्व वास्तवात रमाबाई माधवरावांच्या बरोबर गेल्या होत्या. प्रवासात वाटेत लागणाऱ्या अमृतसर, दिल्ली, अजमेर, वाराणसी, हरिद्वार, इ. अनेक गावांना व तेथील प्रेक्षणीय स्थळांना माधवराव व रमाबाईंनी भेटी दिल्या. ह्या सर्व स्थळांतील वास्तव्याचे बारकाव्याने वर्णन रमाबाईंनी आपल्या 'आठवणी'त केलेले आहे. रमाबाईंची जिज्ञासूवृत्ती, रसिकता व अनुभव ह्या सर्वांना हा प्रवास पोषक झालेला दिसतो. ह्या दृष्टीने काल्का येथील उडिया उद्यानाचे, हरिद्वार येथील गंगेच्या प्रवाहाचे, अमृतसरच्या सुवर्ण मंदिराचे, आग्र्याच्या ताजमहालाचे इत्यादींची त्यांनी केलेली वर्णने वाचून पाहण्यासारखी आहेत. ताजमहालाचे सौंदर्य व भव्यता

जाणवल्यावर तो बांधण्यासाठी अमाप पैसा खर्च करण्याऱ्या राजापेक्षा, त्यांना त्या कुशल शिल्पकाराचे कौतुक अधिक वाटले, असे रमाबाई 'आठवणीं'त सांगतात. किंवा मथुरा-वृंदावनातील व्रजभाषा ऐकल्यावर निरनिराळ्या देशांत जी हिंदी भाषा वापरली जाते त्या सर्वांपेक्षा 'व्रज भाषा फार गोड, मृदू व नम्र असल्यामुळे तिचा त्या लोकांना मोठा अभिमान वाटतो' असे निरीक्षण त्या नोंदवतात.

ह्या प्रवासात निसर्गसौंदर्य व वास्तुसौंदर्य यांबरोबर रमाबाई जनजीवनाचा पण आवर्जून परिचय करून घेताना दिसतात. सिमल्याकडील पहाडी लोकांच्या जातीत, 'चारपाच किंवा अधिक सख्ख्या भावांत एक बायको करण्याची चाल आहे. अनुकूल असल्यास आणखी दुसऱ्या बायका केल्या तरी चालतात,' असे त्या सांगतात.[९]

सिमल्याला असताना बंगल्याच्या आवारात येऊन बसणाऱ्या बायकांशी गप्पा मारताना त्या तेथील जनजीवनाची माहिती मिळवताना दिसतात. तर अमृतसरला गेल्यावर अमृतसर शहर दाखवण्यास आलेल्या पंजाबी महिलांबरोबर त्यांच्या घरी जाऊन त्यांच्याशी स्नेह संपादन केलेला दिसतो. पुष्करला तीर्थावर दिसलेल्या बंगाली स्त्रियांजवळ जाऊन त्यांच्या राहणी, वेश-भूशा वगैरेविषयीच्या शंका रमाबाईंनी पूर्ण करून घेतलेल्या दिसतात.

ह्या प्रवासात मधून मधून चालणाऱ्या थट्टामस्करीतून रमाबाई व माधवराव ह्यांच्यामधल्या वाढत्या खेळीमेळीच्या नात्याचा व जवळिकीचा पण प्रत्यय येत राहतो.

प्रवासात माधवरावांचे एक जिवलग स्नेही रा.ब.शंकरराव पंडित त्यांचेबरोबर होते.काही अपसमजामुळे पंडितांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले होते. त्यामुळे ते सतत उदास असत.त्यांचे मन रमवण्याचा सतत प्रयत्न माधवराव व रमाबाई करताना दिसतात.सिमल्याला वा हरिद्वारच्या वास्तव्यात रमाबाईंचे माधवरावांशी व त्यांच्या ह्या स्नेह्यांशी जे थट्टा- मस्करीचे मोकळेपणाने बोलणे चालत असे ते वाचताना त्या काळात दुर्मिळ असणाऱ्या स्त्री-पुरुषांतील आल्हाददायक सहजीवनाचे मनोरम दर्शन घडते.

श्री.पंडितांना त्यांच्या उदास मनस्थितीमुळे जेवण जात नसे.पण तसे दिसू नये म्हणून ते थट्टेने काही तरी दुसराच बहाणा करत.त्याविषयी रमाबाई आठवणीत सांगतात- "एक दिवस त्यांना जेवण गेले नाही, म्हणून दूध पिण्याचा आग्रह केला. तेव्हा ते म्हणाले, 'वहिनीबाईंची बाजू सावरून घेण्याकरिता मी इतका वेळ उगीच बसलो.पण एक जिन्नसही बरा झाला नाही. खावे काय ?' तेव्हा मी म्हटले, 'काय काय बिघडले आहे त्याचे वर्णन तरी करा, म्हणजे त्यात बराच वेळ निघून जाईल. कोणीकडून वेळ काढायचा इतकेच ना !' यावर पंडितांनी बळेबळे स्वैपाकातल्या खोडी काढायला सुरवात केली.तेव्हा माधवरावांनी थट्टेने म्हटले, 'मीठ अळणी आहे, मिरचीला तिखट नाही, एवढेच कसे विसरलात ?'

पुढे हरिद्वारला असताना माधवराव गंगेच्या पाण्यात पाय सोडून तल्लीन होऊन बसलेले होते.रमाबाई खाण्यासंबंधी त्यांना काही विचारत होत्या, पण तल्लीनतेत ते त्यांना ऐकू गेले नाही.त्या वेळी झालेली नर्म थट्टामस्करी रंगवताना रमाबाई म्हणतात-

"ती संधी साधून पंडित मला म्हणाले, 'वहिनीबाई, कशाला भूक असेल ? तुम्ही तिकडे

कामात होंता. पण इथे आल्यापासून (माधवरावांची) वृत्ती अगदी गंगामय झाली आहे. मला वाटतं, आता हरिद्वारीच राहाण्याचा बेत होणार !.... मग तुमचे कसे होणार ?' ह्यावर कुसुमति टेकडीच्या (फ्रेंच शिकवणाऱ्या बाईवरून केलेल्या चेष्टेच्या) बोलण्याचे उसने फिटत आहे असे माझ्या घ्यानात येऊन मी लगेच म्हटले, माझे काय व्हायचे आहे ?... कोठेही राहाणे झाले, तरी मी जवळच असणारच. मग मला धाक कसला ?"

रमाबाई व माधवराव ह्यांच्यामधील चेष्टेखोरपणाचा आणखी एक प्रसंग पहा.

कलकत्याच्या मुक्कामात, रमाबाईंना शिकवायचे म्हणून माधवराव स्वतः बंगालीचा अभ्यास वेळ मिळेल तसा करू लागले होते. एकदा हजामत करवून घेता घेता ते न्हाव्याकडूनच शब्दाचे उच्चार व अर्थ समजावून घेत होते. ते पाहून रमाबाई थट्टा करीत म्हणतात- "मास्तर तर छान मिळाला ! श्रीदत्तांनी जसे चोवीस गुरू केले तसे इकडल्या गुरूंची यादी करावयास जर मला कुणी सांगितले, तर या गुरूचे नाव पहिले घालीन. पूर्वी गुरूंची सेवा करावी लागे, पण हा गुरू बिचारा इकडचीच चाकरी करीत आहे, असे म्हणून याचे नाव पहिले पाहिजे !"[११]

ह्या मनमोकळ्या थट्टामस्करीबरोबरच, रमाबाईंच्या बदलत्या भूमिकेचा आणखीही एक पैलू इथे पाहावयास मिळतो.

माधवरावांची एखादी गोष्ट वा कृती रमाबाईंना रुचली नाही, तर त्याबद्दल त्यांनी कृतीने वा शब्दाने नापसंती दर्शवावी असे प्रसंग 'आठवणीं'च्या पूर्वार्धात कुठेही आढळत नाहीत. पण आता रमाबाई थोड्या आत्मविश्वासाने वावरू लागलेल्या दिसतात.

इथे काशीबाई कानिटकारांनी सांगितलेली एक आठवण लक्षात घेण्यासारखी आहे. त्या लिहितात-

"एकदा चोपदाराने टपाल आणल्यावर रावसाहेबांचे त्यांना दिले. रमाबाईंचे त्यांच्याजवळ दिले. रमाबाई पत्र फोडून वाचताहेत, तोच 'रावसाहेबांनी सर्व टपाल मागवले आहे', असा निरोप आला. तेव्हा रमाबाईंना वाईट वाटले. रागही आला, त्या रावसाहेबांना उद्देशून पटकन् म्हणाल्या, 'माझ्या माहेरचेच पत्र होते. काही कुठल्या कारस्थानाचा त्यात बेत केलेला नव्हता... एव्हढा अविश्वास कशाला ?' त्यांना ती परवशतेची कल्पना असह्य होऊन नेत्रावाटे त्या विकारांना त्यांनी मार्ग काढून दिला." [१२]

रमाबाईंची 'अस्मिता' माधवरावांच्या सावलीतून बाजूला सरकून थोडी ठसठशीत होऊ लागली असावी, असे ही आठवण वाचताना जाणवते.

कलकत्याला गेल्यावर माधवरावांनी राहाण्यासाठी निवडलेला बंगला ओसाड व जुनाट असल्याने रमाबाईंचे मन तिथे मुळीच रमेना. संध्याकाळी कामाहून आल्यावर माधवरावांनी त्यांना, 'दिवसभर काय केलेस ?' असे विचारताच आपली नाराजी स्पष्टपणे बोलून दाखवत त्या म्हणाल्या, 'काही केले नाही ! करावयाचे काय ? आधी जागा नवी. कोणाची ओळख नाही.. बंगला म्हणून जो घेतला आहे तो तरी मन रमण्यासारखा असावा, तर तोही नाही... जिकडे पाहावे तिकडे भणभणीत व ओसाड...बरे भाडे तरी थोडे आहे ? तर तेही पुष्कळ. असा बंगला का घ्यावा ? यापेक्षा आपण दुसरे घर योग्यतेला शोभेल असे घेऊ. भाड्याचा खर्च

व्हावयाचा तितका होऊन फुकट राहावयास आल्यासारखे दिसत आहे... बाहेर जाणाऱ्या माणसाचे ठीक आहे. पण घरात राहणाऱ्या माणसाचा दिवस उदास, कंटाळवाणा जातो !"[१३]

रमाबाईंचे पूर्वीचे व्यक्तित्व लक्षात घेता त्यांच्यातील हा नवा धीटपणा लक्षणीय वाटतो.

याच सुमारास नाराजी व्यक्त करणारा आणखी एक प्रसंग घडलेला दिसतो. १८९० साली पुण्यात पंचहौद मिशनमधील चहा प्रकरणाने खूपच वावटळ उडवली होती. त्याचे सविस्तर वर्णन रमाबाईंनी 'आठवणीं'त केले आहे. तिथे समारंभाला गेलेल्या काही लोकांनी ख्रिश्चनांच्या हातचा चहा घेतला ही बातमी पसरून पुण्यातील सनातनी लोकांनी ह्या उपस्थितांवर बहिष्काराचे शस्त्र उगारले. माधवराव त्या समारंभाला गेले होते. पण त्यांनी प्रत्यक्ष चहा घेतला नव्हता. तरीपण चहा घेण्याला तत्त्वतः त्यांचा विरोध नसल्याने बहिष्कारातून त्यांनी स्वतःचा एकट्याचा बचाव करण्याचा प्रयत्नही केला नाही. बहिष्कारामुळे रानड्यांना कोणत्याही प्रकारे अडचण येण्याची शक्यता नव्हती. तरीदेखील शेवटी बहिष्कारामुळे इतर मित्रमंडळींना व त्यांच्या कुटुंबियांना खूप मानसिक त्रास होत आहे, हे पाहून रानड्यांनी ह्या मित्रमंडळींच्या इच्छेखातर त्यांना पाठिंबा मिळावा म्हणून स्वतः प्रायश्चित घेतले.

रमाबाईंना ही रानड्यांची कृती मुळीच रूचलेली दिसत नाही. त्याबद्दल त्या लिहितात --

"हे स्वतःचे जाणे (प्रायश्चित घ्यायला) मला अतिशय दुःखद वाटले.... मानहानी झाल्यासारखे वाटून रडू आले.... कोणत्याही रीतीने मनाला समाधान वाटेना. ज्यांना अडचण पडली होती त्यांनी पाहिजे तर प्रायश्चित घ्यायचे होते. आम्हांला यामध्ये गुंतवून सर्वस्वी मानहानी का केली ?... 'स्वतः'च्या भिडस्त स्वभावाचा फायदा घेणारी ही मित्रमंडळी का म्हणायची ? बरे 'स्वतः' तरी अशा गोष्टींत लोकांचे का बरे ऐकले ? या मंडळींकरता काय हवे ते करायला तयार व्हायचे व लोकांकडून नावे ठेवून घ्यायची अशी पहिल्यापासून सवयच आहे, असे उद्वेगजनक विचार दिवसभर माझ्या मनात घोळत होते."[१४]

अर्थात ह्याबाबत रमाबाईंनी माधवरावांशी ते परत आल्याबरोबर लागलीच काही बोलणे केलेले दिसत नाही. त्या लिहितात-

"ह्या गोष्टीबद्दल 'स्वतः'ला फार वाईट वाटले असावे व मी समोर गेल्यावर कदातिच अधिक वाईट वाटेल... म्हणून मी आत आतच राहिले. पण बाहेर काय चालले आहे याचा कानोसा घेतला. तो माझ्या नजरेस आले, की स्वतःची वृत्ती अगदी रोजच्यासारखी असून... कोणत्याही रीतीने उद्वेग वा तळमळ दिसेना. हे पाहून मला फार आश्चर्य वाटले !... सर्व गोष्टींबद्दल त्रास तर झाला असणारच. पण तो बाहेर न दाखवणे... ह्या गोष्टी साधतात तरी कशा ?"[१५]

आपला निर्णय आपल्या पत्नीला आवडलेला नाही, ती आपल्यासमोर येण्याचे टाळते आहे, फारसे बोलत नाही, प्रत्यक्ष काही विचारले नाही तरी 'आठरल्या' सारखी वागते आहे, हे रानड्यांच्या लक्षात आले होते. हे त्यांच्या पुढे झालेल्या बोलण्यातून लक्षात येते. तरीपण आपल्या नेहमीच्या स्वभावाला अनुसरून त्यांनी रमाबाईंजवळ स्वतःहून समजूत काढणारे वा स्पष्टीकरण देणारे काहीही बोलणे केलेले दिसत नाही.

उलट रमाबाई लिहितात- "दोन-तीन दिवस त्यांची ती शांत वृत्ती पाहून माझीच वृत्ती अगदी थंड झाली."[१६] व शेवटी रमाबाईंनीच स्वतः ह्या घटनेबाबत प्रश्न विचारून व चर्चा करून स्वतःच्या मनातील सर्व शंकाकुशंका फेडून घेतलेल्या त्यांच्या 'आठवणों'त दिसतात. रमाबाई त्यांना विचारतात- "हे प्रायश्चित कशाला घेतले बरे? चोहोकडून आता किती टीका होत आहे? विरुद्ध बाजूच्या लोकांनी कितीही नावे ठेवली तरी त्याबद्दल...तितके वाईट वाटत नाही... पण इतक्या जुन्या व आपल्या म्हणविणाऱ्या मित्रांचे उद्‌गार ऐकून अतिशय वाईट वाटते. ज्यांना इतक्या वर्षांच्या सहवासाने स्वतःच्या स्वभावाची खरी ओळख होऊ नये, ते स्वतःला मित्र म्हणवतात तरी कसे? ...मित्रत्व म्हणजे एकमेकांच्या अंतःकरणाची योग्यता. समजली पाहिजे. तसे झाले नाही तोपर्यंत हे नुस्ते शब्दांतच राहते!"[१७]

रमाबाईंच्या ह्या व्यवहारी व मार्मिक प्रश्नांना अर्थातच रानड्यांनी आपल्या थोर मनाला अनुसरून, 'आपणच समजूतदारपणा व मनाचा मोठेपणा दाखवावा,' असे उत्तर दिले आहे. शेवटी ते म्हणतात- "त्यांना नावे ठेवतेस. पण कालपर्यंत तूच किती आठरल्यासारखी झाली होतीस बरें! प्रायश्चित घेतले हा आमचाच दोष आहे असे तुलाही वाटते. ही विकारवशता नव्हे का?.... मनुष्य (मी) जी गोष्ट करतो ती पूर्ण विचाराने करतो, घाईने कोणतीही गोष्ट करत नाही_. अशी मनाशी खात्री ठेवावी.... माहिती नसेल तर विचारून घ्यावी. मागील अनुभवावरून मन शांत ठेवावे. उगीच आपल्याला त्रास करून घेण्यात काय फायदा आहे?"[१८] इथे ह्या दोघा पति-पत्नीत 'संवाद' साधू लागल्याचे दिसते.

अर्थात ह्या चर्चेचा समारोपही नेहमीप्रमाणेच रमाबाई स्वतःची पडती बाजू कबूल करूनच करताना दिसतात. त्या म्हणतात- "हे ऐकल्यावर मला अंगदीच ओशाळल्यासारखे झाले... पश्चात्ताप होऊन पुन्हा पुन्हा फार वाईट वाटले."[१९]

'सहचरी' म्हणून रमाबाई अशा माधवरावांशी अधून मधून थट्टाविनोद व चर्चा करताना दिसत असल्या तरी आपण स्वीकारलेली गृहिणीपदाची पूरक भूमिका व मर्यादा त्या कधीच सोडताना दिसत नाही.

रमाबाईंच्या ह्या मनोवृत्तीचे प्रत्यंतर देणारा एक प्रसंग अमृतसरच्या वास्तव्यात वाचावयास मिळतो. ही सर्व मंडळी जेव्हा अमृतसरला येतात तेव्हा प्रचंड उन्हाळा होता म्हणून ह्या मंडळींना वारा घालण्यासाठी काही मजुरांची व्यवस्था करण्यात आली होती. रमाबाईंसाठी एक स्त्री मजुरीण पाठवली होती. पण तिला परत पाठवून देताना रमाबाई लिहितात-- "स्वयंपाक करावयाचा हे आमचे मुख्य काम. पुरुषमंडळीची जेवणे झाल्याशिवाय, काम टाकून उकडते म्हणून वारा घेत स्वस्त पडून राहणे आम्हा हिंदू बायकांना कसे रुचणार?"[२०]

माधवरांवांच्या मनातदेखील पत्नीची हीच भूमिका अद्याप अभिप्रेत असावी असे दिसते. त्यामुळे त्यांच्या निर्णयाबाबत पत्नीने संदेह दाखवावा हे त्यांना जसे फारसे रुचले नव्हते, त्याचप्रमाणे त्यांच्या कामाबाबतही रमाबाईंनी फारशा चौकशा केलेल्या त्यांना पसंत नसावे असे दिसते.

सोलापूर जिल्ह्यात फिरतीवर करमाळ्याला असताना एकदा सकाळी फिरून यायला

न्यायमूर्तींना उशीर झाला. तेव्हा अभ्यासासाठी तयार होऊन बसलेल्या रमाबाई थट्टेने त्यांना म्हणाल्या- "या तालुक्यात काम कमी आहे वाटतं ? हुरड्याचे दिवस आहेत. गावातील मंडळी अतिशय अगत्याची, भीड घालत असतील. रावसाहेबांना भीड मोडवत नाही, म्हणून दोन वाजताच कोर्ट बंद करून निरुपायाने जावें लागत असेल. त्यामुळे अर्थातच तपासणीला काम बेताचेच असणार."

त्या दिवशी माधवरावांची तब्येत बिघडण्याला सुरवात झाली होती. त्यामुळे असेल कदाचित, पण रमाबाईंची ही थट्टा त्यांना फारशी रुचलेली दिसत नाही. कारण ते म्हणाले- "आधीच उशीर झाला आहे. तेव्हा बोलण्यात वेळ घालवू नको. वाचावयास घे. त्याआधी मला सुंठसाखर आणून दे. आमच्या पुरुषांच्या कामाची चौकशी तुम्हा बायकांना कशाला हवी आहे ?"

मात्र यावर आता रमाबाई पटकन प्रत्युत्तर देताना दिसतात. त्या म्हणाल्या- "खरेच आम्हांला कशाला चवकशी हवी आहे ? त्यांत एवढं आंहे तरी काय ? या तालुक्याच्या कोर्टात जितकी कामे सब जज्ज करतात तितकी कामे आम्ही बायकादेखील करू." रमाबाईंचे हे निरीक्षण रास्त व अचूक असावे, कारण ह्यावर माधवराव हसून त्यांना विचारतात-"काम कमी-जास्त करणे हे ज्याच्या-त्याच्या स्वभावावर आहे. पण करतात ती कामे महत्त्वाची नाहीत, असे का तुला वाटते ?"[२१]

ह्यावर रमाबाईंनी दिलेले उत्तर त्यांच्या विकसित होत चाललेल्या स्वतंत्र विचारसरणीचा पुरावा वाटावे असे आहे.

त्या म्हणतात- "कामाचे महत्त्व कोण नाकबूल करील ? पण ते महत्त्व करणाऱ्याच्या मनात कितपत वागते याचा अनुभव आपल्याला या फिरण्यामध्ये नेहमी येतो. सरकार त्यांना नेमलेला जो पगार देते त्यापेक्षा उत्तम, मध्यम, कनिष्ठ अशा कामाप्रमाणे कमिशनसारखा पगार ठेवला असता, तर याहून अधिक काळजीने व मेहनतीने कामे खचित झाली असती. शिवाय गरीब पक्षकार लोकांना अपिले करण्याचा विनाकारण खर्च तरी पडला नसता."

ह्यानंतर माधवरावांची पाठोपाठ दोन जिवावरची दुखणी उलटलेली दिसतात. ह्या दोन्ही वेळी माधवराव फिरतीवर (१८९१ मध्ये करमाळा व १८९३ मध्ये सोलापूर येथे) असल्याने रमाबाई एकट्याच त्यांच्याजवळ होत्या. पण दोन्ही वेळेस त्यांनी अतिशय धीराने व प्रसंगावधानाने सेवा केलेली त्यांच्या चरित्रावरून दिसते. करमाळ्याच्या पहिल्या जिवावरच्या दुखण्यात तर त्यांना औषधपाणी करणाऱ्या तिथल्या डॉक्टरला खानेसुमारीच्या कामामुळे रात्रीनंतर येणे जमणार नव्हते. तेव्हा गडबडून न जाता रमाबाईंनी काढलेला मार्ग पाहण्यासारखा आहे. रमाबाई लिहितात-

"मला काळजी पडली. मी आमच्या शिरस्तेदारास म्हटले, 'तुम्ही मामलेदारांना जाऊन भेटा व प्रकृतीची ही सर्व हकीगत कळवून मेहरबानीने आजची रात्र डॉक्टरांना आमच्याकडे राहू द्या. त्याच्याबद्दल आमच्या ऑफिसातून दोन कारकून आम्ही कामाकरिता तुमच्याकडे पाठवितो. असा माझा निरोप सांगा'...याप्रमाणे बोलून मी पुण्यात डॉ. विश्रामजी व वन्सं यांना

तार लिहवली. करमाळ्याहून रेल्वे स्टेशन तेरा मैल दूर असल्यामुळे घोड्याची गाडी जोडवून नाना आगाशेंना पाठविले व तुम्ही तार करून स्टेशनावरच थांबा व पहाटे चार वाजता त्यांना घेऊनच या असे सांगितले." [२२]

सुदैवाने रमाबाईंच्या ह्या तत्परतेने केलेल्या योजनेला फळ येऊन माधवराव दुखण्यातून बरे झालेले दिसतात.

ह्या प्रसंगाला उद्देशून रमाबाईंचे नातू व चरित्रकार श्री. मा. विद्वांस म्हणतात- "अशा सर्व आजारांतून त्यांना बरे करण्याचे श्रेय निष्णात डॉक्टरांच्या औषधपचाराइतकेच किंवा अधिकच रमाबाईंच्या कुशल आणि निपुण शुश्रूषेला, पथ्यपाण्याच्या काळजीला, नितांत पतिनिष्ठेला दिले पाहिजे."[२३]

अशा अनुभवांतून बहुधा रमाबाई व माधवराव ह्यांच्यातील सहचर भावना अधिक गाढ होत गेली असावी.

ह्याचे प्रत्यंतर काशीबाई कानिटकरांनी लिहिलेल्या ह्याच सुमाराच्या एका आठवणीत आढळून येते.

माढे तालुक्यात फिरतीवर असताना, तिथल्या मुन्सफांनी जेवायला बोलावले. अनवधानाने बोलावणे बायकांत झाले. पुरुषांत वेगळे केले गेले नाही. म्हणून न्या. रानडे जेवायला जायला कबूल नव्हते. तेव्हा रमाबाईंनी मुन्सफाकडे गुपचूप निरोप पाठवून निमंत्रण करायची सूचना केली. वर न्यायमूर्तींना समजावले-- "लहान माणसांना भीड वाटते. घरासारख्या ठिकाणी पुन्हा पुन्हा बोलावणे ते काय करायचे ? वडील माणसांनी आपण होऊन गेले पाहिजे... इ." [२४]

इथे काशीबाई म्हणतात त्याप्रमाणे, "रमाबाईंच्या मनाचा सरळपणा व निगर्वीपणा तर दिसतोच, पण त्याहीपेक्षा, त्या काळातील न्यायमूर्तींचा दबदबा व एकूण समतोल वृत्ती पाहता त्यांनादेखील वेळप्रसंगी योग्य सल्ला देण्याइतक्या रमाबाई प्रगल्भ झालेल्या दिसतात."

१८९३ मध्ये माधवरावांची हायकोर्ट जज्जच्या बहुमानाचा पदी नेमणूक झाली व ही दोघे मुंबईत राहावयास आली.

ह्या कालखंडात ह्या दोघांत बाळबोध वळणाचा कडकपणा जाऊन अधिक मोकळेपण आलेला दिसतो.

ह्या मुंबईच्या वास्तव्यात रमाबाई हायकोर्ट जज्जची पत्नी ह्या भूमिकेला योग्य अशा परिपक्वतेने राहत असाव्यात व त्यांची ही प्रतिष्ठा न्यायमूर्ती पण जपताना दिसतात. ह्या दृष्टीने पुढील प्रसंग पाहा.

भात कच्चा राहिल्यावरून एकदा रमाबाई आचाऱ्याला रागे भरल्या. ह्या प्रसंगाविषयी रमाबाई लिहितात--

" माझा राग घालवण्याकरता 'स्वतः' विनोदाने म्हटले, थोडा भात कच्चा राहिला तर आचाऱ्याला इतके काय बोललीस ? नुस्ते धान्य जसेच्या तसे खाऊन पचवणारी आम्ही माणसं !... लढाई केलेली आम्ही माणसं आहोत... तू आचाऱ्याला बोलत होतीस तेव्हाच मी

म्हणणार होतो. पण तू आधीच रागावलेली. त्यात यजमानीनपणाच्या डौलात बोलत होतीस. तेव्हा आपण काही मध्येच बोलून तुझा विरस करू नये म्हणून बोललो नाही..." २५

त्यावर तितक्याच खेळकरपणे रमाबाई उत्तरतात- "रोजच्या जेवणात एक घास अधिक झाला तर तेवढा पलिकडे राखून ठेवायचा असतो. तोलून खाणाऱ्यांनी लढाई कसली करावयाची ? आता लेखणीत मात्र लढाई उरली आहे. खरोखरीच लढाईची वेळ आली तर सगळ्यांची केवढी धांदल उडेल."२६

एक अज्ञ बालवधू, हुशार आज्ञाधारक विद्यार्थिनी, कुशल गृहिणी, खेळकर सहचरी अशी विविध पायऱ्यांनी चढत चढत हळूहळू रमाबाई न्यायमूर्तींच्या जीवनाचा अविभाज्य भागच बनत गेलेल्या दिसतात. ह्या दृष्टीने पुढील प्रसंग वाचण्यासारखा आहे. रमाबाई आपल्या 'आठवणीं'त लिहितात-

"प्रार्थना समाजात स्वतःची उपासना असेल त्या दिवशी मी बरोबर असावे असे स्वतःच्या मनातून फार असे व खरे म्हटले तर मला याच उपासनेच्या वेळी विशेष काम असले तरीही त्यातल्या त्यात सवड काढून जावेसे वाटे. याबद्दल कित्येक वेळा माझ्या मैत्रिणी मला विनोदाने म्हणत- आदितवारी उपासना असते, तेव्हा काहीतरी अडचणी येतात.... पण आज बरे फावले ?"२७

ही परस्परांतील आंतरिक समरसता विलोभनीय वाटते. रमाबाई पुढे लिहितात- "उपासना झाल्यावर घरी परत येताना... 'स्वतः' विचारायचे, की 'आज तुला काय समजले ते सांग.' मी सर्व उपासना नीट सांगितली तर म्हणावयाचे, 'तर मग आजची उपासना बरी झाली असावी असे वाटते.' एखादे वेळेस विषय अवघड असला तर मला नीट सांगता येत नसे. त्यामुळे 'स्वतः' म्हणावयाचे, 'तर मग आजची उपासना चांगली झाली नाही म्हणावयाची. उपासनेसंबंधी आम्ही असे प्रमाण बसवले आहे की तुला समजली.म्हणजे ती उपासना चांगली व तुला समजली नाही ती उपासनाच चांगली झाली नाही, दुर्बोध झाली असे मी समजतो." २८

रमाबाईंच्या आकलनक्षमतेविषयी माधवरावांच्या मनात निर्माण झालेला हा गाढ विश्वास असा दिसतो. तर रमाबाईंच्या मनात पतीविषयी असलेला प्रगाढ आदर पुढच्या शब्दांत व्यक्त होतो. रानड्यांच्या उपासनेविषयी त्या लिहितात-" स्वतःची उपासना इतकी अर्थपूर्ण, प्रेमळ व गंभीर होत असे, की ऐकणाऱ्याला धन्य वाटावे... त्या शांत व भक्तीने परिप्लुत झालेल्या वृत्तीमुळे स्वतःच्या चेहऱ्यावरचे एक प्रकारचे तेज दिसे. त्या मुखाकडे एकसारखे पहात राहावे. दृष्टीच काढू नये असे मला वाटे."२९

ह्या कालखंडातील आठवणींत आणखी एक बदल लक्षात येतो. तो म्हणजे, अनेकदा रानड्यांच्या काही वागण्याबद्दल ' मला हसूच येई, गंमत वाटे, मी थट्टेने म्हणे,' असे रमाबाईंच्या तोंडचे उल्लेख अनेकदा भेटतात.

रानडे तल्लीन होऊन भजने म्हणू लागले, की चरणांची उलटापालट करणे, मनाच्या ओळी घालणे, यमक भंग करणे अशा अनेक गंमती होत असत. तेव्हा रमाबाई लिहितात-" अशा वेळी मला फार हसू येई व मी म्हणे, ह्या सगळ्या नवीन अभंगांची एक गाथा करून ठेवूया. मी

कल्याण शिष्यासारखी लिहिण्याचे काम पत्करून हे सगळे अभंग लिहून काढते म्हणजे बरे होईल."

ह्या थट्टेवर रानड्यांचे थोडे गंभीर, थोडे कृतक विनयाचे प्रत्युत्तर असे- "आम्ही आपली भाबडी माणसं. आम्हांला यमके व ताल-सूर यांची माहिती नाही... पण ज्याच्याकरिता आम्ही म्हणतो त्याला ते सर्व समजतात."[३०]

त्यांच्या ह्या रम्य वैवाहिक जीवनाविषयी जेम्स कॅलाक म्हणतात- "This marriage which took place under such a cloud of gloom and vaxation, proved to be the beginning of a peculiarly happy and beautiful married life !"[३१]

रमाबाईंच्या मुंबईतील ह्या सहा वर्षांच्या वास्तव्याकडे बघताना जाणवते, की त्या आता खऱ्या अर्थाने गृहस्वामिनी बनून घराची जबाबदारी पूर्णपणे स्वतः सांभाळू लागल्या होत्या. प्रशिक्षणाचा (under training) काल संपून त्यांचे सौम्य पण स्वतंत्र व जबाबदार व्यक्तिमत्त्व इथून पुढे सतत विकसित होताना दिसते. सामाजिक क्षेत्रांत पण ह्या कालखंडात त्यांनी स्वतंत्रपणे काम सुरू केलेले दिसते. १८९४ त मुंबईत 'हिंदू लेडीज् सोशल क्लब'ची त्यांनी स्थापना केली व त्याद्वारे स्त्रियांचे अभ्यासवर्ग, शिवणक्लास वगैरे सुरू केलेले दिसतात. आर्य महिला समाजाच्या सभांतून त्यांचा सहभाग असे. १८९५त पुण्यास जी सामाजिक परिषद भरली होती तिला जोडून स्त्रियांचे बरेच मोठे हस्तकला प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्याच्या व्यवस्थापनात व सजावटीत रमाबाईंनी महत्त्वाचा भाग घेतला होता असे दिसते.[३२] तर १८९३ च्या प्रदर्शनात प्रमुख परीक्षक म्हणून त्यांनी काम केलेले दिसते. ह्याच कालात न्यायमूर्तींच्या जोडीने त्या प्रार्थना समाजाच्या उपासना- प्रवचनांना पण जाऊ लागलेल्या दिसतात. श्री. रमाबाई व श्री नाथीबाई ठाकरसी यांचा ह्याच काळात चांगला स्नेह जुळलेला दिसतो. त्या दोघी सहकार्याने मराठी व गुजराथी वर्गांत समाज सुधारणेचे कार्य करीत असत.[३३] १८९६ मध्ये ॲलेक्झांड्रा हायस्कूलच्या बक्षीस समारंभास त्या अध्यक्षा म्हणून गेलेल्या दिसतात.

अशा तऱ्हेने 'रमाबाई'चे मुंबईतील जीवन अनेक तऱ्हेने समृद्धपणे चाललेले दिसते. त्यांचे चरित्रकार उमाकांत म्हणतात- "रमाबाईंच्या जीवनातील ही सहा वर्षं पाहता, त्यांना 'अजविलापा'तील गृहिणी सचिवः सखी मिथः असे वर्णन केलेल्या इंदुमतीची उपमा देता येईल."[३४]

Awakening of Indian Woman ह्या पुस्तकात लेखिका मागरिट कझिन्स रमाबाईंविषयी लिहिताना म्हणते, की "ह्या कालखंडात श्री. रानडे मुंबईत जज्ज म्हणून जसे ख्यातनाम झाले होते तशा रमाबाई पण समाजकार्यकर्त्या म्हणून प्रसिद्ध झाल्या होत्या."

१८९६ पासून मात्र उमाकांत म्हणतात त्याप्रमाणे, 'त्यांच्यावर अनेक सांसारिक अडचणी येत गेलेल्या दिसतात. पण आतापर्यंत मिळालेल्या शिक्षणाचे व अनुभवाचे दृष्य फळ त्यांच्या वागण्यात दिसू लागलेले आढळते.'

१८९६ च्या सुमारास मुंबईत पहिला प्लेगचा उद्रेक झाला. घरात उंदिर पडल्याचे व स्वैपाकिणीच्या मुलाला प्लेगची लागण झाल्याचे लक्षात येताच रानड्यांनी तडकाफडकी

लोणावळ्याला जाण्याचा बेत केला. रानडे कोर्टातून परस्पर स्टेशनवर येणार होते व रमाबाईंनी घरची सर्व व्यवस्था करून मुलांना घेऊन बोरीबंदर स्टेशनवर जायचे ठरले होते. त्या प्रसंगाविषयी रमाबाई लिहितात-

"तीन वाजेपर्यंत मी घरातील सर्व व्यवस्था लावून व बंदोबस्त करून त्या आजारी मुलाला व त्याच्या आईला इस्पितळात पाठवले. पहारेवाल्याला व शिपायाला 'उघड्या देवडीवर होईल तितके करून वेळ काढा, होईल तोवर बंगल्यात जाऊ नका,' असे सांगून घरातील जोखमेच्या मालाच्या पेट्या भरून बरोबर घेतल्या. पहारेवाला व शिपाई यांशिवाय 'स्वतःचा' रीडर, सखूचा मास्तर व चार-पाच विद्यार्थी मिळून सहा-सात जणांची निजण्याची व राहण्याची सोय चार-पाच दिवसांकरिता आमच्या समोरच्या... माडीवरच करून दिली... मी स्टेशनवर गेले... रात्री... बंगल्यावरील दोघेही प्लेगने लागले अशी तार दुसऱ्या दिवशी आली. माझा भाचा... व दुर्गाप्रसाद शिपाई या दोघांना मी परत मुंबईत पाठवून तेथील बंदोबस्त करण्यास सांगितले. त्यांना सूचना केली, की तुम्ही आपल्याला जपा... आजारी माणसाला इस्पितळांत पोहोचवा.. मॅजिस्ट्रेटला चिठ्ठी दिली आहे... ते पेन्शनर पोलीस पाठवतील. त्याला बंगल्याचा पहारा करण्यास सांगून तुम्ही... बाहेर विद्यार्थी राहत आहेत, त्या बंगल्यात रहा.' ही सर्व व्यवस्था मी 'स्वतः'ला न कळविता परस्पर करवीत असे. ह्याचे कारण कोणीही आजारी असले तरी स्वतः वास्तपुस्त घेऊन नीट व्यवस्था लागेपर्यंत चैन पडावयाचे नाही... ही स्पर्शजन्य साथ. हिच्यापासून 'स्वतः'ला जितके दूर राहता येईल... ती व्यवस्था आपणच केली पाहिजे. 'स्वतः'कडून अशावेळी 'स्वतः'ला जपण्याकरता दूर राहणे होणार नाही हे मला माहीत होते. म्हणून... आजारी माणसांची बातमीच कळू न देता आपल्याला समजेल तितक्या काळजीने योग्य बंदोबस्त करावा... इतके माझ्या मनाने घेतले." [३५]

अर्थात तार आल्यावर न्यायमूर्तींना सर्व कळलेच व आपल्याला आधी कळू दिले नाही, म्हणून ते रागावलेच. त्यावर रमाबाई म्हणतात--

"कळले तर किती राग येईल, हे मला आधीच माहीत होते. पण सगळ्या गोष्टी जाणूनबुजून केल्या असल्यामुळे रागे भरून घेतल्याचे फारसे वाईट वाटले नाही."[३६]

पतीच्या स्वभावातील बारकावे व त्यांच्या संभाव्य प्रतिक्रिया नेमकेपणाने हेरण्याची रमाबाईंची ही संवेदनशीलता 'आठवणी' वाचताना अनेकदा जाणवते.

मुंबईस राहिलेल्या माणसांत प्लेगची लागण वाढत असल्याचे कळल्यावर माधवराव अस्वस्थ झाले. स्वतः मुंबईला जाऊन नव्या घराची व्यवस्था करतो, असे म्हणू लागले. त्या वेळची रमाबाईंची प्रतिक्रिया पहा-

"ती काळजीची वेळ होती. तरीही हे बोलणे ऐकून मला हसू आले. स्वभाव इतका मायाळू व काळजीखोर असल्यामुळे आजारी माणसाच्या बातमीने मनाची इतकी खळबळ उडून गेली, की आपण जी गोष्ट करण्याचे मनात आणले आले आहे ती आपल्या हातून कितपत होईल, अशा तऱ्हेची कामे... आजपर्यंत आपण... कधी केली आहेत काय ह्याचा विचार 'स्वतः'च्या मनास शिवला नाही, याचेच मला हसू आले. तरी ते मी आवरून धरून काही उत्तर दिले नाही.

जेवण होईपर्यंत जितके बोलणे झाले तितके मी ऐकून घेतले व 'स्वतः'चे जेवण झाल्यावर जेवावयास बसले... नेहमी सुट्टीच्या दिवसात माझे जेवण होईपर्यंत इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलत तेथेच बसावयाचे असे."[३७]

तेव्हा असेच बोलत बसले असताना माधवराव थोडेसे शांत झाले आहेत, हे पाहून रमाबाईंनी हळूच विषय काढून विचारले-

"मला सांगितले तर आज मी पुढे जाते... सर्व कामे करते. जागा पाहून विद्यार्थ्यांची सोय करून जमल्यास रात्रीच्या गाडीने पुढे येते. कल्याणला एक व दुसरी जागा भांडुपास आहे ना ? मी दोन्ही जागा पाहून एक पसंत करून 'स्वतःच्या' इच्छेप्रमाणे सर्व काही करते. काळजी नको. अशा गोष्टी आजपर्यंत स्वतः कधीच केल्या नाहीत. त्या आता कशा बरे होतील ?"[३८]

ह्यानुसार रमाबाई मुंबईत एकट्या आल्या व दोन-तीन बंगले पाहून शेवटी भांडुपचा बाग असलेला प्रशांत बंगला त्यांनी पसंत केला. पुढे त्या लिहितात- "तिथे राहणाऱ्या कारकुनास, रात्रीतून सर्व जागा झाडून, सारवून, चुना लावून, सकाळी राहण्याजोगी झाली पाहिजे, जास्त पैसे पडेल तरी हरकत नाही, असे बजावून भाच्याला चिठ्ठी पाठवली, की घरातील सर्व सामान माणसांबरोबर उद्या सकाळी पाठवून, लिहिण्यावाचण्याचे सामान व आवश्यक तेवढी बुके घेऊन तू कोर्टातून आल्यावर संध्याकाळपर्यंत नव्या बंगल्यात ये. सर्व व्यवस्था लागल्यावर आम्हांला तारा करा, म्हणजे आम्ही गडी, ब्राह्मण घेऊन सोमवारी सकाळी परस्पर भांडुपास येऊ असे कळविले व हे सर्व झाल्यावर रात्री दहाच्या गाडीने निघून एक वाजता लोणावळ्यास येऊन उतरले."[३९]

या संपूर्ण प्रसंगात रमाबाईंनी दाखविलेली सावधचित्तता, आत्मविश्वास, कामाची आखणी व व्यवस्थापन कौशल्य लक्षणीय वाटते.

तिसरे दिवशी मुंबईस परत आल्यावरही, घरातील आजारी नोकरांची स्थिती रानड्यांच्या कानावर गेल्यास, त्यांच्या हळव्या व प्रेमळ स्वभावामुळे त्यांचे जेवणखाण, झोप नीट होणार नाही व त्याचा परिणाम त्यांच्या तब्येतीवर होईल म्हणून रमाबाई सर्व घडामोडी बेतानेच त्यांच्या कानावर घालताना दिसतात. मात्र स्वतः दवाखान्यात जाऊन आजाऱ्यांची वास्तपुस्त, औषधपाण्याचा खर्च व व्यवस्था जातीने बघत होत्या असे दिसते.

थोडक्यात रानड्यांनी जे जे स्वतः केले असते तो सर्व भार स्वतःवर घेऊन रमाबाई पार पाडताना दिसतात.

इथून हळूहळू माधवरावांची तब्येत ढासळत चाललेली दिसते. प्लेगमध्ये घरातील नोकर, आश्रित, बरेच जण मृत्युमुखी पडले. त्याचेपण न्यायमूर्तींना बरेच दुःख झालेले दिसते. त्यांची त्यानंतर भूकच मंदावल्यासारखी झाली होती. ह्या काळात रमाबाई न्यायमूर्तींच्या जेवणाखाण्याकडे अधिकच लक्ष देताना दिसतात. जातीने नानाप्रकारचे आवडीचे पदार्थ शिजवून दोनचार घास तरी जास्त जावे, म्हणून खटपट करताना दिसतात. जेवणाच्या वेळा संभाळण्यासाठी पण जागरूक प्रयत्नात दिसतात. जेवायला उठण्यास वेळ लागला, तर जवळ जाऊन सौम्य नाराजीपण व्यक्त करतात, असे त्यांच्या 'आठवणीं'तून लक्षात येते.

न्यायमूर्तींपण रमाबाईंचा हा प्रेमळ स्वभाव मान्य करून थट्टेने म्हणत- "चला बुवा उठलो ! रिकामे बसून आयते जेवायचे आणि तेही वेळेवर नाही ! उशीर झाला म्हणजे बायकांची जात नाजूक, त्यांना पित्त होते, हे आमच्या लक्षात येत नाही."[४०]

एवढी काळजी घेऊनही महाबळेश्वरला असताना माधवरावांना ऊन लागण्याचे निमित्त होऊन ॲटॅक आलाच. त्यावेळी. रमाबाईंनी केलेली सेवा पाहाताना त्या सहचरीच्या नात्याहूनही चार पावले पलीकडे जाऊन आईच्या भूमिकेत वावरताना दिसतात. ह्या दृष्टीने पुढील वर्णन पहा-

"आज असे का ? असा प्रश्न माझ्या मनापुढे उभा राहून एकदम पोटात धस्स झाले. तरी मी बाहेर काही न दाखवता बजाबाला हाक मारून दूध कढत करून आण, असे सांगून... एक स्वच्छ हलके पांघरूण अंगावर घालून मी मानेपासून पायापर्यंत... सर्व अंग चेपीत बसले. घाम आला होता, तो मी पुसून काढला... 'आता जेवायला उठायचे आहे ना. साडेबारा वाजले,' असे म्हणताच चटकन् उठून स्नानाच्या खोलीत येणे झाले... अंघोळीचे पाणी तयारच होते. थंडी होऊ नये म्हणून लवकर स्नान घालून आटपते घेतले... गड्याकडून बिछाना तयार करविला व खिडक्या लावून घेतल्या... डॉक्टरांना बोलावले. या वेळच्या दुखण्याबद्दल माझी कल्पना काय आहे ती सारी त्यांना सांगितली... डॉक्टरांनी प्रकृती पाहिली व ते मला म्हणाले... 'तुमची कल्पना बरोबर आहे. पुष्कळसे ब्रेसाईड दिले पाहिजे.' यावर मी म्हटले, 'याचीच मला काळजी पडली आहे. काही झाले तरी खरा प्रकार स्वतःला कळू द्यायचा नाही, थंडीवाऱ्याचा ताप आहे. मी डायफ्रेटिक पाठवतो. ते आपण तीन-तीन तासांनी घ्यावे, असे जवळ सांगा व डायफ्रेटिक-मध्ये ब्रोमाईट द्या. दोहींची चव जवळ जवळ सारखी असल्याने ते त्यांत संपादेल. नुस्ते ब्रोमाईड दिले तर... आपल्या डोक्याला विकार झाला की काय अशी मनात शंका आली तर तिचा परिणाम होईल व हीच गोष्ट होऊ द्यायची नाही,' असे मी डॉक्टरना बजावून सांगितले."[४१]

ह्या आजाराचा परिणाम माधवरावांच्या डोक्यावर बरेच दिवस राहिल्याने पंधरा दिवसानंतरही पत्राचा मजकूर सांगताना त्यात विसंगती येई. पत्र लिहून घेणाऱ्या मुलाला चमत्कारिक वाटे. असे रमाबाई सांगतात. पुढे त्या लिहितात-

"त्या मुलाला एकीकडे बोलावून सांगितले- जसा मजकूर सांगणे होईल, तसाच अक्षरशः लिहून काढीत जा. लिहिताना असे का, असे जवळ विचारू नको. लिहिलेली पत्रे माझ्याजवळ आणून द्या. म्हणजे ती कोणाला व मजकूर काय लिहावयाचा तो मी सांगेन, कारण मुलांनी उलट विचारले व आपली काय चूक होत आहे हे 'स्वतः'च्या लक्षात आले तर मनाला धक्का बसून त्यावर परिणाम होईल, या भीतीने सर्व बाजूंनी मला फार जपावे लागे."

ह्या जपणुकीसाठी रमाबाईंचे माधवरावांच्या खाण्यापिण्याकडे, तब्येतीमधील लहानसहान चढउताराकडे बारीक लक्ष असे. दोन घास कमी खाल्ले तरी त्या तत्काळ माधवरावांना प्रश्न करीत, आग्रह करीत. त्यावर माधवराव म्हणाले-

"पुरुष काय हवे ते करोत, तिकडे म्हणून लक्ष द्यावयाचे नाही अशी पहिल्या बायकांची चाल असे. पण तुझे पाहावे तो उलट, माझ्या प्रत्येक हालचालीवर तू एक गुप्त पोलीसच होऊन

बसली आहेस म्हणावयाचे."[४२]

अर्थात माधवरावांचे असले बोलणे रमाबाई मनावर घेताना दिसत नाही.

खूप काम करण्याने तब्येतीची हयगय होत आहे असे लक्षात आल्यास त्या आता सौम्यपणे माधवरावांवर रागावू पण लागलेल्या दिसतात.

एकदा एका फाशीच्या केसचे निकालपत्र लिहिण्यासाठी दिवसभर माधवराव लिहित बसले होते. ते काम आटोपल्यावर त्यांनी रमाबाईंना 'आता तुझे फराळ चहा पाणी काय असेल ते घेऊन ये,' असे सांगितले. त्या चहा-फराळ घेऊन येतात न येतात तोच प्रार्थना समाजातून उपासना करण्यासाठी नोकरांकरवी बोलावणे आले. त्या वेळी रमाबाई लिहितात-

"हे ऐकून मला थोडा राग आला. नोकराला मी म्हटले- 'सांगितले आहे असे म्हणण्यापेक्षा हुकूम केला आहे, असे म्हटलेस तर अधिक शोभेल ! काय त्यांना चिठ्ठीसुद्धा लिहवली नाही ? तुझ्या हाती निरोप आणि तो पाच वाजता !"[४३]

अर्थात माधवरावांना ह्याचा राग न वाटून घेता- 'मी येतो म्हणून सांग,' असे म्हटले. त्यावर पुन्हा रमाबाई लिहितात-

"मी थोडे रागाने म्हटले, 'मला माहीतच होते की सगळी धांदल काय ती खाण्यापिण्याच्या वेळी यावयाची. इतका वेळ कोर्टाचे काम झाले, आता समाजाचे, धर्माचे काम आले... माझ्या हातातले जिन्नस गार होताहेत, पण तिकडे पाहावयास देखील वेळ होत नाही.' इतके ऐकून पोषाख करणे थांबवले व माझ्या हातातील फराळाचे घेऊन थोडेसे खाल्ले व चहा घेतला."[४४]

आतापर्यंतच्या सविस्तर वर्णनातून रमाबाई व माधवराव ह्यांच्यातील सुरवातीचे सर्व प्रकारचे अंतर २५-२६ वर्षांच्या सहजीवनात कसे कमी कमी होत गेले, नातेसंबंधाच्या वेगवेगळ्या पायऱ्या ओलांडत ती दोघे किती निकट येऊन पोहोचली होती, हे लक्षात येते.

ह्याची आणखी एक प्रभावी प्रचिती माधवरावांच्या शेवटच्या आजारात मिळते.

१९०० च्या ऑगस्टमध्ये माधवरावांचा विकार बळावून, त्यांना रोज रात्री दहा ते साडेदहाच्या दरम्यान छातीत बांध आल्यासारखे होऊन झटका येऊ लागला. अनेक औषधोपचार झाले. डॉक्टर झाले, बाकी सारा दिवस ते ठीक असत, त्यामुळे कदाचित हे दुखणे मानसिक असावे असे वाटून रात्रीच्या वेळी गप्पा, गाण्यात, घरांतील मंडळीसमवेत गुंतवून ठेवण्याचा प्रयत्नपण रमाबाईंनी करून पाहिलेला दिसतो. पण झटका यायचा टळला नाही. स्वतः न्यायमूर्तींना पण त्याची काळजी वाटू लागली होती. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे ह्याच सुमारास रमाबाईंचे एक जुने दुखणे बळावून त्यांचे ऑपरेशन करणे आवश्यक ठरले व त्या ताणाच्या काही दिवसांत माधवरावांना रात्रीचा झटक्याचा त्रास एकदाही जाणवला नाही असे दिसते.

जन्मभर अतिशय शांत, स्थितप्रज्ञ व संयमी वृत्तीने जीवनातील हरएक संकटाला, निंदेला, सामोरे गेलेले माधवराव रमाबाईंच्या आजाराने मात्र विचलित झालेले दिसतात. सुरवातीस तर ते ऑपरेशन टाळण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

रमाबाई म्हणतात- "ऑपरेशन केल्यास त्यातून मी बरी होईन की नाही, ही भीती

माधवरावांना वाटत होती. उलट 'स्वतः'च्या दुखण्याच्या वेळी 'स्वतः'ला माझा उपयोग झाला तरच माझे जगण्याचे सार्थक आहे... आजारी राहून नुसते बसून राहण्यापेक्षा मेलेले काय वाईट ?"[४५] असे रमाबाईंना वाटते होते. ऑपरेशनची सूचना रमाबाईंनीच अधिक धीटपणे स्वीकारलेली दिसते.

एक दिवस रमाबाईंची तब्येत थोडी जास्त बिघडली व ऑपरेशन करावेच लागणार असे दिसू लागले. तेव्हाच्या प्रसंगाविषयी रमाबाई लिहितात- "आत येऊन माझ्या पलंगापाशी रात्री जेवणाची वेळ होईपर्यंत बसणे झाले. या दिवशी रोजचे वाचन किंवा सकाळच्या टपालाची उत्तरे लिहिणे वगैरे काही केले नाही. माझे हात आपल्या हातात घेऊन सचिंत बसणे झाले."

जेवणाच्या वेळी देखील 'हिचे ताट आधी वाढून आणावयास सांग. हिचे जेवण झाल्यावर मग मी येईन', असे सांगितले व माझे जेवण झाल्यावर मग स्वतः खाली जाऊन, जेवून पुन्हा लागलीच माझ्याजवळ येऊन बसणे झाले,"[४६]

स्वतःच्या आजारातही माधवरावांनी पत्रलेखन व रोजचे वाचन थांबवलेले दिसत नाही.[४७] पण रमाबाईंच्या आजाराने ते हवालदिल झालेले दिसतात.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी पुन्हा माधवराव रमाबाईंजवळ येऊन बसले. ते पुन्हा पुन्हा रमाबाईंना म्हणत होते- "ऑपरेशन करणे टळत असेल तर बरे नाही का ? हाताने कामे झाली नाहीत, तरी बसल्या बसल्या व्यवस्था पाहता येईल. लिहिण्या-वाचण्याची करमणूक तुझी तुला आहेच. तेव्हा मला हेच पसंत आहे. उगीच जीव धोक्यात का घालावा बरे ?"[४८]

रमाबाई म्हणतात, "प्रत्येक वाक्य बोलताना स्वतःच्या मनाची स्थिती कशी झाली होती ती हुबेहुब माझ्या डोळ्यांसमोर असल्याने माझ्या अंतःकरणात कसेसेच होऊन डोळे पाण्याने भरून आले."[४९] त्यानंतर बहुतेक वेळ ते रमाबाईंचे हात हातात घेऊन विषण्ण मनाने, दृष्टी कुठेतरी लावून बसून होते. तेवढ्यात अकराचे टोले वाजले आणि त्यांच्या लक्षात आले, की रोजची झटका येण्याची वेळ ऑपरेशनच्या काळजीत टळून गेली होती. रमाबाई म्हणतात- "त्यावरून ह्यांचे दुखणे डॉक्टर म्हणतात तसेच ऑर्गनिक नसून नर्व्हसनेसचे खचित आहे. विशेष म्हणजे... हा विचार येऊन मला फार बरे वाटले."[५०]

विशेष म्हणजे पुढेपण रमाबाई ऑपरेशनमधून बऱ्या होईपर्यंत तीन आठवडे माधवरावांना स्पॅझम आले नाहीत.

माधवरावांसारख्या पहाडासारव्या पुरुषाची झालेली ही विकल अवस्था पाहून रमाबाई म्हणतात- "मला भडभडून आले. मी गेले तर स्वतःला असह्य दुःख होईल. स्वतःच्या कोणत्याच गोष्टी आजपर्यंत स्वतः कधी पाहिल्या नाहीत. ते आता कोण करेल ? जरासे बरे नसले तर जेवणखाण, औषधपाणी, अंग चेपणे सर्व उपचार माझ्याशिवाय कोणी केलेले कधी आवडत नाही. मग आता कसे होईल ?"[५१]

अशी विचाराने एका बाजूने त्या व्यथित होताना दिसतात, तर दुसरीकडून 'आता आपण भाग्याच्या शिखरावर आहोत. आता पतीच्या आधी सगळं वैभव भोगल्यावर आपण मेलो तर काय वाईट ?' असा विचार दुसरीकडून मनात येत होता.

'त्या म्हणतात- "दुसऱ्याच्या मनाचा थोडा विचार करावा, हे स्वतःच्या तोंडून जपून व हळू उच्चारलेले वाक्य, त्यातील गहिवरलेल्या आवाजाची व खिन्न चेहेऱ्याची आठवण होऊन त्या शुद्ध प्रेमाची व माझ्या उलट चाललेल्या विचारांची तुलना केली तेव्हा माझा मला थोडा तिरस्कार वाटला. आम्हा उभयतांपैकी कोणीतरी दुःख सोसलेच पाहिजे अशी जर परमेश्वराची इच्छा असेल तर 'स्वतः' करता मी काहीही सोसावे, पण माझ्याकरता 'स्वतः'ला दुःख होऊ नये_जिला पतीच्या अंतःकरणाची चांगली ओळख झाली आहे व जिला त्या निस्सीम प्रेमाची किंमत कळली आहे तिला, 'आप मेले व जग बुडाले' अशा अप्पलपोट्या विचाराने समाधान कसे वाटावे."[५२] अशा उलटसुलट विचारांनी त्या अस्वस्थ झालेल्या दिसतात.

शेवटी रमाबाईंचे ऑपरेशन सुखरूपपणे पार पडले. त्यानंतर तीन आठवड्यांनी माधवराव माथेरानला गेले, नि तिथे त्यांना पुन्हा झटके येऊ लागल्याचे दिसते. रमाबाई पंधरा दिवस मागाहून जाणार होत्या. पण पुन्हा झटके येऊ लागल्याचे कळल्याबरोबर त्यांच्याने राहवेना. त्या डॉक्टरणीला म्हणाल्या- "माझ्याच्याने आता येथे राहवत नाही. माझ्यात थोडी कसर राहिली तरी चिंता नाही. मी पुढे औषध घेईन... घेतलेच पाहिजे असे व विशेष खटपटीशिवाय घेता येण्यासारखे औषध असेल तर द्या. नाहीतर तूर्त काहीच नको. माझे मन स्वस्थ नाही."[५५]

एकमेकांची मने फारसे न बोलताही समजू शकणारे, एकमेकांना जपणारे, एकमेकांच्या दुखण्याने विव्हल होणारे असे हे उत्कट पति-पत्नी नातेसंबंध निर्माण झालेले दिसतात.

रमाबाईंनी काळजी घेऊनही माधवरावाची तब्येत दिवसेंदिवस खालावत चालली होती. रमाबाई लिहितात- "जरी आम्ही दोघेही बाहेरून उसना धीर आणून दुखण्याची भीती नाही. असे परस्परांना भासविण्याची शिकस्त करीत होतो, तरी अंतःकरणाची स्थिती लपली जात नव्हती."[५६]

एकदा नणंदेजवळ रमाबाई माधवरावांच्या दुखण्याबाबत मन मोकळे करून काळजी व्यक्त करीत होत्या. तेव्हा त्यांची नणंद म्हणाली- "देवीवर भार टाकून तू स्वस्थ मनाने राहा. असा धीर सोडू नको. डॉक्टरबिक्टरचे आम्हांला काही समजत नाही. पण तू हुशारीने वागलीस म्हणजे तुझ्याकडे पाहून आम्हांला धीर येतो. ती तू असा धीर सोडू नकोस बाई. 'घरच्या लक्ष्मीने' असे वेळी-अवेळी डोळ्यांतून पाणी काढू नये."[५७]

एके काळी रमाबाईंच्या शिक्षणाचा उद्धार करणाऱ्या व 'मालकिणीच्या तोऱ्यात वागू नको', असे म्हणणाऱ्या नणंदेच्या तोंडचे हे शब्द विशेष लक्षणीय वाटतात.

रानड्यांची प्रकृती जसजसी अधिकाधिक ढासळू लागली तसतसा रमाबाईंचा धीर सुटू लागला. वारंवार उमाळा दाटून येई. ही स्थिती रानड्यांच्या लक्षात येऊ नये म्हणून त्या मधूनच उठून दुसरीकडे जाऊ बघत. पण रमाबाई लिहितात-

"अलीकडे अलीकडे मी मात्र सदोदित जवळ बसावे, इकडे तिकडे जाऊ नये असे स्वतःला वाटत असे. मलाही जरी तसेच वाटे तरी... मनाची अनावर स्थिती झाकण्याकरिताच काहीतरी निमित्त करून मधून मला थोडा वेळ उठून जावे लागे. अशी मी उठू लागले म्हणजे

माझ्या हाताचे बोट धरून ठेवून म्हणायचे, की "काही नको जावयाला... नुकतीच दुखण्यातून उठली आहेस. उगीच खालीवर हेलपाटे किती घालावयाचे. काय करावयाचे असेल ते मुलींना सांगावे."

रमाबाई लिहितात त्यानुसार एव्हाना न्यायमूर्तींना आपल्या आजाराचे गांभीर्य लक्षात आले होते. त्यांनी निरवानिरवीची भाषा सुरू केली होती. आपले मृत्युपत्र तयारही केले. (न्यायमूर्ती रानड्यांनी आपल्या मृत्युपत्रात 'मी, माझी पत्नी व बहीण यांना सर्व हक्क असलेल्या व्यवस्थापिका नेमत आहे व त्यांना या कामात साहाय्य माझे दोघेही भाऊ...' असे लिहून, आपल्या सहचरीविषयी त्यांना वाटणारा पूर्ण विश्वासच व्यक्त केला आहे, असे वाटते.) भोवतालच्या व्यवहारातून ते अलिप्त होत चालले होते. सर्व वेदना मूकपणे सहन करू लागले होते. रमाबाईंचा सहवास मात्र जितका मिळेल तितका घ्यावा असे वाटत होते, असे दिसते. मात्र येऊ घातलेल्या चिरविरहाची दुःखद जाणीव दोघांनाही मनोमन झाल्यामुळे जवळ बसूनही एकमेकांची दृष्टादृष्ट... होऊ देण्याचे टाळत होते. रमाबाई म्हणतात- "कदाचित दृष्टादृष्ट झाली तर मुद्दाम आवरून धरलेल्या 'स्वतः'च्या मनाचा सुद्धा बांध लागलीच ढासळेल, मग माझी काय कथा, असे मला वाटे."[५८]

पण ही ताणाची स्थिती फार काळ टिकली नाही. न्यायमूर्तींचे देहावसान झाले. रमाबाई म्हणतात- "ज्या दैदीप्यमान तेजोमय सौभाग्यसूर्याच्या प्रकाशात मी मोठ्या भूषणाने व खऱ्या आनंदाने एकसारखी सत्तावीस वर्षे वागत होते ते प्रत्यक्ष सेवा घेणारे दिव्य सूर्यरुपी पाय मला अंतरल्यामुळे अत्यंत दुःखरूप, निबिड अंधारात चाचपडत राहण्याचा प्रसंग येऊन पोहोचला ! किती मी भाग्यहीन."[५९]

रमाबाईंच्या जीवनातील 'प्रेरणापर्व' अशी तऱ्हेने संपून गेले व त्या काही काळ दिशाशून्य अवस्थेत फेकल्या गेलेल्या दिसतात.

* *

संदर्भ सूची

१. आमच्या आयुष्यातील आठवणी: रमाबाई रानडे, पृष्ठ ११०, १११, ११२
२. कित्ता: पृष्ठ ११३
३. कित्ता: पृष्ठ ११३
४. कित्ता: पृष्ठ ११५
५. कित्ता: पृष्ठ १४१
६. कित्ता: पृष्ठ ६२
७. कित्ता: पृष्ठ ११६
८. कित्ता: पृष्ठ १३३, १३४
९. कित्ता: पृष्ठ ११९
१०. कित्ता : पृष्ठ १२२
११. कित्ता : पृष्ठ १४२
१२. रमाबाई रानडे चरित्र: उमाकांत, प्रस्तावना: पृष्ठ ९
१३. आमच्या आयुष्यातील आठवणी: रमाबाई रानडे, पृष्ठ १३७
१४. कित्ता : पृष्ठ १६०
१५. कित्ता : पृष्ठ १६१
१६. कित्ता : पृष्ठ १६२
१७. कित्ता : पृष्ठ १६३
१८. कित्ता : पृष्ठ १६४
१९. कित्ता : पृष्ठ १६४
२०. कित्ता : पृष्ठ १३०
२१. कित्ता : पृष्ठ १४४
२२. कित्ता : पृष्ठ १४७

२३. कित्ता : पृष्ठ ७९
२४. रमाबाई रानडेः चरित्रः उमाकांत, प्रस्तावनाः पृष्ठ १२
२५. आमच्या आयुष्यातील आठवणीः रमाबाई रानडे, पृष्ठ १७३
२६. कित्ता : पृष्ठ १७४
२७, २८, २९. कित्ता : पृष्ठ १७५
३०. कित्ता : पृष्ठ १७६
३१. पायोनियर वुमेन ऑफ इंडियाः जेम्स कॅलाक, पृष्ठ ३८
३२. श्रीमती रमाबाई रानडेः मा.श्री.विद्वांस, पृष्ठ १७७
३३. कित्ताः पृष्ठ १४७
३४. रमाबाई रानडे चरित्रः उमाकांत, पृष्ठ ७८
३५. आमच्या आयुष्यातील आठवणीः रमाबाई रानडे पृष्ठ १८६, १८७
३६. कित्ता : पृष्ठ १८८
३७. कित्ता : पृष्ठ १८९, १९०
३८. कित्ता : पृष्ठ १९०
३९. कित्ता : पृष्ठ १९१
४०. कित्ता : पृष्ठ २१०
४१. कित्ता : पृष्ठ २१३, २११
४२. कित्ता : पृष्ठ २२२
४३, ४४. कित्ता : पृष्ठ २२४
४५. कित्ता : पृष्ठ २३३
४६. कित्ता : पृष्ठ २३५
४७. कित्ता : पृष्ठ २३७
४८. कित्ता : पृष्ठ २३८
४९. कित्ता : पृष्ठ २३९
५०. ५१. कित्ता : पृष्ठ २४०
५२, ५३. कित्ता : पृष्ठ २४२
५४. कित्ता : पृष्ठ २४३, २४४
५५. कित्ता : पृष्ठ २४५
५६. कित्ता : पृष्ठ २५९
५७. कित्ता : पृष्ठ २६२
५८. कित्ता : पृष्ठ २७०
५९. कित्ता : पृष्ठ २७१

प्रकरण ५ वे

कर्मयोगिनी

१९०१ साली न्यायमूर्तींचे निधन झाले आणि त्यानंतर काही काल रमाबाईंचे जीवन अंधःकारमय झालेले दिसते. सूर्यास्त व्हावा नि चंद्रोदय व्हायला अवकाश असावा... त्यामधल्या संधिकालाप्रमाणे रमाबाई जीवनातला सर्व उत्साह हरवून दिङ्मूढ व दिशाहीन होऊन गेल्या होत्या, असे जाणवते.

त्या वेळच्या त्यांच्या अवस्थेचे मोठे मार्मिक पण करुण वर्णन श्री अण्णासाहेब कर्व्यांच्या आत्मवृत्तात वाचावयास मिळते. १९०३ साली जेव्हा रमाबाई प्रथमच हिंगण्याच्या शाळेस भेट देण्यास आल्या त्या वेळचे वर्णन करताना अण्णासाहेब लिहितात–

"श्रीमती रमाबाई रानडे यांच्या भेटीचा प्रसंगही असाच हृदयद्रावक होता. सांपत्तिक साधने अनुकूल असतांही वैधव्याग्नीने हिंदू स्त्रियांचे तेज व उत्साह ही कशी कोळपून जातात हे श्रीमती रमाबाई रानडे ह्यांच्या स्थितीवरून फार ढळढळीत रीतीने लक्षात येते. सौभाग्यदीप प्रज्वलित असतांना स्त्री-जातीच्या उन्नतीसाठी त्यांचे यत्न कसे अव्याहत चालले होते याची साक्ष मुंबईचा स्त्रियांचा क्लब देत आहे. न्यायमूर्ती रानड्यांचे मुंबईच्या स्त्रियांनी जे स्वतंत्र स्मारक केले ते स्त्रियांच्या क्लबाशी रमाबाईंचा अतिनिकट संबंध नसता तर खचित केले नसते. पण आता त्यांची काय स्थिती झाली आहे पाहा. अपत्यवत रक्षण केलेल्या संस्थेविषयी प्रेमभाव नष्ट व्हावा हे शक्यच नाही. पण भगिनींचा सप्रेम आग्रह असताही अजून त्यांच्याने तिकडे जाववले नाही. परवा लेडी नॉर्थकोट स्वदेशी गेल्या, त्या वेळी पुण्यातील स्त्रियांच्यातर्फे जी त्यांना पानसुपारी करण्यात आली त्या प्रसंगीही... श्रीमती राणीसाहेब अक्कलकोट यांच्यासारख्या वजनदार स्त्रियांचा आग्रह असतादेखील.... त्यांच्याच्याने जाववले नाही. अशा.... स्थितीत अजूनपर्यंत त्यांना आश्रमाकडेही येववले नाही यात आश्चर्य नाही. आश्रमाविषयी जरी त्यांच्या मनात प्रेम होते व योग्य प्रसंगी त्यांजकडून सल्लामसलतही मिळत असे तरी.... त्यांना आश्रमांत आणण्यासंबंधाने अनेक वेळा यत्न झाले, पण ते व्यर्थ गेले."[१]

वरील वर्णनातून रमाबाईंची न्यायमूर्तींच्या निधनानंतर झालेली अवस्था लक्षात येते. तसेच सुशिक्षित स्त्री-पुरुषांना त्यांच्याविषयी वाटणारा आदरभाव पण दिसून येतो.

रमाबाईंनी पतिनिधनानंतर घराबाहेर पडणे, सभा-संमेलनाला जाणे वगैरे सोडून दिलेले होते. जवळजवळ वर्षभर त्यांनी स्वतःला पतीच्या आठवणींत कोंडून घेतल्यासारखे दिसते.

तथापि, तशा निष्क्रीय व आत्ममग्न अवस्थेत त्या फार काळ राहिलेल्या दिसत नाहीत. न्यायमूर्तींनी दिलेल्या भक्कम पायावर रमाबाईंच्या कर्मयोगाची इमारत उभी राहू लागलेली दिसते. घराबाहेर पडणे रुचत नव्हते व पतीच्या वियोगाचे दुःखही पाठ सोडत नव्हते. अशा वेळी त्यांनी हा एकांतवास व पतीचे स्मरण ह्यांतून एक चिरस्थायी कार्य सिद्धीस नेलेले दिसते.

त्याविषयी श्री. विद्वांस लिहितात- "माधवरावांनी निरनिराळ्या वर्षी प्रार्थना समाजात जे धर्मपर उपदेश केले होते, जी व्याख्याने दिली होती, ती त्यांनी या काळात एकत्र केली. त्यांचे वृत्तपत्रीय अहवाल, श्रोत्यांनी उतरवून घेतलेले सारांश श्री द्वा. गो. वैद्य यांच्या साहाय्याने मिळवून, स्वतः वाचून, तपासून त्यांचा संग्रह 'न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांची धर्मपर व्याख्याने' या नावाने प्रथम वर्षश्राद्धाच्या तिथीस ग्रंथरूपाने प्रसिद्ध केला." [२]

स्वतः रमाबाई पुस्तकाच्या प्रस्तावनेत आपल्या ह्या कामामागचा उद्देश सांगताना म्हणतात– "ह्या धर्मपर व्याख्यानांचा संग्रह करण्याचा हेतू त्या परमपूज्य, अत्यंत शुद्ध पायांची सेवा प्रत्यक्ष नाही, तर या रूपाने तरी घडावी हा आहे.

आणखीही एक हेतू रमाबाईंच्या ह्या कृतीमागे दिसतो. ह्याच प्रस्तावनेत शेवटी त्या म्हणतात– "आपल्याला नंदादीप लावण्याचे सामर्थ्य नसेल, तर तेवत असलेल्या नंदादीपाची नुसती वात सारली तरी पुण्य घडते."

पतीने लावलेल्या ज्ञानदीपाची वात 'सारून' त्याच्या प्रकाशाचा लाभ समाजाला करून देणे, हे काम आपलेच आहे, हे ओळखून त्यांनी हे कार्य केलेले दिसते.

ह्या पुस्तकाला डॉ. भांडारकरांनी प्रस्तावना लिहिलेली आहे. वयाने, ज्ञानाने गुरू असूनही प्रस्तावनेत त्यांनी रमाबाईंचा उल्लेख १९०१ साली 'पूज्य रमाबाई' असा केलेला दिसतो.

रमाबाईंच्या ह्या कामाचे प्रार्थना समाजाच्या दृष्टीने आणखी एक महत्त्व श्री. विद्वांस सांगतात, ते म्हणजे– "प्रार्थना समाजाची तत्त्वे, व त्यांचे स्पष्टीकरण करणारी पुस्तके जरी न्यायमूर्ती व भांडारकरांनी लिहिली होती, तरीपण मनुष्याच्या दैनंदिन जीवनात आत्मोन्नत्तीसाठी आणि मनशांतीसाठी जी ईश्वराची आराधना करावी लागते ती कोणत्या मार्गास अनुसरून करावी; योग, ज्ञान, कर्म आणि भक्ती यांपैकी कोणता मार्ग अनुसरावा; प्रपंचातील बिकट प्रसंगी अंतःकरणात चिंता, भीती व अशांतता उत्पन्न झाली असता त्याचे निराकरण करून आश्वासन, धैर्य, मनःशांती कशी मिळवावी, जीवनात आत्मिक उन्नती व ऐहिक अभ्युदय साधण्यासाठी मनोभूमिका कशी ठेवावी, ह्या सर्व गोष्टींत धर्मातील तत्त्वरूप सिद्धांत पुरे पडत नाहीत. त्यासाठी तत्त्वांचा व्यवहारात उपयोग कसा करावा, हे विवरण करून दाखवून द्यावे लागते. ते काम न्यायमूर्तींनी आपल्या उपासनेतून केलेले होते." [३]

त्यामुळे ह्या पुस्तकामुळे प्रार्थना समाजाच्या तत्त्वांची, दैनंदिन जीवनातील अनुसरणपद्धती व उपयोग हे स्थायी रूपांत उपलब्ध झाले आहेत, असे म्हणता येईल.

आणखी एक सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे काम ह्या अज्ञातवासांत रमाबाईंनी सुरू केलेले दिसते, ते म्हणजे 'आपल्या आयुष्यातील आठवणी' लिहून काढणे.

त्यांची प्रिय कन्या चि. सखू हिच्या आग्रहाखातर रमाबाईंनी वैधव्यदुःखात विरंगुळा म्हणून पतीच्या आठवणी लिहून काढण्यास सुरवात केली व ह्याद्वारे मराठी साहित्यात एक अभिनव स्वरूपाचे, अतिशय साधे, पण जिव्हाळ्याने उत्कट झालेले आठवणीपर सुंदर पुस्तक निर्माण झाले. त्याचा आणखी एक फायदा झालेला दिसून येतो व तो म्हणजे न्यायमूर्तींचे सामाजिक जीवन जितके शुद्ध व थोर होते तितकेच त्यांचे वैयक्तिक जीवनही उदात्त होते, ह्याचा प्रत्यय मराठी वाचकास मिळाला.

ह्याच काळात सामाजिक कार्याबाबतही त्या हळूहळू जागरूक होऊ लागलेल्या दिसतात. पतीने चालू केलेले कार्य त्यांच्यामागे आपण चालू ठेवणे हे त्यांचे खरे स्मारक होय, हा विचार रमाबाईंच्या मनात जागा होऊ लागलेला दिसतो.

पुढे दोनच वर्षांनी महिला परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना त्या जाहीर कबुली देतात, की– "त्या श्रेष्ठ सहवासाचा परिणाम म्हणजे, मी माझ्या मनाच्या शोकाकुल स्थितीला कुरवाळीत बसावे असा होऊ नये... ज्या थोर कार्याकडे त्यांनी तन-मन-धन अर्पण करून अव्याहत श्रम केले, त्या गोष्टींमध्ये हातभार लावावा, असा व्हावयास हवा होता."[४]

त्यामुळे न्यायमूर्तींच्या निधनाला वर्ष उलटताच रमाबाईंनी पतीच्या विविध कार्यांपैकी स्त्री-उद्धाराचे कार्य निवडून त्या दृष्टीने आपल्या जुन्या योजना पुन्हा नेटाने सुरू केलेल्या दिसतात.

१८९६ त मुंबईत जसा त्यांनी 'हिंदू लेडीज् सोशल क्लब' सुरू केला होता त्या धर्तीवर १९०२ मध्ये पुण्यात क्लब स्थापन करून त्याद्वारे स्त्री-शिक्षणाचे वर्ग तसेच व्याख्याने, प्रवचने वगैरे कार्यक्रम सुरू केलेले दिसतात. ह्याचा उद्देश स्त्रियांमध्ये ज्ञानप्रसार करून सामाजिक कर्तव्याची जाणीव उत्पन्न करणे हा दिसतो. ह्याशिवाय सणांच्या निमित्ते स्नेहसंमेलने भरवण्यात येत. ह्यांना भिन्न जाती-धर्मांच्या मिळून २०० च्या वर बायका जमत, असे चरित्रकार सांगतात. फर्स्ट एड व शिवणकामाचे वर्गही सुरू केलेले दिसतात. नर्सिंगचे शिक्षण देण्यास मदत करणाऱ्या लेडी डफरिन् फंडाच्या पण त्या १९०२ मध्ये सभासद झालेल्या दिसतात. १९०३ मध्ये हिंगण्याच्या अनाथ बालिकाश्रम संस्थेच्या कार्यातही त्या सहभागी होऊ लागलेल्या दिसतात. आश्रमाच्या कामावर देखरेख करण्यासाठी नेमलेल्या स्त्रियांच्या कमिटीच्या त्या अध्यक्षा झाल्या व प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी आश्रमास भेट देऊन ते काम करू लागल्या, असे विद्वांस लिहितात.[५]

ह्याविषयी कर्वे आपल्या आत्मवृत्तात सांगतात– "अलीकडे अलीकडे आपल्या घरीच स्त्रियांच्या सभा वगैरे करून स्त्रियांच्या उन्नतीसाठी खटपट करण्याचे त्यांनी सुरू केले आहे.

अशा मनाच्या दुःखी स्थितीत आश्रमाला भेट देण्याचे त्यांच्या मनात आले.... सुमारे दोन तास त्यांनी आश्रमात घालविले व मुलींना योग्य उपदेश केला."

इथे हळूहळू रमाबाई आपल्या दुःखाच्या कोशातून बाहेर पडताना दिसतात. तथापि, अद्याप कोणत्याही सार्वजनिक स ेला किंवा समारंभाला मात्र त्या गेलेल्या दिसत नाहीत.

त्यानंतर १९०४ मध्ये त्यांच्या अंतःकरणातील स्त्री-विकासाच्या तळमळीला व त्यांच्या कार्यशक्तीला गती देणारी घटना घडलेली दिसते. या वेळी सामाजिक परिषदेच्या काही पुढाऱ्यांच्या मनात, ह्या परिषदेला पूरक म्हणून 'भारत महिला परिषद' स्थापन करण्याची कल्पना आली. (ह्या कामी संयोजकांनी रमाबाई रानडे, मिसेस फ्रामजी, मिसेस तैयबजी, सौ. काशीबाई कानिटकर इ. त्या काळच्या कर्तृत्ववान स्त्रियांशी तसेच, त्या काळचे स्त्री-सुधारणावादी अनेक क्लब व मंडळे ह्यांच्याशी पत्रव्यवहार केला.) ह्या परिषदेचे अध्यक्षस्थान रमाबाई रानड्यांनी भूषवावे असे सर्वांचे मत पडले. न्या. रानड्यांच्या निधनापासून कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमास रमाबाई जात नसल्याने त्यांनी हा बहुमान प्रथम स्वीकारलेला दिसत नाही. परंतु सर्वांच्या वतीने वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध नेते डॉ. भांडारकरांनी रमाबाईंना विनंती केली व मग नाइलाजाने रमाबाईंनी हे नेतृत्व स्वीकारलेले दिसते.

"ह्या परिषदेला उच्च, मध्यम व कनिष्ठ वर्गांतील, अनेक प्रांतांतील अनेक धर्माच्या, अनेक जातींच्या आठशेच्या वर प्रतिनिधी उपस्थित होत्या. स्त्री-जीवनाशी संबद्ध अशा अनेक विषयांवर मराठी, गुजराती, उर्दू वगैरे भाषांतून स्त्रियांनी भाषणे केली. परिषदेला त्या काळातील संस्थानिकांच्या स्त्रिया, अनेक सुविद्य स्त्रिया, विवेकानंद मिशनच्या सिस्टर्स उपस्थित होत्या." असे या परिषदेविषयी श्री. विद्वांस सांगतात. शेवटी ते म्हणतात- "अशा प्रकारचे स्त्रियांचे संमेलन आजही अपवादानेच आढळते."[६]

परिषदेतील रमाबाईंचे अध्यक्षीय भाषण हे स्त्री-जीवनाच्या विविध अंगांना व समस्यांना स्पर्श करताना दिसते.

भाषणाच्या सुरवातीसच समाबाईंनी काढलेले उद्गार त्यांच्या मनाच्या घडणीविषयी खूपसे सांगून जातात. त्या म्हणाल्या–"देवाच्या पायावर वाहिलेल्या पुष्पमालेबद्दल निर्माल्यावस्थेतही आपणाला आदर वाटतो. त्याप्रमाणे लोकवंद्य, राष्ट्रोद्धारक पतीची सहधर्मचारिणी म्हणून आपण मला मान दिला आहे. त्याचे मला भूषण वाटते."

त्यानंतर त्यांनी आपल्या भाषणात स्वतंत्र महिला परिषदेची आवश्यकता व तिच्याद्वारे अपेक्षित कार्य ह्यांविषयी विवेचन केलेले आढळते.

परंपरावादी मनोवृत्तीच्या एका पत्राने ह्या परिषदेची बोळवण- 'सुधारकांनी काढलेली पडदा परिषदेची टूम,'[७] अशा शब्दांत केलेली दिसते. तथापि, रमाबाई अशा परिषदेची आवश्यकता सांगताना म्हणतात–

"आता बऱ्याच स्त्रिया सुशिक्षित झाल्या असल्या तरी पुष्कळ प्रांतांत.... स्त्रियांमध्ये पुरुषांसमोर जाण्याची रीत नसते... ज्या स्त्रिया परिषदेस जातात त्यांनाही मर्यादेच्या वळणामुळे

आपले विचार येथे मोकळ्या मनाने मांडता येत नाहीत. शिवाय स्त्रीविशिष्ट नाजूक विषयावंर आपले विचार पुरुषांच्या समोर व्यक्त करणे शक्य होत नाही... म्हणून स्त्रियांसाठी वेगळी परिषद भरवणे अवश्य आहे."[८]

परिषदेच्या उद्दिष्टांविषयी रमाबाईंनी अतिशय व्यापक व सखोल विचार केलेला दिसतो. परिषदेची उद्दिष्टे सांगताना, स्त्रियांत ज्ञानप्रसार, परस्पर स्नेहभाव वाढणे, स्त्री-समस्यांची चर्चा, अनुभवांची देवाण-घेवाण... इ. उद्दिष्टे तर मांडलेली दिसतातच. पण त्याहीपुढे जाऊन त्या म्हणतात- "ह्याहीपेक्षा थोर लाभ म्हणजे आपण सर्व जमातींच्या व धर्माच्या स्त्रिया जमलो आहोत व आपणास स्त्री-समाजाच्या व राष्ट्राच्या हिताविषयी गोष्टी बोलाव्या असे वाटत आहे. आपल्या जातीत कोणते दोष आहेत व ते कसे काढावे व दुसऱ्या जातीत काय गुण आहेत व ते आपणांत कसे आणावेत हा विचार आपल्या मनात उत्पन्न व्हावा. आपली बुद्धी विकसित होऊन मन उदार होईल आणि सर्व जातींत व धर्मांत सलोखा व एकजीव होऊन आपल्या देशास... उच्च पदवी प्राप्त होईल."[९]

न्यायमूर्तींच्या संस्कारामुळे सुरवातीपासून रमाबाईंच्या स्त्री-विकासाच्या कल्पनेला राष्ट्रीय व जातधर्मातीत पाया लाभलेला दिसतो. पुढे त्या म्हणतात–

"कुटुंबाप्रमाणे देशाचे कल्याण स्त्री व पुरुष या दोन्ही वर्गांच्या शहाणपणावर, परिश्रमावर आणि एक विचारावर अवलंबून असते.... (विशिष्ट गुणानुसार स्त्री-पुरुषांचे परिश्रम होत असले आणि त्याबद्दल अभिनंदन करण्याची वृत्ती दोन्ही वर्गांत असली म्हणजे देशाच्या उन्नतीची आशा असते.)"

स्त्री-पुरुष समानतेबाबत परस्पर पूरकत्वाची त्यांची भूमिका इथेच व्यक्त झालेली दिसते. "स्त्रियांनी आत्मविकासासाठी सुरू करायची ही चळवळ, हा पुरुषवर्गाशी सुरू करायचा संघर्ष नसून त्यांनी आपल्याला जो उत्थानासाठी हात दिला आहे त्याचा फायदा घेऊन आपल्या पायांवर उभे होणे वा पुढे आपला भार त्यांच्यावर केवळ पडू न देणे," असा विचार रमाबाई मांडताना दिसतात. त्या म्हणतात-

".... स्त्री-शिक्षणाच्या प्रसारासाठी समाजसुधारणेच्या प्रवर्तक महात्म्यांनी गेली अठरा वर्षे जे परिश्रम केले ते यशस्वी होऊन, स्त्री-वर्गाला स्वतःची स्थिती सुधारण्यासाठी व उन्नती करण्यासाठी स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकता वाटू लागली."[१०]

त्यांच्या ह्या भूमिकेबाबत श्री. विद्वांस लिहितात– "अखेरीस रमाबाईंनी, 'आजपर्यंत दोन्ही वर्गांकरता विचार व परिश्रम करण्यास थकल्या भागलेल्या आपल्या पुरुष मंडळीला आपण उत्साहाने साह्य करावे'.... अशा सौजन्ययुक्त शब्दांनी समाजसुधारणेच्या जेष्ठ नेत्यांच्या तोपर्यंतच्या कार्याबद्दल कृतज्ञतादर्शक उद्गार काढून.... स्त्री-वर्गाच्या कार्यक्षमतेविषयीचा आत्मविश्वास व्यक्त करून आपले भाषण संपवले."[११]

ह्याच भाषणात रमाबाईंनी, स्त्रियांना पुढे येऊन सार्वजनिक हिताची कोणती कामे करता येतील ह्याचे परंपरेचे सूत्र धरून विवेचन केलेले दिसते.

"दुसऱ्याचे दुःख पाहून कळवळा उत्पन्न होणे आणि दुःखाचे निवारण करणे हा स्त्री-स्वभावाचा धर्म आहे,"[१२] असे मत व्यक्त करून त्या पुढे म्हणतात– "तो थोडाही मावळू देणे इष्ट नाही, तसेच सदसद्‌विवेक बुद्धीला जी नवीन दुःखे जाणवू लागली आहेत, त्याकडेही आपण लक्ष दिले पाहिजे."

ह्यासाठी त्यांनी दीन-दुबळ्या लोकांची, बाळंतिणींची, आजाऱ्यांची सेवा-शुश्रुषा करणाऱ्या एका जुन्या काळातील संस्थानिक स्त्रीचा, तसेच परोपकारी मध्यम स्थितीतल्या बायकांचा दाखला दिला आहे. पुढे त्या म्हणतात–

"महिना-पंधरा दिवसांनी मुलींच्या शाळेत जाऊन तेथील शिकविण्याची व्यवस्था पाहून रीतीभाती, शिक्षकिणींचे लक्ष, पिण्याच्या पाण्याची व आडोशाची सोय, जागेची स्वच्छता, खेळण्यास आवार वगैरेबद्दल योग्य सूचना कराव्यात. मुली लवकर सासरी जातात हे खरे, पण आपल्या सुनांना शाळेत घालावे."

त्या काळच्या परिस्थितीची चौकट स्वीकारूनच.. त्यात अधिक सुखसोयी देण्याच्या बारकाईच्या सूचना रमाबाई इथे करताना दिसतात.

स्त्रियांच्या आत्मविकासातील शिक्षणाचे महत्त्व त्यांनी जाणलेले होते. तरीपण त्या वेळच्या बहुसंख्य सुधारकांप्रमाणे रमाबाईपण सुरवातीला स्त्रीची 'पतीला अनुरूप पत्नी बनणे'– ही भूमिका स्वीकारताना दिसतात. त्या आपल्या भाषणात सांगतात–

"पाश्चात्त्य विद्येच्या प्रसारामुळे नव्या पिढीतील तरुणांच्या मनात... आपल्या भावी स्थितीविषयी नवे नवे विचार व संकल्प उत्पन्न होतात. अशा त्यांच्या कल्पनांशी जिचे विचार जुळतात अशी बायको असली म्हणजे दोघांचा आनंद दुणावेल. जिच्यावर आपले व पुढील पिढीचे सुख व लौकिक अवलंबून आहे. अशी स्त्री पत्नी आपल्या अनुरूप विचारांची नसेल– तर बायकोबद्दल त्यांना आदर वाटेनासा होतो. पति-पत्नीमधील ही विषमता अंशतः तरी दूर व्हावी म्हणून.... स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी गृह शिक्षण वर्ग सुरू करावेत."[१३]

तसेच ह्या भाषणात विधवा, निराधार पण सामान्य स्त्रियांना आपण अर्थार्जनासाठी मदत केली पाहिजे, निराधार स्त्रिया व पोरक्या मुलींविषयी आपले ते सामाजिक कर्तव्य आहे, असे मत त्या मांडतात.[१४]

सरसकट पुनर्विवाहाबाबत रमाबाई आयुष्याच्या शेवटीही कधी अनुकूल नव्हत्या. पण विनापत्य बालविधवा असेल, तर तिचा पुनर्विवाह होण्यास त्यांची हरकत उरली नव्हती. पण ह्या सुरवातीच्या काळात, त्यांची पुनर्विवाहाबाबतची मते स्पष्ट ठरली नसावीत. कदाचित परिषदेच्या व्यासपीठावरून समाजाला धक्का देणारा हा विचार इतक्यातच मांडावा हे त्यांच्या धोरणात बसणारे नसेल. म्हणून ह्या भाषणात त्यांनी अल्पवयीन विधवेला, पाश्चात्य सिस्टर्सचा आदर्श समोर ठेवून सेवाकार्याला स्वतःला वाहून घेण्यात आयुष्याची श्रेष्ठता आहे, असा सल्ला दिलेला दिसतो.

त्या म्हणतात– "आपल्याकडील अनाथ मुलींनी त्यांचा (सिस्टर्स) कित्ता पुढे ठेवणे

हितावह नाही काय? या मुलींचा उपयोग.... निरनिराळ्या शहरी गृहशिक्षणाचे वर्ग, शिवण्याचे वर्ग, आंधळ्यांची शाळा, बहिऱ्या-मुक्यांची शाळा, निराश्रित म्हाताऱ्या व थकलेल्या माणसास राहण्यासं ठिकाण वगैरे स्थापून, करून घेतला पाहिजे."[१५]

'स्वार्थत्याग हा लहान मुलींनाच का सांगता, त्यांनाही सुखाची आवड नाही का?'- आज येणारा हा प्रश्न त्या वेळीपण रमाबाईंनी आपल्या भाषणात पुढे आणलेला दिसतो.[१६]

पण त्याचा विचार व त्याचे उत्तर त्या काळाच्या चौकटीतच करून रमाबाईंनी त्यांना सेवाव्रताचा मार्ग सुचवलेला दिसतो. त्या म्हणतात– "पाश्चात्य देशांतील सिस्टर्स... आपले आईबाप, घरेदारे, श्रीमंती व आपला देश सोडून, आजन्म कुमारी राहाण्याची शपथ घेऊन... घराबाहेर पडतात, त्यांचे तन-मन-धन, दुसऱ्याचे बरे करण्याकडे.... लागलेले असते म्हणून त्यांची योग्यता श्रेष्ठ मानली जाते."[१७]

वसाहतवादातून पसरत गेलेल्या ख्रिश्चन धर्ममूल्यांचा प्रभाव सुशिक्षित मनावरही कसा हळूहळू पडत होता त्याचे दर्शन इथे घडते. रमाबाईंचे हे भाषण खूप मुद्देसूद, विचारपूर्ण व प्रभावी झालेले दिसते. काही परंपराभिमानी पत्रांचा अपवाद वगळता, टाईम्स, सुबोध पत्रिका, मनोरंजन आदी सर्व प्रमुख पत्रांनी 'लेडी प्रेसिडेंट'चे अभिनंदन करून त्यांचे भाषण छापलेले दिसते.

वरील भाषणात आणखीही एका येऊ घातलेल्या समस्येचे रमाबाईंनी सूतोवाच केलेले दिसते व ती म्हणजे 'निराश्रित म्हाताऱ्यांसाठी संस्थेची गरज'. आज आपण ज्याला 'वृद्धाश्रम' म्हणतो ती गरज प्राथमिक रूपात त्या काळात जाणवू लागलेली दिसते.

ह्या परिषदेच्या निमित्ताने रमाबाईंचे सार्वजनिक जीवनात पदार्पण झालेले दिसते. विद्वांस लिहितात– "त्यांच्या चर्येवर पूर्वीचा आनंद वा स्मित पुन्हा दिसणे अशक्य होते. पण त्यांनी आपले शोकाकुल मन संयमाने शांत व स्थिर केले. पतीच्या उर्वरित कार्याच्या पूर्तीसाठी आपले आयुष्य समर्पण करण्याच्या निश्चयामुळे त्यांच्या चर्येवर गंभीर प्रसन्नता दिसू लागली."[१८]

ह्यानंतर रमाबाईंच्या सार्वजनिक कार्याचे क्षेत्र सतत विकसित होत गेलेले दिसते. १९०७ साली स्थापन झालेल्या सेवासदनाने तर त्यांच्या कार्याचे स्थायी रूपच सिद्ध केलेले दिसते. १९०४ ते ७ ह्या मधल्या दोन-तीन वर्षांतही रमाबाईंनी रंजल्यागांजल्यांकरिता मातृभावनेने कार्य केलेले दिसते.

चरित्रकार सांगतात– "१९०४ च्या जून महिन्यात मुंबई इलाख्याच्या सरकारकडून 'येरवडा येथील तुरुंगाच्या मानद अधीक्षक व्हाल का?' अशी विचारणा करण्यात आली आणि रमाबाईंनी तत्काळ मान्यता दिलेली दिसते.

भारतातील जातिनिविष्ट समाजरचनेत, भिन्न भिन्न जातींच्या लोकांचा संपर्क येणेच असंभाव्य होते. तशात एखादी व्यक्ती गुन्हेगार म्हटली म्हणजे तर संभावित समाज तिच्या जवळपासही जाणे दुरापास्त ! अशा काळात रमाबाईंनी ही विनंती मान्य केली हे विशेष दिसते. दर पंधरा दिवसांनी त्या येरवडा कारागृहातील स्त्री-कैद्यांना भेटी देऊन सहानुभूतीने त्यांच्या

खाण्यापिण्याची, कामाची, विश्रांतीची विचारपूस करीत. त्यांच्या मुलांच्या प्रकृतिस्वास्थ्याच्या व्यवस्थेबद्दलही कळकळीने विचारपूस करीत. त्याचा परिणाम म्हणजे सुरवातीला, एक प्रतिष्ठित हिंदू स्त्री आपल्याला भेटायला येते, ह्याबद्दल त्यांना वाटणारे आश्चर्य व संकोच हळूहळू विरत गेला व त्या रमाबाईंशी मोकळेपणाने बोलू लागल्या. रमाबाई त्यांना तुकाराम, नामदेव वगैरेंचे भक्ती व सदाचारपर सोपे अभंग निवडून त्यांचा आशय समजावून देत. त्यांच्यासाठी देवाची प्रार्थना करत.

ह्या स्नेहपूर्ण संवादाचा परिणाम कैदी स्त्रियांवर फारच चांगल्या तऱ्हेने होत होता असे दिसते. श्री. विद्वांस सांगतात– "अभंगांतील सदाचारपर चरणांची आळवणी रमाबाईंच्या पाठोपाठ कैदी स्त्रियाही करीत आणि मनाशी त्यातील आशयाचा आणि...आपल्या जगण्याचा संबंध जोडून विचार करीत."[१९]

सुबोध पत्रिकेत ह्या भेटीचा वृत्तांत देताना, बातमीदार लिहितो– "पाश्चात्य देशांत, तुरुंगातील कैद्यांच्या वारंवार भेटी घेऊन, त्यांस धर्माचा व नीतीचा उपदेश करणे हे काम महत्त्वाचे गणले जाते. अशा भेटीमुळे कैद्यांचे कल्याण होते, असा अनुभव आहे. आमच्या येथे अशा प्रकारचा प्रयत्न कोणी केल्याचे ऐकिवात नाही. परंतु श्रीमती रमाबाई....तेथे जाऊन फार उपयुक्त काम करत आहेत.... श्रीमती रमाबाईंना त्या बायांच्या भेटीस गेल्यापासून राहवत नाही आणि त्या बाया श्री. रमाबाईंच्या भेटीच्या दिवशी मार्गप्रतीक्षा करीत असतात."[२०]

विद्वांस म्हणतात– "गुन्हेगाराला निरंतरचा पापी आणि अपरिवर्तनीय गुन्हेगार समजू नये....त्याला माणुसकीने व सहानुभूतीने वागवणे आवश्यक आहे....त्याला मन गुंतेल, रमेल असे काम देणे गरजेचे आहे.[२१] समाजशास्त्र व मानसशास्त्र, दंडशास्त्र ह्यांच्या संशोधन व अनुभव ह्यांतून काढलेले पाश्चात्य विचार.... रमाबाईंना परिचित होते.... आज अशी कामे समाजसेवक करीतही आहेत. पण त्या काळात हे काम अपूर्व होते."[२२]

हे अपूर्व काम रमाबाई किती निष्ठेने करत होत्या याचे वर्णन सुझी सोराबजीच्या 'विमेन इन मॉडर्न इंडिया' ह्या पुस्तकातील रमाबाईंवरील लेखात वाचावयास मिळते. त्या लिहितात– "श्री. रमाबाई पुणे शहरात राहात. त्या जागेपासून येरवड्याच्या कारागृहापर्यंतचे अंतर सुमारे चार मैल आहे. पण तेथे जाऊन येण्यास पडणारी तसदी, लागणारा काळ आणि तेथील कैद्यांसाठी करावयाच्या कामाला यश मिळण्याची अनिश्चितता, ह्यामुळे रमाबाईंचे मन कधी निरूत्साही झाले नाही. हवामान कितीही गैरसोयीचे असो... त्यांची 'बम' घोडागाडी, भेटीच्या दिवशी सकाळी नियमितपणे कारागृहाच्या लोखंडी दरवाज्याच्या दिशेने जात असे. श्री. रमाबाई त्यांच्या प्रकृतीची, व्यवस्थेची अंतःकरणाच्या सहानुभूतीने विचारपूस करीत. अभंगातील मनोन्नतीकारक विचार व भावना सोप्या शब्दांत समजावून सांगत. सन्मार्गापासून दूर अशा आडमार्गात घोटाळलेल्या त्या स्त्रियांच्या भावनाशून्य चर्येवर श्री. रमाबाईंचे बोलणे ऐकताना अपूर्व आणि मनोरम मृदुता पसरू लागे, सुटकेनंतरच्या स्वतःच्या जीवनाविषयी आशा व उत्साह उत्पन्न होई....१९०४ पासून आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत वीस वर्षे हे

पतितोद्धाराचे व समाजसेवेचे कार्य श्री. रमाबाईंनी केले."[२३]

रमाबाई जसजशा ह्या कारागृहातील स्त्रियांत मिसळू लागल्या तशा त्यांना ह्या गुन्हेगार स्त्रियांबरोबर असणाऱ्या लहान बालकांविषयी अनुकंपा वाटू लागलेली दिसते. सणासुदीला ही निरपराध बालके कारागृहातील कदान्न खाणार हा विचार त्यांच्या मनाला दुःखदायक वाटला. म्हणून मग त्यांनी, मध्यवर्ती कारागृहाच्या सुपरिंटेंडंटशी बराच पत्रव्यवहार करून सणासुदीला ह्या बालकांसाठी, पक्वान्न, फळे वगैरे पाठवण्याची अनुमती मिळवलेली दिसते. ह्या विषयी श्री. विद्वांस आपल्या चरित्रग्रंथात लिहितात–

"तेव्हापासून श्रीमती रमाबाई.... प्रमुख सणाच्या वेळी, स्वतःच्या.... देखरेखीखाली.... पक्वान्ने करवून, ती त्या कारागृहातील बालकांसाठी पाठवू लागल्या.... हा त्यांचा नियम आयुष्याच्या अखेरपर्यंत चालू होता."[२४]

ह्याच्या पुढचे पाऊल म्हणजे रमाबाईंनी कारागृह सुपरिंटेंडंटची परवानगी घेऊन कारागृहातील गुन्हेगार स्त्रियांस साक्षर करण्यास सुरवात केलेली दिसते. चरित्रकार ह्या विषयी म्हणतात– "त्या काळी तरी कारागृहांत, सांपत्तिक आणि सांस्कृतिक-दृष्ट्या अगदी मागासलेल्या वर्गातील स्त्रियांचे प्रमाण मोठे होते... ही वस्तुस्थिती लक्षात घेता, कारागृहातील तीन-चार स्त्रियांच्या गटाला साक्षर करण्याचा उपक्रम सुरू होणे फार महत्त्वाचे पाऊल होते. तीन-चार महिन्यांत रमाबाईंचा पहिला शिष्यवर्ग लिहू-वाचू लागला. नंतर नवीन गट पुढे आला. अशा रीतीने कैदी स्त्रियांना त्यांच्या विरंगुळ्याचे आणि मनोन्नतीचे नवे साधन उपलब्ध झाले."[२५]

"यांपैकी काही स्त्रिया सुटका झाल्यावर, रमाबाईंकडे येऊन त्यांची भेट घेत आणि रमाबाईंकडून मिळालेल्या सहानुभूतीमुळे आणि त्यांनी केलेल्या उपदेशामुळे आपल्याला नवजीवन लाभले, असे म्हणून त्यांना कृतज्ञतापूर्वक धन्यवाद देत"– असे त्यांचे चरित्रकार लिहितात.[२६]

पुढेपण त्या सेवासदनातील स्त्रियांना घेऊन हॉस्पिटलातील रोगी, मनोरुग्ण ह्यांना भेटायला जात व त्यांना फळे, मिठाई, पुस्तके वगैरे वाटत असत, असे चरित्रावरून दिसते.

थोडक्यात स्त्री-उद्धाराचे ठोस काम सुरू करण्याची संधी उपलब्ध होण्यापूर्वीच रमाबाईंचा रंजल्या-गांजल्यांच्या जीवनात थोडाफार आनंद व उन्नती निर्माण करण्याचा उपक्रम सुरू झालेला दिसतो.

सेवासदनाचे कार्य उभे होण्यापूर्वीच्या ह्या कालखंडात रमाबाईंच्या जीवनात आणखी एक ठळक घटना घडलेली दिसते.

१९८५ साली मुंबई इलाख्यातील पहिले मुलींचे हायस्कूल 'हुजुरपागा' पुण्यात सुरू झाले. मुंबईत अलेक्झांड्रा हायस्कूल मुलींसाठी सुरू झाले होते. पण तेथे धनिक ख्रिश्चन, पार्सी व काही हिंदू मुलीच जात. तेव्हा सामान्य हिंदू मुलींसाठी पुण्याप्रमाणे आपणही वर्गण्या जमवून एखादे हायस्कूल काढावे असे मुंबईतील समाजसुधारक व स्त्री-शिक्षणेच्छु लोकांच्या मनात

होते. योगायोगाने श्री चंदारामजी ठक्कर ह्या दानशूर कच्छी गृहस्थाच्या मृत्युपत्रान्वये त्यांच्या सार्वजनिक धर्मादाय ट्रस्टमधून बरीच रक्कम उपलब्ध झाली. त्यामुळे त्यांच्या ट्रस्टीजनी १९०८ साली त्या पैशातून मुंबईत मुलींचे हायस्कूल काढण्याचे ठरवले, आणि उद्घाटक म्हणून येण्यासाठी रमाबाईंना विनंती केलेली दिसते. वस्तुतः त्या काळापर्यंत पुण्या-मुंबईत अनेक जाती-धर्मांतील सधन, सुशिक्षित, पदवीधर स्त्रिया समाजकार्यात उतरू लागल्या होत्या. शिवाय नुकत्याच झालेल्या सखूबाईंच्या– कन्येच्या मृत्युमुळे त्या शोकग्रस्त होत्या. त्यामुळे अध्यक्षपद भूषविण्याची त्यांची मनस्थिती नव्हती.

तथापि, शाळेच्या ट्रस्टीजना रमाबाईच ह्या बहुमानाला सर्वशः योग्य होत्या, असे वाटलेले त्यांच्या पाठोपाठ गेलेल्या अत्याग्रहाच्या पत्रांवरून दिसते.

निमंत्रणाच्या पहिल्या पत्रात ट्रस्टी श्री. नानू कोठारे लिहितात– "आपले पती आज विद्यमान असते तरी हिंदू समाजातील अग्रगण्य महिला या नात्याने, आमच्या हायस्कूलच्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान आपणाकडे आलेच असते. आता आपण एकाकी व दुःखार्त अवस्थेत आहात. पण पूर्वीच्या श्रेष्ठस्थानीच आहात.... ज्या व्यक्तींमध्ये लोकांच्या मनाचे प्रबोधन करून.... मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य असते अशांनी कर्तव्यतत्पर न होता, स्वतःच्या दुःखात मग्न राहून आपली लोककल्याणाची क्षमता निष्क्रिय राहू देणे योग्य होईल कां ?"[२७]

पत्रातून सुधारकं वृत्तीच्या लोकांच्या मनात रमाबाईंविषयी काय भावना व अपेक्षा निर्माण झाल्या होत्या, ह्याचा अंदाज येतो. अशा अत्याग्रहाच्या पत्रांमुळे नाईलाज होऊन शेवटी रमाबाईंनी हे निमंत्रण स्वीकारलेले दिसते. मात्र निमंत्रण स्वीकारल्याबरोबर त्यांनी या हायस्कूलमध्ये शिकवण्यासाठी योजलेले विषय, अभ्यासक्रम, तसेच हायस्कूलचे कार्यकारी मंडळ, कार्यवाह, अध्यक्ष, मतदार संघ इ. सर्व माहिती मागवलेली दिसते. उद्घाटनाचे भाषण करण्यापूर्वी ह्या सर्वांचा नीट अभ्यास केलेला त्यांच्या भाषणावरून दिसतो. रमाबाईंना पुढे आयुष्यात अनेक सभा-संमेलनांचे अध्यक्षस्थान भूषवावे लागले. अनेक विषयांवर त्यांनी भाषणे केलेली दिसतात. त्या वेळीपण त्यांची कार्यपद्धती अशीच राहिलेली दिसते. विषयाचा पूर्ण अभ्यास करून तर्कशुद्ध मांडणी करत, विषय प्रतिपादन करणे ही त्यांच्या भाषणाची पद्धत दिसते. चंदारामजी हायस्कूलच्या उद्घाटनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनी केलेल्या भाषणात पण हीच पद्धती दिसून येते.

आपल्या भाषणात सुरवातीसच त्यांनी विद्यादानासारखे सर्वश्रेष्ठ धर्मकार्य होत आहे तेही देशाच्या भावी मातांना, ह्याबद्दलचा आपला आनंद व्यक्त केला आहे. ह्या विद्यालाभाच्या जोडीने आणखी जो एक लाभ होणार आहे त्याबद्दल त्या म्हणतात–

"शाळेच्या व्यवस्थेबद्दल आणि शिक्षणक्रमाबद्दल लहानसे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. ते वाचून मला फार समाधान वाटते. या शाळेची स्वतंत्र इमारत झाल्यावर सभोवताली बाग होणार आहे. मुलींना वृक्ष-वेलीसन्निध मोकळ्या मनाने आणि शुद्ध हवेत आपल्या समवयस्क मैत्रिणींबरोबर विनोद करण्यास व खेळण्यास मिळेल हा मुंबईसारख्या शहराचा फार मोठा

फायदा आहे."[२८]

शिक्षणाइतकीच, चार भिंतींत कोंडल्या गेलेल्या भारतीय स्त्रीला मोकळ्या, शुद्ध हवेची, स्वच्छंद आनंदाची गरज होती व ती रमाबाईंना जाणवली होती (पं. रमाबाईंनी पण ती ओळखली होती) असे दिसते.

'शिक्षण' ह्या संकल्पनेविषयी रमाबाईंचे विचार काय होते, तसेच स्त्रियांच्या शिक्षणाविषयी त्यांच्या मनात त्या काळी रूपरेखा काय होती, हे ह्या भाषणातून कळून येते. त्या म्हणतात– "लिहिण्या-वाचण्याचा उपयोग रोजच्या व्यवहारात तर हवेच; शिवाय आपल्या कल्पना व विचार यांना स्पष्ट रूप देण्याचे साधन म्हणून ते (शिक्षण) महत्त्वाचे आहे.[२९]

मुलींना विविध भाषांतील सुंदर वाङ्मयाशी परिचय करून देणे हे अभ्यासक्रमात समाविष्ट होते. त्या विषयी आनंद व्यक्त करताना त्या म्हणतात– "ह्यामुळे.... त्यांना सुखाचे व मनोविकासाचे अमोल साधन साध्य करून देणे आहेच, पण ह्याहूनही वाङ्मयाचा श्रेष्ठ उपयोग म्हणजे, जीवनाचा अर्थ काय ? इतिकर्तव्यता काय ? ज्यांनी जीवित सफल केले ते कसे वागले ? याचा बोध होणे हा होय."[३०]

रमाबाईंच्या 'शिक्षण' संकल्पनेत साक्षरतेबरोबरच प्रगल्भ सुशिक्षितपणा अभिप्रेत असावा असे दिसते. तरीपण रमाबाईंच्या मनात स्त्री-शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट हे चांगली गृहिणी तयार व्हावी हे असावे, असे पुढील उद्गारांवरून वाटते– "मुलींना देण्यात येणारे शिक्षण हे त्यांच्या 'शरीर, मन, बुद्धी' यांचा विकास करणारे तर हवेच, पण त्यात संसारोपयोगी अभ्यासक्रमाचा पण समावेश असावा," असे त्यांचे मत दिसते. त्या म्हणतात– "संसारोपयोगी अभ्यासक्रमांत साधारण गणित, हिशोब ठेवणे, गृहासंबंधी आरोग्याची माहिती असणे, साधे कपडे बेतता व शिवता येणे, पक्वान्ने व फराळाचे पदार्थ करता येणे आणि जात्या मधुर असलेल्या कंठाला सुसंस्कार देऊन चित्तवृत्ती प्रसन्न राखण्यासाठी गाता येणे हे महत्त्वाचे आहे. अशा स्थूल दृष्टीने अभ्यासक्रम ह्या शाळेत योजल्याने मनाला बरे वाटते !"[३१]

मात्र ह्या दोन स्त्री-प्रतिमांना (गृहिणीपद व व्यक्तिविकास) जोडणारा एक विचार प्रथमपासून त्यांच्या शिक्षण विचारात आधारभूत दिसतो, आणि तो म्हणजे 'देशाविषयीच्या कर्तव्याची जाण'. अगदी ह्या सुरवातीच्या भाषणातूनही तो स्पष्टपणे व्यक्त झालेला दिसतो. त्या म्हणतात–

"पण सर्वांहून एका गोष्टीचे मला विशेष समाधान वाटते, ती म्हणजे, शिक्षणक्रम तयार करताना, ह्या शतकात उत्पन्न झालेल्या, देशप्रेमाच्या हितकारक भावनेची जोपासना करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे."[३२]

इंग्रजी शिक्षणामुळे आलेल्या काही नव्या चांगल्या विचार व संकल्पनांबद्दल सांगताना त्या म्हणतात– "सर्व चराचरावर प्रेम करा म्हणून सांगणारा भागवत धर्म आपल्याकडे असूनही आपल्या देशाची अवनती झाली आहे. ह्याचे कारण, हिंदुस्थान हा आपला सर्वांचा देश आहे व त्याची सेवा करणे हे आपले कर्तव्य आहे. ही भावना इतके दिवस आपल्याकडे नव्हती....

हा विचार आपल्याकडे इंग्रजी शिक्षणामुळे उत्पन्न झाला आहे.... उद्योगधंद्यामुळे उत्पन्न झालेल्या जातिभेदांना आपण महत्त्व देत आलो. आपल्या प्रेमाची व कर्तव्याची कक्षा आपल्या जातीपुरतीच ठेवीत आलो, पण इंग्रजी शिक्षणानंतर आपल्या.... लक्षात आले की.... वरवर फेरफार असले तरी....आपण एकाच हाडामासाचे आहोत. आपला धर्म, इतिहास एकच आहेत- ही एकतेची जाणीव हा इंग्रजी शिक्षणाचा शुभ परिणाम आहे...."[३३]

ही देशप्रेमाची व देशसेवेची नवी जाणीव नव्या पिढीत संस्कारित झाल्याखेरीज तिला कृतीचे रूप येणार नाही, म्हणून त्या सांगतात– "देशभक्ती ही जर सर्वांच्या हृदयात उत्पन्न झाली पाहिजे, असे वाटत असेल तर त्यासाठी स्त्रियांनाही आपल्या देशाच्या व इतर देशांच्याही इतिहासाचे ज्ञान झाले पाहिजे. बाळपणी कोवळ्या मनावर मातेकडून जे संस्कार होतात त्यांची पाळेमुळे फार खोल गेलेली असतात. पुढे मुलांना कितीही शिक्षण मिळाले तरी मातेकडून मिळालेल्या शिक्षणाइतका उपयोग होत नाही.... स्त्रियांना... ज्या पृथ्वीवर आपण राहतो तिच्यावरील नद्या, पर्वत, दऱ्याखोरी यांची रचना कशी आहे, पशुपक्षी, पाण्यातील प्राणी यांच्याविषयी माहिती, तसेच चंद्र, सूर्य, ग्रहमाला यांविषयी... यथार्थ कल्पना असणे अवश्य आहे. त्यामुळे सृष्टीव्यापारातील सौंदर्याचा त्यांना अनुभव येईल. त्यांचे अज्ञान नाहीसे होईल. हे उद्दिष्ट समोर ठेवून...अभ्यासक्रम योजिला आहे, याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत."[३४]

राष्ट्रहित कल्पनेचे अधिष्ठान जसे प्रथमपासून शेवटपर्यंत त्यांच्या स्त्री-विकासाच्या कार्याला लाभलेले दिसते. तसेच आंतरधर्मीय, आंतरराष्ट्रीय भगिनीभावाचे अधिष्ठान जे पुढे आयुष्यभर त्यांनी जोपासलेले दिसते, त्याचे सूतोवाचपण ह्या सुरवातीच्या भाषणात केलेले दिसते. त्या म्हणतात–

"हिंदुस्थानातील सर्व जातींच्या व धर्मांच्या स्त्रियांना एकत्र जमवावे, त्यांच्याशी दळणवळण व स्नेह वाढवावा अशा प्रवृत्तीच्या युरोपिअन स्त्रियांपैकी मिसेस मूर मॅकेन्झि ह्या एक प्रमुख आहेत. त्यांनी पुण्याला 'विमेन्स इंडियन असोसिएशन' ही संस्था स्थापन केली आहे. तेथे सर्व जातींच्या व धर्मांच्या स्त्रिया एकत्र जमून विचार विनिमय करतात. मिसेस मूर मॅकेन्झि यांना या शाळेसारख्या ठिकाणी बोलावून इंग्लंड वगैरे देशांतील थोर स्त्रियांची चरित्रे, त्यांची परोपकाराची कामे किंवा काव्यशास्त्र, इतिहास वगैरे विषयांवर व्याख्यान देण्यास विनंती करावी."[३५]

न्यायमूर्तींच्या सहवासात लाभलेल्या वरिष्ठ स्तरावरील जीवनक्रमामुळे रमाबाईंचा अनेक पाश्चात्य स्त्रियांशी संपर्क आला होता. त्यांचे गुण, त्यांचे समाजकार्य, त्यांची सहृदयता, हिंदू स्त्रियांविषयी त्यांपैकी काहींना वाटणारी प्रामाणिक कळकळ, ह्यांचा त्यांना परिचय झालेला होता. त्यामुळे एक व्यापक असा भगिनीभाव, त्या काळातही त्यांनी प्रथमपासून स्वीकारलेला दिसतो.

अशा तऱ्हेने आपले विचार व्याख्यानातून मांडताना रमाबाईंच्या शिक्षणविषयक भूमिकेची रूपरेषा ठळक होत गेलेली दिसते. स्त्री-विषयक कार्याचा तपशील पण त्यांच्या मनात

स्पष्ट होत गेलेला दिसतो. त्याला मूर्त रूप देण्याची संधी सेवासदनाच्या रूपाने ह्याच वेळी त्यांना लाभली. सेवासदनाच्या माध्यमातून पसरत गेलेल्या त्यांच्या बहुस्तरीय कर्मयोगाचा तपशील आता सविस्तरपणे पाहू.

* *

संदर्भ सूची

१. धोंडो केशव कर्वे, आत्मवृत्त व चरित्र : धों. के. कर्वे व नारायण महादेव पटवर्धन, (आ/३), पृष्ठ १९३
२. श्रीमती रमाबाई रानडे : मा. श्री. विद्वांस, पृष्ठ १०२
३. कित्ता: पृष्ठ १०४
४. कित्ता: पृष्ठ ११२
५. कित्ता: पृष्ठ १२०
६. कित्ता: पृष्ठ १५७
७. कित्ता: पृष्ठ १६२
८. कित्ता: पृष्ठ १५९
९. कित्ता: पृष्ठ १५९
१०. कित्ता: पृष्ठ १६०
११. कित्ता: पृष्ठ १६२
१२,१३. कित्ता: पृष्ठ १६०
१४,१५. कित्ता: पृष्ठ १६१
१६,१७. कित्ता: पृष्ठ १६१
१८. कित्ता: पृष्ठ ११२
१९,२०. कित्ता: पृष्ठ १६४
२१. 'डोंगरीच्या तुरुंगातील आमचे १०१ दिवस' ह्या १८८२ साली प्रसिद्ध झालेल्या गो. ग. आगरकरांच्या पुस्तकात हाच दृष्टिकोन आगरकरांनी स्पेन्सरच्या 'प्रिझन एथिक्स' ह्या ग्रंथाच्या आधारे मांडला आहे. पृष्ठ २९ ते ३५
२२. श्रीमती रमाबाई रानडे : मा. श्री. विद्वांस, पृष्ठ १६५
२३. वुमेन इन मॉडर्न इंडिया : सुझी सोराबजी

२४. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस, पृष्ठ १६६
२५. कित्ता: पृष्ठ १६७
२६. कित्ता: पृष्ठ १६८
२७. कित्ता: पृष्ठ १७२
२८,२९,३०. कित्ता: पृष्ठ १७४
३१. कित्ता: पृष्ठ १७४-१७५
३२,३३. कित्ता: पृष्ठ १७५
३४,३५. कित्ता: पृष्ठ १७६



प्रकरण ६ वे

कर्मभूमी – सेवासदन

सेवासदन ही संस्था १९०८ साली प्रथम मुंबईत व नंतर १९०९ साली पुण्यात स्थापन झालेली दिसते. समाजकार्याला वाहून घेणारी ही स्त्रियांची अशी संस्था काढायची कल्पना व खटपट मुंबईचे एक पारसी सुधारक श्री. मलबारी व दुसरे श्री. गिडुमल ह्या दोघांची दिसते. तथापि, ह्या कामासाठी त्यांना मूळ प्रेरणा रमाबाईंच्या भाषणातून मिळाली असावी असे वाटते. कारण रमाबाईंचे नातू व चरित्रकार आपल्या पुस्तकात म्हणतात - "१९०४ साली मुंबईत भरलेल्या 'आद्य महिला परिषदे'च्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात रमाबाईंनी, स्त्रियांनी सुशिक्षित होऊन सार्वजनिक हिताची कोणकोणती कामे घ्यावी याचे सविस्तर विवेचन केले. पाश्चात्य देशांतील सेवावृत्तीने काम करणाऱ्या सिस्टर्सचा आदर्श आपण ठेवायला हवा... हे त्या भाषणातील महत्त्वाचे प्रतिपाद्य होते."

रमाबाईंची ही कल्पना श्री. मलबारी आणि श्री. गिडुमल यांच्यासारख्या सुधारक पुढाऱ्यांना पसंत पडली.[१]

पुढे त्यांनी 'सेवासदन उर्फ सिस्टर्स ऑफ इण्डिया' संस्था स्थापन करण्यासाठी बराच निधी गोळा केला व संस्थेचे स्वरूप, कार्यपद्धती कशी असावी हे ठरवण्यासाठी मुंबईतील प्रमुख स्त्रियांची सभा रमाबाईंच्या अध्यक्षतेखाली भरवली. रमाबाईंना पाठवलेल्या निमंत्रणाच्या पत्रात तर भालचंद्र भाटवडेकरांनी लिहिले होते -

"या कामाला आपल्यासारख्या अनुभवी व विदुषी स्त्रियांची मदत आवश्यक आहे. आपण आल्याने सर्व व्यवस्था ठीक होईल."[२]

श्री. विद्वांस लिहितात - "या विनंतीला मान देऊन रमाबाई मुंबईत आल्या व त्यांनी 'सेवासदन'बद्दलची आपली योजना स्त्रियांच्या मोठ्या सभेपुढे मांडली आणि ती संमत झाली. सर्वांच्या विनंतीप्रमाणे रमाबाईनी संस्थेचे व सल्लागार समितीचे तहहयात अध्यक्षपद स्वीकारले.[३] ह्या १९०८ साली नियुक्त केलेल्या समितीच्या सदस्या म्हणून लक्ष्मीबाई

चंदावरकर, श्रीमती दोराब टाटा, श्रीमती अली अकबर खान, श्रीमती विठ्ठलदास ठाकरसी, गुलबाई डॉक्टर, बिबी दिलशाद बेगम व इतर अनेक मराठी स्त्रिया होत्या.

ह्या नुसत्या नावांवरून नजर फिरवली तरी संस्थेचे सर्वधर्मीय व सर्वजातीय असे प्रातिनिधिक स्वरूप स्पष्ट होते. ह्या संस्थेने आपल्या 'स्त्री-जीवन विकास' ह्या उद्दिष्टाला अनुसरून, सुरवातीलाच ग्रंथालय, वाचनालय, शिक्षणवर्ग, मोफत दवाखाना, कशिदावर्ग, शिवणकामाचा वर्ग व विद्यार्थिनींसाठी वसतिगृह सुरू केले.

पुण्यास रमाबाईंचे 'हिंदु लेडीज स्पेशल क्लब' ह्या संस्थेतर्फे स्त्री-उद्धाराचे कार्य अगोदरपासून सुरूच होते. किंबहुना त्यांचे हे काम पाहूनच मुंबई सेवासदनाचे जनरल सेक्रेटरी श्री. गिडुमल यांनी रमाबाईंना पुण्यास सेवासदनाची शाखा सुरू करण्याची विनंती केली. मुंबईसारखा धनिक मंडळींचा आश्रय व तज्ज्ञ डॉ. स्त्रियांचे मार्गदर्शन पुण्यात मिळण्याची शक्यता सुरवातीला वाटत नसल्याने, श्री. गिडुमल यांच्या सूचनेचा विचार करण्यासाठी रमाबाईंनी आपल्या क्लबातील व बाहेरील उत्साही व कार्यक्षम अशा मंडळीच्या तीन-चार सभा भरवल्या व त्यांना मुंबईच्या सेवासदन संस्थेची माहिती, उद्दिष्ट व कार्यपद्धती समजावून सांगितली व मग सर्वानुमते असे ठरले, की 'क्लबतर्फेच सहा महिने हे काम करून पाहावे व मग शाखा स्थापन करण्याचा निर्णय ध्यावा,' असे त्यांचे चरित्रकार विद्वांस सांगतात.[४]

ते पुढे लिहितात - "ह्या निर्णयानुसार क्लबच्या मूळच्या शिक्षणवर्गाचे काम १९०९ मध्ये जास्त पद्धतशीर करण्यात आले. रमाबाईंच्या नेतृत्वामुळे पुण्यातील सुप्रसिद्ध घराण्यातील स्त्रिया ह्या अभ्यासवर्गात मेहनत घेऊन काम करत होत्या. त्यामुळे क्लबच्या शिक्षणवर्गांना असामान्य प्रतिष्ठा प्राप्त झाली."[५]

मग ह्या अभ्यासवर्गाच्या जोडीने शिवणकामाचा वर्ग, धर्मशिक्षण वर्गही सुरू करण्यात आलेले दिसतात. ह्या वर्गांच्या परीक्षांना बाहेरच्या पदवीधर शिक्षकांबरोबर स्वतः रमाबाई परीक्षकाचे काम करत होत्या, असे चरित्रावरून कळते. विद्यार्थिनींकडून फी तर घेण्यात येत नव्हतीच, उलट गरीब परिस्थितीतील मुलींना क्लबतर्फेच पाटी-पुस्तके देऊन साहाय्य केले जात असे, असे दिसते.

मग क्लबने आणखी एक उपक्रम सुरू केलेला दिसतो. तो म्हणजे श्री. न. चिं. केळकर, प्रा. धोंडो केशव कर्वे, काशीबाई कानिटकर अशा पुण्यातील नामवंत मंडळींना बोलावून व्यवहारोपयोगी व उद्बोधक विषयांवर बायकांसमोर व्याख्याने करवणे. त्याबद्दल विद्वांस लिहितात-

"विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे विवेकानंदांच्या इंग्लिश व अमेरिकन अशा दोन शिष्यांना क्लबमध्ये बोलावून त्यांची.... भाषणे आयोजण्यात आली. त्या दोघीही कलकत्त्यांत गरीब वस्तीत राहून लोकांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करीत होत्या. रमाबाईंना अभिप्रेत असलेल्या सेविका स्त्रीचा आदर्श.... विद्यार्थिनींना पाहावयास मिळाला. पुण्यास ह्याच पद्धतीचे काम विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भगिनी जनाक्का करीत होत्या. त्यांच्या निराश्रितांच्या शाळेला क्लबने चौदा रुपये जमवून दिले.[६]

अशा तऱ्हेने क्लबच्या समाजकार्याचा व्याप रमाबाईंच्या वाड्यात,त्यांच्या नेतृत्वाखाली वेगाने वाढत चाललेला दिसतो. ह्या सर्व कामांसाठी क्लबला (व पुढे सेवासदनालाही) रमाबाईनी केवळ आर्थिक नव्हे तर आपला दिवाणखाना, फर्निचर, कारकून, गडी वगैरे वापरायला देऊन सक्रीय मदत केलेली दिसते.

रमाबाईंचे हे कार्य पाहून त्यांना मातेसमान मानणाऱ्या ना. गोपाळ कृष्ण गोखल्यांना, आपल्या 'सर्व्हन्ट्स् ऑफ इंडिया सोसायटी' तर्फे रमाबाईंना काहीतरी साहाय्य करावे असे वाटू लागले व त्यांनी आपल्या सोसायटीचे जेष्ठ सदस्य श्री. गो. कृ. देवधर यांना रमाबाईंच्या कार्यात मदतनीस म्हणून पाठवलेले दिसते.पुढे संपूर्ण हयातभर देवधरांनी रमाबाईंच्या जोडीने सेवासदनाच्या वाढत्या व्यापाची धुरा समर्थपणे वाहिली.

देवधरांचे साहाय्य लाभल्यादर रमाबाईंनी मुंबईस जाऊन श्री. गिडुमल यांच्याशी विचारविनिमय करून, पुण्यास सेवासदनाची शाखा स्थापन करण्याचा निर्णय घेतलेला दिसतो.दोन्हीकडे रमाबाईंच अध्यक्षा व प्रमुख संचालिका असाव्यात असे ठरले.मात्र पुण्याचे सेवासदन जरी शाखास्वरूप असले,तरी आपले नियम करण्यास व व्यवस्थापनात शाखेला स्वातंत्र्य राहील,अशी योजना रमाबाईंनी मान्य करवून घेतलेली दिसते.

त्यानंतर क्लबतर्फे पुणे शहर व कँपमधील हिंदू,पारसी,ख्रिश्चन,मुसलमान वगैरे धर्मांच्या व भिन्न जातींच्या स्त्रियांची सभा भरवून रमाबाईंनी त्यांना संस्थेचे उद्देश व नियम वाचून दाखवले.स्त्रियांमध्ये शिक्षणप्रसाराची व समाजसेवेस उद्युक्त करण्याची किती आवश्यकता आहे ह्याचे विवेचन केले. मग सर्वांच्या संमतीने २ ऑक्टोबर १९०९ रोजी सेवासदनाची स्थापना केली व पुढे १९१७ मध्ये तिला स्वतंत्र संस्था म्हणून नोंदवण्यात आलेले दिसते. ह्याविषयी विद्वांस लिहितात - "पुण्याच्या शाखेचे सेवाकार्य खूप विस्तृत झाले होते.म्हणून ही स्वतंत्र व्यवस्था करण्यास आली. दोन्ही ठिकाणी प्रेरक व प्रवर्तक शक्ती म्हणून रमाबाईंचा प्रभाव विशेष होता."[७]

इथे 'सेवासदन' संस्थेच्या उद्देशांकडे नजर टाकल्यास रमाबाईंच्यावर न्यायमूर्तींच्या सर्वसमावेशक व दूरदृष्टीच्या धोरणांचा प्रभाव किती होता ह्याचे प्रत्यंतर येईल. उद्देशांची कलमे,'स्त्री-वर्गात परस्पर स्नेहभाव वृद्धिगत करणे (सिस्टरहुड),शिक्षणाद्वारे त्यांच्या बुद्धीचा विकास घडवणे (व्यक्तिमत्व विकास),त्यांच्या स्वाभाविक सेवापरायण वृत्तीला सार्वजनिक हिताची व परोपकाराची कामे करण्यास प्रवृत्त करणे (सामाजिक बांधिलकी)' अशी होती. सेवासदनच्या कौन्सिलमध्ये,पार्सी,मुसलमान,हिंदू,ख्रिश्चन वगैरे स्त्रियांचा समावेश होता असे दिसते व त्यांना सल्लागार म्हणून एक पुरुषांची कमिटी स्थापन केलेली दिसते.

समाजाचे स्वास्थ्य, सुख व भावी उत्कर्ष, शिक्षणप्रसारावर अवलंबून असल्याने सेवासदनात त्यावर प्रथमपासून भर देण्यात आलेला दिसतो. अभ्यासक्रमाची नीट आखणी करून,प्रशिक्षित शिक्षक नेमून वा तयार करून विविध विषय ह्या शिक्षणवर्गात शिकवले जात. तसेच शारीरिक शिक्षण, आरोग्य, फर्स्ट एड वगैरे विषयही अभ्यासक्रमात अंतर्भूत केलेले दिसतात. विविध विषयांवर व्याख्याने वा कीर्तने आयोजित करणे, तसेच प्रसंगाप्रसंगाने

स्नेहसंमेलने भरवणे असे वेगवेगळे उपक्रम सेवासदनने अंमलात आणलेले दिसतात.

शालेय शिक्षणाच्या जोडीला, पगारी शिंपी शिक्षक नेमून स्त्रियांना शिवणकाम व कलाकौशल्याच्या वस्तू शिकवून, त्या विकून आर्थिक कमाईची वाटही सेवासदनाने उघडून दिलेली दिसते. ह्याच काळात रमाबाई दवाखान्यात जाऊन रोग्यांना फळे-पुस्तके वाटणे, विचारपूस करून धीर देणे वगैरे सेवाभावी कृती करताना दिसतात. त्यांचे चरित्रलेख विद्वांस म्हणतात -

"या वातावरणामुळे रमाबाईंपासून स्फूर्ती घेऊन संस्थेतील काही कार्यकर्त्या गोरगरिबांना औषधे देणे, गरीब स्त्रियांची बाळंतपणे करणे, मुले सांभाळणे, वगैरे कामे परोपकारी बुद्धीने विनामूल्य करीत !"[८]

रमाबाईंच्या ह्या स्त्री-विकासाच्या भरीव कार्याला वर्षाच्या आत समाजाकडूनही पावती लाभलेली दिसते. किर्लोस्कर नाटक कंपनीसारख्या संस्था, डॉ. मुकुंदराव जयकरांसारखी प्रतिष्ठित व्यक्ती संस्थेला नवनवीन योजना कार्यान्वित करण्यासाठी आर्थिक साहाय्य करताना दिसतात. ह्या समाजमान्यतेने उत्साहित होऊन १९१० साली संस्थेने आपला वार्षिक बक्षीस समारंभ थाटाने साजरा केलेला दिसतो.

ह्या समारंभास विविध जाती-धर्मांच्या ५०० स्त्रिया व २०० पुरुष हजर होते असे दिसते.

उपस्थितांचा हा प्रतिसाद सेवासदन संस्थेने वर्षाच्या आत समाजात केवढे कुतुहल निर्माण केले होते, ह्याचा दर्शक वाटतो. त्या वेळी झालेल्या भाषणातील काही उतारे पाहा.

काशीबाई कानिटकर म्हणतात - "आमच्या आम्हीच जेव्हा खडबडून जाग्या झालो तेव्हाच स्त्री-सुधारणारूपी शकट पुढे चालून आला. आमच्या मार्गात अडचणी किती आहेत हे आम्हांसच माहीत."

सुझी. सोराबजी म्हणतात- "स्त्रियांच्या हरएक प्रकारच्या उन्नतीसाठी पुण्यात चालविलेल्या चळवळींच्या हृदयस्थानी श्री. रमाबाई रानडे आहेत."

डॉ. भांडारकर म्हणतात - "श्री. रमाबाई रानडे यांनी या कामांत तन-मन-धन अर्पण केले आहे. आज आपण उन्नतीच्या मार्गाला लागलेला स्त्री-समुदाय पाहतो त्याचे श्रेय त्यांना दिलेच पाहिजे."[९]

वर्षाच्या अवधीत 'सेवासदन' संस्थेने पुण्यातील सुशिक्षित समाजाला केवढे प्रभावित केले होते, ह्याची साक्ष वरील उद्गारांतून जाणवते.

स्त्रियांच्या सामान्य शिक्षणाची घडी अशा प्रकारे बसवल्यावर एक पाऊल पुढे टाकून गतभर्तृकांना स्वतःच्या पायावर उभे करण्याच्या दृष्टीने रमाबाईंच्या योजना सुरू झालेल्या दिसतात.

शाळेसाठी शिक्षिका तयार करणे, शिवणक्लासात मदतनीस स्त्रिया नेमणे, याचबरोबर विधवा स्त्रियांना सोयीचा व्यवसाय म्हणजे नर्सिंगचा होय, हे जाणून रमाबाईंनी त्यासाठी खटपट सुरू केलेली दिसते. त्यासाठी स्वतः स्त्रियांच्या मनाची तयारी करणे, हॉस्पिटलकडून परवानगी मिळवणे, अभ्यासक्रमासाठी मदत मिळवणे ह्या सर्व गोष्टी महत्त्वाच्या होत्या.

रमाबाईंनी त्या कौशल्याने पार पाडलेल्या दिसतात.

त्या काळी स्त्री-डॉक्टरच्या व परिचारिकांच्या अभावी, प्रसूतीच्या वेळी संकोचामुळे कितीतरी स्त्रियांना मृत्युमुखी पडावे लागे. पुरुषांच्या शुश्रुषेसाठी, तसेच दुष्काळ, अपघात, मोठमोठ्या यात्रा या प्रसंगींही रुग्णांना उपचार करण्यासाठी परिचारिकांची फार गरज असे. हे समाजसेवेचे, भूतदयेचे काम आपल्या समाजात नवीन होते. पण त्याची आवश्यकता दिवसेंदिवस जास्तच भासू लागली होती. म्हणून रमाबाईंनी सेवासदनातर्फे १९११ सालापासून काही उच्च वर्गातील स्त्रियांना ससून हॉस्पिटलमध्ये रुग्णपरिचर्चेचे व प्रसूतीशास्त्राचे शिक्षण मिळण्याची व्यवस्था केलेली दिसते. ह्याविषयी विद्वांस लिहितात - "श्रीमती रमाबाईंनी १९१० च्या अखेरीस ससून हॉस्पिटलच्या सिव्हिल सर्जन कर्नल स्मिथ यांना विनंती केली. त्यांनी ती मान्य करून प्रसूतिशास्त्र व रुग्णपरिचर्येचा कोर्स तयार केला व वरिष्ठांची मंजुरी मिळविली. श्री. मथुराबाई गोगटे व श्री. कृष्णाबाई जठार ह्या दोन गतभर्तृका मोठ्या धैर्याने तयार झाल्या.... त्यांना इंग्रजी येत नव्हते. तेव्हा सेवासदनच्या सल्लागार समितीतील एक सदस्य डॉ. शिखरे यांनी इंग्रजी अभ्यासक्रम मराठीतून शिकवण्याची जबाबदारी स्वीकारली."[१०]

त्या काळी घराबाहेरील जगाशी, विशेषतः पुरुषांशी मध्यमवर्गीय स्त्रियांचा संपर्क येत नसे. त्यामुळे प्रथम काही काळ ह्या विद्यार्थिनींना पुरुष रुग्णांची सेवा करण्यास संकोच वाटत असे. ह्यातून रमाबाईंनी, समानतेचे वा धीटपणाचे धडे देण्याऐवजी समजूतदारपणाने मार्ग काढलेला दिसतो. चरित्रकार सांगतात -

"रमाबाई स्वतः वॉर्डमध्ये मुलींबरोबर जात व विद्यार्थिनींना सांगत- 'आपण आपल्या वडिलांची, भावाची नाही का शुश्रुषा करत ? हीच भावना तुम्ही या दुःखी रुग्णांबद्दल ठेवा. व्याधिग्रस्तांची सेवा ही परमेश्वर सेवा आहे.' तसेच त्या रुग्णांना सांगत - 'तुम्ही या मुलींना आपल्या बहिणी अथवा मुली समजा व त्यांची हिंमत वाढवा !' या उपदेशाचा चांगला उपयोग होई .... रमाबाईंच्या उपस्थितीने मुलींचा संकोच दूर झाला. अशा रीतीने सेवासदनाच्या अत्यंत महत्त्वाच्या उपक्रमाचा शुभारंभ झाला !"[११]

हॉस्पिटलमध्ये नर्सेसना सर्व जाती-धर्मांच्या रुग्णांची शुश्रुषा करावी लागे. तेव्हा अशा मुलींना जुन्या मताच्या लोकांच्या वाड्यात किंवा स्वतःच्या घरांतही राहणे त्या काळी कठीण होते असे दिसते. त्यामुळे अर्थातच ह्या विद्यार्थिनींसाठी वसतिगृहाची गरज भासू लागली. लगेच रमाबाईंनी १९११ मध्ये आपल्या राहत्या वाड्यात सेवासदनाचे वसतिगृह सुरू केले.

ह्या विद्यार्थिनी, स्त्रियांचे जेवणखाण, राहणे, झोपणे, रमाबाईंच्या सान्निध्यात होई व त्यांच्या प्रकृतीची, मनोविकासाची, अभ्यासाची व सुरक्षिततेची काळजी त्या घेत, असे त्यांचे चरित्रकार सांगतात.[१२]

ह्या प्रसूतिशास्त्र व रुग्णपरिचर्येच्या शिक्षणासाठी १९१२ त बारा विद्यार्थिनी वसतिगृहात राहात होत्या. त्यातल्या अकरा विधवा होत्या, असे विद्वांस सांगतात.[१३]

पुढे सेवासदनमध्ये शिकणाऱ्या मुलींसाठी एखादे पुस्तकालय असावे, असे वाटून रमाबाईंनी आपल्याजवळील पुष्कळ पुस्तके शाळेला दिली. मग हरिभाऊ आपटे, न. चिं.

केळकर, का. र. मित्र वगैरे अनेक सुधारकांनीही पुस्तकालयाला आपली पुस्तके भेट म्हणून दिलेली दिसतात.

अशा तऱ्हेने रमाबाईंच्या नेतृत्वाखाली सेवासदन शाळा, वसतिगृह, नर्सिंग कोर्स, विणकाम, भरतकाम, यंत्रावर पायमोजे विणणे वगैरेची औद्योगिक शिक्षण शाळा, या सगळ्यांची विस्तार व दर्जा दोन्ही बाबतींत वेगाने वाढ होत चाललेली दिसते. ह्यालाच जोडून पेटीवादन वर्ग, वृद्ध स्त्रियांसाठी अभंगाचा वर्ग, व्याख्यानमाला वगैरे उपक्रम चाललेले दिसतात.

सेवासदनाच्या ह्या स्त्री-उन्नती कार्याबद्दल महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ह्यांचा अभिप्राय पहा--

"पुण्यामध्ये व मुंबईमध्ये सेवासदन नावाच्या अत्यंत लोकोपयोगी संस्थेचे काम होत आहे.... ज्यांचे अष्टोप्रहर चुलीजवळ जातात अशा बायकांनी थोडा रिकामपणा काढून तो विद्याग्रहणाकडे खर्च करावा म्हणून वर्ग काढून त्यांच्या सोयीस येईल त्या वेळी, त्या रीतीने त्यांना शिकवणे, अडल्यानडल्याकडे जाऊन त्यांच्या अडनडी समजावून त्यांस यथाशक्ती मदत करणे, दुःखितांकडे जाऊन त्यांस धीर देणे हे पवित्र कार्य श्री. रमाबाई साहेबांनी इतर स्त्रियांच्या मदतीने सुरू केले आहे. अशा रीतीने वहिनीसाहेबांचे घर हे स्वतःच सध्या सेवासदन झाले आहे. रावसाहेब रानड्यांच्या हयातीत ज्या ठिकाणी प्रगतिपर उलाढाली होत, त्याच ठिकाणी ते कैलासवासी झाल्यानंतर वहिनी बाईसाहेबांनी.... स्त्री-समाजाच्या हितार्थ आपणास वाहिले.... पूर्वीप्रमाणेच परोपकाराचा उद्योग चालू ठेवला. जणू रावसाहेबांची थोर विभूती पुनरपि त्या ठिकाणी अवतरली आहे."[१४]

संस्था स्थिर होऊन लोकोपयोगी होत आहे असा विश्वास वाढला तेव्हा संस्थेच्या कार्याचा प्रसार करावा म्हणून रमाबाई व इतर सदस्या .... वेगवेगळ्या .... गावी जाऊन व्याख्याने देऊ लागलेल्या दिसतात. श्री विद्वांस लिहितात -

"वऱ्हाडमध्ये यवतमाळ, अमरावती, अकोला येथे रमाबाई रानडे गेल्या होत्या. तेथे स्त्री-शिक्षण व स्त्रियांची कर्तव्ये, ह्यासंबंधी त्यांची व्याख्याने झाली. पालनपूर येथे दुष्काळाचे वेळी गेल्या असताना रमाबाईंनी, दोन दिवस मुक्काम लांबल्याचा फायदा घेऊन, गुजराथी स्त्रियांसमोर 'विधवा आणि त्यांची शोचनीय स्थिती' यासबंधी आपले विचार मांडले."[१५]

पुढे संस्थेच्या कार्यविस्ताराबरोबर तिचे खर्चही वाढत चाललेले पाहून रमाबाईंनी एखादा कायम फंड उभा करण्याचे ठरवलेले दिसते. त्यासाठी त्यांनी स्वतःचे पाच हजार रुपये देऊन फंडाचा शुभारंभ केला व नंतर धनिकांकडे शब्द टाकला, असे श्री. विद्वांस सांगतात.

रमाबाईंच्या नावाला असलेली प्रतिष्ठा, त्यांचे स्नेहसंबंध व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांनी निष्ठेने चालवलेले कार्य पाहून सर विठ्ठलदास ठाकरसी, रतन टाटा इत्यादींसारख्या उद्योजकांनी रमाबाईंना आर्थिक साहाय्य आवडीने केलेले दिसते.

ह्या प्रतिष्ठा व लोकोपयोगी कार्याचे आणखी एक फलित म्हणजे रमाबाईंच्या पुण्यातील ह्या सेवासदन संस्थेला त्या काळातील बहुसंख्य मोठ्या व्यक्ती येऊन भेट देऊन गेलेल्या

दिसतात. 'गव्हर्नरांच्या पत्नी लेडी विलिंग्डन, लेडी क्लार्क, ॲनी बेझंट, महात्मा गांधी व कस्तुरबा गांधी, याचबरोबर फिरोजशहा मेहता, पं. मालवीय, सर विश्वेस्वरय्या, सर जमशेटजी व त्यांच्या पत्नी, मि. वाडिया.... अनेक संस्थानाधिपती, त्यांच्या राण्या आणि युवराज, सेवासदनास भेट देऊन गेले असे श्री. विद्वांस लिहितात व पुढे म्हणतात - "संस्थेसंबंधी अभिप्राय लिहिताना भारताच्या इतर प्रांतांतून आलेल्या स्त्री-पुरुषांना, आपल्या प्रांतात अशा संस्थेची कोणाला कल्पनाही करता येत नाही, हे विशेषत्वाने जाणवले आहे."[१६]

ह्यावरून लोकाश्रय व राजाश्रय हे दोन्ही रमाबाईंच्या वाट्याला आलेले दिसतात. सेवासदनाचे काम रमाबाई ज्या प्रशासन कौशल्याने व तळमळीने करत होत्या त्यामुळे सरकारी ग्रँट्सपण त्यांच्या शाळेला लाभत गेलेल्या दिसतात. त्याचप्रमाणे कुलीन व थोराघरच्या स्त्रिया त्यांच्या कामात सहभागी होताना दिसतात. गांधीजींच्या अस्तित्वामुळे तरुण मुलींना राजकारणात व समाजकारात जाऊ देण्यास पालक जसे निश्चिंत असत, तसाच प्रभाव रमाबाईंच्या अस्तित्वाचा झालेला दिसतो. रमाबाई ज्या उपक्रमात असतील त्याला देणगी देण्यास वा आपल्या घरच्या मुलीबाळी तिथे शिकायला पाठवायला पालकांना निश्चिंत वाटत असे, असे जाणवते.

"पुणे सेवासदन संस्थेत धर्म, पंथ, जाती, प्रांत किंवा वर्ग यांवरून कोणताही भेद करण्यात येत नसे, वसतिगृहात ब्राह्मण स्त्रियांसमवेत सारस्वत, मराठा, जैन, लिंगायत, गुजराथी विद्यार्थिनी राहत होत्या. एवढेच नव्हे, तर वसतिगृहात वीस इंडियन ख्रिश्चन, एक मुसलमान व एक ज्यू अशा स्त्रियाही होत्या. संस्थेत उदार आणि व्यापक धर्मतत्वे व संस्थेचे ध्येय यांची शिकवण सर्वांना मिळे .... स्त्रिया व शिक्षक एका कुटुंबातल्यासारखे वागत. हा रमाबाईंच्या व्यक्तिमत्वाचा आणि तेथील वास्तव्याचा परिणाम होता."[१७] असे श्री. विद्वांस म्हणतात.

ह्याच सुमारास संस्थेचा कायम फंड वाढवण्याच्या दृष्टीने रमाबाईंनी आणखी एक अभिनव उपक्रम केलेला दिसतो, तो म्हणजे फॅन्सिफेअर भरवणे. आज आपण विक्री व मनोरंजन ह्या दोन्ही गोष्टी साधण्यासाठी आनंदमेळा (fun fair) वगैरे भरवतो. त्यांची सुरवात ह्या 'फॅन्सिफेअर'ने रमाबाईंनी त्या काळी केली, असे म्हणावयास हरकत नाही.

ह्यापूर्वी स्त्रियांनी केलेल्या कला-कौशल्याच्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीचे प्रयोग दोन-चार झाले होते. उदा. १८९३ साली हरी नारायण आपट्यांनी असे छोटे प्रदर्शन भरवले होते. त्यात रमाबाई स्वतः परीक्षिका होत्या. 'परीक्षकांच्या लौकिकामुळे आणि खटपटीमुळे प्रदर्शनास इतके मोठे यश आले, असे नंतर आपटे ह्यांनी याबद्दल करमणुकीत लिहिले होते.'[१८] १८९५ मध्ये राष्ट्रीय व सामाजिक परिषदेच्या वेळी ह्याहून मोठे प्रदर्शन भरवण्यात आले होते. "त्यातील वस्तूंची सुंदर मांडणी करण्यात आणि व्यवस्थापनात रमाबाईंनी महत्त्वाचा भाग घेतला होता. रमाबाईंना स्वतःला भरतकाम, विणकाम कल्पकतेने नवी नक्षी योजून सुबकपणे करता येत असे,"[१९] असे चरित्रकार विद्वांस सांगतात. १९११ मध्ये इंग्लंडच्या बादशहाच्या आगमनप्रसंगीपण असे एक प्रदर्शन भरले होते व त्यांत सेवासदनाच्या विद्यार्थिनींनी आपल्या कलाकृती मांडल्या होत्या.

पण रमाबाईंनी भरवलेली ही फॅन्सीफेअर ही त्याही पुढची पायरी होती, असे चरित्रकार विद्वांस सांगतात. त्यांनी ह्या प्रदर्शनाचे सविस्तर वर्णन रमाबाईंच्या चरित्रात केले आहे. त्यावरून ह्या प्रदर्शनात मुंबई व पुण्याकडील बहुसंख्य सुशिक्षित, मोठ्या घरच्या स्त्रिया तसेच पारसी, युरोपिअन स्त्रिया सहभागी झाल्या होत्या, असे दिसते. "प्रदर्शनाची जागा, पताका, चायनीज लँटर्न्स, रोषणाई, करमणुकीच्या कामासाठी उभारलेले ऐटदार तंबू, रंगीत फुले लावून काम करणारे स्त्री-पुरुष स्वयंसेवक इत्यादींमुळे रंगीबेरंगी व गजबजलेली दिसत होती." [२०] प्रदर्शनांत सेवासदनच्या व इतर मुंबई-पुण्याकडच्या स्त्रियांनी केलेल्या कलाकृतीच्या वस्तू, प्रदर्शन व विक्रीसाठी मांडल्या होत्या.

प्रदर्शनाचे उद्घाटन मुंबई इलाख्याचे गव्हर्नर श्री. क्लार्क व त्यांच्या पत्नी ह्यांच्या हस्ते केले गेले. पण सर्वांत अभिनव व महत्त्वाची गोष्ट जाणवली ती ही, की पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्याचा मान मथुराबाई गोगटे ह्या नर्सिंगचे शिक्षण घेणाऱ्या पहिल्या विधवा विद्यार्थिनीलो ण्यात आला होता. विधवेला मिळालेला हा 'सामाजिक सन्मान' त्या काळाच्या दृष्टीने फारच मोठी व महत्त्वाची घटना (प्रगती) दिसते. सर्व स्टॉल्सवर विक्रीसाठी प्रतिष्ठित घरांतील स्त्रिया स्वतः बसल्या होत्या व वस्तू घेण्यास उत्तेजन देत होत्या. पिक्चर गॅलरीसाठी स्वतः गव्हर्नराच्या पत्नीने आपण काढलेली चित्रे पाठवली होती. हिंदू व इंग्रजी दोन्ही प्रकारच्या पदार्थांचे स्टॉल्स उभारले होते. हत्ती, उंट, फिरते चक्र वगैरे करमणुकीची साधने होती. गावातल्या व्यापाऱ्यांनी वेगवेगळे सामान, भाडे न घेता वापरण्यास दिले होते. अशा प्रकारे अनेक व्यक्तींच्या मदतीने फेअर तीन दिवस दणक्यात झालेली दिसते. हजारो स्त्री-पुरुष फेअरचा आनंद घेऊन गेले. एक दिवस निव्वळ बायकांसाठी ठेवला होता. फेअरची जागा गावांपासून तीन-चार मैल लांब, वाहतुकीची साधने दुर्मिळ, तरीही त्या दिवशी वाई, जेओर, मानार येथील पडदानशीन बेगमा, नामदार आगाखान ह्यांच्या कुटुंबातील स्त्रिया, सरदार, जहागिरदारांच्या स्त्रिया या मिळून आठ-नऊ शे स्त्रिया येऊन गेल्याचे सांगून चरित्रकार विद्वांस म्हणतात "हा आकडा विक्रमी होता !"[२१]

ह्या तीन दिवसांच्या विक्रीतून सेवासदन फंडाला साडेतीन हजारांची प्राप्ती झाली, असे दिसते. कार्यकर्त्यांना संयोजनाचा अनुभव मिळाला, शिवाय प्रदर्शन बघण्यास आलेल्या लोकांना सेवासदनाच्या कार्याची व सुशिक्षित स्त्रियांच्या कलेची ओळख झाली. प्रेक्षक स्त्रियांत कलेची आवडही निर्माण झाली असावी. अध्यक्षीय भाषणात लेडी क्लार्क म्हणाल्या त्यानुसार - "चित्रकला व संगीत यांचा शालेय शिक्षणात समावेश करण्यात आल्याने .... स्त्रियांच्या अंगच्या गुणांचा अधिकाधिक विकास होऊ लागेल. हिंदी मुलींना आता बाहेर हिंडण्याचे अधिक प्रसंग येऊ लागल्यामुळे सृष्टिनिरीक्षणाचे सुख त्यांना मिळू शकेल !"[२२]

शेकडो भिन्नधर्मीय स्त्रिया गावाबाहेरील प्रदर्शनात, रोषणाई व शोभेचा आनंद घेत, सुंदर कलाकृती न्याहाळत, खाद्य पदार्थांचा आस्वाद घेत मोकळेपणाने हिंडत आहेत, हे दृष्य एकोणिसाव्या शतकातील जीवनात अपूर्वच वाटते.

'इंडियन सोशल रिफॉर्मर' या इंग्रजी साप्ताहिकाचे संपादक लिहितात - "या सर्व

खटपटीत या स्त्रियांचा दुसराही महत्त्वाचा उद्देश आहे. घरबसल्या होण्यासारखी अशी हस्तकौशल्याची पुष्कळ कामे स्त्रियांना करता येण्यासारखी असतात. त्यांच्यापासून टापटीप, नीटनेटकेपणा, कल्पनाचातुर्य वगैरे पुष्कळ गुणांच्या विकासास चांगली मदत होते व त्यांच्या योगाने मानसिक उन्नतीस, गृहशोभेस व सुखप्रद जीवनास मोठे साहाय्य होते."

हा उतारा उद्धृत करून रमाबाईंचे नातू लिहितात - "या उद्योगामागे रमाबाईंची ही एक दृष्टी असावी."[२३]

वरील उताऱ्यातील मानसिक उन्नती म्हणजे 'स्वत्व जागृती' व सुखप्रद जीवन म्हणजे 'अभिरुची संपन्नता' अभिप्रेत असावी असे वाटते. तत्कालीन स्त्री-जीवनात ह्या दोन्ही वृत्ती परिस्थितीमुळे दडपल्या गेल्या होत्या.

प्रदर्शन पाहून त्या कला शिकण्याची इच्छा अनेक स्त्रियांच्या मनात उत्पन्न झाली. अशांसाठी सेवासदनाने कु. कमलाबाई ब्रह्मांडकर ह्या मुंबईच्या निष्णात शिक्षिकेची नेमणूक करून मोफत शिवणकला वर्ग सुरू केला.

रमाबाईंच्या ह्या उपक्रमाचे अनेक लोकांकडून, तसेच ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश वगैरे वृत्तपत्रांतून बरेच कौतुक झालेले दिसते. तथापि, स्त्रियांचा हा मोकळेपणा न रुचलेल्या पुराणमताभिमानी व्यक्तींनी मात्र ह्या उपक्रमाबाबत केसरीतून कुत्सित टीका केलेली दिसते. 'मिना-बझार' किंवा 'रंगेल यात्रा' अशी नावे देऊन पत्रकर्ता लिहितो, की -- 'सदर रंगेल बाजारास वस्तूच्या प्रदर्शनापेक्षा त्या विकणाऱ्या स्त्रियांचे प्रदर्शन असे स्वरूप आले होते.'[२४] स्त्रिया आपल्या तारुण्याचा व सौंदर्याचा वापर करून लाडिकपणे गिऱ्हाइके पटवत होत्या, असाही आरोप ह्या पत्रकर्त्याने केलेला दिसतो. 'बझारात स्टॉलवर स्त्रिया बसवायच्या तर स्त्रियांकरताच बझार उघडा ठेवायचा ....पुरुषांना बझार उघडा ठेवायच्या वेळी फक्त निवडक पोक्त स्त्रिया किंवा पुरुष स्वयंसेवक ठेवून अगर नुसती लेबले लावून विक्री करायची,' असाही सल्ला 'सेवासदनचा एक हितचिंतक' अशा सहीने लिहिणाऱ्या ह्या पत्रकर्त्याने केलेला आहे. 'वस्तूला मिळणारी अधिक किंमत ही स्त्रियांच्या चित्ताकर्षकत्वाची किंमत होय,' असे पत्रलेखक म्हणतो.

वरील पत्रातून तत्कालीन परंपराभिमानी माणसांचा, घराबाहेर पडून मिश्रसमुदायांत कार्य करू पाहाणाऱ्या तरुण स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा संकुचित होता, हे लक्षात येते.

ह्या पत्राला 'गांगेयी'[२५] यांनी १९ ऑक्टो. १९१२ च्या 'ज्ञानप्रकाशा'त सविस्तर उत्तर दिले आहे. त्यात त्या लिहितात- "कूपमंडूकवत् लोकांना नव्या गोष्टी पसंत पडतच नाहीत... ह्या लोकांना वाटते, की बायकांनी गृहकृत्ये करून फार तर चार अक्षरे शिकावी, कमाल म्हणजे एखाद्या सेवासदनातल्या सारख्या व्याख्यानास जावे.... त्यांना अशी भीती वाटते, की बायकांना व मुलींना मोकळे सोडल्यास काहीतरी अनिष्ट होईल. . . . पण ज्याला मनुष्यस्वभावाविषयी माहिती आहे, त्याला इतके भिण्याचे कारण नाही....बायका जर वाईट निघाल्या, तर त्याचा दोष पुरुषवर्गाकडे येतोच.... स्त्रियांस अधिक मोकळीक मिळून त्यांना आपले मत निर्भीडपणे देता येईल तर पुरुषांच्या बेजबाबदारीस बराच आळा बसेल."

सेवासदन संस्थेचा स्त्रियांना स्वावलंबी बनविण्याचा व समाजकार्य शिकवण्याचा उद्देश लक्षात घेता स्टॉलवर शालीनतेच्या कल्पनेपायी पुरुषांना बसवणे अयोग्य ठरले असते.

'गांगेयी'नी आपल्या पत्रातून 'नावे कळवण्याचे' आवाहन देऊनही 'हितचिंतकाने' पाळलेले मौन, हे स्त्रियांच्या चवचालपणाचे त्यांचे आरोप पूर्वग्रहातून केले असावेत, ह्या संशयाला बळकटी आणणारे वाटतात.

एकंदरीत, ह्या प्रसंगाने सार्वजनिक कामासाठी प्रतिष्ठित संसारी स्त्रियांनी लोकांपुढे येण्याची, लोकांत मिसळण्याची नवी वाट पाडल्याचे लक्षात येते.[२६]

आपल्या 'हिंदू लेडीज स्पेशल' क्लबच्या जुन्या प्रथेप्रमाणे रमाबाई स्त्रियांची स्नेहसंमेलने पण प्रतिवर्षी भरवताना दिसतात. त्या निमित्ताने बायकांना घराबाहेर पडून, इतर स्त्रियांच्या सहवासात विचार व अनुभवाची देवाणघेवाण करीत, नवे स्नेहसंबंध जोडत जीवनाचा नवा अनुभव घेण्याची संधी लाभलेली दिसते.

स्त्रीच्या घराबाहेरील अस्तित्वाला अशा निमित्ताने हळूहळू आकार येऊ लागलेला दिसतो.

शिक्षण ही स्त्रीच्या भावी विकासाची पहिली गुरुकिल्ली आहे, हे स्वानुभवाने रमाबाईंना जाणवले असावे. त्यामुळे शिक्षणाचे त्यांना फार महत्त्व वाटत होते. आपल्या वैयक्तिक जीवनात जवळच्या, दूरच्या शिक्षणार्थी मुलांना त्यांनी किती कळकळीने मदत केली, हे आपण पुढे पाहणार आहोत. इथे उल्लेख करावासा वाटतो, तो एम्.ए. ची परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या पहिल्या मराठी स्त्रीचा, कु. कृष्णाबाई ठाकूर यांच्या रमाबाईंनी केलेल्या सक्रीय अभिनंदनाचा ! समारंभ करून त्यांचे कौतुक करताना रमाबाईंनी न्यायमूर्तींच्या नावे त्यांना बक्षीसपण दिल्याचे दिसते. इथे इंदिराबाई देवधरांनी सांगितलेली एक आठवण नोंदवावीशी वाटते.

डॉ. इंदुमती नाईक नावाच्या एक स्त्रीने गोवधबंदीचा ठराव काँग्रेस कमिटीच्या सभेत मांडला म्हणून पुण्याच्या गोरक्षण संस्थेने त्यांना मानपत्र दिले. ह्याबद्दल त्यांचा सत्कार करावा असा प्रस्ताव स्त्रियांच्या सभेत मांडला गेला. त्यावर काही स्त्रियांचे मत पडले, की 'त्यांचे पतीच संस्थेचे चिटणीस ! तेव्हा ह्यात मानपत्र देण्याइतके काय आहे ?' यावर रमाबाईनी दिलेले उत्तर महत्त्वाचे वाटते.. त्या म्हणतात- " कारण महत्त्वाचे नाही, पण एका स्त्रीची योग्यता पुराणमताभिमानी लोक मानतात, ही घटना अभिनंदनीय आहे. योग्य अशा नवीन विचारसरणीचा अंगिकार समाजाने करणे म्हणजेच 'प्रगती !'[२७] ह्याच बाबतीत इंदिराबाई देवधर आणखी एक आठवण सांगतात.

त्या काळी एका सुशिक्षित तरुण स्त्रीने विवाहित पुरुषाशी प्रेमविवाह केला. ह्या पुनर्विवाहित स्त्रीला मंडळात व्याख्यानासाठी बोलावण्याचा विचार चालू होता. तेव्हा रमाबाई म्हणाल्या "अशा पुनर्विवाहितांना मुळीच सहानुभूती दाखवू नये. आपण सधवा होऊन पर्यायाने दुसऱ्या एका स्त्रीला विधवा केल्याप्रमाणे हे वर्तन आहे. ह्यांत सुधारणा तर मुळीच नाही, उलट सुधारणा चळवळीस हे लांच्छनच आहे."

वरील दोन्ही प्रसंगांतून रमाबाईंचे स्त्री-सुधारणेच्या बाबतीत काय धोरण होते ते स्पष्ट

होते.

सेवासदन ही प्रामुख्याने स्त्री-शिक्षण संस्था होती. त्यामुळे रमाबाई स्त्री-शिक्षणाच्या दृष्टीने नवेनवे उपक्रम शोधत असत, असे दिसते. १९१४ पर्यंत सेवासदनात सामान्य शिक्षणाच्या जोडीने नर्सिंग, संगीत, शिवणकाम, विणकाम एवढेच वर्ग चालू होते. पण मग रमाबाईंनी शिक्षण प्रशिक्षणाचा (नॉर्मल स्कूल) वर्ग सुरू केला. त्यातील विद्यार्थिनींचे सरकारी परीक्षेतील यश पाहून, शिक्षणखात्याने सेवासदनाला तीन वर्षांचे सर्टिफिकेट कोर्स सुरू करण्यास परवानगी दिलेली दिसते. त्या पाठोपाठ सेवासदनाने पुण्याच्या बी. जे. मेडिकल स्कूलचा फायदा घेऊन मध्यमवर्गातील स्त्रियांनी वैद्यकी विषयाचा डिप्लोमा घ्यावा (एल. सी. पी.एस) म्हणून खूप प्रचार केला, मध्यवर्ती सोयीच्या ठिकाणी विद्यार्थिनींसाठी बोर्डिंग सुरू केले.[२८]

त्याबाबत विद्वांस लिहितात - "ह्याही बोर्डिंग कमेटीच्या अध्यक्षा श्रीमती रमाबाई असल्याने मुलींची सर्व प्रकारची काळजी घेतली जाईल, असा त्यांच्या पालकांना विश्वास वाटला.... हे वसतिगृह अर्थातच उत्तम चालू लागले."[२९]

पुढे लवकरच मॅट्रिकच्या परीक्षेनंतर शास्त्रीय विषयाची प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या मुलींसाठी 'सब-असिस्टंट सर्जन'चा अभ्यासक्रम सुरू झालेला दिसतो. त्या विषयी श्री. विद्वांस सांगतात - "वसतिगृहात त्यासाठी सात स्त्रिया येऊन राहिल्या. त्यांमध्ये दोन ब्राह्मण, दोन मराठा, दोन ख्रिश्चन व एक मुसलमान अशा एकत्र राहत होत्या."

सेवासदनाचा व्याप अशा प्रकारे वाढत गेलेला दिसतो. जागा पुरेना म्हणून मग रानडेवाड्यातली जागा सोडून संस्थेसाठी स्वतंत्र जागा घेऊन व त्यावर स्वतंत्र बांधकाम करून, १९१५ पासून संस्था नवीन जागेत हलवण्यात आलेली दिसते. रमाबाईंनी स्वतःच्या खर्चाने तिथेच आपल्यासाठी घर बांधले. कारण रानड्यांच्या मृत्युपत्रानुसार दत्तक मुलगा सज्ञान झाल्यावर (१९१५ मध्ये) जुना वाडा त्याला द्यायचा होता. त्यामुळे रमाबाईंनी जाणीवपूर्वक ही योजना केलेली दिसते. शिवाय जवळ राहिल्याने संस्थेच्या कामावर देखरेख ठेवणे, त्यांना सोपे जाणार असावे.

१९१७ मध्ये सेवासदनाच्या सर्व यशस्वी विद्यार्थिनींचा बक्षीस-वितरण समारंभ फर्ग्युसन कॉलेजच्या ॲंफी-थिएटरमध्ये करण्यात आलेला दिसतो. त्यावेळी डॉ. भांडारकर आपल्या स्वागतपर भाषणात म्हणाले, की- 'जे काम पाच-सहा वेगवेगळ्या संस्थांतून व्हावयाचे ते ह्या एका संस्थेच्या हातून होत आहे, याबद्दल रमाबाई रानडे व त्यांचे मदतनीस ह्यांचे मी अभिनंदन करतो.' पाहुणे म्हणून आलेल्या लॉर्ड विलिंग्डन, सिव्हिल सर्जन हूटन, डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन्स ना. काव्हर्नटन वगैरेंनी पण विविध प्रकारच्या स्त्री-शिक्षणाबाबत संस्थेने केलेल्या कामाची वाखाणणी केलेली दिसते.

पण त्या वेळी घडलेला एक प्रसंग अधिक लक्ष वेधून घेतो.

बक्षीस वितरण प्रसंगी काही सोवळ्या गतभर्तृका पारितोषिक स्वीकारण्यासाठी व्यासपीठावर आल्या. तेव्हा काही विद्यार्थी श्रोत्यांनी कुत्सितपणे हसून टाळ्या वाजविल्या.

त्या वेळी रमाबाईंनी झटकन पुढे होऊन,ह्या असभ्यपणाबद्दल श्रोत्यांना कडकपणे समज दिली. त्यानंतर मात्र समारंभ शांतपणे पार पडला असे दिसते.समारंभाच्या शेवटी आपल्या भाषणात रमाबाईंनी तो प्रसंग लक्षात ठेवून मोठे तळमळीचे उद्गार काढलेले दिसतात.त्या म्हणाल्या -

"आज प्रत्येक घरात अशी माणसे आहेत. अशा माणसांच्या स्वार्थत्यागी वागणुकीने उपकृत झाले नाही, असे घर सापडणे कठीण पडेल. आपल्याच घरच्या माणसांना असे अनादराने वागवणे चांगले नाही.जोपर्यंत अशी स्थिती आहे,तोपर्यंत मुले उन्नतीच्या मार्गाला लागली आहेत,असे केव्हाही म्हणता येणार नाही !"[३०]

हळूहळू सेवासदनाच्या शाखा पुण्याबाहेर सोलापूर,नगर,बारामती,अलिबाग इ.अनेक गावी स्थापन झालेल्या दिसतात. त्या मागे स्त्री-जागृती, देशभक्ती व समाजसेवेची ज्योत गावोगावी पसरवावी ही दृष्टी दिसते.पुढे संस्थेचे सेवाभावी सेक्रेटरी श्री.कृ.देवधर हे इंग्लंडला काही कामानिमित्त गेले असताना त्यांनी तिथे भारताविषयी आस्था असलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या सहकार्याने 'लंडन असोसिएशन ऑफ दी पूना सेवासदन' ही संस्था स्थापन केलेली दिसते. त्याचा फायदा म्हणजे हिंदुस्थानात नर्सिंगच्या शिक्षणात उत्कृष्ट ठरलेल्या सेवासदनच्या नर्सेसना ह्या संस्थेमार्फत लंडन हॉस्पिटलात प्रशिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध झाली.

१९१७ मध्ये सेवासदनाला मदत म्हणून गंधर्व नाटक मंडळींनीही एक धर्मार्थ प्रयोग केल्याचे दिसते.त्या काळी नाट्यप्रयोगांना स्त्रियांची बसण्याची व्यवस्था माडीवर एका बाजूला असे.पण ह्या प्रयोगाला सर्व स्त्री-पुरुष एकत्र व सरमिसळ बसले होते. आणि विशेष म्हणजे गर्दी असूनही कुठेही गोंधळ वा अपप्रकार घडलेला दिसत नाही.

रमाबाई व त्यांची संस्था ह्यांच्याविषयी समाजमनात असलेला आदर व दबदबा अशा प्रसंगांतून दिसून येतो.

शिक्षणाचा संबंध बौद्धिक क्षमतांच्या विकासाबरोबरच व्यावहारिक कार्यकौशल्याशी पण आहे,ह्याची जाण रमाबाईंनी दाखवलेली दिसते.त्यांचे चरित्रकार लिहितात- "सेवासदनचे प्रथमपासून धोरण होते, की आपल्या निरनिराळ्या खात्यांत शिक्षण पूर्ण केलेल्या स्त्रियांना संस्थेत नेमायचे आणि जबाबदारीने काम करण्याचा अनुभव द्यावयाचा."[३१]

ह्याचा प्रत्यक्ष पुरावा आपल्याला रमाबाईंच्या 'आमच्या आयुष्यातील आठवणी' ह्या पुस्तकाच्या छपाईच्या निमित्ताने पाहावयास मिळतो.पुस्तकाच्या प्रस्तावनेत श्री.गोपाळ कृष्ण देवधर लिहितात- "दुसरी मौजेची गोष्ट अशी,की एका सर्वमान्य विदुषीने लिहिलेले पुस्तक त्याच विदुषीचा अत्यंत निकट संबंध असलेल्या 'सेवासदन' संस्थेने काढलेल्या 'महिला विजय' छापखान्यात कंपोज झालेले असून,तेही ह्या कलेत शिक्षण घेतलेल्या स्त्रियांनीच कंपोज केलेले आहे."

पं.रमाबाईंनी केडगाव येथे काढलेल्या व स्त्रियांनीच चालवलेल्या छापखान्याचे इथे स्मरण होते.

साक्षरता, व्यवसायशिक्षण मनोविकास ह्याचबरोबर मोकळ्या मैदानातील स्त्रियांच्या

खेळालापण रमाबाईंनी त्या काळातही प्रोत्साहन दिलेले दिसते. श्री. विद्वांस लिहितात- "१९२० मध्ये पुण्यात स्त्रियांचे खेळ घेण्याचा उपक्रमही श्री रमाबाईंनी केलेला दिसतो. त्या काळात ही गोष्ट अतिशय अभिनव स्वरूपाची असल्याने, अशा स्पर्धा होणार आहेत, ही बातमी सविस्तरपणे टाईम्समध्ये छापून आलेली असावी.... पुण्याच्या डेक्कन जिमखान्यावर या स्पर्धा होणार होत्या. टवाळ बघ्यांना टाळण्यासाठी डेक्कन जिमखान्याभोवती कनाती लावलेल्या पाहिल्याचे श्री. विद्वांस सांगतात. 'सर्व जाती-धर्माच्या भारतीय स्त्रिया व युरोपियन स्त्रियांमध्ये घ्यावयाच्या या स्पर्धांसाठी एकूण चौदा मैदानी व चाळीस बैठे खेळ निश्चित झाले,' असे टाईम्सने छापले आहे. प्रत्यक्षात स्पर्धा झाल्याचे वृत्त मात्र मला कुठे पाहावयास मिळालेले नाही.[३२] पण स्पर्धा झाल्याचे बी. डी. देवघरांसारखे जुने लोक सांगतात."

१९२५ मध्ये सेवासदनाच्या सर्व शाखांत मिळून एक हजारांवर विद्यार्थिनी विविध वर्गांतून मोफत शिक्षण घेत होत्या, असे चरित्रावरून दिसते. फक्त गायन-वादनाच्या वर्गाला थोडीशी फी घेण्यात येई. सेवासदनातून उत्तीर्ण झालेल्या नसस, मिडवाईफ, सब असिस्टंट सर्जन, एल.सी.पी.एस. शिक्षिका, औद्योगिक शिक्षिका महाराष्ट्रात जवळच्या बेळगाव, हुबळीपर्यंत नोकरीनिमित्त पसरलेल्या दिसतात.[३३]

ह्या वेळापर्यंत रमाबाई आणि सेवासदन ही नावे जवळ जवळ एकरूप झालेली दिसतात. सेवासदनाचा वटवृक्ष जो विस्तारलेला व विसावा देणारा झाला त्या मागची चैतन्यशक्ती रमाबाईच होत्या, हे अनेकांनी अनेक प्रसंगी व्यक्त केलेले दिसते. काशीबाई कानिटकर त्यांच्या उमाकांतलिखित चरित्राच्या प्रस्तावनेत म्हणतात -

"सेवासदनाची मूळ कल्पना जरी दुसऱ्याची असली तरी पुणे शाखा वाढविण्याचे, तिला अनेक अंगाने सजविण्याचे व तिच्या प्रीत्यर्थ शारीरिक, मानसिक व सांपत्तिक झीज सोसण्याचे बिकट काम वहिनीबाईंकडे आले, म्हणून ती एवढ्या नावारूपाला चढली. सेवासदनाच्या योगे आज अनेक गरीब, निराश्रित स्त्रियांना अब्रूने अन्न-वस्त्र मिळते आहे.... जनतेचा डोळा सदा वक्रच असतो. त्या वस्तुस्थितीला सोडून पुणे सेवासदन नव्हते. त्याचेवरही अनेक कुतर्क होते. पण वहिनीबाईंचा खंबीर आधार त्या संस्थेला होता. त्याच्यावर येणाऱ्या माऱ्यास तोंड देण्यास त्यांनी आपला ढालीसारखा उपयोग करून घेतला, सर्वांची मैत्री संपादन करून, विरुद्ध असेल त्यांची भावना प्रेमाने नाहीशी करत होत्या. रावसाहेब रानडे होते तोपर्यंत बाहेरगावाहून आलेल्या मंडळींना नवीन कल्पना, नवीन बातमी, नवीन शिक्षण, नव्या ओळखी करून घेण्याचे ठिकाण रानड्यांचे घर होते. तसेच त्यांच्यानंतर स्त्रियांना तरी सेवासदन हे ठिकाण होते. वहिनीबाई गरीब, श्रीमंत, मध्यम असा भेदाभेद न मानता प्रत्येकाला प्रेमाने, अगत्याने व जिव्हाळ्याने भेटत !"[३४]

काशीबाईंनी आपल्या आत्मचरित्रात सेवासदन नामक एक प्रकरण लिहिले आहे, त्यावरून 'सेवासदनाचा' मूळ उद्देश हा ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना कायदा, आरोग्य वगैरे बाबतींत मदत करणे हा होता, असे दिसते. पण त्या लिहितात-- "आमच्या हातून हे काही झाले नाही. खेडेगावात तर काहीच झाले नाही."

'एकोणिसाव्या शतकातील बहुसंख्य सुधारणावादी चळवळी ह्या शहरी मध्यमवर्गापुरत्या सीमित राहिल्या,' ह्या डॉ. आंबेडकरांच्या आरोपाचाच थोडासा दाखला इथे मिळतो.

तरीदेखील आपले संस्कार व आपल्या मर्यादा ओळखून रमाबाईंनी जे कार्य केले, - काशीबाई म्हणतात तद्वत - "आपला मोठेपणा बाजूला ठेवून सेवासदनाचे काम केले,[३५] स्त्रियांना विकासाच्या अनेक वाटा उघडून दिल्या, विधवांना आत्मसन्मानाने जगणे मिळवून दिले, गृहिणींना घराची दारे उघडून बाहेरच्या विशाल समाजजीवनात सहभागी होण्याची सवय पाडली -" ते काम एकोणिसाव्या शतकातील स्त्री-जीवनाच्या पार्श्वभूमीवर चमकून दिसते.

मूळ आराखड्यातील ग्रामीण जनतेची सेवा रमाबाईंनी फारशी केली नसली तरी इतर समाजसेवा व राष्ट्रसेवा, विशेषतः त्याबद्दलची बांधिलकीची जाणीव स्त्रियांच्या मनात जागी करण्याचे मोठे काम केलेले दिसते. ही समाज व राष्ट्रसेवा पुढील प्रकरणात पाहू !

इथे ७ मार्च १९१४ रोजी रमाबाईंनी जॉन मेमोरिअल हॉलमध्ये जे व्याख्यान दिले त्यातले वाक्य आठवते. त्या म्हणाल्या - "१९०४ मध्ये महिला परिषदेतील व्याख्यानात ज्या गोष्टी आम्हा पोक्त बायकांच्या हातून घडाव्या अशी नुसती इच्छा प्रदर्शित केली होती, त्या आज मूर्त रूपाने अस्तित्वात आल्या आहेत.... याशिवाय गेल्या नऊ वर्षांत ज्या उणीवा आम्हांला भासत आहेत त्या संस्थेच्याद्वारे भरून काढण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहो !"[३६]

असे म्हणतात, की महाराष्ट्राला रमाबाई आज ज्या आदरणीय वाटत आहेत त्या सेवासदनच्या द्वारे त्यांनी आपल्या कर्तृत्वाची ओळख महाराष्ट्रास करून दिली म्हणून ! त्यापूर्वीचे त्यांचे जीवन न्यायमूर्तींच्या सावलीसारखे होते.

अर्थात रमाबाईंचे व सेवासदनाचे कौतुक अनेकांना वाटत असले तरी त्याकडे संशयाने व तुच्छतेने पाहाणारी मंडळीही पुण्यात होती असे दिसते. श्री: उमाकांत रमाबाईंच्या चरित्रात लिहितात -

"प्रत्येक चळवळीकडे राजकीय दृष्टिकोनाने पाहायची सवय महाराष्ट्राला लागल्यामुळे स्वतंत्रपणे सामाजिक दृष्टीने समाजसेवा करणाऱ्यांना महाराष्ट्रात बहुजनसमाजाचा पाठिंबा हवा तेवढा लाभत नाही. रमाबाईंनी आपल्या पतीच्या दृष्टिकोणाप्रमाणे सामाजिक व शैक्षणिक कार्याला स्वतःला वाहून घेतलेले दिसते. तथापि, मूळच्या त्या नेमस्त पक्षाशी निगडित असल्याने त्यांच्या सेवासदनाच्या स्त्री-शिक्षण कार्याकडेही तत्कालीन कांही पुणेकर वाकड्या नजरेने बघत. नेमस्त पक्षाच्या राजकीय मतांशी संबंध टाळून (पुनर्विवाह-नवधर्ममत) कर्त्यांनी आपली स्त्री-शिक्षण चळवळ चालवली. म्हणून त्यांना मध्यमवर्गाची सहानुभूती लाभली."[३७] अशा लोकांकडे दुर्लक्ष करण्याची वृत्ती न्यायमूर्तींच्या सहवासातून रमाबाईंनी उचलली असावी. त्यामुळे असल्या टीकेचा परिणाम त्यांच्या कार्यावर झालेला दिसत नाही.

केसरीकारांनी रमाबाईंच्या कार्याचे कधीच कौतुक केलेले दिसत नाही. "रमाबाईंनी चालवलेल्या विविध चळवळींविषयी ज्ञानप्रबोध, सुबोधपत्रिका यांमध्ये वेळोवेळी मजकूर प्रसिद्ध होई. परंतु केसरी मात्र त्या बातम्या छापत नसे. असे त्यांचे चरित्रकार विद्वांस

म्हणतात !"[३८]

पुढे ते सांगतात - "टिळक सेवासदन बघायला कधीही आले नाहीत किंवा रमाबाईंनीही त्यांना बोलावले नाही."

उलट टिळकांच्या मृत्यूनंतर स्त्रियांतर्फे जी दुखवट्याची सभा पुण्यात झाली त्याचे अध्यक्षस्थान रमाबाईंनी स्वीकारलेले दिसते. ह्या सभेविषयी, त्या काळच्या एक प्रख्यात विदुषी व समाजकार्यकर्त्या डॉ. कमलाबाई देशपांडे असे सांगतात - "सभेत अनेक स्त्रिया भरभरून बोलत होत्या. सभा फार लांबेल म्हणून ह्या स्त्रियांना 'कमी बोलायला सांगा' अशी कोणीतरी रमाबाईंना सूचना केली. तेव्हा रमाबाई म्हणाल्या, की नेहमी स्त्रियांना पुढे या व बोला म्हणून धीर देता देता पुरेवाट होते. आज अंतरीच्या जिव्हाळ्याने मनापासून त्या बोलत आहेत. तेव्हा त्यांना बोलू द्यावे. सभा लांबली तरी हरकत नाही."[३९]

विद्वांस लिहितात - "टिळक न्यायमूर्तींवर यथेच्छ टीका करत असत. पण त्यांचे देशप्रेम व कर्तृत्व लक्षात घेऊन न्यायमूर्तींनी त्यांच्या टीकेबद्दल कधीच राग मानला नाही."[४०] हीच मोठ्या मनाची भूमिका इथे रमाबाईंची दिसते.

सेवासदनाद्वारे रमाबाईंनी प्रथम पुण्यात व मग महाराष्ट्रात जे स्त्री-शिक्षणाचे, स्वावलंबनाचे, स्त्री-जीवन विकासाचे बीज पेरले, त्यामुळे ह्या संस्थेला महाराष्ट्रातच नव्हे, तर भारतात एक आदरणीय व अनुकरणीय असे स्थान प्राप्त झालेले दिसते.

मुंबईचे एकेकाळचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन (१९३४) म्हणतात "I know of no organization, in the Bombay Presidency that can be compared with Sevasadan, for the work it is doing. And I have heard that there is no other society like it in the whole of India."

न्यायमूर्तींच्या मागे स्वतंत्रपणे विकसित होत गेलेले रमाबाईंचे व्यक्तिमत्व व कर्तृत्व आपण पाहिले. इथे लक्ष्मीबाई टिळकांनी आपल्या 'स्मृतिचित्रां'त पतीच्या निधनानंतर काढलेले उद्गार आठवतात. त्या लिहितात - "टिळकांच्या अस्थी पेटीत जाताच माझे अस्तित्व जाणवू लागले."[४१] रमाबाईंचे असेच घडलेले दिसते. न्यायमूर्ती गेले आणि त्यांचे अस्तित्व प्रभावीपणे प्रगट होत गेले. किंबहुना अनेक भारतीय स्त्रियांच्या बाबतीत असेच घडताना दिसते. तशात पती जर आदरणीय असेल तर त्या आपले स्वतंत्र अस्तित्व शोधू इच्छितच नाहीत का ? कोण जाणे ! पण वैधव्यानंतर उमलत गेलेल्या भारतीय स्त्रिया अनेकदा दिसतात.

रमाबाई त्यांपैकीच एक !

* *

संदर्भ सूची

१ श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस,पृष्ठ१२

२, ३.कित्ता: पृष्ठ १२३

४. कित्ता पृष्ठ १२४

५ ,६.कित्ता: पृष्ठ १२५

७. कित्ता : पृष्ठ १२३

८. कित्ता: पृष्ठ १२९

९. कित्ता: पृष्ठ १२९ , १३०

१०. कित्ता: पृष्ठ १३०

११. कित्ता: पृष्ठ १३१

१२ ,१३.कित्ता: पृष्ठ १३१

१४. ज्ञानप्रकाश,१ ऑक्टोबर १९१२

१५. ज्ञानप्रकाश, २१ फेब्रुवारी १९१२

१६. श्रीमती रमाबाई रानडे: मा.श्री.विद्वांस,पृष्ठ १३३

१७. कित्ता: पृष्ठ १५२

१८ ,१९.कित्ता: पृष्ठ १७८

२०. कित्ता: पृष्ठ १७८, २५ सप्टेंबर व २७ सप्टेंबर १९१२ च्या ज्ञानप्रकाशात ह्या फेअरचे सविस्तर वर्णन आले आहे.

२१. ज्ञानप्रकाश, २७ सप्टेंबर १९१२

२२. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस,पृष्ठ १८०

२३. कित्ता: पृष्ठ १७८

२४. केसरी, ऑक्टोबर १९१२

२५. 'गांगेयी' ह्या टोपणनावाने लिहिणाऱ्या बाई काशीबाई कानिटकर असाव्यात

का ? कारण त्या काळी इतक्या परखडपणे लिहिणारी लेखिका त्याच दिसतात. ह्या दृष्टीने शोध घेता घेता त्यांच्या सावत्र आईचे माहेरचे नाव गंगूबाई असे होते हे कळले. सख्ख्या आईपेक्षा हीच मोठी आई सर्व मुलांचे बघत असे. तेव्हा तिच्यावरून 'गांगेयी' नाव काशीबाईंनी घेतले का ?

२६. अशा फॅन्सीफेअर सेवासदनने पुन्हा आयोजित केलेल्या दिसत नाहीत. पुणेकरांच्या कुत्सित टीकेचा परिणाम म्हणायचा का ? का केसरीत आलेल्या ह्या पत्रातील सल्ला रमाबाईंना योग्य वाटला ? पत्रकर्ता लिहितो- "एखादा मार्ग स्त्रियांच्या संबंधाने समाजाची शिष्टाचाराची जी कल्पना आहे तिच्याशी विसंगत आहे असे लोकमत असल्यास त्या मार्गापासून सेवासदन यापुढे तरी परावृत्त होईल अशी आशा आहे." सुधारकाला समाजमनाची कुंपणे नाही म्हटले तरी सर्वार्थाने तोडता येत नाहीत, हेच खरे.

२७. आठवणी : इंदिराबाई देवधर अनुराधा : जानेवारी १९६२ :

२८. १९-२-१९१२ च्या टाईम्समध्ये रमाबाईंनी पाठवलेले एक पत्र छापले आहे. त्यात त्या संपादकांना उद्देशून लिहितात - "स्त्रियांचे मेडिकल कॉलेज हवे म्हणून तुम्ही तुमच्या पत्रातून जोरदार आवाहन केले आहात. आपल्या प्रांतात असे कॉलेज झाल्यास संपूर्ण भारतात ते एकमेव ठरेल. सेवासदन गावदेवी रोडवर संस्था बांधतेय. तिथे आम्ही विद्यार्थिनींची राहायची सोय करू. बोर्डिंग, स्कॉलरशिप इ. देऊ." त्यानंतर २३-२-१९१६ च्या ज्ञानप्रकाशात असिस्टंट सर्जन प. वा. शिखरे यांचे पत्र आले आहे. त्यांत त्यांनी या सेवासदनाच्या हॉस्टेलची माहिती दिलेली आहे.

२९. श्रीमती रमाबाई रानडे : मा. श्री. विद्वांस, पृष्ठ १४२

३०. ज्ञानप्रकाश, १८ ऑक्टोबर १९१७

३१. श्रीमती रमाबाई रानडे : मा. श्री. विद्वांस, पृष्ठ १५१

३२. कित्ता: पृष्ठ १८७

३३. कित्ता: पृष्ठ १५०

३४. रमाबाई रानडे : उमाकांत, प्रस्तावना

३५. काशीबाई कानिटकर, आत्मचरित्र व चरित्र : सरोजिनी वैद्य पृष्ठ १७७, १७८, १७९

३६. श्रीमती रमाबाई रानडे : मा. श्री. विद्वांस, पृष्ठ १३९

३७. रमाबाई रानडे : उमाकांत, पृष्ठ ११४

३८. श्रीमती रमाबाई रानडे : मा. श्री. विद्वांस - पृष्ठ २९०

३९. आठवणी : डॉ. कमलाबाई देशपांडे, अनुराधा, जानेवारी १९६२,

४०. श्रीमती रमाबाई रानडे : मा. श्री. विद्वांस, पृष्ठ २९०

४१. स्मृतिचित्रे : भाग ३रा, पृष्ठ १२१

प्रकरण ७ वे

सामाजिक व राजकीय जाणिवा

'सेवासदन' ही संस्था उभी करून तिच्याद्वारे स्त्रियांच्या विकासासाठी रमाबाईंनी काय काय धडपड केली ती आपण आतापर्यंत पाहिली. मात्र हे करताना स्त्री-जीवनापलीकडील व्यापक सामाजिक व राजकीय घडामोडींपासून त्या सर्वस्वी अलिप्त राहिलेल्या दिसत नाहीत.

स्त्री-सुधारणा हे व्यापक समाजसुधारणेचे एक साधन, त्या मानत होत्या, हे आपण पाहिलेच आहे. त्यामुळे इतर अनेक सामाजिक आपत्तीच्या वेळी त्या आपल्या सहकाऱ्यांसह प्रतिकारास सिद्ध झालेल्या दिसतात.

१९११ साली साळुंब्रे गावी गंगाधर कुलकर्णी यांच्या घरच्या रामनवमी उत्सवातील नाटकाचे वेळी फार मोठी आग लागली. त्या वेळी जखमींना प्रथमोपचार व साहाय्य देण्यात सेवासदनातील दोन कार्यकर्त्या, सेक्रेटरी देवधरांच्या जोडीने तत्काळ गेलेल्या दिसतात. रमाबाई त्या वेळी रिलीफ डिस्ट्रिब्यूशन कमिटीच्या उपाध्यक्षा होत्या. त्यांनी ह्या आगीत विधवा व निराश्रित झालेल्या स्त्रिया व मुलींच्या शिक्षणाचे काम वाडिया ट्रस्टच्या मदतीने पार पाडलेले दिसते.[१]

१९१२ गुजराथ व काठेवाडमध्ये पडलेल्या दुष्काळातही रमाबाई आपल्या सहकारी स्त्रिया घेऊन तिकडे मदतकार्यासाठी गेलेल्या दिसतात. श्री. विद्वांस लिहितात - "तेथे त्यांनी दहा-बारा दिवस फिरून, चोवीस खेड्यांतील रजपूत वगैरे पडदानशीन जातींतील, कनिष्ठ तसेच इभ्रतदार वर्गांतील दुष्काळग्रस्त स्त्रियांच्या घरोघरी जाऊन त्यांना सेंट्रल रिलीफ फंड, वाडिया चॅरिटीजतर्फे धान्याची व पैशाची मदत वाटली. पुढे ह्या रीतीने श्रीमती जानकीबाई भट सेविकांसह पंचमहलमध्ये आणि सौ. काशीबाई कानिटकर नगर जिल्ह्यात साहाय्यार्थ गेल्या."[२]

२० वर्षांपूर्वी पं. रमाबाईंनी वैयक्तिक पातळीवर हेच काम केले होते. तेच काम आता रमाबाई संस्थेच्या द्वारे करू लागलेल्या दिसतात. अर्थात दोघींच्या त्या मागच्या प्रेरणांचे रंग

थोडे भिन्न दिसतात.

रमाबाईंच्या ह्या मानवतावादी कामात पं. रमाबाईंसारख्या धार्मिक प्रेरणेच्या कोणत्याही छटा मिसळलेल्या नव्हत्या, असे दिसते.

७ मार्च १९१४ रोजी जॉन स्मॉल मेमोरियल हॉलमध्ये केलेल्या भाषणात रमाबाईंनी आपली ह्या बाबतची भूमिका स्पष्ट केलेली आहे. त्या म्हणतात --

"मातृप्रेम ही परमेश्वराने स्त्रियांच्या अंगी उत्पन्न केलेली मोठी शक्ती आहे. या शक्तीची वाढ करणे हे समाजोन्नतीच्या दृष्टीने फार अगत्याचे आहे.... मातृप्रेम घरापुरते, म्हणजे फार संकुचित आहे. त्याच्या वाढीवर सर्व तऱ्हेच्या कर्तृत्वाची व दयाधर्माची कामे अवलंबून आहेत. आपलेपणाच्या भावनेची परंपरा देशापर्यंत वाढत गेली तरच आपली बुद्धी उदार होऊन आपल्या हातून खरी उपयुक्त व श्रेयस्कर कामे होतील.... अशा प्रकारच्या मातृप्रेमी भावना वाढविणे हा सेवासदन संस्थेचा मुख्य हेतू आहे."[३]

मातृत्वभावनेच्या विकासाबाबत त्या व्याख्यानातून जे हे सांगत आल्या, ते त्यांनी स्वतः आचरून दाखवलेले दिसते. त्यांच्या उमाकांतलिखित चरित्राला आठवणीवजा प्रस्तावना लिहिताना त्यांच्या सहकारी व त्या काळातील सुप्रसिद्ध लेखिका लक्ष्मीबाई कानिटकर लिहितात-

"पती, पत्नी व मुलें यांच्या संबंधीचे तेवढेच प्रत्येकीचे कर्तव्य आहे..... फार झाले तर परलोक सुखप्राप्तीसाठी पुराणश्रवण व दानधर्म करणे एवढ्यावर मानवी प्राण्याचे कर्तव्य संपत नाही. या अफाट विश्वातील असंख्य जीवांमध्ये आपलाही अंशतः भाग आहे व त्या प्रत्येकास एकमेकांबद्दल कर्तव्य करावे लागते.... अशी समजूत पडण्यास कै. रावसाहेब रानडे व वहिनीबाई रानडे या दांपत्यांचे उदाहरण डोळ्यापुढे ठेवले तर बराच कार्यभाग होईल."[४]

ह्याच देशप्रेमाच्या व देशहिताच्या उदात्त भावनेतून रमाबाईंनी सरकारने नव्याने सुरू केलेल्या 'इंडियन डिफेन्स फोर्स'मधील हिंदी अधिकारी व फौजीभाईंच्या स्वागत व अभिनंदनाचा कार्यक्रम घडवून आणलेला दिसतो.

स्वागताच्या भाषणात त्या म्हणतात - "आय. जी. एफ.मधील आपल्या बंधूंना पाहून येथील स्त्रियांना मनापासून आल्हाद झाला आहे. पोटी आलेल्या मुलांनी मातीच्या गोळ्याप्रमाणे निर्जीव न राहता वीरश्रीची कामें करण्यास तयार व्हावे व आपण वीरमाता व्हावे अशी महत्त्वाकांक्षा या स्त्रियांची आहे."[५]

देशात, आपल्या अवतीभवती घडणाऱ्या घटना व आपत्तींना संवेदनशीलतेने व तप्तरतेने त्या प्रतिसाद देताना दिसतात.

१९१७-१८ त पुण्यात एन्फ्लुएंझाची मोठी साथ आली होती. ससून हॉस्पिटलला पूरक आणखी एक तात्पुरते हॉस्पिटल उघडावे लागले होते. लगेच तिथे 'सेवासदनने' आपल्या नर्सेस मदतीला धाडलेल्या दिसतात. त्याखेरीज इतरत्रही रोग्यांच्या शुश्रुतेस सेवासदनाच्या विद्यार्थिनी व शिक्षकांनी साहाय्य केल्याचे चरित्रात नमूद आहे.

साथीप्रमाणेच यात्रेच्या ठिकाणीपण अतोनात गर्दीमध्ये गरीब स्त्रिया व मुलांचे फार हाल

होतात, हे लक्षात घेऊन आळंदीच्या कार्तिकी एकादशीच्या यात्रेच्या वेळी पूना म्युनिसिपालटीच्या विनंतीवरून रमाबाई स्वतः काही सहकारी स्त्रिया व स्वयंसेविका घेऊन तिथे जाऊन तीन-चार दिवस राहत असत. कडेवर मूल घेऊन दर्शनासाठी रांगेत ताटकळत उभ्या राहणाऱ्या स्त्रियांना पाणी देणे, त्यांची मुले सांभाळणे, त्यांना देवदर्शनाबाबत मदत करणे, त्यांची विचारपूस करणे इत्यादी व्यवस्था बघत असत.[६] सेवासदनाचे हे सेवाकार्य महाराष्ट्रापुरते मर्यादित दिसत नाही.

कुंभमेळ्याच्या वेळी अलाहाबाद आणि हरिद्वार येथे जमलेल्या जत्रेतील इजा झालेल्या यात्रेकरूंच्या सेवेसही सेवासदनच्या सेविकांचे पथक गेले होते.[७]

इथे एक विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे रमाबाई स्वतः जेव्हा अशा मदत कार्यासाठी जात तेव्हा जाण्यायेण्याचा सेविकांचा खर्च एखाद्या ट्रस्टतर्फे होणार असला, तरी त्या आपला खर्च स्वतःच करत, असे दिसते. आपली ऐपत असताना धर्मार्थ फंडाचा पैसा वापरणे, त्यांच्या नैतिक भूमिकेला पटणारे नव्हते, असे दिसते.[८]

अशा तऱ्हेने रमाबाईंचे सेवाकार्य चालू असताना १९१२ मधील मुंबई प्रांतिक महिला परिषदेच्या व्यासपीठावरून केलेल्या भाषणात त्यांनी एक पाऊल आणखी पुढे टाकलेले दिसते.

सुरुवातीस संस्थेचे हित लक्षात घेऊन, ती स्थिर होईपर्यंत रमाबाईंनी पतितांच्या प्रश्नाविषयी आवाज उठवला नव्हता. पण ह्या प्रांतिक परिषदेत अस्पृश्यता-निवारण व पतितांचा उद्धार ह्या राष्ट्रीय गरजांचा ठामपणे त्यांनी पाठपुरावा केलेला दिसतो.[९]

समाजसेवेच्या संकल्पनेचे क्षेत्र अधिक व्यापक करताना त्या म्हणतात, - "सुधारणेची तत्त्वे कृतीत आणण्यासाठी आपण जाति भेदाचे दुराग्रह टाकून कनिष्ठ वर्गासाठी असणारी आपली जबाबदारी उचलली पाहिजे."[१०]

ह्या पद्धतीचे त्यांचे विचार बनत गेल्याने त्या विठ्ठल रामजी शिंदे ह्यांनी स्थापन कलेल्या अस्पृश्यांच्या 'निराश्रित सहाय्यक मंडळात' दर संक्रातीला जाऊन तिळगूळ वाटून दोन वर्गांतील दुराव्याची दरी हळूहळू मिटवण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

विठ्ठल रामजी शिंद्यांनी भरवलेल्या हरिजन संमेलनातही त्या सहभागी झालेल्या दिसतात. त्याबद्दल बोलताना महर्षी शिंदे म्हणतात- "आमच्या देशात स्त्रीवर्ग आणि पुरुषवर्ग यांचा, तसेच उच्चवर्गातील व कनिष्ठ वर्गातील स्त्रियांचा सार्वजनिक कार्यात कधी विशेषसा संबंध येत नाही. परंतु हे दोन्ही अलगपणाचे तट मोडून उच्च-नीच वर्गाच्या स्त्रिया व या चळवळीच्या संबंधाने सहानुभूती बाळगणारे काही पुरुष हे जे आज एकत्र आले आहेत, ते या सभेचे अध्यक्षस्थान श्रीमती रमाबाई साहेब रानडे ह्यांनी अलंकृत केले आहे म्हणूनच होय."[११]

दोन वर्गांतील हे अंतर मिटवून टाकण्याची रमाबाईंची ही तळमळ किती प्रामाणिक असावी ह्याचा आणखी एक पुरावा मिळतो. त्यांचे चरित्रकार सांगतात - "स्वतः रमाबाई बाहेर कधी काही खात नसत. अधूनमधून गार्डन पार्टीला, पडादा पार्टीला त्यांना बोलावणे येई. तिथे त्या एखादे फळ खात. पण विठ्ठल रामजी शिंदे व जनाक्का यांनी दिलेल्या सहभोजनास मात्र

त्या गेल्या होत्या."[१२]

अशा प्रकारे आपल्या भोवती घडणाऱ्या सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्या समरसून सहभाग घेताना दिसतात. त्याचप्रमाणे राजकीय जीवनातील, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय महत्त्वाच्या घडामोडीही त्यांच्या नजरेतून सुटलेल्या दिसत नाहीत. ह्या घडामोडींचे धागे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे स्त्रियांच्या जीवनाशी ही निगडित असल्याने त्या अशा घटनांनापण सक्रीयपणे प्रतिसाद देताना दिसतात्.

ह्याच दृष्टिकोनातून दक्षिण आफ्रिकेत गांधीजींनी जी कामगिरी केली व कस्तुरबांनी त्यांना जी साथ दिली त्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी १९१५ फेबुवारीत रमाबाईंनी त्या दोघांचा सेवासदनात बोलावून सत्कार घडवून आणलेला दिसतो. पुढेपुढे रमाबाईंच्या राजकीय जाणिवा प्रखर होत चाललेल्या दिसतात. त्याच सुमारास सरकारने केनिया कॉलनीतील हिंदी लोकांवर जे अपमानास्पद व अन्याय्य निर्बंध लादलेले होते त्यांची पाहणी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारने पाठविलेल्या डेप्युटेशनचा अहवाल प्रसिद्ध झाला. त्यामुळे हिंदुस्थानात खळबळ उडाली. ब्रिटिश साम्राज्य सरकार या अन्यायाची उपेक्षा करीत असल्याने हिंदुस्थानात ठिकठिकाणी निषेध सभा भरविण्यात आल्या. १९२३ डिसेंबरच्या पुण्याच्या सभेतील भाषणात रमाबाई म्हणाल्या - "जे साम्राज्य सरकार, हिंदी प्रजाजनांना केनिया वसाहतीच्या फायद्यासाठी तेथे जाऊन राहायला भरीस पाडते व स्वार्थी हेतू सिद्धीस गेल्यावर, तेथील हिंदी लोकांवर ब्रिटिश वसाहतवाले जो अन्याय करतात, त्याकडे लक्ष देत नाही त्या सरकारचे आसन डळमळीत होऊ लागले आहे, असे समजावे." ह्याच भाषणात पुढे त्यांनी साम्राज्य सरकारकडून होणाऱ्या अन्यायामुळे, ब्रिटिश मालावर बहिष्कार घालण्याच्या चळवळीस योग्य कारण मिळत आहे, असे आपले मत असल्याचेही स्पष्टपणे सांगितले."[१३]

त्यांच्या राजकीय निर्भीडपणाचा आणखी एक प्रसंग पाहावयास मिळतो.

पहिले जागतिक महायुद्ध चालू असताना १९१८ मध्ये मुंबईस गव्हर्नरांच्या अध्यक्षतेखाली वॉर कॉन्फरन्स भरवण्यास आली होती. हिंदू स्त्रियांच्या प्रतिनिधी म्हणून रमाबाई हजर होत्या. सभेत गव्हर्नर व टिळकांचा खटका उडून टिळक सभागृह सोडून गेले. त्यानंतर भाषण करताना रमाबाई स्पष्टपणे म्हणतात - "राजकर्त्यांसंबंधी प्रजेची कर्तव्ये आहेत तशी प्रजेसंबंधी राजकर्त्यांचीपण आहेत. म्हणून प्रजेने राजनिष्ठेने केलेल्या स्वार्थत्यागाची जाणीव ठेवून प्रजेला न्याय्य हक्क द्यावेत."[१४]

त्यांच्या' राजकीय सजगतेची आणखी एक घटना पहा. फिजी बेटांत त्या काळी मुदतबंदी (Indented Labour) मजुरीची पद्धत सुरू झाली होती. त्याचा बायकांच्या जीवनावर वाईट परिणाम होत होता. त्यांच्या अब्रूसही धोका उत्पन्न झाला. तेव्हा ही अपमानकारक पद्धत बंद व्हावी म्हणून मुंबई येथे सर्व जाती-धर्मांच्या स्त्रियांची प्रचंड सभा फिरोजशहा मेहतांच्या पत्नींच्या अध्यक्षतेखाली भरली होती. त्या सभेतही रमाबाईंनी भाग घेतलेला दिसतो. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या - "मुदतबंदी पद्धतीने काम करणे हे मजुरांच्या नैतिक व सामाजिक अशा दोन्ही दृष्टींनी घातुक असल्याचे प्रसिद्ध असून त्याबद्दलचा निषेध करण्यास आज आपण

जमलो आहोत. ह्या पद्धतीने हिंदी स्त्रियांना अगदीच अवनत दशेस पोहोचविले असून, आता या गोष्टीकडे दुर्लक्ष करणे बिलकुल योग्य होणार नाही. गुलामगिरी आपण नाहीशी केली, असा इंग्लंड मोठा अभिमान बाळगते. परंतु फिजी बेटांत व इतर ब्रिटिश वसाहतींत असलेली मजुरांची स्थिती गुलामगिरीहून भिन्न आहे काय ?"[१५]

त्यांचे चरित्रकार श्री. विद्वांस त्यांच्या ह्या भाषणावर प्रतिक्रिया व्यक्त करताना लिहितात - "रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा आवाका, त्यांच्यातील धैर्य व कळकळ ह्या सर्वांचे निदर्शक असे हे प्रसंग आणि विचार आहेत."[१६]

तथापि, रमाबाईंवर न्यायमूर्तींच्या नेमस्त राजकारणाचा संस्कार होता. त्यामुळे पहिल्या महायुद्धाच्या वेळी म्हणजे १९१७ त ब्रिटिश सरकारने युद्धकर्जाची योजना मांडली होती. तेव्हा रमाबाईंनी २८ एप्रिलला सेवासदनात चालक, सभासद शिक्षिका, सभासद विद्यार्थिनी अशी सर्वांची एक सभा घेऊन, "ज्यांना शक्य असेल त्या सर्वांनी सरकारला कर्ज द्यावे. हे सर्वांचे कर्तव्य आहे," असे मदतीचे आवाहन आपल्या भाषणात केले. इतकेच नव्हे, तर मदतीचे स्वतःतर्फे २००० रुपये व सेवासदनातर्फे १००० रुपये जाहीरही केले. पुढे १९ मेला लेडी विलिंग्डन यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या स्त्रियांच्या सभेतही रमाबाईंनी भाषण करून मदतीला पाठिंबा दिलेला दिसतो. परंतु जिथे राजकर्त्यांचे अन्यायी धोरण दिसून आले तेथे मात्र त्या ठामपणे विरोध करताना दिसतात.

अशा प्रकारे रानड्यांच्या मागे, रमाबाई नकळत राजकीय चळवळींच्या धारेत हळूहळू सामील झालेल्या दिसतात. रमाबाईंच्या उमाकांतलिखित चरित्राला प्रस्तावना लिहिताना काशीबाई कानिटकर म्हणतात - "सामाजिक गोष्टींत जितकी बायकांच्याकडून प्रगती होणे शक्य असेल तितकी करवून घ्यावी. या धोरणाने ते वहिनीबाईंच्याकडून काम करून घेत. राजकीय कामांत बायकांनी अजूनपर्यंत भाग घेण्यासारखी स्थिती आली नाही, तेव्हा त्यात त्यांनी भाग घेऊ नये असे न्या. रानड्यांचे प्रथम मत असावेसे वाटते. म्हणूनच मुंबईस दुसरी राष्ट्रीय सभा झाली त्या वेळी... ब्रॉडला साहेबाच्या सूचनेप्रमाणे पं. रमाबाई स्त्रियांना सभासद करण्याची खटपट करू लागल्या. पण रावसाहेब रानड्यांनी वहिनीबाईंना किंवा पुण्यातील अन्य पुढाऱ्यांच्या बायकांना प्रोत्साहन दिले नाही. पं. रमाबाईंनी खटपट करून सात-आठ स्त्री डेलीगेट मिळविले."[१७]

त्या वेळी रमाबाईंनी पण सभेस जाण्याचा आग्रह धरलेला दिसत नाही. कारण पतीवर रमाबाईंची नितांत श्रद्धा होती, हे आपण पाहिलेच आहे. पण तेव्हा जी वेळ आली नव्हती ती आता आली आहे, असे रमाबाईंच्या विवेक-बुद्धीला वाटलेले दिसते. त्यामुळे त्या राजकीय घडामोडीत स्वतःला उस्फूर्तपणे व हिरिरीने गुंतवताना दिसतात.

ह्या नंतरच्या कालखंडात रमाबाई तीन महत्त्वाच्या आंदोलनांत सहभागी झालेल्या दिसतात. त्यातले एक म्हणजे सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी झालेले आंदोलन.

१९१८ मध्ये कायदे कौन्सिलने एक कायदा पास करून म्युनिसिपालिटींना मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीने व मोफत करण्याचा अधिकार दिला होता.

ह्याच वेळी मुलांबरोबर मुलींना पण मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू करावा, अशी मागणी पुरोगामी वृत्तींच्या पक्षांची होती. जहाल पक्षाचे लोक याला राजी नव्हते. खर्चाच्या सबबीवर सध्या फक्त मुलांसाठी कायदा करावा, असे त्या पक्षाचे म्हणणे होते. मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाचा कायदा आता झाला नाही तर कायमचा लांबणीवर पडेल, हे जाणून सुधारक पक्षांच्या लोकांनी जागोजाग सभा घेऊन आपले ठराव सभेत मंजूर करून घेतलेले दिसतात.

मुलीनाही आताच प्राथमिक शिक्षण मोफत, सक्तीचे झाले पाहिजे, ह्या बाबत रमाबाईंचा प्रथमपासून आग्रह होता. त्यांच्या नेतृत्वाखाली पुणे सेवासदनाने ह्या मताच्या प्रसारासाठी त्या काळात खूप परिश्रम घेतलेले दिसतात. महर्षी कर्व्यांच्या संस्थांनी पण ह्या कामात सेवासदनाच्या जोडीने भाग घेतला असे दिसते. रमाबाईंच्या जोडीने पुण्यातील इतरही अनेक महिलांनी पेठापेठांतून सभा घेऊन हिरिरीने भाषणे केलेली आढळतात. "प्रथम मुलांचे व नंतर मुलींचे अशी चालढकल आम्ही सहन करणार नाही. स्त्रिया आता मागे राहणार नसून पुरुषांच्या पावलांबरोबर पावले टाकीत पुढे येतील. तेव्हा मुलांबरोबर मुलींना पण शिक्षण सक्तीचे करा. कायदा केला, की लोक त्याचे पालन करू लागतात, असे स्त्रियांचे म्हणणे होते असे दिसते.

ज्या दिवशी हा प्रश्न म्युनिसिपल कौन्सिलमध्ये चर्चेसाठी येणार होता, त्या दिवशी म्हणजे १२ फेब्रु. १९२० रोजी, आपल्या मताची तीव्रता दाखवण्यासाठी पुण्यातील पूर्व व पश्चिम भागांतील स्त्रियांनी एक प्रचंड मिरवणूक काढली. तिचे चरित्रात असे वर्णन आहे -

"पश्चिम भागातील स्त्रियांची मिरवणूक सेवासदनपासून निघाली. तिचे नेतृत्व श्रीमती रमाबाई रानडे यांनी केले. आणि पूर्व भागातील मिरवणुकीचे नेतृत्व श्रीमती जनाक्का शिंदे यांनी केले. त्यांची गाठ बुधवारात पडली. काहींनी ह्याला छबिना असे म्हटले आहे. हा छबिना बघण्यास त्या दिवशी रस्त्याच्या दोन्ही बाजूंस हजारो लोक उभे होते."[१८]

सभा सुरू होण्यापूर्वी श्रीमती रमाबाई रानडे ह्यांच्या नेतृत्वाखाली स्त्रियांचे एक डेप्युटेशन म्यु. कौन्सिलच्या अध्यक्षांना भेटले व त्यांच्यापुढे आपली मागणी ठेवली. मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे आश्वासन मिळाल्यावर हे डेप्युटेशन परत गेलेले दिसते.

ह्या मिरवणुकीबद्दल 'सुबोधपत्रिका'कार लिहितात - "मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाविषयी खुद्द स्त्रियांमध्ये किती जागृती झाली आहे, हे स्त्रियांच्या ह्या जंगी मिरवणुकीतील दोन हजार स्त्रियांचा समूह पाहून कळते. कोण तो उत्साह ! दोन हजार स्त्रिया भर रस्त्यामधून पुण्यासारख्या ठिकाणी हातात पताका घेऊन फिरतात. लोकांकडून विडंबना करून घेतात, त्या सर्व केवळ मौजेसाठी काय ? पुण्याच्या स्त्री-शिक्षणाच्या विरोधकांनी हे खूप समजून असावे, की मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांच्या हातून आता निसटला आहे. तो स्त्रियांनी आपल्या हाती घेतला आहे !"[१९]

हा प्रश्न एखाद्या भागापुरता मर्यादित नसून हिंदुस्थानातील सर्वच स्त्रियांच्या उन्नतीशी निगडीत आहे. त्या मागे स्त्री-पुरुष समानतेचे जे मूलभूत तत्त्व अनुस्यूत आहे.... त्याची जाणीव व जागृती हिंदुस्थानातील सर्वच स्त्रियांना होणे उपकारक आहे. हे जाणून रमाबाईंनी ह्या

लढ्याची माहिती निरनिराळ्या शहरांतील स्त्रियांना व्हावी, त्यांनीपण अशा सभा घेऊन ह्या लढ्याला पाठिंबा द्यावा, म्हणून खूप परिश्रम घेतलेले दिसतात.

त्यांचा इतका परिणाम झालेला दिसतो, की त्यानंतर मद्रास, मंगलोर, अलाहाबाद, सुरत, तंजावर अशा वेगवेगळ्या शहरांतून तेथील सुशिक्षित पुरोगामी स्त्रियांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रियांच्या सभा भरून त्यात पाठिंब्याचा ठराव संमत करून तशा आशयाची पत्रे त्यांनी रमाबाईंना पाठवलेली दिसतात. अलाहाबादची सभा पं. जवाहरलाल नेहरूंच्या आई 'स्वरूपराणी' ह्याच्या अध्यक्षतेखाली भरली होती व संमत केलेला ठराव त्यांनी तारेने रमाबाईंना कळवलेला दिसतो.

रमाबाईंच्या ह्या परिश्रमाचे महत्त्व सांगताना त्यांचे चरित्रकार श्री. विद्वांस म्हणतात - "ह्या चळवळीतील महत्त्वाची गोष्ट अशी, की एका स्थानिक प्रश्नाला रमाबाईंनी अखिल भारतीय पातळींवरील प्रश्नाचे अतिशय व्यापक रूप दिले. त्यामुळे त्या अत्यावश्यक चळवळीचे पडसाद साऱ्या देशभर बराच काळ घुमत राहिले."[२०]

रमाबाईंच्या ह्या धडपडीला यश येऊन, मुलामुलींच्या सक्तीच्या शिक्षणाचा मुद्दा तत्त्वतः म्युनिसिपालिटीने मान्य केला. पण हा निर्णय अंमलात आणणे ऐच्छिक असल्याने प्रत्यक्ष शिक्षणाचे काम त्यांनी सुरू केलेले दिसत नाही.

तेव्हा सरकारने सर नारायणराव चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा एक समिती नेमून तिने गावोगावी जाऊन स्त्रियांच्या प्राथमिक शिक्षणाची मागणी, आवश्यकता... व स्वरूप ह्यांचा अंदाज घ्यावा, असे ठरलेले दिसते.

ह्या प्रश्नावर समितीने रमाबाईंना पत्र पाठवून त्यांचे मत कळविण्यास सांगितले. रमाबाईंनीही तत्परतेने आपले निवेदन पाठवलेले दिसते. त्या पुन्हा एकदा आग्रहाने कळविताना दिसतात, की- "सक्तीचे शिक्षण सुरू करायचे असेल तर मुलगे आणि मुली यांना एकदमच सुरू करावे. ह्यासाठी होणाऱ्या खर्चापैकी दोन तृतीयांश रक्कम सरकारने राजवाडे समितीच्या सूचनेप्रमाणे अनुदान म्हणून द्यावी. त्यासाठी कर बसवणे आवश्यक असल्यास इन्कम-टॅक्सचा दर वाढवून, चैनीच्या वस्तूंवर कर बसवून पैसा उपलब्ध करून द्यावा.... अशा काही महत्त्वाच्या सूचना केलेल्या दिसतात."[२१]

दुर्दैवाने तो काळ आर्थिकदृष्ट्या मंदीचा असल्याने समितीच्या शिफारसीनुसार कायद्याचा मसुदा कौन्सिलने संमत करूनही प्रत्यक्ष अंमलात येऊ शकलेला दिसत नाही. पण स्त्रियांची जागृती, संघटित शक्ती व आत्मविश्वास ह्या प्रश्नाच्या निमित्ताने दृढ झालेला दिसतो.

रमाबाईंनी सहभाग घेतलेले दुसरे आंदोलन म्हणजे 'स्त्रियांच्या मताधिकारासाठी आंदोलन' हे होय.

पहिल्या महायुद्धात हिंदी जनतेने दिलेल्या सहकार्याला प्रतिसाद म्हणून, ब्रिटिश सरकारने, हिंदुस्थानला काही राजकीय हक्क देण्याचे आश्वासन दिले होते. त्यांत लोकनियुक्त प्रतिनिधींची जबाबदार राज्यपद्धती टप्याटप्याने सुरू करण्याचे आश्वासन होते. ह्या सुधारणांचा स्त्रियांनाही लाभ व्हावा, म्हणून संघटित प्रयत्न करण्याचे त्या काळच्या स्त्री-नेत्यांनी ठरवलेले

दिसते. श्रीमती ॲनी बेझंट ह्यांच्या थिआसॉफिकल सोसायटीत सहकारी म्हणून मद्रासला येऊन राहिलेल्या व हिंदी स्त्रियांच्या चळवळीशी एकरूप झालेल्या श्रीमती मागरिट कझिन्स ह्यांच्या पुढाकाराने स्त्रियांनी मद्रासला 'विमेन्स इंडियन असोसिएशन' नावाची संस्था स्थापन केली होती, असे दिसते. तिच्यातर्फे अखिल भारतीय स्त्री-शिष्टमंडळाने आपली मागणी व निवेदन सरकारी प्रतिनिधींना सादर केले. त्यातील मागणीचा मसुदा असा होता - "राजकीय सुधारणांमध्ये मताधिकारासंबंधी योजना करताना स्त्रियांना नागरिक म्हणून मान्यता द्यावी. कायद्यामधील शब्दरचना अशी करावी, की स्त्रियांना त्यात अपात्र धरण्यात येऊ नये. त्यांना पुरुषांप्रमाणे प्रतिनिधित्वाची संधी असावी."

कायदा व राज्यपद्धतीत प्रथमपासूनच स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह ह्या स्त्रियांनी धरलेला दिसतो.

रमाबाई स्वतः ह्या सभेसाठी मद्रासला जाऊ शकल्या नाहीत. पण त्यांनी व इतर काही स्त्रियांनी तारा पाठवून आपण ह्या निवेदनात सहभागी असल्याचे जाहीर केलेले चरित्रावरून दिसते.

ह्या निवेदनात मुलींना सक्तीचे प्राथमिक शिक्षण, स्त्रियांची ट्रेनिंग कॉलेज, मेडिकल कॉलेज, हॉस्पिटलमध्ये स्त्रियांच्या नर्सिंगची सोय इत्यादी इतरही मागण्या केलेल्या दिसतात.

दुर्दैवाने ह्या सरकारी प्रतिनिधींनी स्त्रियांच्या निवेदनाकडे पूर्ण दुर्लक्ष केलेले त्यांच्या अहवालातून दिसते.

तथापि, ह्यानंतरही कमिट्या नेमणे, लोकमताचा अंदाज घेणे व चोहोकडच्या स्त्रियांनी एकमताने केलेल्या मताधिकार मागणीला डावलणे, असा प्रकार काही काळ चाललेला दिसतो. शेवटी मुंबई इलाख्यातील स्त्री मताधिकाराच्या चलवळीच्या कामासाठी वीस प्रमुख स्त्रियांची, रमाबाई रानड्यांच्या अधिकाराखाली.... एक कमिटी नेमण्यात आली व तिच्यातर्फे दोन स्त्रियांना इंग्लंडमध्ये काम करणाऱ्या कमिटीपुढे प्रत्यक्ष साक्ष देण्यासाठी पाठविण्यात आलेले दिसते. ह्या स्त्रियांनी तसेच सरोजिनी नायडू व ॲनी बेझंट ह्यांनी आपली निवेदने सादर केली व प्रभावी भाषणे केली. काही पुरोगामी सुधारणावादी पुरुषांनी आपली शिष्टमंडळे पाठविली. काहींनी स्त्री-मताधिकाराचा पुरस्कार करणाऱ्या तारा पाठवल्या. रमाबाई रानड्यांनी व इतर काही स्त्रियांनी 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया' साप्ताहिकात पत्रे प्रसिद्ध करून जोरदार प्रचार केलेला दिसतो.

परिणाम म्हणून इंग्लंडमधील जॉईंट कमिटीने स्त्रियांच्या मताधिकाराचा प्रश्न सोडविण्याचे काम हिंदुस्थानातील विभिन्न धर्मीय पुरुषांवर व प्रांतिक सरकारांवर सोपवलेले दिसते.

१९२१ मध्ये ह्या प्रांतिक सरकारची कायदे कौन्सिले प्रथम अस्तित्वात आल्यावर मद्रास येथील कौन्सिलने स्त्री-मताधिकाराचा ठराव सर्वांत प्रथम संमत केलेला दिसतो. स्त्रियांना स्वत्वाचा विकास करण्यास सगळीकडे संधी द्यावी, असे मत बहुसंख्य सभासदांनी व्यक्त केलेले दिसते. मुंबई इलाख्यासारख्या विविध प्रकारच्या विपुल स्त्री-संघटना नसूनही ह्या

इलाख्यातील स्त्रियांचा मागरिट कझिन्स यांनी आपल्या 'विमेन्स इंडियन असोसिएशन'तर्फे केलेल्या सातत्याच्या प्रचाराला यश येऊन विजय झालेला दिसतो.

ह्या नंतर मग पाच महिन्यांनी मुंबई कायदे कौन्सिलात बरीच भवति न भवति होऊन Sex disqualification रद्द करण्याचा हा कायदा १९२१ जुलै अखेर संमत झालेला दिसतो.

मुंबई कायदे कौन्सिलात (२७ जुलै १९२१ रोजी) जेव्हा हा ठराव प्रथम मांडण्यात आला तेव्हा त्यावर जी उलटसुलट मते सभासदांनी व्यक्त केली ती फार गमतीदार आहेत. केवळ भारतीयच नव्हे तर पाश्चात्य पुरुषही स्त्रियांकडे किती पारंपरिक दृष्टीने पाहत होते ह्याचे त्यातून दर्शन घडते.

नामदार हेवर्ड, खानबहादुर मुट्टो, मि. राथामिल्ड, सी. एम. बेकर, जहांगिर पेटिट, इत्यादी लोकांनी 'स्त्रियांचे क्षेत्र संसार हे असून राजकारण हे क्षेत्र त्यांच्या नैसर्गिक गुणांचा लोप करणारे आहे,' अशा आशयाची मते व्यक्त करून ठरावाच्या विरुद्ध मते दिलेली दिसतात. तर ना. र. पु. परांजपे, सी. एम. गांधी. आर. एम. नीलकंठ, नौरोसजी डुमासिया, गुलाम हुसेन हिदायतुल्ला, ह्यांनी न्याय व प्रगतीच्या मार्गात येणाऱ्या परंपरा नष्ट व्हाव्यात व स्त्रियांना कायदे जर समान आहेत तर हक्क पण समान द्यावेत, असे मत व्यक्त केलेले दिसते.

शेवटी एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर एच. एस. लॉरेन्स ह्यांनी स्त्रियांची बाजू मांडणारे प्रभावी भाषण करून विरोधकांचे मुद्दे तर्कशुद्धपणे खोडून काढलेले दिसतात. 'युरोपातील आर्थिक स्थित्यंतर हिंदुस्थानातही येणार आहे. तेव्हा वरच्या वर्गातील स्त्रियांना जीवनसंघर्षासाठी सिद्ध होण्यास आपण अवसर दिला पाहिजे,' असे मत त्यांनी व्यक्त केलेले आढळते. त्यांच्या भाषणातील रमाबाईसंबंधी केलेला उल्लेख इथे खास नोंदवावासा वाटतो. आपल्या भाषणाच्या शेवटी ते म्हणतात -

"ह्या कौन्सिलात केव्हा तरी स्त्रियांचा सभासद म्हणून प्रवेश होईल ह्या घटनेची काही वक्त्यांना चिंता व भीती वाटत आहे. पण मला त्यांत काही भीतिप्रद वाटत नाही. मला जर स्त्रियांपैकी कोणत्या एकाच नावाचा उल्लेख करावयाचा झाला, तर मी म्हणेन जगात असे विधीमंडळ असू शकेल, की ज्याला ह्या शहरात सुप्रसिद्ध असलेल्या श्रीमती रमाबाई रानडे यांचे सभासदत्व बहुमानास्पद वाटणार नाही? त्यांची सल्लामसलत हितावह होणार नाही?"[२२]

न्यायमूर्तीच्या मागे वीस वर्षांत केलेल्या कार्याने रमाबाईंची राजकीय वर्तुळातही कोणती प्रतिमा व स्थान उभे झाले होते, ह्याची कल्पना वरील भाषणावरून सहज करता येते. एच. एस. लॉरेन्स ह्यांच्या रमाबाईविषयीच्या उद्गारांतून व्यक्त होणारा आणखी एक अर्थ इथे लक्षात घेण्यासारखा आहे.

ठरावाला विरोध करणाऱ्या बहुतेक सभासदांनी, समाजाला आदर्श वाटणारी स्त्री शालीन, मितभाषिणी व आपल्या संसारात सम्राज्ञी म्हणून वावरणारी असते, असे मत मांडले आहे. स्त्रियांना असे अधिकार देण्याने सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक जीवनांत उलथापालथ होईल, असे भय काहींनी व्यक्त केले आहे. राजकारणात गुंतल्याने घराकडे दुर्लक्ष होईल, अशी शंका

काहींना वाटते, तर सीता, द्रौपदीचे आदर्श काहींना टिकवावेसे वाटतात. स्त्रिया जुलमी प्रतिबंधाचे समर्थनच करतात. जुन्या चाली सोडायला तयार नसतात. तेव्हा त्यांना मताधिकार देण्याने....समाजसुधारणा होणार कशी ? असा काहींचा प्रश्न आहे. व्यासपीठावरून भाषण देणारी म्हणजे प्रसिद्धीची हाव धरणारी, प्रस्थापित तत्त्वांना व परंपरांना विरोध करणारी स्त्री समाजाला आदरणीय वाटणार नाही, असेपण मत व्यक्त झालेले दिसते.

रमाबाईंचे उदाहरण देण्याने वरील बहुतेक आक्षेप किती निराधार आहेत हे सोदाहरण स्पष्ट होईल असे लॉरेन्स यांना वाटले असावे. संसार आणि समाजकारण, राजकारण, शालीनता आणि तडफदारपणा, संस्कारसंपन्नता आणि नवीनता ह्या सर्वांचा सुवर्णमध्य गाठता येतो, असे त्यांना रमाबाईंच्या उदाहरणातून सुचवायचे असावे. प्रस्ताव मांडणाऱ्या हरिलाल देसाईंनी ह्या चर्चेत मांडलेला एक मुद्दा इथे आवर्जून नोंदवावासा वाटतो. विरोधकांना उत्तर देताना शेवटी ते म्हणतात - "वयाने अज्ञानी, वेडे किंवा तशा तऱ्हेची अपात्रता असणाऱ्यांना मताधिकारास अपात्र धरण्यात येते. सुबुद्ध स्त्रियांना मताधिकारास अपात्र ठरवणे योग्य आहे का ? स्त्रियांना निर्जीव वस्तूप्रमाणे मानणे हा धर्म आहे, असे मानण्यात येत असेल, तर अशा धर्माच्या जागी लोकसत्तेचे तत्त्व आणि स्त्री-पुरुषांच्या हक्काची समानता ह्याची स्थापना होणे जरूर आहे."[२३]

स्त्री-मताधिकार हक्काच्या निमित्ताने, स्त्री-मुक्ती चळवळीच्या मागच्या प्रमुख तत्त्वांची व विचारधारेची नकळत मांडणी होऊन गेलेली दिसते.

चर्चा ऐकताना, स्त्रियांची बाजू पुरुषांना मांडावी लागते हे पाहून, मागरिट कझिन्स म्हणतात - "सभागृहात उभ्या राहून आमची बाजू मांडण्याचा हक्क आम्हांला नसावा, याचा आम्हांला उद्वेग वाटला." ह्यातील स्त्रियांना झालेली स्वत्वाची जाणीवही लक्षणीय वाटते.

अशा तऱ्हेच्या अनेक वाद-प्रतिवादांनंतर ठरावावर मतदान झाले. मागरिट कझिन्स म्हणतात - "शेवटच्या क्षणापर्यंत आम्ही सभासदांना भेटून प्रचार केला होता."[२४] शेवटी मतदान होऊन बहुमताने एकदाचा ठराव संमत झाला.

ह्या प्रसंगाचे एवढ्या विस्ताराने वर्णन करण्याचे कारण म्हणजे यातून स्त्रियांनी आपल्या राजकीय हक्कासाठी दिलेला निर्धारपूर्वक लढा. पुरुषवर्गाची मानसिकता, पारंपरिक मूल्यांचे मानवी मनावर असणारे दडपण, परिवर्तनाविषयी वाटणारे अनामिक भय, तर काही पुरुषांची उदारमनस्कता ह्या सर्वांचे यात दर्शन घडते. त्याचबरोबर, आधुनिक जीवनातील राजकारणाच्या वाढत्या महत्त्वाची व सामर्थ्याची रमाबाईंना झालेली जाणीवही लक्षात येते. ती झाल्यामुळे त्या ह्या संग्रामात जिद्दीने घडपडलेल्या दिसतात. ह्या विजयात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. ह्याचा पुरावा श्री. विद्वांसांच्या पुढील विधानात मिळतो.

ते सांगतात - "कौन्सिलचे काम संपल्याबरोबर प्रमुख सभासद श्रीमती रमाबाई रानड्यांना भेटून त्यांचे अभिनंदन करण्यासाठी गर्दीने त्यांच्या समोर आले, कारण स्त्री-मताधिकाराच्या ठरावाचा विजय रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाशी निगडीत होता."[२५] ते पुढे म्हणतात -"मुंबई इलाख्यातील ह्या काळातील स्त्री-मताधिकारासाठी झालेल्या आंदोलनाच्या आधारस्तंभ श्रीमती रमाबाई रानडे ह्या होत्या, असे मिसेस कझिन्सनी ह्या चळवळीचा परामर्श घेताना

निःसंदिग्धपणे लिहिलेले आहे.रमाबाई वुइमेन्स इंडियन असोसिएशनच्या पुणे शाखेच्या जशा अध्यक्षा होत्या, तशाच वुइमेन्स फ्रान्काईज कमिटीच्याही अध्यक्षा होत्या. त्यांनी या काळात प्रचाराची गती आणि दृढता विलक्षण वाढवली. त्यांनी जागोजागी स्त्रियांच्या सभा घेऊन मताधिकाराची आकांक्षा सर्व भागातील स्त्रियांना आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला."

ह्याही चळवळीत रमाबाईंनी भिन्नधर्मीय व भिन्नभाषिक स्त्रियांच्या सभा घडवून त्यांनाही समाविष्ट करून घेतलेले दिसते.सर्वांत प्रचंड सभा रमाबाईंच्या अध्यक्षतेखाली सेवासदनाच्या आवारातच भरली होती.श्री विद्वांस म्हणतात त्यानुसार,'या सभेला ८०० स्त्रिया व कौन्सिलचे अनेक सभासद उपस्थित होते.' मुंबई पुणे, सुरत येथेही रमाबाईंच्या मार्गदर्शनाखाली अशाच सभा भरून स्त्रियांच्या एकमुखी मागण्यांचे दर्शन घडवलेले दिसते.

मात्र रमाबाई ह्या मताधिकाराशीच थांबलेल्या दिसत नाहीत.ह्या विजयानंतर दोन वर्षांतच नॅशनल लिबरल फेडरेशनच्या अधिवेशनाच्या वेळी त्यांनी निःसंदिग्ध शब्दांत स्त्रियांच्या प्रतिनिधित्वाचीही मागणी केलेली दिसते.त्यातील पुढील वाक्ये लक्षणीय वाटतात -

"Women do not prepare any longer to content themselves with the second place in life, which men have assigned to them. They are determined to come to the front, to take part in the various movements of the country, not merely social but political also, for the betterment of their country."

पुढे त्या आपल्या ठरावात म्हणतात-- "प्रांतिक तसेच केन्द्रीय कायदे कौन्सिलच्या सभासदत्वाचा व मतदानाचा हक्क स्त्रियांना देण्याची वेळ आता आलेली आहे," असे ह्या सभेचे मत आहे.

ह्या त्यांच्या भाषणावर त्यांचे चरित्रकार श्री.विद्वांस लिहितात- "या ठरावाच्या भाषेतील श्री. रमाबाईंची ज्वलंत मनोवृत्ती जाणून घेताना, येथवरची त्यांची वाटचाल सूक्ष्मपणे न्याहाळणाऱ्या वाचकाला विस्मय वाटल्याखेरीज राहणार नाही. स्वतःच्या सामाजिक जीवनातील अनुभवातून अद्ययावत जगाच्या उंबरठ्यावरच त्या येऊन उभ्या ठाकल्या आहेत."[२६]

* *

संदर्भ सूची

१. ज्ञानप्रकाश : ११-४-१९११ व १४-४-१९११
२. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस, पृष्ठ १३२ व सेवासदन ३रा वार्षिक अहवाल
३. कित्ता : पृष्ठ १३९-१४०
४. रमाबाई रानडे, उमाकांत : प्रस्तावना : पृष्ठ १३
५. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस, पृष्ठ १४६
६. पायानियर विमेन ऑफ इंडिया : प.सेनगुप्ता, पृष्ठ ४०
७. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस, पृष्ठ १५१
८. रमाबाई रानडे : उमाकांत, पृष्ठ ११७
९. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस, पृष्ठ १८८
१०. कित्ता : पृष्ठ १३७
११. ज्ञानप्रकाश : पृष्ठ ९ ऑक्टोबर १९१२
१२. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस, पृष्ठ २७२
१३. श्रीमती रमाबाई रानडे, व्यक्ति आणि कार्य : मा.श्री.विद्वांस, आठवणी पुरवणी, पृष्ठ २५
१४. कित्ता : पृष्ठ २४
१५,१६. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस, पृष्ठ १९०
१७. श्रीमती काशीबाई कानिटकर : आत्मचरित्र आणि चरित्र : सरोजिनी वैद्य, पृष्ठ १६
१८. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस, पृष्ठ २४६
१९. सुबोध पत्रिका : २४-२-१९२०
२०. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस, पृष्ठ २५०
२१. कित्ता : पृष्ठ २४९

२२. कित्ता : पृष्ठ २६१
२३. कित्ता : पृष्ठ २६२
२४. कित्ता : पृष्ठ २६३
२५. कित्ता : पृष्ठ २६३
२६. कित्ता : पृष्ठ २६४

प्रकरण ८ वे

रमाबाईंची शब्दसृष्टी

"महाराष्ट्राला रमाबाई आज ज्या आदरणीय वाटत आहेत त्या 'आठवणीं'सारखे अलौकिक पुस्तक त्यांनी लिहिले व सेवासदनाच्या द्वारे आपल्या कर्तृत्वाची ओळख महाराष्ट्रास करून दिली म्हणून !"

'सुबोधपत्रिके'चे संपादक द्वा.गो.वैद्य ह्यांचे हे विधान रमाबाईंच्या जीवनातील कर्तृत्वाची दोन प्रमुख शिखरे दाखवतात असे वाटते.

ह्यापैकी एक शिंखर- त्यांचे समाजकार्य- ते आपण आतापर्यंत बरेच तपशीलवार न्याहाळले. आता थोडा त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा आढावा घेऊ.

रमाबाईंचे अजरामर वाङ्मयीन कर्तृत्व म्हणजे त्यांचे आठवणींचे पुस्तक 'आमच्या आयुष्यातील आठवणी'. त्या एकाच पुस्तकाने त्यांना मराठी सारस्वताच्या दरबारात मानाने प्रवेश मिळाला आहे असे म्हणता येईल. ज्या काळात वाचन आजच्या इतके सार्वत्रिक झाले नव्हते, त्या काळात ह्या पुस्तकाने सात आवृत्या निघण्याचा अपूर्व मान मिळवला आहे.

हे पुस्तक लिहिण्यामागच्या हेतूविषयी प्रस्तावनेत गोपाळ कृष्ण गोखले म्हणतात– "पतिनिधनाने झालेल्या दुःखात अंतःकरणाचे सांत्वन करण्यासाठी व जो श्रेष्ठतम सहवास आता प्रत्यक्ष राहिला नाही त्याचा मानसिक रीतीने अनुभव घेण्यासाठी ...." आपल्या लोकोत्तर पतीच्या साधुतुल्य वैयक्तिक व कौटुंबिक जीवनाचे चित्र त्या रेखाटत गेल्या. त्यात आपले चित्र शक्यतो आणावयाचे नाही, असा त्यांचा हेतू असावा असे दिसते. कारण आपल्या 'आठवणीं'च्या पुस्तकात एके ठिकाणी त्या म्हणतात–

"मी माझ्या संबंधाने फारशी हकीगत लिहू नये म्हणून आरंभापासून हा विचार मनात ठेवून चालले आहे. पण चमत्कार असा, की संसारात बायकोचा संबंध अगदी सावलीसारखा असल्यामुळे तो टाळता येत नाही. म्हणून 'स्वतःची' गोष्ट अगर मनःस्थिती नीट समजण्याकरताच जेथे माझा संबंध आहे तेथे मात्र चालतच नाही, म्हणून पुढे ठेवीत आहे."[१]

पण गंमत अशी दिसते, की या आठवणींतून न्यायमूर्तींचे लोकवंद्य, उदात्त मन जसे दिसते, त्याचबरोबर रमाबाईंची उत्कट पतिनिष्ठा, निर्मळ व समजूतदार मन, आत्मविलोपी वृत्ती, अहंकारविरहितता, शक्यतो कुणाविषयी कटुता न बाळगण्याची दिलदार वृत्ती– थोडक्यात एक सुजाण सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व वाचकांच्या डोळ्यासमोर उभे होते.

ह्या पुस्तकाचे इंग्रजी व गुजराथीत अनुवाद झाले असून, रवीन्द्रनाथांचे भाऊ सत्येन्द्रनाथ यांनी बंगालीत अनुवाद केला आहे.[२]

ह्या पुस्तकाचा आणखीही एक विशेष, प्रस्तावनेत श्री. गोखल्यांनी नमूद केला आहे. ते म्हणतात– "पत्नीने आपल्या पतीबद्दल अशा तऱ्हेने लिहिलेला हा हिंदुस्थानातील पहिलाच ग्रंथ आहे असे वाटते !"

ज्या काळात पतिपत्नींनी एकमेकांविषयी चार लोकांत कौतुकाने काही बोलणे अवमानदर्शक ठरले जात असे, त्या काळात रमाबाईंनी आपल्या पतीच्या घरगुती आठवणी, त्यांचा मोठेपणा, परस्परांतील प्रेमभाव सहजपणे लोकांपुढे ठेवला आणि तरीही कुणालाही त्याबद्दल यःकिंचित् नावे ठेवण्यास जागा दिलेली दिसत नाही. त्यांची आठवणी लिहिण्याची पद्धतही पूर्णतः स्वतंत्र व देशी आहे असे वाटते.

पतीविषयी अनुपमेय भक्ती व सात्त्विक प्रेम, निवेदनातला प्राजंळपणा, घरगुती, अकृत्रिम पण प्रासादपूर्ण भाषाशैली ह्या गुणांमुळे हे पुस्तक मराठी वाचकाच्या हृदयाला जाऊन भिडलेले दिसते.

आजही ते मराठीतील उत्कृष्ट आत्मकथनांपैकी एक मानले जाते. शाळा-कॉलेजांत वाङ्मयाच्या अभ्यासाला म्हणून नेमले जाते. त्यावर अनेक कौतुकपूर्ण परीक्षणे लिहिली गेली आहेत.

ह्यात रमाबाईंनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे खूप जिवंत, मार्मिक व बारकाव्यांमुळे नेमकेपणाने उतरली आहेत. ह्याचे वानगीदाखल एक-दोन नमुने पाहू. मुलासारखा वाढविलेला पुतण्या नानू व पुतणी शांता यांची रमाबाईंनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे पाहा. एकदा त्या माथेरानला मुलांना घेऊन गेल्या होत्या. त्याबद्दल लिहिताना म्हणतात–

"चि. नानू पाच- सहा वर्षांचा लहान व सखूला आता अकरा वर्षे पुरी झाली होती .... ती फार बुद्धिमान व हुशार आहे. तशीच शहाणी, देखणी आणि मर्यादशील आहे, अशी स्वतः तिची वाखाणणी करावयाची असे. तिच्या गरीब स्वभावाबद्दल जेव्हा तेव्हा कैवार घ्यावयाचा. चि. नानूचा स्वभाव हूड, धीट, तापट, पण पक्का निश्चयी व अभिमानी असून तो बुद्धीने चलाख असल्यामुळे त्याला चवथ्या वर्षापासूनच लिहिता-वाचता येऊ लागले .... आपले ते सर्व दुसऱ्यापेक्षा चांगले आहे, अशी त्याची लहानपणापासून समजूत व महत्त्वाकांक्षा असे. दुसऱ्या मुलांची चांगली व नवी वस्तू असली व आपली खरोखरच जुनी व वाईट असली तरी तो चिडावयाचा नाही. उलट आपले चांगले व तुझे वाईट म्हणून दुसऱ्या मुलांना चिडवून खूप हसावयाचा."

आपल्या शांता ह्या पुतणीविषयी त्या लिहितात– "ती अतिशय बोलकी व खेळकर होती, तिचे बोलणे लाडिक व नाजूक असून स्वभाव मोहक, मनमिळावू व गोड असे- ही जात्या फार नकली असे. तिला एकदा विचारले, की अमूक माणूस कसा बोलतो, चालतो ते दाखीव, की झाली सुरवात– मग बजाबापासून सासूबाईपर्यंत सगळ्यांच्या नकला हुबेहूब करून 'स्वतः'ला व आम्हा सर्वांना खूप हसायला लावायची."[३]

भाषाशैलीच्या दृष्टीने 'आठवणी' हे अगदी सरळ साधे असले तरी अधूनमधून मार्मिक उपमा देण्याचे कौशल्यही लक्ष वेधून घेणारे वाटते, त्याचा एक नमुना पाहा. न्यायमूर्तींची बदली बाहेरगावी झाली तरी उन्हाळ्याची सुट्टी लागली (कोर्टाला) की ते आवर्जून आतुरतेने पुण्यास येत. पुण्यातील तरुण कार्यकर्ती मंडळी, न्यायमूर्तींच्या आगमनाची आतुरतेने वाटच पाहत असत. ह्याबद्दल रमाबाई लिहितात–

"मे महिन्याची सुट्टी म्हणजे सर्व ग्रॅज्युएट मंडळींना तो दिवाळीपेक्षा सणाचा व उत्साहाचा महिना आहे, असे वाटे. कारण त्या वेळच्या जुन्या व नव्या मंडळींमध्ये परस्परांबद्दल प्रेम व आदरबुद्धी जास्त वसत असे. त्यांनी आपले धुरीणत्व पूर्ण विश्वासाने एकाच हाती दिले होते. त्या खंबीर व सामर्थ्यवान हाताने आपल्यावरील भार व जबाबदारी पूर्ण ओळखून पुण्याची जीर्ण झालेली नौका कित्येक वर्षे सुनियंत्रितपणे चालवली. वसंत ऋतूच्या आरंभी जुन्या व नव्या सर्व लतावृक्षांना पालवी फुटते व नवे अंकूर येतात. त्याप्रमाणे ह्या वसंत ऋतूमध्ये मंडळींना नवे सुचलेले विचार एकत्र करून सुव्यवस्थितपणे जोडून व गुंतवून उपयुक्त कामाकडे लावायचे कुशल माळ्याचे काम 'स्वतः'कडे असायचे."[४]

न्यायमूर्तींच्या शेवटच्या आजारात स्वतःच्या मनाची झालेली करुण स्थिती, रमाबाईंनी इतकी हृदयस्पर्शी वर्णिली आहे, की त्यांचे चरित्रकार उमाकान्त म्हणतात– "हे वर्णन चांगले, की 'पण लक्षात कोण घेतो' ह्या हरी नारायण आपट्यांच्या प्रख्यात कादंबरीतील नायिकेचे– यमूचे, पतिनिधनानंतर केलेले वर्णन अधिक चांगले, असा भ्रम पडावा, इतके हे वर्णन सरस उतरले आहे."[५]

पतीविषयी अनुपमेय भक्ती व सात्त्विक प्रेम, निवेदनातला प्रांजळपणा, घरगुती, अकृत्रिम पण प्रसादपूर्ण भाषाशैली, जिवंत व्यक्तिचित्रे, मध्यमवर्गीय बाळबोध मराठी कुटुंबाचे वास्तव दर्शन इ. गुणांमुळे हे पुस्तक मराठी वाचकांच्या हृदयाला जाऊन भिडलेले दिसते. ह्या पुस्तकाविषयी 'टाईम्स'मध्ये प्रदीर्घ लेख लिहिताना शेवटी न्या. नारायणराव चंदावरकर म्हणतात– "हा आठवणींचा पुष्पगुच्छ म्हणजे 'लव्हज् लास्टिंग मेमोरियल' आहे." (१५.५.१९१०)

रमाबाईंचे दुसरे वाङ्मयीन कार्य म्हणजे, न्यायमूर्तींच्या धर्मपर व्याख्यानांचे संपादन करून ते पुस्तकरूपाने महाराष्ट्राला उपलब्ध करून देणे. ह्या पुस्तकाचे प्रार्थना समाजाचे तत्त्वज्ञान व सिद्धांत समजण्याच्या दृष्टीने अभ्यासकाला असणारे महत्त्व आपण मागे पाहिलेच आहे. ह्या पुस्तकाला रमाबाईंनी लिहिलेली प्रस्तावनापण, त्यांच्या सरळ, शुद्ध व प्रसादपूर्ण

शैलीची साक्ष देणारी आहे. श्री विद्वांस त्याबद्दल लिहितात– "ह्या पुस्तकाला रमाबाईंनी लिहिलेल्या प्रस्तावनेने सहृदय वाचकाचे हृदय हलवून सोडते. श्री. गणेश जनार्दन आगाशे यांनी मुंबई ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिकोत्सवामध्ये या लहानशा प्रस्तावनेचा अतिशय गौरवाने उल्लेख केला आहे."[६]

रानड्यांच्या उपासनेचा स्वतःवरील प्रभाव त्या 'आठवणींत अतिशय संवेदनशीलतेने टिपताना दिसतात. त्या लिहितात– "उपासना ऐकत असताना किंवा तेथून परतल्यावर सुद्धा, त्या प्रेमळ पण मनावर पूर्णपणे संस्कार करणाऱ्या शब्दांनी जागृत झालेले धर्मविचार पुढे एकसारखे मनात घोळत राहत व आपल्याला आज काही जास्त अधिकार प्राप्त झाला आहे, आपली योग्यता जास्त झाली आहे, असे वाटून आनंद होई. 'धर्माचे साध्य happiness नसून blessedness आहे."

तसा अनुग्रह (blessedness) झाल्याचा अनुभव रमाबाईंना येत होता असे दिसते. न्यायमूर्तींच्या उपासनेविषयीची रमाबाईंची प्रतिक्रिया किती सार्थ आहे. हे त्या काळातील एक विद्वान संशोधक लेखक श्री द्वा. गो. वैद्य ह्यांच्या उद्‌गारावरून सिद्ध होते. ते लिहितात– "सव्वा-सव्वा तास उद्‌बोधन व प्रार्थना व सव्वा तास व्याख्यान ऐकूनही शेवटी– अरेरे, आणखी पुढे नाही ? असे वाटे. कितीही चिंतेने माणूस व्यग्र असला तरी माधवरावांची ती प्रेमळ प्रार्थना ऐकून- चिंता नाहीशी होत असे !"[७]

ह्या उपक्रमाचा उद्देश सांगताना प्रस्तावनेत त्या म्हणतात– "ती प्रेमळ, शांत, गंभीर वाणी ऐकण्याचे भाग्य आता राहिले नाही. तरीपण माझ्या हृदयस्थ असलेल्या मूर्तीच्या मुखातून निघालेल्या अमृतवाणीचा आश्रय केला तर ह्या दुःखातही समाधानाला जागा होईल व मनाला स्थैर्य व शांती येण्याला ती प्रसादवाणीच कारणीभूत होईल असा मला पूर्ण भरवसा वाटतो."

अत्यंत व्याकूळ मनाने रमाबाई प्रस्तावना लिहीत आहेत, हे वाचकांना जाणवते. तरीपण रानड्यांच्या संस्काराने आलेली प्रगल्भता व स्थिरचित्रतापण त्यातून डोकावते. पण विशेष म्हणजे अशा लिखाणातही भाषेचा उपजत डौल व संपन्नता वाचकाला जाणवल्याखेरीज राहणार नाही, असे वाटते. पुढे त्यांनी न्यायमूर्तींच्या भाषणांना दिलेली नंदादीपाची व आपल्या ह्या संपादनाच्या कृतीला दिलेली वात सरसावण्याची उपमा आशय, भावना व प्रसंगगांभीर्य या सर्वार्थाने समर्पक वाटते. श्री विद्वांस म्हणतात– "हे वाक्य वाचीत असताना ज्याचे हृदय आल्हादरसाने आर्द्र होत नाही, असा वाचक विरळा !"[८]

रमाबाईंचे तिसरे मोठे वाङ्‌मयीन कार्य म्हणजे श्री. न. र. फाटकांसारख्या अधिकारी लेखकाला पूर्ण सहकार्य व प्रोत्साहन देऊन न्यायमूर्तींसारख्या अतुल राष्ट्रपुरुषाचे समग्र व साक्षेपी चरित्र लिहवून घेणे.

त्यावेळी रमाबाई शेवटच्या आजारातल्या व्याधींनी ग्रस्त होत्या. तरीपण इहलोक सोडण्यापूर्वी हे आत्यंतिक महत्त्वाचे पण काही कारणांनी राहून गेलेले काम पूर्ण व्हावे, ही त्यांची तळमळ होती. श्री.न.र.फाटक आपल्या चरित्राच्या प्रस्तावनेत सांगतात– "संकल्पिलेले

चरित्र माझ्या डोळ्यादेखत होईल ना ? असा प्रश्न त्या सतत विचारत.त्यांच्या ह्या टोचणीमुळे हे चरित्र जलद लिहून झाले."

चरित्र लिहून झाल्यावर ते रमाबाईंना दाखवण्यात आले.श्री.विद्वांस म्हणतात– "आईची प्रकृती नीट नव्हतीच,पण दृढ निश्चय आणि मनाची प्रबल इच्छा म्हणून आईंनी प्रथम फाटक यांच्याकडून व नंतर रा.नागेश शास्त्री यांच्याकडून ते पुस्तक तीनच दिवसांत वाचून पुरे करून घेतले."[९]

लेखन चालू असताना,तब्येत ठीक नसतानाही त्या आपल्याकडून होईल ते सहकार्य देत होत्या,असे न.र.फाटक कृतज्ञतापूर्वक चरित्राच्या प्रस्तावनेत नमूद करतात.

ह्या पुस्तकाला पण रमाबाईंनी लिहिलेली आशीर्वादपर प्रस्तावना फार लक्षणीय वाटते. चरित्रपर लेखनप्रकारातील धोके,पाळावयाची पथ्ये यांचे अतिशय मार्मिक विवेचन करून त्यांनी फाटकांच्या लेखनाचे संयमित कौतुक केलेले आढळते. त्या लिहितात– "चरित्र लिहिण्याचे कार्य सोपे नाही. ज्या व्यक्तीचे चरित्र लिहायचे, तिने आपल्या हयातीत जी कामगिरी केली असेल,त्या कामगिरीच्या पाठीशी जे हेतू असतील.... या सर्वांची माहिती यथातथ्य यावयास पाहिजे .... ही माहिती सांगत असताना ती कोठेही कंटाळवाणी होऊ न देण्याची खबरदारी घेतल्यामुळे मनोरंजकपणात कोठेही खळ पडल्याचे आढळून येत नाही. पुष्कळदा चटकदारपणा आणण्याच्या भरात चरित्रलेखक, आपली माहिती विश्वसनीय व साधार असावयास पाहिजे,ही महत्त्वाची गोष्ट विसरतात.ही गोष्ट रा.फाटक यांनी डोळ्याआड केली नसल्यामुळे विश्वसनीयता व चटकदारपणा ह्या दोन्ही गुणांचे योग्य मिश्रण झाले आहे." चरित्र पूर्ण झाल्याचा आनंद व्यक्त करताना त्या म्हणतात– "निराश झालेल्या मनुष्याला केवळ ईशकृपेमुळे,बहुत वर्ष इच्छिलेली गोष्ट मिळाल्याने जसा अनुपमेय आनंद होतो तसा मला हे चरित्र पाहून होत आहे."

रमाबाईंनी आणखी एका पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे.ते म्हणजे कवी गिरीशांचे खंडकाव्य 'अभागी कमला' हे होय. रमाबाईंना तत्कालीन विधवेच्या दुर्दशेबाबत किती अनुकंपा वाटत असे हे आपण पाहिलेच आहे. त्यांनी स्वतः विधवेला असणाऱ्या निष्ठूर निर्बंधाचा अनुभव पंढरपूरच्या देवळात घेतलेला होता. त्यामुळे ह्या प्रस्तावनेत विधवांच्या करुण दशेचे वर्णन करून त्या म्हणतात– "ह्या काव्याच्या वाचनाने भगिनींची दुःखे निवारण्यास जिवापलीकडे झटणारे अरविंदांसारखे (नायक) तरुण वीर जन्मास येवोत ! आणि हिंदू स्त्रियांचा दर्जा वाढून विधवांची दया येण्यासारखी स्थिती पालटो."

पतिपत्नी संबंधांबाबत मात्र त्यांची स्वतःची खास अशी भूमिका दिसते.अभागी कमलचे अरविंदावरचे प्रेम पूर्णपणे निशुद्ध होते का ? अशी शंका त्यांच्या मनात येते व तसे नसल्यास ते त्यांना आवडणारे नसावे म्हणून त्या लिहितात– "कमलची तिच्या पतीवरील निष्ठा,प्रेम व भक्ती ही जास्त स्पष्टपणे व्यक्त व्हायला पाहिजे होती."

'पतिनिष्ठा' हे रमाबाईंच्या लेखी अनिवार्य मूल्य होते. त्यांची स्वतःची पतिभक्ती

आत्यंतिक दृढ असल्यामुळे, स्त्री-पुरुष नात्यातली तरलता, गूढता, अनिवार्य गुंतागुंत त्यांच्या पतिपरायण मनाला रुचलेली नसावी असे दिसते.

त्या काव्यात गिरीशांनी विधवा कमला गजरा माळत होती, असे वर्णन केले होते. हिंदू विधवा, निदान त्या काळी, गजरे घालणे शक्य नव्हते. रमाबाईंनी ती चूक तात्काळ गिरीशांच्या नजरेस आणून दिली व मग त्यांनी त्यातील माळणे ऐवजी ओघळणे असा कल्पनाबदल केला, असे चरित्रकार श्री. विद्वांस सांगतात.[१०]

ह्या सर्वच प्रस्तावनांतून त्यांची वाङ्मयीन जाणकारी व सामाजिक भान लक्षात येते.

इथे रमाबाईंची नेमक्या उपमा वापरणारी अल्पाक्षरी शैलीची काही वाक्ये स्मरतात. म्हातारपणाने विकल झालेल्या डॉ. भांडारकरांना भेटून परतताना, श्री. विद्वांस सांगतात– "बाहेर पडल्यावर रमाबाई म्हणाल्या, भीष्म शरपंजरी पडले आहेत."[११] ना. गोखल्यांनी सरकारने देऊ केलेला 'सर' किताब नाकारला तेव्हा त्यांचे अभिनंदन करताना रमाबाईंनी म्हटले– "सरकारने तुम्हांला देऊ केलेला मुकुट तुम्ही खाली ठेवलात हे योग्यच केलेत !"[१२]

दोन्ही वाक्यांत रमाबाईंच्या मनातील सगळा भाव-संदर्भ चपखलपणे उतरला आहे.

त्यांच्या ह्या साहित्यविषयक जाणकारीमुळे व शैक्षणिक अनुभवामुळे शिक्षणखात्याच्या टेक्स्ट बुक कमिटीवर त्यांची नेमणूक झाली असावी. ह्याबाबत 'पायोनिअर वुमेन ऑफ इंडिया' ह्या आपल्या पुस्तकात प्रसिद्ध समाजसेविका व लेखिका पद्मिनी सेनगुप्ता लिहितात–"Apart from her social work, Ramabai Ranade had literary inclinations and was on several text book committees, besides writing her recollections, which are considered as a Marathi Classic to-day."[१३]

प्रायमरी व सेकंडरीची मराठी व इंग्रजी पुस्तके वाचून त्यांची परीक्षणे व अभिप्राय (Review) शिक्षणसमितीकडे पाठवावा लागत असे. स्वतंत्ररीत्याही पुस्तकांची परीक्षणे त्या लिहीत असत, असे दिसते. हरिभाऊंच्या 'पण लक्षात कोण घेतो' ह्या पुस्तकावर अभिप्राय लिहिताना त्या म्हणतात– "ही गोष्ट वाचून तर ती आपल्या लहानपणातील गोष्ट काही फेरबदल करून लिहिली आहे, असे वाटल्यावाचून राहात नाही."[१४]

हरिभाऊंचे वास्तववादी लेखनाचे सामर्थ्य, रमाबाईंनी इथे टिपलेले दिसते.

न्यायमूर्ती असताना, दक्षिणा प्राईज कमिटीकडून परीक्षणासाठी त्यांच्याकडे पुस्तके येत असत. त्याबद्दल काशीबाई कानिटकर सांगतात– "ही सर्व पुस्तके वहिनीबाईनाच वाचून दाखवावी लागत व त्यावरचा अभिप्राय रावसाहेब सांगतील तसा लिहावा लागे. ही अशी कामे रावसाहेब त्यांच्याकडून करून घेत म्हणून त्या बहुश्रुत व कोणत्याही कामात वाकबगार झाल्या."[१५]

रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक वाङ्मयीन आविष्कार म्हणजे त्यांनी आपल्या लेकीला पाठवलेली पत्रे. १९०४ ते १९०६ च्या दरम्यान त्यांनी सखूताईंना पाठवलेली पत्रे आज त्यांचे नातू माधवराव विद्वांस ह्यांचेजवळ उपलब्ध आहेत. त्यातून रमाबाईंच्या घरातले

सुखवस्तू, सुसंस्कृत व प्रेमळ वातावरण जाणवते. पत्रातून अनेकदा भाषणांचे उल्लेख, निसर्गवर्णने, समाजकार्याविषयी कळकळ व्यक्त करणारे उतारे आढळतात. कौटुंबिक जिव्हाळा, सौजन्य, तारतम्य यांचेही दर्शन घडते व या सर्वांतून एक अतिशय सुसंस्कृत व समतोल, संवेदनशील प्रेमळ व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उभे राहते. माय-लेक, सासू-जावई ह्यांच्यातील हृद्य नातेपण उलगडत जाते. पत्रे कौटुंबिक असली, तरी त्यात पुण्यातील सामाजिक घडामोडींचे तपशीलपण अनेकदा असतात. कुटुंबाच्या चार भिंतीबाहेरच्या जगातील घडामोडी त्यांना तितक्याच जिव्हाळ्याच्या व महत्त्वाच्या वाटत होत्या, असे दिसते. ४-१०-१९०५ च्या पत्रात गोखल्यांचे मंडईच्या कोपऱ्यावर भाषण झाले. त्याचे वर्णन लिहिताना त्या म्हणतात– "सभेच्या वेळी गॅलरीत उभी राहून दुर्बिणीतून पाहत होते, म्हणून ऐकता आले नाही. पण सर्व पाहता आले."

लहानसेच वाक्य पण रमाबाईंची मानसिकता त्यातून आविष्कृत होते. पतिनिधनाच्या दुःखामुळे अद्याप सार्वजनिक जीवनात मिसळण्याला त्यांचे मन घेत नव्हते. पण त्याच वेळी त्यांचे नवसंस्कारित मन महत्त्वाच्या घडामोडींपासून अलिप्तही राहू शकत नव्हते, असे दिसते.

आणखी इथे दोन-तीन नमुने वानगीदाखल पाहा. १४-२-१९०६ ला सखूताईंना लिहिलेल्या पत्रात त्या म्हणतात– "सौ. काकूंकडे जातेस ते नीट चालले आहे ना? समुद्राकाठची वस्ती असल्याने भरती लवकर येते तशी ओहोटीचीही भीती आहेच!" किंवा २३-७-१९०७ च्या पत्रात सखूताईला त्या कळवतात– "पुरोहितकाकू बुवांच्या नादी लागल्या आहेत. तो मनुष्य फार ढोंगी असून धूर्त व कावेबाज असावा असे, सर्व गोष्टी ऐकल्या त्यावरून स्पष्ट होते. म्हणून सत्यभामाबाईंना समजावून सांगितले. पण त्याचा नाद काही कमी होत नाही. मोहात सापडल्यासारखे दिसते. यावर वन्सं हसून म्हणाल्या, बुवांच्या नादाने का होईना त्या जुन्या तऱ्हेत आल्या, म्हणजे तुमच्या पक्षाची चांगलीच फजिती झाली."

एवढ्याशा पत्रात भाबड्या, अंधश्रद्धाळू सत्यभामाबाई, सुजाण रमाबाई नि परंपराभिमानी वन्सं अशा तीन व्यक्तिरेखा चटकन उभ्या केलेल्या दिसतात.

रमाबाईंना स्वतंत्रपणे लेखन करण्यास सवड नसली तरी आपल्या कार्याच्या निमित्ताने त्यांना जागोजागी भाषणे द्यावी लागत. वृत्तपत्रातून लेखही लिहावे लागत. त्यांचे इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांवर प्रभुत्त्व होते, असे त्यांचे चरित्रकार सांगतात[१६] व त्याचा प्रत्यय ह्या भाषणातून येतो. त्यांपैकी वैचारिक निबंधाच्या जवळ जाणारी त्यांची काही भाषणे पाहू.

निराश्रित सहाय्यकारी मंडळाच्या; महाराष्ट्र परिषदेस जोडून स्त्रियांची एक सभा लष्करातील शाळेत भरली होती. तिथले रमाबाईंचे भाषण, स्वतंत्र विचार करणे व मांडणे ह्या दोन्ही दृष्टीने बघण्यासारखे आहे. त्या म्हणतात– "पुराणे न कळता वाचत राहिले तरी निव्वळ पाठांतराने पुढे त्यांचा उलगडा होत जातो. तद्वत निकृष्ट वर्गातील स्त्रियांना पण अशा सभांमध्ये प्रथम काही कळले नाही तरी अंगवळणी पडल्यावर पुढे हळूहळू समजत जाईल.... या लोकांच्या मार्गात अस्पृश्यतेची जी मुख्य अडचण आहे ती माझ्या मते स्वच्छपणाच्या

सवयीमुळे दूर होईल. कारण स्पर्श केल्याने विटाळ होतो, ही कल्पना या वर्गाची राहणी अस्वच्छतेची, धंदा अस्वच्छतेचा, त्यांचे गावाबाहेर राहणे, या गोष्टींवरून आली असावी. पुढे स्वच्छतेला अधिक किंमत मिळून स्वच्छता म्हणजे सोवळेपणा, असे समजून अशा अस्वच्छ मनुष्यांना सामान्य जनसमूहाने व्यवहारापासून बहिष्कृत केले असावे. ज्या मार्गाने ही अस्पृश्यता आली त्याच मार्गाने तिला घालविली पाहिजे. बेद्राबाई नावाच्या एका बाईने आपल्या जातीच्या चौदा-पंधरा मुलांचे बोर्डिंग चालवले आहे. तेथील स्वच्छता व टापटीप पाहता ते निकृष्ट जातीचे म्हणून ओळखूही येत नाही. तेव्हा अस्वच्छ ते अमंगल याच न्यायाने स्वच्छ ते मंगल, शुचिर्भूत असे लोक मानू लागतील, अशी माझी समजूत आहे. वरील मीमांसा खरी वा खोटी असो, पण स्वच्छतेच्या सवयी आपण लावून घेतल्या पाहिजेत !"

रमाबाई ह्या इंग्रजीच्या प्रभावी वक्त्या होत्या, असे त्यांच्या सहकारी मार्गारिट कझिन्स म्हणतात. त्यांच्या इंग्रजी भाषणाचा हा नमुना पहा. १९२३ साली 'ऑल इंडिया लिबरल फेडरेशनच्या' अधिवेशनात मागणी करताना त्या म्हणतात–

"As you know all things have a limit. True it is, that woman has the good qualities of patience and suffering rather than making others suffer. True also it is, that although woman though unable to redress their wrongs by themselves, at present seek the help of their men. Equally true it is, that where the reputation of woman is concerned, they do not let their inherent spiritedness and bravery lie low. You have known of instances when woman driven to the wall by men have come out and defended their honour."

त्यांनी मुदतबंदी मजुरीच्या निषेधार्थ स्त्रियांच्या सभेत दिलेले भाषण वाचताना लक्षात येते, की[१७] रमाबाईंची भाषणे करण्याची पद्धत अतिशय पद्धतशीर होती. ज्या प्रश्नांशी निगडीत भाषण करायचे त्याची सर्व माहिती, इतिहास प्रथम सांगून मग त्यात आपली जबाबदारी का व कशी येते ते विशद करायचे व मग त्यावरील कृती ठरवायची, अशा पद्धतीने त्या भाषणे करताना दिसतात. त्यामुळे त्यांची भाषणे प्रभावी होत. सतत वेगवेगळ्या संदर्भात त्यांना वक्त्या वा अध्यक्षा म्हणून बोलावले गेल्याचे दिसते. डॉ. रखमाबाई एका पत्रात म्हणतात– "त्यांच्या भाषणाची पद्धत मनोवेधक असे. मला वाटे, की आपणास त्यांच्यासारखी भाषणशैली साधेल, तर बरे होईल."[१८]

८ एप्रिल १९१२ ला प्रांतिक महिला परिषद भरली होती. रमाबाई त्याच्या अध्यक्षा होत्या. सुरवातीसच प्रांतिक परिषदा ह्या स्थानिक प्रश्नांसाठी आवश्यक असल्या तरी राष्ट्रीय परिषदासुद्धा हव्याच असतात, ह्यांची कारणमीमांसा सांगताना त्या म्हणतात–

"पाश्चात्य सुधारणेत व आपल्या हिंदू सुधारणेत भेद काय ? या सुधारणेत ज्यास चांगल्या गोष्टी आहेत त्या आपल्या सुधारणेत सामील कशा करून घेता येतील, तसेच आपल्या

सुधारणेचे वैशिष्ट्य कोठपर्यंत राहणे शक्य आहे,ह्या सर्वांची चर्चा होण्यासाठी राष्ट्रीय परिषद होणे आवश्यक आहे."

पुढे त्या म्हणतात– "ज्या देशात बुद्ध जन्माला आला,दयेने प्रेरित होऊन उच्च-नीच न बघता सद्धर्माचे ज्ञान यच्चय।त मनुष्यास देण्याची बुद्धी ज्या देशात जन्माला आली, उपनिषत्काली व बुद्धकाली स्त्रियांची योग्यता जाणून त्यांना धर्मोपदेश करण्याची मुभा देण्यात आली,आजही वडील स्त्रीला 'आई',असे पूज्यतादर्शक संबोधण्याची वहिवाट आहे, त्या देशाच्या संस्कृतीची हानी न होता, उलट देशाचे तेज, सामर्थ्य निदर्शनास येण्यास सामाजिक सुधारणा सहाय्यभूत होईल."

प्रगल्भ भाषा, विचारातील समतोल आणि संस्कृतीतील बलस्थाने व कच्चेपणा जोखण्याचे तारतम्य ह्यांमुळे ही भाषणे वैचारिक वाङ्मयाच्या जवळ येऊन पोहोचतात.

२७-९-१९१० च्या मनोरंजन दिवाळी अंकात मुलामुलींच्या लग्नाचे वय, ह्या विषयी त्यांनी लिहिलेला स्फुट लेख, हादेखील मुद्देसूद लेखन व स्वच्छ विचारपद्धती ह्या दृष्टीने वाचनीय आहे.

प्रार्थना समाजाच्या व्यासपीठावरून त्यांनी केलेली प्रवचने पण वाचनीय आहेत.प्रार्थना समाजाच्या पंचेचाळिसाव्या वार्षिक उत्सवात 'संतांचे उपकार' ह्या विषयावर बोलताना त्यांनी मांडलेला हा विचार पहा–

"देवाचे भजन हे अमुक एका लाभासाठी करायचे नसून भजनातील भक्तिभावात बुडून शाश्वत सुखाचा अनुभव घ्यायचा असतो. जीवनातील नाना प्रसंगांना सामोरे जाण्याचे बळ त्यातून मिळते. म्हणून निरपेक्ष बुद्धीने भजन करावयास शिकवणे ही जाणत्या सुशिक्षित माणसाची जबाबदारी आहे".[१९]

रमाबाईंच्या या भाषणांविषयी श्री.विद्वांस म्हणतात– "त्यांची भाषणे बुद्धिमत्ता,सखोल ज्ञान, सार्वजनिक कार्याचा विस्तृत अनुभव, प्रगल्भ विचार, योजकता ह्यांचा प्रत्यय देणारी आहेत."

स्त्री-उद्धारक, समाजसुधारक, राष्ट्रप्रेमी, शिक्षणप्रेमी, विचारवंत, कुटुंबवत्सल स्त्री अशी रमाबाईंची अनेक रूपे आपल्याला त्यांच्या व्याख्यानातून भेटतात. पण रमाबाईंच्यात, 'एक संवेदनशील रसिक रमाबाईंपण दडल्या होत्या,ह्याचे दर्शन आकोले येथील २,४-१२-१९११ च्या व्याख्यानातून कसे होते पहा.

त्या म्हणतात– "मी मुंबईतील एका प्रभु बाईंच्याकडे गेले होते.तिने घरात भिंतीवर काही अप्रतिम चित्रे काढली होती.एका चित्रात प्रेमध्वज नाटकातील प्रसंग दाखवला होता.चित्रातील व्यक्तीच्या तोंडावरचे हावभाव इतके बेमालूम होते,की पाहाणारा आश्चर्यचकित होऊन जाईल. एका चित्रात बोगद्यातून बाहेर पडणारी गाडी दाखवली होती. आगगाडीचा धूर, प्रथम सरळ निघून, नंतर वारा लागल्यामुळे वाकडा तिकडा होत दूरवर पसरत जात आहे,असे दाखवले होते. मी त्या बाईस विचारले,की "ही चित्रे आपण कागदावर काढली असती तर मागे तरी

राहिली असती. इथे ती पाच-सहा महिन्यांत पुसून जातील."

असे बारकाव्याने व रसिकतेने वर्णन करून मग सूत्र आपल्या भाषणांशी जोडून घेत त्या म्हणाल्या– "ललितकला बायकांना सहज आपल्याशा करून घेता येण्याजोग्या आहेत. आपण आपली पूर्वपरंपरा राखून त्यास नवीन वळण दिले पाहिजे इतकेच ! तेव्हा हल्लीच्या काळाला अनुसरून अशा सर्व गोष्टी साध्य होण्यास आधी माता सुशिक्षित पाहिजेत."

रमाबाईनी आपल्या ह्या भाषणाचा समारोप आध्यात्मिक जीवनदृष्टीने केलेला दिसतो. तिथे त्यांच्या भाषेचा पोत एकदम बदललेला जाणवतो. त्या सांगतात–

"पुण्य परोपकार । पाप हे परपीडा । आणिक नाही जोडा । दुजा जगी ॥" या तत्त्वावर पाप-पुण्याची ओळख आयांनी मुलांना करून दिली पाहिजे. आता सुधारणारूपी नदीचा ओघ झपाट्याने पुढे चालला आहे. नव्या काळाला अनुसरून आपण आपल्या लेकींना वा मुलांना समभावाने वागविले पाहिजे .... अत्यंत मूल्यवान व श्रेष्ठ असे आत्मज्ञान मनुष्यमात्राने प्राप्त करून घेतले पाहिजे. 'पिंडी ते ब्रह्मांडी' या समजुतीने, नाम, लिंग भेदही लक्षात न घेता भूतदयेची कामे फळाची आकांक्षा न धरता ईश्वरार्पण वृत्तीने केली पाहिजेत. ठेवील त्या परिस्थितीत समाधानाने राहाता येणे, तो आपला भार वाहतो, तो कनवाळू माता आहे अशी श्रद्धा मनात उत्पन्न होणे, ही मोठी सिद्धी आहे. ती प्राप्त करून घेऊन, देवाचे सान्निध्य मिळविणे, यातच मनुष्य जन्माचे सार्थक आहे.

गीता व बायबल - दोन्हींच्या शिकवणुकीचे संस्कार ह्या भाषणात दिसून येतात. रमाबाईंचे अनेक युरोपियन अधिकाऱ्यांच्या बायकांशी स्नेहाचे संबंध होते. त्यामुळे त्यांच्या इंग्रजी भाषेचा सरावही वाढत गेलेला दिसतो. ह्या बहुभाषिकत्वामुळे एक वेगळीच भूमिका एकदा त्यांच्या वाट्याला आलेली दिसते. त्या प्रसंगाचे वर्णन श्री विद्वांसांनी आपल्या पुस्तकात केले आहे. ते म्हणतात–

"१९०५ मध्ये इंग्लडचे प्रिन्स ऑफ वेल्स आपल्या पत्नीसह हिंदुस्थानात आले होते. त्या वेळी त्यांच्या पत्नीच्या सत्कार समारंभाच्या वेळी राजेरजवाड्यांच्या, सरदारांच्या पत्नींना, तसेच शहरातील इतर माननीय स्त्रियांना निमंत्रणे होती. अगदी थोडे अपवाद वगळता ह्या स्त्रियांचा इंग्लिश भाषेशी परिचय नव्हता. निमंत्रित स्त्रियांचा वैयक्तिक रीतीने प्रिन्सेस ऑफ वेल्स यांच्याशी इंग्रजी भाषेत परिचय करून देणे, या स्त्रियांच्या अभिवादनाचे प्रिन्सेससाठी इंग्रजीत भाषांतर करणे, प्रिन्सेसच्या प्रतिअभिवादनाचे त्या त्या स्त्रियांसाठी मराठी, गुजराथीत भाषांतर करणे यासाठी ह्या तिन्ही भाषांत आणि उच्च एतद्देशीय व उच्च इंग्लिश समाजातील रीतिरिवाज अनुसरण्यात कुशल असलेल्या सुविद्य आणि माननीय महिलेला विनंती करणे आवश्यक होते. ती रमाबाईंना करण्यात आली व हे काम रमाबाईंनी उत्तम रीतीने पार पाडले."[२०]

रमाबाईंच्या इंग्रजी भाषेवरील व लेखनावरील प्रभुत्वाचा प्रत्यय देणारे आणखी एक पत्र श्री. विद्वांसांच्या संग्रही सापडले. डेक्कन कॉलेजातील इंग्लिश भाषेचे प्रोफेसर टर्नबुल ह्यांच्या

पत्नी मिसेस ल्युसी टर्नबुल ह्यांना, प्रगत विद्यार्थ्यांसाठी तयार करावयाच्या इंग्रजीच्या पुस्तकात घालायला न्यायमूर्तींवर लेख हवा होता. तो रमाबाईंनी लिहून द्यावा अशी विनंती त्यात करण्यात आलेली दिसते.

अशा प्रकारे, कोणत्याही प्रकारचे औपचारिक शिक्षण प्राप्त झाले नसताही, रमाबाईंनी कमावलेली ही भाषिक श्रीमंती, अभिव्यक्तीची समृद्धता, मांडणीतील घाटदारपणा व शैलीचा लवचिकपणा, हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वविकासाचेच दुसरे रूप वाटते.

* *

संदर्भ सूची

१. आमच्या आयुष्यातील आठवणी : रमाबाई रानडे, पृष्ठ २३२.
२. श्रीमती रमाबाई रानडे : मा. श्री. विद्वांस, पृष्ठ २९७
३. रमाबाई रानडे : उमाकांत, पृष्ठ ७६
४. आमच्या आयुष्यातील आठवणी : रमाबाई रानडे, पृष्ठ ६३
५. रमाबाई रानडे : उमाकांत, पृष्ठ १२६
६. श्रीमती रमाबाई रानडे, व्यक्ति आणि कार्य : मा. श्री. विद्वांस : आठवणी पुरवणी, पृष्ठ १३
७. प्रार्थना समाजाचा इतिहास : भाग २ रा, पृष्ठ १०१
८. श्रीमती रमाबाई रानडे : मा. श्री. विद्वांस, पृष्ठ ३०५
९. कित्ता : पृष्ठ २९९
१०. कित्ता : पृष्ठ २८४
११. कित्ता : पृष्ठ २९२
१२. कित्ता : पृष्ठ २८८
१३. पायोनियर विमेन ऑफ इंडिया : प. सेनगुप्ता, पृष्ठ ४१
१४. रमाबाई रानडे : उमाकांत, पृष्ठ १२६
१५. श्रीमती काशीबाई कानिटकर : आत्मचरित्र आणि चरित्र : सरोजिनी वैद्य, पृष्ठ १६४
१६. श्रीमती रमाबाई रानडे : मा. श्री. विद्वांस, पृष्ठ २९२
१७. ज्ञानप्रकाश, २२-१०-१९१५
१८. वक्तृत्वसमारोहानिमित्त आठवणी : मा. श्री. विद्वांस
१९. सुबोध पत्रिका, २-४-१९२६
२०. श्रीमती रमाबाई रानडे : मा. श्री. विद्वांस, पृष्ठ २९३

प्रकरण ९ वे

रमाबाई - एक स्त्री

आतापर्यंत आपण रमाबाईंच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व वाङ्मयीन जाणिवांचा व कार्याचा प्रवास पाहिला.

तथापि सामान्यतः भारतीय स्त्री कितीही व्यापक क्षेत्रात कार्य करत असली तरी त्याचवेळी ती एक कुटुंबवत्सल स्त्रीही असते. तिचे कुटुंबातल्या व भोवतालच्या व्यक्तीशी असणारे नातेसंबंधपण खूप बघण्यासारखे असतात व ते संबंध त्या स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाविषयी खूप बोलत असतात.

ह्या दृष्टीने आता आपण, रमाबाई एक पतिपरायण पत्नी, कुटुंबवत्सल गृहस्वामिनी, आई, मैत्रिण व त्याहीपेक्षा एक स्वतंत्र व्यक्ती ह्या भिन्नभिन्न रूपांत कशा वावरताना दिसतात ते पाहणार आहोत.

ह्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू दिसतो तो त्यांची पतिभक्ती. 'आपल्यापासून आपल्या पतीला केव्हा दुःख होऊ नये हीच तिची आमरण इच्छा असावी. हेच तिचे वैभव, हेच तिचे व्रत'[१] ही त्यांची धारणा होती. न्यायमूर्तींच्या निधनानंतर त्या जे सेवारत आयुष्य जगलेल्या दिसतात, त्याची प्रेरणा ह्या पतिभक्तीतूनच लाभलेली दिसते.

श्री विद्वांस चरित्रात लिहितात– "माधवरावांच्या देशोन्नतीच्या सर्वांगीण कार्यांपैकी समाज सुधारणा, स्त्री-शिक्षण, स्त्री-जीवनविकास ह्या कार्यांना एकाकी अवस्थेतील रमाबाईंनी उर्वरित आयुष्याचा तेवीस वर्षांचा काळ समर्पित करून समाजापुढे पतिव्रता-धर्माचा आणि स्त्री-कर्तृत्वाचा नवीन आदर्श निर्माण करून दाखविला."

न्यायमूर्तींच्या निधनानंतरचा रमाबाईंचा दिनक्रम श्री. विद्वांसानी आपल्या चरित्रात दिला आहे. ते सांगतात– पाच वाजता उठून मुखमार्जन करून, इरास्ववताची स्तोत्रे व अभंग म्हणत आणि नंतर न्यायमूर्तींच्या फोटोला फुले वाहत ..... सहा वाजता सखू, नानू यांना उठवीत .... स्तोत्रे म्हणून झाल्यावर ती दोघेही न्यायमूर्तींच्या तसबिरीला नमस्कार करून .... अभ्यासाला

बसत.... स्नान केल्यावर पूजेला बसत.... त्यांच्या पूजेत चांदीच्या नक्षीच्या चौकटीत बसवलेला न्यायमूर्तींचा एक फोटो व वयाच्या चौथ्या वर्षापासून पूजा करीत आलेल्या गणपतीची लहानशी मूर्ती असे... रात्री झोपताना न्यायमूर्तींच्या धर्मपर व्याख्यानांपैकी काही भाग वाचीत.... एक दोन अभंग म्हणत व तसबिरीला वंदन करून झोपी जात.... न्यायमूर्तींप्रमाणे दिवसाचे सोळा-अठरा तास त्या वेगवेगळ्या उद्योगांत असत."[२]

पुढे त्यांचे नातू श्री. विद्वांस कॉलेजातील सहामाही परीक्षेत उत्तम पास होऊन स्कॉलशिपच्या यादीत त्यांचे नाव आले. तेव्हा ते लिहितात– "ही बातमी रमाबाईंना सांगितली तेव्हा त्यांना आनंद झाला. त्यांनी दादांच्या (न्यायमूर्तींच्या) तसबिरीला हार आणि वाटायला पेढे आणविले."[३]

१९१५ त त्यांचा दत्तक पुत्र २१ वर्षाचा झाल्याबरोबर न्यायमूर्तींच्या मृत्युपत्रान्वये तो आता घराचा मालक होणार होता. त्यामुळे रमाबाई तात्काळ त्याचदिवशी घरातील सर्व सामान, कागदपत्र, याद्या करून मुलाच्या सुपूर्द करून रानडेवाडा सोडून गेलेल्या दिसतात. मनात विचार येतो, की वैवाहिक जीवनाच्या पंचवीस वर्षांच्या मधुर स्मृती, ज्या वाड्याशी निगडीत होत्या, स्वतःच्या सामाजिक कार्याची मुहुर्तमेढ ज्या वाड्यात रोवली गेली, तो वाडा सोडून जाताना रमाबाईंना काय वाटले असेल?

ह्या दृष्टीने चरित्रात शोध घेतला तेव्हा चरित्रकार एवढेच सांगतात– "रानडेवाड्याचा प्रत्यक्ष निरोप घेताना रमाबाई बाह्यतः अत्यंत शांत होत्या."[४] घर सोडताना त्यांनी आपल्याबरोबर फक्त "न्यायमूर्तींच्या संस्मरणीय वस्तू म्हणून नेहमी बसण्याचे कोच, ऑईल पेन्टिंगची त्यांची तसबीर, त्यांचे सोन्याचे घड्याळ, विद्यापीठाकडून मिळालेले सोन्याचे पदक, न्यायमूर्तीपदी झालेल्या नेमणुकीचे अधिकापत्र अशा काही वस्तू ठेवल्या होत्या."[५]

न्यायमूर्तींचे हे सोन्याचे घड्याळ विशेष सभा-समारंभाना जाताना रमाबाई वापरीत, असे त्यांचे चरित्रकार सांगतात.[६]

रानडेवाडा सोडल्यानंतर सेवासदनाच्या आवारातील त्यांचे घर बांधून होईपर्यंत काही काळ त्या फर्ग्युसन रोडवर भाड्याचा बंगला घेऊन राहत होत्या असे दिसते. एके रात्री तिथे चोरी होऊन त्यांचे ते घड्याळ चोरीस गेले. त्यावेळच्या रमाबाईंच्या मनोवस्थेबद्दल चरित्रकार म्हणतात– "चोरीला गेलेल्या घड्याळाशी रमाबाईंच्या हृद्य भावना निगडित होत्या. ते माधवरावांचे स्मृतिचिन्ह होते.... असे हे घड्याळ आपल्यापासून दूर गेले. ह्या भावनेमुळे माझ्यामध्ये हे घड्याळ वापरण्याची योग्यता नाही काय? अशी हुरहुर त्यांना लागून राहिली. घड्याळाऐवजी माझा एखादा जास्त किंमतीचा दागिना चोरीला गेला असता तरी मला अशी खिन्नता आली नसती, असे त्यांना वाटत राहिले."[७]

पुढे ते घड्याळ सापडल्यावर लेखक म्हणतात– "घड्याळ सापडल्यावर त्यांना खूप आनंद झाला.... ते हातात घेऊन कितीतरी वेळ त्या त्याकडे बघत राहिल्या."[८]

रमाबाई सेवासदनातील नव्या घरात राहायला आल्यांवर त्यांनी आपल्या दिवाणखान्यात

ठाणे

माधवरावांच्या सर्व वस्तू ठेवल्या होत्या. न्यायमूर्तींच्या कोचावरच त्यांची मोठी तसबीर ठेवली होती. श्री. विद्वांस सांगतात– "त्या दिवाणखान्यात येताना सर्वांनी पादत्राणे बाहेर काढून ठेवायची पद्धत होती. बैठकीची व टेबल, खुर्च्यांची रचना अशी असे, की माधवरावांच्या तसबिरीकडे कोणाची पाठ होऊ नये. रमाबाईंना नमस्कार करायला जी कोणी मंडळी येत त्या मंडळींनीही माधवरावांच्या तसबिरीला प्रथम नमस्कार करून मग आपल्याला नमस्कार करावा अशी त्यांची इच्छा असे." [९]

ह्याही घरात पूर्वीप्रमाणे रमाबाई गणपतीची छोटी मूर्ती व माधवरावांचा लहानसा फोटो, त्याची सोवळ्याने पूजा करताना दिसतात. चरित्रकार सांगतात– "पूजा झाल्यावर, एकचित्ताने 'माधव' नावाचा जप करून ध्यानस्थ बसत .... नामस्मरण संपल्यानंतर त्यांच्या मुद्रेवर अधिक प्रसन्नता आलेली मला दिसे." [१०]

अगदी मरणकाळीही रमाबाईंची ही पतिनिष्ठा त्यांना बळ देऊन गेलेली दिसते. त्या घटनेविषयी चरित्रात अशी नोंद दिसते– "अगदी अखेरच्या दिवसांत आमच्या घरातल्या सखूताई लेले या बाईंना रमाबाई समाधानाने म्हणाल्या, आज पहाटे 'प्रत्यक्ष' मला स्वप्नात येऊन सांगितले, की आता आपले काम संपलेले आहे. आपल्याला दुसरीकडे जायचे आहे."

पतीच्या निधनांतर रमाबाई सर्वार्थाने गृहस्वामिनी झाल्या होत्या. ही भूमिका त्या कशी पार पाडत होत्या ते पाहू. त्यांचे चरित्रकार लिहितात– "रमाबाईंना नातेवाईक मंडळी आपापल्या नात्याप्रमाणे वेगवेगळे संबोधत, पण बाहेरची मंडळी आदरपूर्वक 'वहिनीसाहेब' म्हणत. त्या काळात महाराष्ट्रातील संस्थानिकाच्या पत्नीला आदराने 'वहिनीसाहेब' म्हणण्याचा प्रघात होता. पण रमाबाईंना हा मान एका जेष्ठ नेत्याची पत्नी म्हणून नव्हता. त्यांच्या ठिकाणी जी सुशिक्षितता व सुसंस्कृतता होती, मोठ्या कुटुंबाची व सार्वजनिक कार्याची जबाबदारी पार पाडण्याची जी क्षमता होती तिच्याशी त्याचा संबंध होता." [११]

न्यायमूर्तींच्या मागे रमाबाईंची वैयक्तिक राहणी जरी अत्यंत साधेपणाची होती तरी इतर व्यवस्था माधवरावांच्या प्रतिष्ठेला साजेशी, अशीच त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवलेली दिसते.

श्री. विद्वांस म्हणतात– "माधवरावांच्या वेळच्याप्रमाणे प्रतिष्ठेने राहण्यासाठी रमाबाईंनी सेवासदनाच्या घरातली घोडागाडी, कारकून, कोचमन, स्वैपाकाची बाई, गडी, वगैरे ठेवले होते. त्याचप्रमाणे निराधार आप्तांना, विद्यार्थ्यांना आश्रय दिलेला होता .... [१२] पूर्वीप्रमाणेच आपला पत्रव्यवहार लिहिण्यासाठी लेखनिकही ठेवला होता. रमाबाईंनी सखूताईला लिहिलेली बरीच पत्रे लेखनिकाने लिहिलेली व रमाबाईंनी सही केलेली आहेत." [१३]

त्यांच्या ह्या अशा प्रतिष्ठेने व मोठ्या मनाने जगण्यामुळे चरित्रकार सांगतात– "त्या काळात स्त्रियांचा 'गृहस्वामिनी' म्हणून मान व अधिकार पतीच्या आर्थिक व सामाजिक प्रतिष्ठेवर अवलंबून असे आणि पतिनिधनाबरोबर त्यांच्या त्या मानाचा व अधिकाराचा शेवट होई. रमाबाईंच्या बाबतीत तसे घडले नाही." [१४]

असे स्थान जरी त्यांनी पतीमागे निर्माण केलेले होते, तरी त्या सर्वांशी अत्यंत अगत्याने,

जिव्हाळ्याने व प्रेमाने वागताना दिसतात. त्यांच्या समकालीन श्रीमती काशीबाई कानिटकर लिहितात–

"त्यांनी कोणाशी ताठ्याचे किंवा आढ्यतेचे वर्तन ठेवले नव्हते. दोन्ही जावांशी .... प्रेमळ वडील बहिणीसारख्या वागत. सासूशी व थोरल्या नणंदेशी अत्यंत मर्यादेने वागत. त्यांना दानधर्माची अडचण पडू नये म्हणून दरमहा त्यांच्या नकळत त्यांच्या पूजेच्या संबळीत वीस-पंचवीस रुपये ठेऊन देत. वास्तविक घरप्रपंचापैकी रावसाहेबांनी देऊन ठेवलेल्या अधिकारामुळे .... त्या दोघींच्या हातात पैसा खेळत असे. पण त्या त्यातून घेतील न घेतील या समजुतीने त्या समजून उमजून धर्माकरिता वरील रक्कम ठेवत."[१५]

रमाबाईंनी 'आमच्या आयुष्यातील आठवणी' हे पुस्तक लिहिले. पण ते लगेच छापलेले दिसत नाही. त्यामागे पण अशीच वडील माणसांचे मन जपण्याची भावना दिसते. श्री. विद्वांस सांगतात–[१६] "संसारातील सुरुवातीच्या दिवसात त्यांना, अक्का माई यांच्याकडून जो त्रास झाला होता, त्याचे आठवणीतील चित्र पाहताना त्या. दोघींना वाईट वाटेल हे ओळखून त्या अक्का, माई हयात होत्या तोपर्यंत मूकच राहिल्या .... त्या दोघी दिवंगत झाल्या, मग रमाबाई प्रकाशनाच्या तयारीस लागल्या."

वडिलधाऱ्यांचा मान ठेवायचा हे रमाबाईंचे धोरण असले तरी त्यांनी आपल्या तत्त्वाच्या बाबतीत मात्र कधी तडजोड केलेली दिसत नाही.

न्यायमूर्तींच्या निधनानंतर रमाबाईंनी आपल्या पतीच्या व स्वतःच्या सुधारणेच्या तत्त्वानुसार केशवपन केलेले नाही. श्री. विद्वांस सांगतात– "वैधव्योत्तर केशवपन न केलेल्या त्यांच्या घराण्यातल्या त्या पहिल्याच स्त्री होत. त्यामुळे दोन्हीकडील परंपराप्रिय स्त्रियांना रमाबाईंच्या ह्या निर्धारामुळे वाईट वाटणे, राग येणे साहजिकच होते. पण रमाबाईंनी ह्या बाबत क्षिती बाळगली नाही. घरातील पूजाअर्चा, खाणेपिणे ह्यांमध्ये बायका आपणास बहिष्कृतासारखे वागवतील हे त्यांना माहीत होते. तरीपण त्या सकेशा राहिल्या आणि आपल्या पतिनिष्ठेला व विवेकबुद्धीला साजेशा रीतीने अखेपर्यंत विविध बाबतींत त्या वागल्या."[१७]

समाजसुधारणेच्या कार्यातील माधवरावांचे तीन सहकारी श्री. शंकरराव पंडित, श्री. वामनराव मोडक व श्री. चिंतामणराव भट, हे माधवरावांच्या पूर्वीच दिवंगत झाले होते. त्यांच्या पत्न्यांनी पण केशवपन केले नव्हते. तथापि श्री. विद्वांस म्हणतात– "या तीनही गृहस्थांच्या अर्धांगिनींना त्यांच्या कर्त्या-सवरत्या मुलांचा खंबीर आधार होता. रमाबाईंच्या बाबतीत तसेही नव्हते. पूर्वी शिक्षणाचेबाबतीत, पती असताही रमाबाईंना घरातल्या वडिलधाऱ्या स्त्रियांनी खूप विरोध केला होता व छळही केला होता. अशा वातावरणात केशवपन न करणे तसे सोपे नव्हते– अशा स्थितीत माधवरावांच्या तत्त्वांचे आणि मतांचे पालन करून त्यांनी आपली पतिनिष्ठा व तत्त्वनिष्ठा सिद्ध केली."[१८]

ह्याची किंमत रमाबाईंना मोजावी लागलेली दिसते. श्री. विद्वांस सांगतात– "केशवपनाची सक्ती करता आली नाही, तरी घरातल्या स्त्रियांनी देवपूजेच्या व

जेवणखाण्याच्या सोवळ्यात रमाबाईंचा संपर्क येऊ दिला नाही... पूजाअर्चा, अन्नपान इत्यादी व्यवहारात वाळीत टाकल्याप्रमाणेच वागवीत .... वर्षभरानंतर त्या जेव्हा जेवायला माजघरात येऊ लागल्या, तेव्हा त्यांचे पान थोडे दूर व निराळे मांडले गेले. पण सोवळ्या-ओवळ्याच्या बाबतीत रमाबाईंनी आपली मते त्यांच्यावर लादली नाहीत. त्यांच्या पूजाअर्चा, अन्नपानाला आपला संपर्क होऊ दिला नाही." [१९]

आणखीही काही वैयक्तिक बावतींत रमाबाईंनी रूढीच्या विरूद्ध जाऊन आपल्या सदसद्विवेकानुसार वर्तन केलेले दिसते.

उदा., त्या काळी सकेशा विधवांना मूर्तिपूजा निषिद्ध होती. पण रमाबाईंनी आपल्या छोट्या गणेशमूर्तीची पूजा पूर्वीप्रमाणे खाजगीत चालू ठेवलेली दिसते. विधवा काचेच्या बांगड्या वापरत नसत, पण विद्वांस सांगतात– "रमाबाई दोन दोन सौम्य रंगाच्या काचेच्या बांगड्या, मोजके सुवर्णालंकार, साधीच पण उत्तम पोताची, मंद रंगाची पातळे नेसत.[२०] घोडागाडी, काश्मिरी शाल, गोफात अडकवलेले न्यायमूर्तींचे सोन्याचे पॉकेट वॉच, इ. भारंदस्त चिजा न्यायमूर्तींच्या इतमामाला साजेशा म्हणून त्या वापरत होत्या, असे दिसते."

त्यांचे चरित्रकार उमाकांत म्हणतात– "विधवेने आपण कोणाची बायको होतो, हे समजून वागले पाहिजे असे रमाबाईंचे म्हणणे असे व स्वतः त्यांची वागणूक तशी होती." [२१] गांधीजी रमाबाईंविषयी नवजीवन साप्ताहिकात म्हणतात– "वैधव्य ही हिंदू धर्माची शोभा आहे. रमाबाईंना पाहिल्यावर वैधव्याची शोभा मला अधिक समजू लागली."

"माधवरावांचा श्राद्धविधी देखील, मोठ्यांच्या इच्छेनुसार वैदिक पद्धतीने केला तरी संध्याकाळी प्रार्थना समाजाच्या पद्धतीनुसार त्या ईश्वरोपासना करवीत असत व तीमध्ये त्या स्वतःही सहभागी होत. तसेच न्यायमूर्ती बुधवारी गेले, म्हणून दर बुधवारी सकाळी त्या ईश्वरोपासना करवीत," असे त्यांचे चरित्रकार श्री. विद्वांस सांगतात.[२२]

थोडक्यात रमाबाईंचे पुन्हा पूर्वीप्रमाणे एक कुटुंब-जीवन सुरू झालेले दिसते. फरक इतकाच दिसतो, की आता पूर्वीचा कुटुंब प्रमुख घरात नव्हता व ती भूमिका न्यायमूर्तींच्या मृत्युपत्रानुसार रमाबाई वठवीत होत्या असे दिसते.

न्यायमूर्तींनी आपल्या इच्छापत्रानुसार, संपत्तीची व्यवस्था व विनियोग करण्यासाठी रमाबाई व बहीण दुर्गाक्का यांना, व्यवस्थापिका म्हणून नेमलेले दिसते व न्यायमूर्तींच्या ह्या इच्छेनुसार रमाबाईंनी ह्या सर्व जबाबदाऱ्या पतीच्या धोरणाने प्रामाणिकपणे पार पाडलेल्या दिसतात.

पत्नी, सून, गृहस्वामिनी ह्याबरोबरच रमाबाईंचे आणखी एक रूप पाहण्यासारखे आहे. व ते म्हणजे आईचे. वस्तुतः माधवराव व रमाबाईंना स्वतःचे अपत्य नव्हते. तथापि, रमाबाईंच्या भावजयीच्या आकस्मिक निधनानंतर तिची मुलगी 'सखू' ही ह्या दोघांनी आपल्या मुलीसारखी वाढवलेली दिसते. तसेच माधवरावांच्या धाकट्या सावत्रभावाचा एकुलता एक मुलगा नारायण उर्फ नानूपण त्यांच्याकडेच मुलासारखा वाढलेला दिसतो. माधवरावांच्या इच्छेनुसार त्यांच्या

मृत्युनंतर नानूला रमाबाईंनी कायदेशीर दत्तक घेतलेला दिसतो.

ह्या दोन मुलांमुळे त्यांच्या जीवनातील अपत्याची उणीव भरून निघाली असे दिसते. त्यांच्या संदर्भात .... स्वतः रमाबाई 'आठवणीं'त म्हणतात–

"संसारातील मुख्य सुखाचा भाग जी अपत्ये, ती आम्हांला मुळीच नाहीत. तरी आम्ही दोघेही त्याने ठेवलेल्या स्थितीत आनंदात आहोत. कधी उदासीन राहिलो नाही. उलट ती वाण भरून काढण्याचीही आम्ही तजवीज केली आहे."

पुढे दुर्दैवाने ह्या सखूताईचे पहिल्या बाळंतपणातच निधन झाले. आणि तिचा छोटा बाळ माधव उर्फ देवदत्त हा रमाबाईंनाच लेकीच्या इच्छेनुसार आणून वाढवावा लागलेला दिसतो. ह्या व्यतिरिक्त रमाबाईंना आणखी एका मुलाचे आईपण स्वीकारावे लागलेले दिसते. त्याचे असे घडले, की रमाबाईंचा चुलत पुतण्या यशवंतराव आफ्रिकेत असे. त्यांचा मुलगा राजाराम दीड वर्षांचा असताना यशवंतरावाची पत्नी वारली. मरताना तिने मूल रमाबाईंकडे ठेवण्यास सांगितले. त्यामुळे कॉलेजात जाईपर्यंत देवदत्ताबरोबर ह्याही मुलाचा प्रतिपाळ रमाबाईंनी केलेला दिसतो.

अशा प्रकारे चार मुलांच्या रमाबाई आई झालेल्या दिसतात. आपल्या कार्यव्यस्त जीवनात हे आईपण रमाबाईंनी कसे पार पडले ते जरा आता तपशीलात पाहू या.

ह्या चौघांतली सर्वांत मोठी सखूताई तान्हेपणापासून रमाबाईंनी वाढवली. रमाबाई माधवरावांसह फिरतीला जात तेव्हा पुष्कळदा वर्षाच्या आतल्या सखूला बरोबर घेऊन जात. त्यावेळी त्यांचा अभ्यासही चालू असायचा. आपल्या 'आठवणीं'त रमाबाई सांगतात–

"चि. सखू फक्त दहा महिन्यांची असल्यामुळे सकाळच्या प्रहरी मला तिचे काम बरेच असे, तरी होईल तितके लवकर ते काम उरकून घेऊन 'स्वतः' फिरून घरी येण्यापूर्वी मला वाचनाकरिता तयार राहावे लागे. कारण सकाळच्या वेळीच माझ्या इंग्रजी वाचनाला तास-दीड तास वेळ मिळे. एखाद दिवशी मी आपले काम आधी उरकून घेतले नसले तर तो दिवस फुकट जाई व पुन्हा दुसरा दिवस येईपर्यंत 'जवळ' वाचावयास मिळत नसे. म्हणून होता होईतो आपली वेळ चुकवीत नसे." [२३] त्याच प्रसंगातील पुढील बोलण्यावरून हेही लक्षात येते, की सखू लहान असल्याने रात्रीची उठत असे व पुष्कळदा रमाबाईंना ओळीने दोनतीन रात्री जाग्रण घडत असे.

सखूताई, रमाबाई व माधवरावांची अतिशय लाडकी होती. हे आठवणीतील तिच्याविषयीच्या उल्लेखावरून कळते. माधवरावांच्या निधनानंतर तिनेच आईचे मन रमवावे, म्हणून आईला माधवरावांच्या 'आठवणी' लिहून काढायला लावल्या होत्या.

पुस्तकाच्या अर्पण पत्रिकेतून मायलेकींचे जिव्हाळ्यांचे नाते दिसून येते. रमाबाई लिहितात– "मुलीचे मन जात्याच कोमल, तशात आम्ही मुंबईहून पुण्यास आल्यावर (माधवरावांच्या मृत्युनंतर) तर ती सदोदित मला चिकटून असे व मला काय पाहिजे, कशाने मला हलके वाटेल, या योजनेत असे. पोरवय तरी माझ्या अंतःकरणाला वाव मिळावा म्हणून,

मला सुखकर अशा 'आठवणी' काढून माझे समाधान व्हावे असा प्रयत्न करी."

न्यायमूर्तींच्या मृत्यूनंतर सखूताईचे लग्न रमाबाईंनी आपल्या सुधारक विचारांशी जुळणारे स्थळ शोधून करून दिलेले दिसते. लग्नानंतर तिचे माघारपण, कोडकौतुक, बाळंतपण ह्या सर्व आईला हव्या हव्याशा वाटणाऱ्या जबाबदाऱ्या त्यांनीच पार पाडलेल्या दिसतात. अधूनमधून तिच्याकडे आपल्या बागेतील फळे, भाजीपाला, तूप, फराळाचे सामानही त्या पाठवत, असे त्यांच्या पत्रांतून दिसून येते. रमाबाई व सखूबाई ह्या मायलेकीतील जिव्हाळ्याचे नातेही त्यांच्या उपलब्ध पत्रांतून दिसून येते. संसारातील बारीक-सारीक अडचणींत, प्रसंगांत कसे वागावे, सगळ्यांची मने संभाळून, स्वतःचा विकास कसा करत राहावा, सामाजिक भानपण कसे जागे ठेवावे इ. तऱ्हेचे मार्गदर्शन त्यांच्या पत्रातून दिसते. त्यांच्या अशा पत्रातील एक-दोन नमुने पहा. १०-२-१९०६ च्या पत्रात त्या लिहितात– "तुझे शिकणे चालू आहे. वेळ चांगला जातो हे वाचून आनंद वाटला. पण पाहुणे मंडळी आहेत तो शिक्षण बंद राहिले तरी हरकत नाही. जसे धोरण दिले आहे तशी वाग." स्वतःचा विकास वा स्वतःचा आनंद हा गृहिणी कर्तव्याच्या आड येऊ नये, असे धोरण रमाबाईंनी दिलेले दिसते.

सुट्टीत रमाबाई लोणावळ्याला बंगल्यात जात. सखूताईची तब्बेत बरी नसल्याने तिनेपण विश्रांतीसाठी यावे, असे रमाबाईंना वाटत होते. तथापि, सखूताईचा दीर तिच्याजवळ होता व त्याला सुट्टी लागून तो घरी जाईपर्यंत सखूताईने येऊ नये, बरे दिसणार नाही, असे त्यांनी ३१-३-१९०६ च्या पत्रात कळवले आहे.

संसार व माणसे सांभाळायला ज्याप्रमाणे रमाबाई शिकवताना दिसतात, त्याचप्रमाणे 'हिंदु लेडीज सोशल क्लब'च्या सभेना जातेस ना? किंवा मुंबईच्या आपल्या कार्यकर्त्या मैत्रिणी माणकबाई कोठारे, सोनाबाई जयकर वगैरेंना भेटत जा, असेही त्या आवर्जून सांगताना दिसतात. ६-४-१९०६ च्या पत्रात रमाबाई लिहितात– "लांब असल्यावर रूसू नये, जवळ असल्यास समजूत तरी घातला येते. रुसलीस असे वाटल्याने बरे वाटले नाही. म्हणून घाईत पत्र लिहीत आहे."

दोघी मायलेकींतील जिव्हाळ्याचे नाते ह्या पत्रातून स्पष्टपणे दिसून येते.

एकदा सखूताईने त्यांना पत्रातून कुठल्याशा पाहिलेल्या स्थळाचे वर्णन कळवले. त्यावर (१५-३-१९०६) रमाबाई लिहितात– "पत्र वाचून संतोष व कौतुक वाटले. असे पत्राच्या रूपाने तरी पाहिलेल्या वस्तूंचे, ठिकाणचे, व्यक्तीचे वगैरे वर्णन करता आले म्हणजे प्रत्येक विषय लक्ष लावून पाहण्याची सवय लागते व त्यामुळे तो विषय नीट लिहिता येतो."

पत्रातून जसे उद्‌बोधन करताना दिसतात त्याचप्रमाणे सखूबाई घरी आली असेल तर तिला आवर्जून आपल्याबरोबर व्याख्यानांना, आपल्या तुरुंग भेटींना घेऊन जात असत, असे दिसते.

दुर्दैवाने सखूताईचा पहिल्याच बाळंतपणात अंत झाला व हे मायलेकीचे नाते व्यावहारिक अर्थाने पूर्णविराम पावले. पण सखूताईच्या बाळाला आपल्याकडे ठेवून रमाबाई

आपले कन्याऋण पुन्हा फेडताना दिसतात.

रमाबाईंचे दुसरे अपत्य म्हणजे त्यांचा दत्तक पुत्र नानू. सखूताईप्रमाणे नानूपण बालपणापासून रमाबाईंकडे वाढलेला दिसतो.

सखूताईप्रमाणे तोही माधवराव व रमाबाईंबरोबर लोणावळा,महाबळेश्वर वगैरे ठिकाणी सुट्टीत जात असे. न्यायमूर्तींच्या शेवटच्या आजारात रमाबाई मुलांना घेऊन न्यायमूर्तींकडे माथेरानला गेल्या होत्या. त्या वेळचे वर्णन करताना त्या सांगतात– "रोज जेवण झाल्यावर दोन्ही वेळ मुलांना घेऊन बसणे होई. सखूकडून गाणी म्हणवून घ्यायची,नानूकडूनही कविता म्हणून काही गोष्टी सांगून घ्यावयाच्या .... दोन्ही मुलांकडून होणाऱ्या करमणुकीत स्वतःचा पुष्कळ वेळ जायचा."[२४]

न्यायमूर्तींच्या सख्ख्या व सावत्र भावंडात मिळून तो एकमेव मुलगा होता. त्याला दत्तक घ्यायचे न्यायमूर्तींच्या मनात होते. त्यामुळे न्यायमूर्तींच्या निधनानंतर दुःखातून बाहेर पडल्यावर रमाबाईंनी लगेच दत्तकविधान पूर्ण केलेले दिसते व पुढे पोटच्या मुलांप्रमाणे त्या त्याला वाढंवितांना दिसतात. तो आठ-नऊ वर्षांचा असताना त्याला टायफॉईड झाला तेव्हा रमाबाईंनी केलेल्या अविरत सेवेचे वर्णन चरित्रात वाचावयास मिळते. नानूला आजारात जेवण देता येत नव्हते. एकदा रागावून तो म्हणाला– "तुम्ही सगळी जेवता, तू सुद्धा जेवतेस. मला मात्र जेवण नाही." यावर श्री. विद्वांस लिहितात– "रमाबाईंच्या मनाला नानूचे शब्द खूप लागले त्यावेळेपासून जेवणाच्या वेळी दुपारी व रात्री अर्धी भाकरी व दूध येवढेच त्यांनी खाण्यास सुरवात केली. नानू बरा होऊन मऊ भात खाऊ लागल्यावर त्या नेहमीप्रमाणे जेवण करू लागल्या."

नानू हा आपल्या आदरणीय पतीच्या घराण्याचा वारसा आहे. तेव्हां त्याला त्या परंपरेनुसार वाढवायचा हीपण भावना त्यांच्या मनात असावी. कारण त्यांनी त्याला शिकायालही न्यायमूर्तींचा घनिष्ठ संबंध असलेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये व पुढे डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन कॉलेजात घातले.* त्याचे शिक्षण अभ्यास,प्रकृती, सवयी ह्याकडे त्यांचे बारीक लक्ष असे, असे सखूताईंना पाठवलेल्या पत्रातील उल्लेखातून दिसते. श्री. विद्वांस सांगतात– "नानूच्या शाळेतील अभ्यासाची रमाबाई काळजी घेत. एखादा विषय कच्चा असला तर घरी शिक्षक ठेवून तो करवून घेत. तब्येत सुधारण्यासाठी त्याने ग्राऊंडवर जाऊन क्रिकेट,फुटबॉलसारखे खेळ खेळावेत,अशी व्यवस्थाही त्यांनी केली. त्याला घोड्यावर बसण्यासही त्यांनी शिकविले." न्या. रानड्यांचे हिंदुस्थानच्या सर्वांगिण सुधारणेसंबंधीचे तत्त्वज्ञान,त्या दिशेने करावयाच्या कार्याची योजना यासंबंधी नानूला माहिती व्हावी व त्यानुसार त्याच्या मनाला वळण लागावे म्हणून रमाबाई समाजसुधारणावादी पक्षातील सर्व मोठ्या मंडळींशी त्याचा परिचय करून देत. नानूच्या बालपणी त्याचा अपराध नसताना दोनदा त्याचा

---

* त्याकाळी मोठ्या घरची मुले डेक्कन कॉलेजात जात असत. तिथे जाणे प्रतिष्ठेचे मानले जात होते, असे दिसते.

अपमान होण्याचे प्रसंग आलेले दिसतात.

ह्या प्रसंगात रमाबाईंनी लहान मुलगा आहे म्हणून सोडून न देता, उलट त्याचा स्वाभिमान जपण्यासाठी, शेवटपर्यंत दाद लावून घेऊन, विनाकारण अपमान करणाऱ्यांना नानूची क्षमा मागायला लावली, असे चरित्रकार सांगतात.[२५] डॉ. रखमाबाईंनी रमाबाईंच्या काही आठवणी लिहिल्या आहेत. त्यातली एक आठवण ह्या संदर्भात लक्षणीय वाटते. सन १९०७ मध्ये त्यांच्या प्रयत्नांनी महिला परिषद, सुरतला भरली होती. रमाबाई अध्यक्षा म्हणून तिथे गेल्या होत्या. तेव्हांची आठवण सांगताना डॉ. रखमाबाई लिहितात–

"परिषदेची बैठक दोन दिवसांची होती .... पुढे आणखी एक दिवस श्रीमती रमाबाईंनी सुरतेत राहावे व पुरातन ऐतिहासिक स्थळे पाहावीत असा मंडळींचा आग्रह होता. परंतु रमाबाईंचे एकच उत्तर असे– 'मी आपला पुत्र नानू यास अमूक एक तारखेस परत येईन असे वचन दिले आहे, ते मोडता कामा नये.' म्हणून त्या एक दिवससुद्धा जास्त राहिल्या नाहीत."[२६]

त्याला ग्रामोफोनवर गाणे ऐकायची फार आवड होती. पण मॅट्रीक होईपर्यंत अभ्यासात व्यत्यय नको, म्हणून रमाबाईंनी घरात ग्रामोफोन घेतलेला दिसत नाही. सुट्टीत मात्र मुद्दाम भाड्याने आणवून त्याची हौस पुरवताना दिसतात.

त्याने बी.ए. होऊन आय.सी.एस. व्हावे अशी त्यांची फार इच्छा होती. पण त्याने मेडिकलला जायची इच्छा व्यक्त केल्यावर रमाबाईंनी आपल्या मताचा आग्रह सोडून दिलेला दिसतो, हे विशेष लक्षणीय वाटते. वर त्याला अभ्यासाला उपयुक्त अशी सर्व उपकरणे, मायक्रोस्कोप वगैरे विकत आणून दिलेली दिसतात.

पुढे रमाबाईंनी नानूचे लग्नदेखील थाटामाटात, स्वतःच्या वैयक्तिक देखरेखीखाली, रानडेवाड्याच्या पूर्वपरंपरेला साजेशा पद्धतीने करून दिलेले दिसते. श्री विद्वांस सांगतात– "जोगळेकरांनी (मुलीचे वडील) मानपान व समारंभ आपल्या प्रतिष्ठेस शोभेल असा केला. पण श्रीमती रमाबाईंनी त्यांच्याकडून स्वतःला काहीही मानपान किंवा आहेर घेतला नाही."

न्यायमूर्ती गेल्यापासून लग्नकार्यास वा समारंभास जाणे त्यांनी बंद केले होते. ह्याही लग्नात त्या समारंभास वा व्याह्यांच्या घरी गेल्या नाहीत. वाड्याच्या सज्जातून त्यांनी मिरवणूक पाहिली. सून घरी आल्यावर पहिला नमस्कार न्यायमूर्तींच्या तसबिरीला करून मग इतरांना केला.[२७]

अशा तऱ्हेने रमाबाईंनी नानूचे सर्व संगोपन पोटच्या पोराप्रमाणे केलेले दिसते. पण पुढे दुर्दैवाने आर्थिक बाबींवरून दोघात वैमनस्य येत गेलेले दिसते. श्री. विद्वांस म्हणतात– "माधवरावांची, घराणे एकीने रहावे ही योजना फलद्रुप व्हावी म्हणून रमाबाईंनी आपल्या व्यक्तिगत सांपत्तिक हिताकडे आणि शरीरप्रकृतीकडे लक्ष न देता प्रयत्नांची पराकाष्टा केली– व बरीच वर्ष कुटुंब अभंग राहिले.[२८] परंतु जावा-दीरांनी नानूच्या मनात किल्मिष भरवून रमाबाईंच्या प्रयत्नांवर पाणी फिरवलेले दिसते. रमाबाईंनी व्यवस्थापनाच्या काळात अयोग्य

खर्च केला, दूरच्या आप्तांना घरी ठेवून घेतले, त्यांच्यावर अनावश्यक खर्च केला, आश्रितांच्या संगोपनावरही खर्च करणे अनावश्यक होते, असे आरोप करून कोर्टात दावा लावला व तो रमाबाईंना जन्मभर पुरला." [२९]

ह्या प्रकाराने त्यांना किती मानसिक क्लेश झाले असतील ह्याची कल्पना येऊ शकते. तथापि, श्री विद्वांस लिहितात– "रमाबाईंनी ह्या कुणावद्दलही रागाचा कटू शब्द काढला नाही– कुणी तसे काढल्यास त्या ऐकण्यासही त्या नाराजी दाखवत. ह्याचा अर्थ त्यांची वृत्ती संवेदनशील नव्हती, असे नाही. पण त्यांचा मनःसंयम सामर्थ्यवान होता.... असे अनुभव मनुष्य स्वभावाची जाण वाढवतात. व्यक्तीच्या वृत्तीला अलिप्तता आणतात. तिच्यामुळे दुःखापेक्षा आपण आपले कर्तव्य केले हे समाधान रमाबाईंना वाटत राहिले." [३०]

आईपणाचा अनुभव देणारे हे दोन्ही संबंध रमाबाईंना वेगवेगळ्या कारणाने अपयश देऊन गेलेले दिसतात. तथापि, रमाबाईंच्या वृत्तीत बदल झालेला दिसत नाही.

चुलत पुतण्याने आणून ठेवलेला नातू राजाराम व सखूताई गेल्यावर तिचा मुलगा ही दोन्ही नातवंडे रमाबाईंनी पुन्हा पहिल्यापासून त्याच कर्तव्यनिष्ठेने लेकरांप्रमाणे वाढवलेली दिसतात.

एव्हांना रमाबाईंचे सामाजिक व शैक्षणिक कार्य खूपच विस्तारले होते. अशा वेळी ही शिशुसंगोपनाची जबाबदारी पुन्हा त्यांच्यावर येऊन पडली. श्री. विद्वांस म्हणतात– "परंतु प्रखर कर्तव्य निष्ठेमुळे त्यांनी तिच्याकडे पाठ फिरवली नाही. पण तान्ह्या मुलांना वाढविण्यासाठी काय काय करावे लागते, हे ज्यांनी स्वतः केले असेल त्यांनाच ह्याची कल्पना येऊ शकेल." [३१]

ते पुढे सांगतात– "मला सर्दी-खोकला फार लवकर होई, पचनशक्तीही नाजूक होती. अतिशय जपावे लागे. प्रत्यक्ष जन्मदात्री घेऊ शकली नसती, इतकी बारीकपणे रमाबाईंनी माझी काळजी घेतली. संस्थेच्या कामासाठी बाहेरगावी जाताना बहुतेक वेळी त्या मला व राजारामाला बरोबर घेऊन जात, बरोबर आम्हांला संभाळण्यासाठी बाई असे." [३२]

ह्या दोघांना योग्य वेळी शाळेत घालणे, खाजगी शिक्षक ठेवून अभ्यास करवून घेणे, मुलांच्या मनाला वळण लावण्यासाठी बोधप्रद गोष्टी व कविता वाचून दाखवणे, प्रसंगी आईसारखे रागावून शिस्त लावणे, सुट्टीच्या दिवशी आपल्याबरोबर फिरायला नेणे, इतर शाळेतील मुलांच्या कार्यक्रमांना नेणे हे सर्व रमाबाईंनी ह्या मुलांसाठी केलेले चरित्रावरून दिसून येते. श्री. विद्वांस लिहितात–

"मुलांच्या मनात त्यांच्याविशयी प्रेम, निष्ठा व आदर असे. पण त्यांच्या स्थिर, शांत व समतोल वागण्यामुळे मुलांना त्यांची कंधी भीती वाटत नसे. बालमन त्या जाणून घेत. आपण दिवसभरात काय खेळलो, शाळेत काय झाले, मित्रांशी काय बोलणे झाले ह्यासंबंधी जेवणापूर्वी रमाबाईंजवळ सांगायचे, असे आम्हा मुलांना वळणच होते." [३३]

दोघांच्याही मुंजी रमाबाईंनी साग्रसंगीत थाटाने केलेल्या दिसतात. आईविना मुले, तेव्हा

समारंभात कोणतीही उणीव राहू न देण्याची त्यांनी दक्षता घेतलेली दिसते.

ह्यानंतर वर्षभरातच रमाबाईंचे जावई बापूराव विद्वांस निधन पावलेले दिसतात. विद्वांस सांगतात– "मी दहा-बारा वर्षांचा होताच बापूराव माझी जबाबदारी घेतील व आपल्याला कर्तव्यपूर्तीचे समाधान मिळेल अ गी त्यांना आशा होती. ती नष्ट झाली."

हा धक्का रमाबाईंना जबरदस्त होता. तथापि, हताशपणाला त्यांच्या स्वभावात स्थान नव्हते. त्यांनी मला प्रेमाने, हळुवारपणे वाढवले. माझ्या आईवडिलांसंबंधी कोणतीही गोष्ट त्या माझ्यासमोर बोलत नसत.[३४]

नानूप्रमाणे ह्या नातवांवरील अन्यायाचाही रमाबाई दक्षपणे प्रतिकार करताना दिसतात. एकदा एका शिक्षकाने त्यांच्या विद्वांस ह्या आडनावावरून कोटी करून हिणवले. तेव्हा रमाबाईंनी तत्काळ ती बाब मुख्याध्यापकांपर्यंत नेऊन त्यांच्याकरवी, निष्पाप अभागी मुलांशी असे वागणे निर्दयतेचे द्योतक आहे, अशी त्यांची कानउघडणी करवलेली दिसते. रमाबाईंची मुलांना वाढवण्यातली आणखी एक पद्धत लक्षणीय वाटते. चरित्रकार त्याबद्दल सांगतात–

"मुलं खोड्या करायचीच. त्या त्रासदायक वा अपायकारक नसतील तर तेवढी सवलत मुलांना देणे आवश्यक आहे, ह्याचे त्यांना भान होते. मुलांनी बागेतल्या झाडावर चढणे, पेरू, जांभळे, कैऱ्या खाणं, ह्याला त्या मोकळीक देत. पण फुलपाखरं, खारी वगैरे प्राण्यांना त्रास दिला, तर त्यांना चालत नसे, त्या कानउघडणी करत. मुलांनी आपसात खोड्या केल्यास 'मी बोलणार नाही' अशी ताकीद देत किंवा फारतर एखादी हलकी चापट मिळे. पण असे प्रसंगही अपवादानेच येत. पण मुलांना एवढी शिक्षा होणेदेखील कमीपणाचे वाटे."[३५]

पुढे एके ठिकाणी ते स्पष्टपणे म्हणतात– "रमाबाईंनी मला व राजारामला दोघांना अगदी सारखे वाढविले. दोघांसाठी त्या प्रत्यक्ष आईच होत्या."[३६]

दोघेही कॉलेजात गेले आणि रमाबाई आपल्या कर्तव्यातून निश्चिंत झालेल्या दिसतात.

१९०४ ते १९२४ ही वीस वर्षे रमाबाईंच्या जीवनात स्त्री-जीवन विकास, समाज सुधारणा व राजकीय चळवळी ह्या दृष्टीने किती व्यस्त स्वरूपाची होती, हे आपण पाहिले आहे. त्या पार्श्वभूमीवर रमाबाईंनी 'कुटुंबवत्सल स्त्री' म्हणून घरातील सर्वांच्या विकासासाठी व सुखासाठी जी जागरूकता दाखवलेली दिसते, ती महत्त्वाची वाटते.

पत्नी, गृहिणी, आई ह्या नात्यांप्रमाणेच आणखी एक 'नाते' रमाबाईंनी जन्मभर जोपासलेले दिसते व ते म्हणजे 'मैत्रिणीचे'. त्यांच्याविषयी त्या काळातील सुप्रसिद्ध समाजकार्यकर्त्या व लेखिका पद्मिनी सेनगुप्ता लिहितात– "She had a unique knack of making friends of all those she came into contact."[३७]

त्यांच्या सहवासात आलेल्या अनेक देशी-विदेशी स्त्रिया, सरकारी अधिकाऱ्यांच्या पत्नी, गव्हर्नरच्या पत्नी, राजघराण्यातील स्त्रिया तसेच पार्शी, ख्रिश्चन, मुसलमान इत्यादी प्रतिष्ठित स्त्रियांशी त्यांचे अतिशय स्नेहाचे संबंध दिसतात व त्यांतल्या काहींशी तर त्यांचे खूप जिव्हाळ्याचे संबंध जुळले होते.

त्या काळात मुंबई इलाख्याला काही सहृदय गव्हर्नर लाभले होते. भारतीय जनतेच्या, विशेषतः स्त्रियांच्या उन्नतीसाठी होणाऱ्या उपक्रमांत त्यांचे सहकार्य असे. अशा लॉर्ड रे, नॉर्थकोट इत्यादींच्या पत्नींशी रमाबाईंचे स्नेहाचे संबंध होते. स्वदेशी जाण्यापूर्वी लेडी नॉर्थकोट १९०३ मध्ये पुण्यात आल्या होत्या. तेव्हा त्या स्वतः रानडेवाड्यात जाऊन त्यांनी रमाबाईंची भेट घेतल्याचा उल्लेख ९ जुलै १९०३ च्या 'टाइम्स'मध्ये आढळतो. रानड्यांच्या निधनामुळे रमाबाई अद्यापं सभा- समारंभांना जात नसल्यामुळे लेडी नॉर्थकोटच त्यांना भेटायला गेलेल्या दिसतात. गव्हर्नरच्या पत्नीने कुणाच्या घरी आपणहून जाणे ही घटना अपूर्वच आहे. पण लेडी नॉर्थकोटचे रानडे दांपत्याशी अतिशय स्नेहाचे व जवळचे संबंध होते.

लेडी रेपण त्यांना जवळून ओळखत होत्या. त्यांनी न्या. चंदावरकरांजवळ काढलेले उद्‌गार ह्याची साक्ष देतात. त्या म्हणाल्या– "मि. रानडे ह्यांनी स्वीकारलेल्या अल्पवयीन कुमारिकेच्या व्यक्तिमत्त्वांत, विवाहोत्तर उत्कृष्ट शिक्षणाने उत्क्रांती घडवून, समाजाला इतक्या सुविद्य, सुसंस्कृत आणि कर्तृत्ववान रमाबाई रानडे देऊन, पूर्ण भरपाई केली आहे."[३७(ब)]

हिंदुस्थान सोडून जाताना त्यांनी रमाबाईंना पाठवलेले पत्र त्यांचे नातू श्री. विद्वांस ह्यांच्या संग्रहात वाचायला मिळते. त्या त्यात लिहितात– "India, I cannot leave without writing to thank you for the great help you have given to the nurses.... you are conferring a great blessing on Poona and the less advanced Poona Hindu Woman."

लेडी नॉर्थकोटप्रमाणेच मिसेस मूर मॅकेन्झि ह्या त्या वेळच्या 'हिंदू स्त्रियांची मैत्रीण' म्हणून प्रख्यात असलेल्या आयरीश स्त्रीशी पण त्यांचा स्नेह संबंध होता.

१-८-१९०६ ला आपल्या पतीला लिहिलेल्या पत्रात सखूबाई लिहितात– "परवाचे दिवशी आम्ही येथून मिस सोराबजीकडे जाऊन, त्यांना बरोबर घेऊन मिसेस मूर मॅकेन्झिला भेटायला गेलो होतो. ती आली त्याच दिवशी ति. ताईला (रमाबाईंना) आपल्या घरी येण्याविषयी तिने आग्रह केला व दिवसही ठरवून ती गेली. उद्या सकाळी आम्ही मिसेस गिबकडे जायचे ठरवले आहे."

त्या काळी पावसाळ्यात गव्हर्नरचा मुक्काम पुणे येथे असायचा व उन्हाळ्यात महाबळेश्वरास. त्यामुळे ह्या काळात रमाबाईंचा अधिक संबंध ह्या अधिकारी स्त्रियांशी आलेला दिसतो.

गव्हर्नर लॉर्ड रे ह्यांच्या पत्नीशीपण रमाबाईंचा स्नेह होता. अशा अनेक परदेशी, परधर्मी स्त्रियांची स्नेहपूर्ण पत्रे, आजही रमाबाईंचे नातू श्री. विद्वांस ह्यांच्या संग्रही पाहावयास मिळतात. यात काही मुस्लिम मान्यवर स्त्रियापण आहेत. रमाबाईंच्या स्नेहवर्तुळात त्या काळातील सुशिक्षित पार्सी व ख्रिश्चन स्त्रियापण होत्या, हे त्यांच्या पत्रांतून तसेच सभेच्या वृत्तांतांतून लक्षात येते. श्री. विद्वांस म्हणतात–

"कळत नकळत जे राष्ट्रहितकारक काम साधले गेले त्या विषयी त्यांची एक ख्रिश्चन मैत्रीण

सुझी सोराबजी १९२५ साली दिलेल्या भाषणात म्हणते– "I remember how marvellously she gained the confidence and trust of the English people here, and brought understanding between east and west."

मी लंडनला असताना ह्यांतील अनेक इंग्रजी मित्रांना भेटले. त्यांनी रमाबाईं रानड्यांची आठवण काढली. म्हणाले, आम्ही आणि विशाल हिंदू राष्ट्रातील ती एक link आहे. मुस्लिम व पारसी स्त्रियांना पण असेच वाटत असे, की 'ती' आपल्याला समजू शकेल.[३९]

रमाबाईंविषयी असा स्नेहपूर्ण विश्वास असल्यामुळे बहुधा त्यांनी पुढाकार घेतलेल्या सर्व सभांत, कार्यांत ह्या भिन्नधर्मीय स्त्रिया सहभाग घेताना त्यावेळच्या वृत्तपत्रातील अहवालातून दिसतात.[२७] फेबु. १९१७ ला माधवबागेत फिजी बेटातील हिंदी लोकांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी रमाबाईंच्या प्रेरणेने सभा भरली होती. तिचा वृत्तांत २-३-१९१७ च्या 'ज्ञानप्रकाशात' आला आहे. रमाबाईंच्या भाषणाचा अहवाल देऊन पुढे पत्रप्रतिनिधी सांगतो– "ह्या सभेत मिस सिरीन कार्सेटजी, मिसेस एम. के. गांधी, लेडी फाजलभाई, कृष्णगौरी सेटलवाड, मिसेस ताराबाई चुनीलाल मेहता, मिसेस तैयबजी, मिसेस कामरुद्दीन लतीफ, लेडी मेहेरबाई दोराबजी वगैरे अनेक स्त्रियांची भाषणे झाली."

रमाबाईंविषयी स्नेहाबरोबरच, वेगवेगळ्या कारणांसाठी त्यांच्याविषयी आदर बाळगणाऱ्या मैत्रिणीपण ह्या पत्रव्यवहारातून भेटतात. मुंबईचे गव्हर्नर क्लार्क ह्यांची कन्या मिस व्हायलेट क्लार्क ह्यांचा रमाबाईंशी स्नेहाचा संबंध होता.

श्रीमती सरोजिनी नायडू एका पत्रात रमाबाईंना लिहितात– "मिस् क्लार्क मला म्हणाल्या, की पुण्यात असताना मिसेस रानडे यांच्या स्नेहाचा लाभ होतो. त्यांना आपणाविषयी फार आदर वाटतो. तसेच त्यांच्या वडिलांना पण (गव्हर्नर यांनाही) वाटतो."

सरोजिनी नायडू त्या वेळी पंचविशीच्या तरुणी होत्या. समाजकार्य करत होत्या. गव्हर्नरच्या बायको-मुलींशी मैत्री असण्याइतकी, गव्हर्मेंट हाऊसवर उतरण्याइतकी प्रतिष्ठा त्यांना प्राप्त झाली होती असेही दिसते. तथापि, रमाबाईंशी त्यांचेही संबंध आत्यंतिक आदराचे दिसतात. त्या एका पत्रात लिहितात–"पेशव्याच्या राजधानीतील कर्तृत्वाच्या प्रमुख मार्गदर्शकांपैकी आपण एक आहात_आपल्या आणि माझ्या अंतःकरणाशी निकट असलेल्या बऱ्याच काही गोष्टींविषयी मला आपली सल्लामसलत घ्यायची आहे...."

आणखी एका पत्रात लिहितात– "आपली अभिनंदनाची तार मिळाली. त्यामुळे आपणाला पत्र लिहून आपल्या नावाचा प्रभाव भारतात सगळीकडे किती शुभ आणि मनोवृत्तीकारक असतो हे आपणास सांगण्याची संधी मिळाली."[४०]

रमाबाई महिला परिषदा, सभा वगैरेंच्या निमित्ताने कलकत्ता, मद्रास वगैरे ठिकाणी जात असत. त्यामुळे त्यांचा प्रभाव सर्वत्र पसरलेला दिसतो. मुंबईतील कामा हॉस्पिटलमधील स्त्री-रोग तज्ज्ञ डॉ. पिची फिपसन् ह्यांचीपण रमाबाईंशी मैत्री होती.[४१] हिंदू स्त्रिया-पुरुष डॉक्टरांपुढे जायला संकोचतात, म्हणून बायकांसाठी संपूर्ण स्त्री-डॉक्टर असलेले हे एकमेव

हॉस्पिटल होते. पण इथेही जायला बायका बिचकत. तेव्हा डॉक्टर व स्त्रिया यांची गाठ घालून देण्याचे काम दोन्ही वर्गांशी परिचय व स्नेह असलेल्या स्त्रीनेच करायला हवे होते व हे काम रमाबाईंनी केल्यामुळे डॉ. पिची फिपसन्‌ला रमाबाईंविषयी फार स्नेहादर होता, असे श्री. विद्वांस आपल्या संग्रहातील फिपसन्‌च्या पत्रावर टीप लिहिताना म्हणतात. उद्योगपती ठाकरसी कुटुंबातील स्त्रियांशीपण रमाबाईंचा किती स्नेह होता हे त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त लिहिलेल्या प्रेमलीला ठाकरसी यांच्या आठवणींतून दिसून येते.[४२]

ह्या वरिष्ठ वर्गातील, भिन्न जाती-धर्माच्या स्त्रियांप्रमाणेच मध्यमवर्गीय स्त्रियांशी पण रमाबाईंचे जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित झालेले दिसतात. न्यायमूर्तींच्या निधनानंतर मुंबईतील मध्यमवर्गीय महिलांचे एक अतिशय सहवेदनेने लिहिलेले सांत्वनपर पत्र श्री. विद्वांसांच्या संग्रहात पाहावयास मिळते. पत्राखाली 'आपल्या दुःखित भगिनी' अशी सही असून त्यात मराठी स्त्रियांबरोबरच धनकोरबाई माधवदास,* बाई फातमाबाई वली मामद, बाई जैनाबाई महंमद अशा गुजराथी, मुस्लिम स्त्रियांची पण नावे दिसतात.

पुण्यासारख्या पारंपरिक वृत्तीच्या अस्सल मराठी शहरात वास्तव्य असलेल्या व पारंपरिक वळणाच्या घरात अख्खा जन्म काढलेल्या रमाबाईंचा हा मैत्रिणींचा व चाहत्यांचा संमिश्र परिवार पाहता व त्यांच्या सहकार्याने सतत वाढत गेलेला कामाचा व्याप पाहता न्यायमूर्तींप्रमाणे रमाबाईंचे जीवनही खूप समृद्ध व चैतन्यशील झाले होते, असे म्हणावेसे वाटते.

ह्या भिन्न जाती-धर्मांतील, वेगवेगळ्या थरांतील मैत्रिणींप्रमाणेच, समवयस्क पुरुषवर्गातही रमाबाईंचे वावरणे सहज, मोकळेपणाचे होते, असे दिसते.

न्यायमूर्तींच्या निधनानंतर रमाबाईंचे कार्यक्षेत्र जसे वाढू लागले तशा त्या सुट्टीत अधूनमधून विश्रांतीसाठी पूर्वीप्रमाणे लोणावळ्याला जाऊन राहत असत, असे त्यांच्या चरित्रात नोंदवले आहे. तेथील त्यांच्या दिनक्रमाविषयी लिहिताना चरित्रकार श्री. विद्वांस लिहितात– "लोणावळ्यासही रमाबाईंकडे पुष्कळ पाहुणे यायचे. संध्याकाळच्या वेळी भांडारकर, चंदावरकर, न्या. तेलंगांचे चिरंजीव, नानू कोठारे हे सुधारक मित्र सहकुटुंब यायचे. त्यांच्यासाठी साध्या खुर्च्या, आराम खुर्च्या, जाजमे वगैरे अंगणात मांडलेले असत. अनेक विषयांवर सर्वांच्या गप्पा चालत."[४३]

आणखी एके ठिकाणी ते लिहितात– "रवीन्द्रनाथ टागोर, जगदीशचन्द्र आणि लेडी अबला बोस, ॲनी बेझंट यांनापण मी रमाबाईंकडे पाहिले आहे.... पुष्कळ इंग्रज अधिकारी सपत्निक यायचे."[४४]

थोडक्यात कौटुंबिक जीवनाइतकेच रमाबाईंचे स्नेहवर्तुळ गजबजलेले दिसते. विविध नातेसंबंधांतून रमाबाईंचे जीवन न्याहाळता न्याहाळता शेवटी मनात कुतुहल उभे राहते ते हे,

---

* अगदी सुरवातीच्या पुनर्विवाहित स्त्रियांपैकी एक. ह्यांना रानड्यांनी लग्नात मदत केली होती. पुढे समाजाकडून त्यांना खूप छळ सोसावा लागत होता.

की एक व्यक्ती म्हणून त्या कशा जगल्या ? ह्या प्रश्नाच्या प्रकाशात रमाबाईंचे जीवन थोडे पुन्हा पाहूया.

त्यांच्या पूर्वायुष्यात आपण पाहिलेच आहे, की त्या आपल्या थोर पतीच्या विचारांना आत्मसात करीत स्वतःला घडवीत गेल्या.

न्यायमूर्तींच्या निधनानंतर त्या प्रार्थना समाजाद्वारे न्यायमूर्तींनी दाखवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वाच्या प्रकाशातच अर्थपूर्ण जीवनाच्या वाटेवर वाटचाल करताना दिसतात.

हे तत्त्व म्हणजे– "मनुष्याने केलेले सगळे कायदे आणि नियम यांच्याही वर असणारा एक शाश्वत धर्म आहे. त्याचे अधिष्ठान न्याय व समता, दया व अनुकंपा, अंतःकरणातून मिळणाऱ्या सदसद्विवेकाच्या प्रेरणा हे आहे."

त्यांच्या ह्या मार्गदर्शक सूत्राचे एक अधिष्ठान 'न्याय' हे आहे. स्वतःवरील व्यक्तिगत न्याय-अन्यायापेक्षा इतरांवरील अन्यायाच्या विरुद्ध त्या आवर्जून झगडताना दिसतात. स्त्रियांना न्याय मिळावा. समान हक्क मिळावेत म्हणून त्यांनी काय काय केले ते आपण पाहिलेच आहे. व्यक्ती म्हणून अवतीभवतीच्या अन्यायाचे वरपर्यंत जाऊन त्यांनी केलेले निराकरण आपण पाहिले आहे. अशा वेळी अन्याय झालेली व्यक्ती छोटी का मोठी आहे, एकटीच आहे का अनेक आहेत, हा विचार त्यांनी केलेला दिसत नाही. विधवांबाबत दाखवलेल्या अनुदारवृत्तीचा तर भरसभेत निषेध करताना त्यांना आपण पाहिले आहे. ह्याचेच आणखी एक-दोन दाखले पाहूया.

चरित्रकार सांगतात– "त्या काळी गरीब, असहाय विधवांबद्दल टीका करणे, स्त्री-शिक्षणाची टवाळी करणे हे धार्मिकतेचे गमक मानले जात असे. रमाबाई स्त्री-शिक्षणाच्या पुरस्कर्त्या असल्याने त्यांच्या कानावर ही निंदा जावी, असे ह्या लोकांना वाटे. एकदा माझ्या एका विधुर शिक्षकाने वर्गात आम्हा सर्व विद्यार्थ्यांसमोर म्हटले– "विधवा बायका सेवासदनात जाऊन शिकू लागल्यापासून स्वैपाकासाठी बाई मिळण्याची फार पंचाईत झाली आहे. त्यामुळे माझे जेवणाचे हाल होत आहेत." यावर वर्गातील मुले हसू लागली.

रमाबाईंच्या कानावर हे जाताच त्यांनी ताबडतोब ही हकीगत मुख्याध्यापकांच्या कानावर घालून त्या शिक्षकाला ताकीद देवविली.[४५] लहान मुलांच्या मनात स्त्रियांची अवहेलना करण्याची वृत्ती उतरू नये, म्हणून रमाबाईंनी हे पाऊल उचललेले दिसते. अशीच आणखी एक जागरूक कृती रमाबाईंनी केलेली दिसते. त्या काळीं मेळ्यातून म्हटल्या जाणाऱ्या पदांतून स्त्रियांची वाईट भाषेत टवाळी केली जायची. अशा एका असभ्य पदासंबंधाने 'केसरी'त अनुकूल अभिप्राय आलेला दिसला. त्याबरोबर त्याच्या निषेधार्थ रमाबाईंनी सेवासदनात स्त्रियांची सभा घेण्याचे ठवले. त्या वेळी केसरीचे संपादक श्री. न. चिं. केळकर होते. त्यांना हे कळताच त्यांनी आपल्या गैरहजेरीत झालेल्या ह्या चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त करणारे पत्र रमाबाईंना पाठवून आपला खेद व्यक्त केलेला दिसतो. 'अशी पदे पुन्हा छापली जाऊ नयेत अशी खटपट करण्यास मी यापूर्वीच लागलो आहे,' असे त्यांनी कळवले.[४६]

आपल्या सदसद्‌विवेकबुद्धीने स्वीकारलेल्या तत्त्वांच्या बाबतीतही त्या कणखर राहिलेल्या दिसतात.

श्री. विद्वांस आपल्या एका लेखात सांगतात– "१९१५ साली भरलेल्या सामाजिक परिषदेला रमाबाईंना अध्यक्ष म्हणून निमंत्रित केले होते. तिथे विधवाविवाहाला पाठिंबा देणारा ठराव मांडण्यात यायचा होता."

रमाबाईंची सरसकट विधवाविवाहास मान्यता नव्हती. त्यामुळे आपल्या तत्त्वाशी न जुळणाऱ्या सभेच्या अध्यक्षपदाचा मान त्यांनी स्वीकारलेला दिसत नाही.

त्यांच्या लेकीच्या लग्नाचे वेळीपण असाच तत्त्वाचा कस लागण्याचा प्रसंग आलेला दिसतो. त्याचे असे घडले–

रमाबाईंनी प्रथम आपल्या लेकीसाठी, समाजसुधारणेविषयी आस्था दाखवणाऱ्या न्यायमूर्तींच्या एका स्नेह्याचा मुलगा पाहिला. परंतु मुलगी सज्ञान झालेली असल्याने ह्या पापाच्या क्षालनार्थ व्रात्यस्तोम विधी केला पाहिजे व देवदेवक ठेवणाऱ्याने प्रायश्चित घेतले पाहिजे, असे मुलाच्या आईवडिलांनी कळवले. ही हकीगत सांगून विद्वांस सांगतात– "समाजसुधारक म्हणवणाऱ्याने अशी अट घालावी, याबद्दल रमाबाईंना वाईट वाटले. अशा अटीपुढे नसते घेणे हे आपल्या पतीच्या तत्त्वाविरुद्ध आहे व आपल्याला कमीपणा आणणारे आहे, म्हणून रमाबाईंनी आपल्याला अट मान्य करता येत नाही, असा निरोप पाठविला."[४७] पुढे त्यांनी बिजवर व वयाने थोडा मोठा पण आपल्या सुधारकी मतांशी जुळणारा, हुशार मुलगा लेकीसाठी ठरवलेला दिसतो.

केशवपनाबाबत आपल्या दोन्हीकडील घराण्यांच्या पूर्वपरंपरा डावलून रमाबाईंनी आपल्या तत्त्वासाठी दाखवलेला ठामपणा आपण पाहिला आहे. सकेशा राहिल्यामुळे अपंक्त होण्याचे वा विठ्ठलाचा पदस्पर्श न मिळण्याचे दुःखपण त्यांनी स्वीकारलेले दिसते.

सेवासदनात जातिपाती-धर्माचा भेदाभेदही त्या पाळत नसत, हे आपण पाहिलेच आहे. ह्या विषयी डॉ. जेरूशा झिराड, या एक जुनी आठवण सांगतात. त्या लिहितात– "त्या हुजुरपागेच्या वसतिगृहातील मुलींना आपल्या घरी येण्यास निमंत्रण देत. आम्हा ज्यू आणि ख्रिश्चन मुलींना रमाबाईंच्या घरातील उच्च ब्राह्मणी रीतिरिवाज पाळण्यात आपल्या हातून काही चूक होईल अशी भीति वाटे. रमाबाईंच्या हे लक्षात येई आणि त्या आम्हांला म्हणत– 'तुम्ही आपल्या घरी जशा वागता तशाच मोकळेपणाने इथे वागा.' आम्हा सर्वांचे त्या सारख्याच प्रेमाने आतिथ्य करीत."[४८]

न्याय, समता ह्यांबरोबर दया व अनुकंपेचा पण हृद्य आविष्कार त्यांच्या आचरणात दिसतो. "शिकणाऱ्या लहान मुलाबद्दल त्यांना नेहमीच आस्था वाटे,"[४९] ह्या श्री. विद्वांसांच्या विधानाचा प्रत्यय त्यांच्या आयुष्याकडे पाहताना अनेकदा येतो. न्यायमूर्ती असताना तर अनेक विद्यार्थी त्यांच्या घरी राहून शिक्षण घेताना दिसतात. पण त्यांच्या निधनानंतर त्याहीपेक्षा, सर्व घरदार इस्टेट, दत्तक मुलांच्या स्वाधीन करून रमाबाई सेवासदनात राहायला आल्यावरही

आपल्या व्यक्तिगत उत्पन्नातूनही त्या अनेक गरीब विद्यार्थ्यांना मदत करताना दिसतात. ह्याविषयी एक आठवण त्याचे नातू श्री. विद्वांस सांगतात–

"जोशी आडनावाच्या एक विधवा बाई आमच्या घरी पापड-लोणची घालायला यायच्या. त्या. आपल्या कृष्णा नावाच्या हुशार मुलाचे प्रगतिपुस्तक, बक्षिसे हौसेने रमाबाईंना दाखवायच्या. रमाबाईं पालक म्हणून कौतुकाने प्रगतिपुस्तकावर सही करायच्या. पुढे त्याची आई वारल्यावर रमाबाईंनी त्याला आपल्या घरी ठेवून त्याचे शिक्षण केले."[५०] पुढे हा मुलगा मोठा अधिकारी झालेला दिसतो.

विद्यार्थ्याविषयी रमाबाईंना वाटणारी आस्था दाखवणारा आणखी एक प्रसंग पाहा. रमाबाई त्या वेळी नातवांना घेऊन सुट्टीत लोणावळ्याला गेल्या होत्या. एक रात्री जेवणखाणे आटोपल्यावर अचानक, रत्नागिरीच्या हायस्कूलचे एक शिक्षक सहलीला आणलेल्या विद्यार्थ्यांना घेऊन चौकशी करत त्यांच्या बंगल्यावर पोहोचले. त्यांच्या जेवणाखाण्याची कुठे सोय होत नव्हती. म्हणून तांदूळ व भांडी मिळतील का, असे ते विचारत होते. ह्यावर श्री. विद्वांस म्हणतात– "आईने आतून ऐकले व सर्वांना आपल्याकडेच जेवावयास बोलवा, असे मला त्यांना सांगण्यास सांगितले व अर्ध्या तासात स्वैपाकाच्या बाईला मदतीला घेऊन नव्याने स्वैपाक करून सर्वांची पाने मांडली .... आईचे वागणे नेहमी असेच असे."[५१]

आणखी एके ठिकाणी ते लिहितात– "रमाबाईंचा स्वभाव अत्यंत करारी, बाणेदार व मानी असा होता. परंतु गर्वाचा त्यांच्यामध्ये अगदी अभाव होता. त्यांच्या स्वभावातील दुसरी बाजू म्हणजे मनाचा प्रेमळपणा व कोमलपणा. रस्त्यावर कोणी एखादे मूल रडत असल्यास त्यांचा जीव थोडाथोडा होत असे. त्या शक्य तिथे त्या मुलाला शांत करायला थांबायच्या."[५२]

त्यांच्या समकालीन एक कर्तृत्ववान स्त्री श्री. झिराड यांची रमाबाईंच्या संदर्भातली प्रतिक्रिया अशीच दिसते. त्या लिहितात– "आपल्या कार्यातून आणि वागण्यातून रमाबाईंनी स्त्रियांपुढे जीवनाचा आदर्शच उभा केला आहे. त्यांच्या स्वभावातील विशेष चित्ताकर्षक गुण म्हणजे, त्यांची शालीनता आणि वागण्यातला साधेपणा."[५३]

डॉ. झिराडांच्या प्रमाणे त्या काळातील आणखी एक समर्थ स्त्री म्हणजे डॉ. रखमाबाई. महिला परिषदेनिमित्ताने त्यांना रमाबाईंना जवळून पाहण्याचा योग आलेला होता. त्या लिहितात– "त्यांचा सुरतेस मुक्काम सुमारे सहा दिवसांचा होता. त्या अवधीत त्यांच्या अनुपम थोरवीचे आणि निस्वार्थीपणाचे स्वरूप पाहण्याची संधी मला मिळाली. सुरतेस कोणी भेटावयास आल्यास गरीब-श्रीमंत असा विचार न करता विश्रांतीच्या वेळातही स्वतःच्या आरामाकडे न बघता त्यांना आनंदाने भेटत. तसेच त्या अध्यक्षा म्हणून उत्तम खोली व पलंग मी त्यांना दिला होता. तर तो पलंग त्यांनी सखूताई व तिच्या बाळाला देऊन, खोली आपल्याबरोबर आलेल्या इतर स्त्रियांना सुखावह व्हावे म्हणून दिली व आपण व्हरांड्यातील झोपाळ्यावर झोपल्या," अशी आठवण त्या सांगतात.

त्यांनी सांगितलेली आणखी एक आठवण महत्त्वाची वाटते. प्रत्येक स्त्रीला ज्या दुहेरी

जबाबदारीला सामोरे जावे लागते ती म्हणजे, आपले कार्य आणि मुलासंबंधी कर्तव्य! त्याबाबत रमाबाईंचे वर्तन पाहा. डॉ. रखमाबाई लिहितात– "सुरतेस येताना मुलांच्या देखभालीसाठी नेहमीची बाई रमाबाईंनी बरोबर आणली होती. तरी सौ. सखूबाईच्या लहान बाळाचे न्हाणे, दूध पाजणे रमाबाई स्वतः करीत. रमाबाईंनी संगोपन केलेल्या दूरच्या नात्यातल्या 'राजाराम' ह्या तीन वर्षांच्या मुलालाही त्यांनी बरोबर आणले होते. त्याने हट्ट घेतला म्हणून त्याला खाऊ घालणे रमाबाई स्वतः करीत."[५४]

त्यांच्या ह्या अशा स्वार्थनिरपेक्ष, तत्त्वनिष्ठ वागण्यामुळे त्यांना समाजातही एक आदरणीय व अनुकरणीय व्यक्ती म्हणून मान मिळालेला दिसतो.

श्री. विद्वांस लिहितात– "न्या. रानड्यांची मित्रमंडळी रमाबाईंना घरातील वडील भावजयीसारखा मान देत. कौटुंबिक गोष्टींतही त्यांचा सल्ला घेत."

न्यायमूर्तींचे मित्र श्री. दीनानाथराव माडगावकर ह्यांच्या जज्ज मुलाने रमाबाईंना पत्र लिहून– "हायकोर्ट जज्जच्या पत्नीने कसे वागावे, याचा योग्य उपदेश आपल्या पत्नीला करावा," अशी विनंती केली. तर प्रो. लेडी प्रेमलीला ठाकरसी आपल्या आठवणीत सांगतात की– "आमचे लग्न ठरल्यावर पतीने, श्री विठ्ठलदास ठाकरसी यांनी, मला पत्र लिहून मी रमाबाई रानड्यांचा आदर्श ठेवावा," असे सुचवले होते.[५५]

पुढे श्री. विद्वांस म्हणतात– "आपल्या सर्वसामान्य पातळीवर शिक्षित असणाऱ्या स्त्रियांनी अनेक बाबतींत आपल्या बरोबरीचे व्हावे अशी हुशार तरुणांची अपेक्षा असे. ती पूर्ण व्हावी म्हणून ते त्यांना रमाबाईंच्या हाती सोपवत."[५६]

आणखी वेगवेगळ्या प्रकारच्या गरजांसाठी समाजातील प्रतिष्ठित स्त्रिया रमाबाईंकडे विश्वासाने मदत मागताना दिसतात.* ह्या संदर्भात त्यांच्या चरित्रातील दोन घटना लक्षणीय वाटतात. श्री. विद्वांस लिहितात– "इंदूरच्या चंद्रावती राणीसाहेब होळकर यांना स्वतःसाठी म्हणून एका 'कंम्पॅनियन' स्त्रीची आवश्यकता होती. त्यांनी आपली अपेक्षा कळविणारे पत्र रमाबाईंना लिहिले. रमाबाईंनी पण तात्काळ श्रीमती पुरोहित नावाच्या बाईंना त्यांच्याकडे पाठवून दिले. श्रीमती लक्ष्मीबाई प्रधान ह्यापण अशाच लेडी ठाकरसी यांच्याकडे रमाबाईंनी पाठवल्या होत्या."[५७]

एवढ्या प्रतिष्ठित माणसांत सहजपणे वावरणाऱ्या रमाबाई आपल्या सहकारी वा आपल्याहून वयाने लहान असणाऱ्या स्त्रियांशी पण तेवढ्याच समान भूमिकेतून वागताना दिसतात. मिस जेरूशा झिराड यांचा हा अनुभव पहा. त्या लिहितात– "दुसऱ्याच्या गुणांचा अंतःकरणपूर्वक गौरव करणं त्यांचा स्वभाव होता. १९१४ त मुंबई इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांच्या पत्नीने नूरबाग येथे सूतिकागृह स्थापण्याच्या प्रचारासाठी सभा भरवली होती. श्री. रमाबाई, लेडी विलिंग्डन यांच्याबरोबर व्यासपीठावर होत्या. मी व डॉ. काशीताई

* श्रीधर व्यंकेतकर ह्यांचे पण १५.३.२३ चे पत्र उपलब्ध आहे. त्यांत त्यांनी रमाबाईंना कायदेशीर अनाथ मूल मिळवून देऊ शकेल का - अशी विचारणा केली आहे.

नवरंगे (पहिल्या स्त्री डॉक्टरांपैकी एक) खाली प्रेक्षकांत बसलो होता. त्यांचे लक्ष आमच्याकडे गेले. सभेचे काम संपल्याबरोबर त्या आमच्याजवळ आल्या व आम्हांला लेडी विलिंग्डन यांच्याकडे नेऊन आमचा परिचय करून दिला."

आणखी एका आठवणीत त्या सांगतात, "की बेने इस्त्रायली स्त्री-मंडळाच्या सभेत अध्यक्षा म्हणून भाषण करून त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले होते. सभा संपल्यावर माझ्या आईला बरे नसल्याचे कळताच त्या घरी जाऊन तिची व आमची विचारपूस करून आल्या."[५८]

ह्याच सहजपणाने त्या पंढरपूरच्या वारकरी म्हातारीशी बोलून तिच्या जवळची जुनी गाणी ऐकताना दिसतात.[५९]

त्या काळी प्रार्थना समाजाच्या नियमानुसार स्त्रिया सभासद होऊ शकत नव्हत्या व त्यामुळे तिथे जाऊन स्त्रियांनी उपासना चालविण्याचा प्रश्नच येत नव्हता. तथापि, रमाबाईंच्या बाबतीत अपवाद झालेला दिसतो. त्या प्रार्थना समाजाच्या स्त्रियांच्या मेळाव्यात व अधूनमधून संमिश्र मेळाव्यात उपासना चालविताना दिसतात.*

'एक व्यक्ती' म्हणून रमाबाईंचे अस्तित्व अशा तऱ्हेने समाजमान्य झालेले दिसते. न्यायमूर्तींच्या मागे असे अर्थपूर्ण व कर्तृत्वपूर्ण जीवन जगणाऱ्या रमाबाईंचा मृत्यूपण लक्षणीय ठरलेला दिसतो. रमाबाईंचा शेवटचा आजार व त्यानंतर झालेला मृत्यू हेदेखील त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी बरेच काही सांगून जातात.

आजार जसा वाढू लागला, हातून अधिक काही कार्य होण्याची शक्यता दिसेना, तेव्हा सहसा राग-दुःखाचा आविष्कार तीव्रपणे न करणाऱ्या रमाबाई 'जोपर्यंत काम करण्याची शक्ती आहे तोपर्यंत जगण्यात अर्थ आहे, नाहीतर काय जगात असून नसण्यासारखे पडून राहायचे,' असे कंटाळून म्हणताना दिसतात. आणि आपल्या जगण्याचा अर्थ संपत आला आहे हे जाणवल्यापासून त्यांनी आपले मन अलिप्त करायला सुरवात केलेली दिसते.

त्यांचे नातू लिहितात– "रमाबाईंना चिंता अनेक गोष्टींची होती. पण देह थकल्यावर सर्व लौकिक चिंतांच्या पलीकडे मनाला नेता यावे, एवढी तात्त्विक स्थिरवृत्तीही त्यांनी संपादली होती."[६०]

१९२४ साली रमाबाईंचे देहावसान झाल्यावर 'ज्ञानप्रकाशा'त त्यांच्या निधनाचे वृत्त देताना 'ज्ञानप्रकाश'कार लिहितात– "त्यांच्या निधनाची बातमी हा हा म्हणता पसरली, स्त्रियांचे थवेच्या थवे, त्यांच्या दर्शनार्थ लोटू लागले .... वसंत व्याख्यानमालेतील व्याख्यान बंद ठेवण्यात आले. स्त्रियांच्या डोळ्यांतून एकसारखा अश्रुप्रवाह चाललेला ज्यांनी पाहिला त्यांना श्री. रमाबाईसाहेबांच्या मृत्यूने स्त्री-जातीची एक प्रमुख पालनकर्ती नाहीशी झाली, अशीच सर्व स्त्रियांची भावना झाली असल्याचे स्पष्ट दिसून येत होते .... एक हजार स्त्री-पुरुषांचा समुदाय प्रेतयात्रेबरोबर चालत होता."[६१]

---

* प्रार्थना समाजाच्या पहिल्या स्त्री सभासद होण्याचा मान पुढे श्री वासुदेवराव केळकर ह्यांच्या दुसऱ्या पत्नीला मिळाला, हे प्रार्थना समाजाच्या इतिहासावरून कळते.

ह्या प्रेतयात्रेचे अपूर्वपण सांगताना 'ज्ञानप्रकाश'कार पुढे म्हणतात– "अपूर्व आणि विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे या समूहात शेपन्नास कुलीन स्त्रियाही होत्या. ब्राह्मणांच्या स्त्रियांचा प्रेतयात्रेबरोबर जाण्याचा प्रघात नसतो. पण शिक्षणाबद्दल व स्त्रियांच्या सर्वसाधारण उन्नतीबद्दल अविश्रांत श्रम करून रमाबाईंसाहेब यांनी जे प्रेम संपादन केले, त्या प्रेमाने स्त्रियांनी वहिवाटीची सीमा निर्भयतेने ओलांडली .... विधवा स्त्रीचे प्रेत जात असता त्याकडे स्त्री-समाजाची साहजिकच पाठ फिरते. पण याही संदर्भात अपवाद झाला. 'आपल्या कर्तव्यनिष्ठेने व उज्ज्वल आयुष्यक्रमाने या माऊलीने आपले खरे सौभाग्य कायम राखले' असेच उद्गार दुतर्फा उभ्या असलेल्या स्त्रियांच्या तोंडून निघाले व रमाबाईसाहेबांना अखेरचा प्रणाम करण्याकरता त्यांचे हात वर गेले."

रमाबाईंनी जन्मभर मराठी स्त्रीची पारंपारिक मानसिकता बदलण्यासाठी अनेक उपक्रमांद्वारे प्रयत्न केले. त्याचे फलित थोडेसे ह्या प्रसंगाद्वारे दिसून येते.

ह्याच पेपरात अग्रलेखात रमाबाईंचे मोठेपण मांडताना 'ज्ञानप्रकाश'कार शेवटी म्हणतात– "महाराष्ट्रातील, किंबहुना हिंदुस्थानातील स्त्री-शिक्षणाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा त्या शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांत श्रीमती रमाबाईसाहेबांचे नाव निःसंशय प्रामुख्याने गणले जाईल."

जन्मभर 'केसरी'ने रमाबाईंच्या कार्याची दखल घेतली नाही. तथापि, २९ एप्रिल १९२४ रोजी त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे निधनवृत्त लिहिताना म्हटले आहे–

"कै. रावसाहेब रानड्यांच्या हयातीतच वहिनीसाहेबांनी योग्यता समाजास कळून आली होती. तथापि, ज्याप्रमाणे सूर्याच्या सान्निध्यात चंद्राचा प्रकाश दुणावत नसून उणावतो, त्याप्रमाणे न्यायमूर्तींच्या व्यापक तेजात रमाबाईंचे तेज भासमान होत नव्हते. परंतु सूर्यास्तानंतर जसा चंद्राचा शीतल प्रकाश प्राणिमात्रास आल्हाद देतो, त्याप्रमाणे गेली तेवीस वर्षे श्री. रमाबाईंनी आपल्या परोपकार बुद्धीने, स्त्री-शिक्षणाच्या पुरस्कर्तृत्वाने व मातृवात्सल्याने महाराष्ट्रीय समाजास ऋणी करून ठेवले आहे. न्यायमूर्ती गेल्यावरही पुण्याला जो पोरकेपणा भासला नाही, तो रमाबाईंसाहेबांच्या निधनाने आता भासू लागेल. गेल्या दोन तपांत पुण्यात सामाजिक सुधारणेची जी चळवळ निघाली तिला रमाबाईंचा हातभार नाही, असे सहसा घडत नसे."

श्रीमती रमाबाईंच्या निधनाने १९ व्या शतकाच्या अखेरचे पुणे व २० व्या शतकाच्या प्रारंभीचे पुणे यांच्यामधला एक मोठाच दुवा निखळला असे म्हणावयास हरकत नाही.

'सुबोध पत्रिका'कार लिहितात– "साधारणपणे पंचवीस कर्तृत्ववान माणसांना जे कार्य सहज व्हायचे नाही ते काम रमाबाईंनी करून दाखवले. त्यांची विविध कार्यांतील एकतानता पाहून नवीन माणूस थक्क होत असे. त्यांनी आपल्या भोवती धर्म्य वातावरण उभे केले होते. त्या पुढे होत्या म्हणून लोकांनी आपल्या घरातील बायांना सेवासदनात पाठविले. त्यांचे नैतिक वजन, त्यांचा दीर्घोद्योग व मनमिळाऊपणा ह्यांमुळे सेवासदनावर लोकांची श्रद्धा

बसली."

त्यांची मैत्रीण सुझी सोराबजी म्हणतात– "She had blazed the trail for women in practically trackless wild."[६२]

आणि शेवटी महात्मा गांधींची प्रतिक्रिया पाहा– "The death of Ramabai Ranade is a great national loss. She was the embodiment of all that a Hindu widow could be."[६३]

रमाबाईंची ह्या ऐहिक जगातील शेवटची कृती म्हणजे त्यांचे स्वतःचे मृत्युपत्र. त्याद्वारे त्यांनी आपले राहते घर व आपल्या 'आठवणीं'चे हक्क आपल्या अपत्यवत वाढवलेल्या संस्थेला देऊन टाकलेले दिसतात. आपल्या जीवित कार्याशी त्यांनी दाखवलेली ही समरसता घराबाहेर पडून कार्य करू पाहाणाऱ्या स्त्रीला बरेच काही सुचवून जाईल असे वाटते.

* *

संदर्भ सूची

१. आमच्या आयुष्यातील काही आठवणीः रमाबाई रानडे, पृष्ठ - २४१,२४२
२. श्रीमती रमाबाई रानडे - मा.श्री.विद्वांस पृष्ठ २०७
३. कित्ता : पृष्ठ ३०३
४. कित्ता : पृष्ठ २२७
५. कित्ता : पृष्ठ २३१
६. कित्ता : पृष्ठ २३४
७. कित्ता : पृष्ठ २३६
८. कित्ता : पृष्ठ २३६
९. कित्ता : पृष्ठ २३७
१०. कित्ता : पृष्ठ २३८
११. कित्ता : पृष्ठ २३
१२. कित्ता : पृष्ठ ११४
१३. कित्ता : पृष्ठ २३२,१९७
१४. कित्ता : पृष्ठ ११३
१५. श्रीमती काशीबाई कानिटकर, आत्मचरित्र ,आणि चरित्र : सरोजिनी वैद्य पान १६५
१६. श्रीमती रमाबाई रानडे : मा.श्री.विद्वांस, पृष्ठ - २९६
१७. कित्ता : पृष्ठ १०७
१८. कित्ता : पृष्ठ १०९
१९. कित्ता : पृष्ठ १०९- ११०
२०. कित्ता : पृष्ठ ११०- १११
२१. श्रीमती रमाबाई रानडे : उमाकान्त, पृष्ठ १०३

२२. श्रीमती रमाबाई रानडे: मा.श्री.विद्वांस, पृष्ठ ११०
२३. आमच्या आयुष्यातील काही आठवणी: श्रीमती रमाबाई रानडे, पृष्ठ : १४३,१४४
२४. कित्ता : पृष्ठ २४६
२५. श्रीमती रमाबाई रानडे: मा.श्री.विद्वांस, पृष्ठ २०७ ते २०९
२६. कित्ता : पृष्ठ ३०१
२७. कित्ता : पृष्ठ २१३-२१४
२८. कित्ता : पृष्ठ २२२
२९. कित्ता : पृष्ठ २२९
३०. कित्ता : पृष्ठ २३३
३१. कित्ता : पृष्ठ १९४
३२. कित्ता : पृष्ठ २६६
३३. कित्ता : पृष्ठ २७०
३४. कित्ता : पृष्ठ २७६
३५. कित्ता : पृष्ठ २८०-२८१
३६. कित्ता: पृष्ठ २८१
३७. पायोनियर विमेन ऑफ इंडिया : पी. सेनगुप्ता, पृष्ठ ४१
३८. श्रीमती रमाबाई रानडे - मा.श्री.विद्वांस, पृष्ठ २८९
३९. कित्ता
४०. कित्ता: पृष्ठ २९४-२९५
४१. कित्ता: पृष्ठ ११८
४२. अनुराधा, जन्मशताब्दी विशेषांक जानेवारी १९६२ रमाबाई रानडे
४३. श्रीमती रमाबाई रानडे: मा.श्री.विद्वांस, पृष्ठ २८०
४४. कित्ता: पृष्ठ २८९
४५. कित्ता: पृष्ठ २७८
४६. कित्ता: पृष्ठ २७९
४७. कित्ता: पृष्ठ २९१,१९२
४८. लोकसत्ता, २२ जाने. : विद्वांस लेख
४९. श्रीमती रमाबाई रानडे: मा.श्री.विद्वांस, पृष्ठ २८२
५०. कित्ता: पृष्ठ २८१
५१. कित्ता: पृष्ठ २७१
५२. कित्ता: पृष्ठ २६९
५३. कित्ता: पृष्ठ २९९
५४. कित्ता: पृष्ठ ३०१

५५. अनुराधा - रमाबाई रानडे जन्मशताब्दी विशेषांक ,जानेवारी१ ९६२
५६. श्रीमती रमाबाई रानडे: मा.श्री.विद्वांस,पृष्ठ २८७
५७. कित्ता: पृष्ठ २८९
५८. कित्ता: पृ ष्ठ २९९,३००
५९. कित्ता: पृष्ठ २८०
६०. कित्ता: पृष्ठ ३०८
६१. ज्ञानप्रकाश, २९ एप्रिल १९२४
६२. पायोनियर विमेन ऑफ इंडिया : प.सेनगुप्ता,पृष्ठ ४१
६३. यंग इंडिया,८ मे १९२४.

प्रकरण १०वे

समारोप

आतापर्यंत आपण रमाबाई रानड्यांच्या जीवनाचा व कर्तृत्वाचा तपशीलवार आढावा घेतला.एक अतिशय पारंपरिक कुटुंबातून आलेली अशिक्षित,अल्लड मुलगी.त्या वेळी रुपाने, बुद्धीने,कर्तृत्वाने न्यायमूर्तींच्या मानाने सुमार. रानड्यांच्या कर्तृत्वाचा, विद्वतेचा, व्यासंगाचा, समाजधुरीणत्वाचा डंका चांगलाचा गाजलेला, त्याचे दडपण. वयाचे भरपूर अंतर. . . रानड्यांच्या उदारमतवादी,पुरोगामी विचारांना घरी-दारी घुमू लागलेली नाराजीची वावटळ.

ह्या सर्व परिस्थितीला सामोरे जात,तिच्याशी जुळवून घेत,तिच्यातून निश्चितपणे मार्ग काढत....ह्या सुरवंटाचे पाहता पाहता फुलपाखरू झालेले दिसते....

सुजाण,समजूतदार,सुसंस्कृत,सुशिक्षित,कर्तृत्वशाली,संघटनाकुशल....पुरोगामी.... हे रमाबाईंचे नवे रूप न्यायमूर्तींच्या सहवासात उलगडत गेले. त्यांच्याविषयीचा रमाबाईंना असलेला नितांत आदर....ह्या अढळ ध्रुवताऱ्यावर नजर ठेवून रमाबाईंनी स्वतःचे व्यक्तिमत्त्व नवऱ्याच्या प्रेरणांशी समांतर घडवीत नेले.स्वतःच्या अस्तित्वाचा आनंद,प्रयोजन,श्रेय तिथे त्यांना सापडत गेलेले दिसते व त्या वाटेवर ठामपणे सुरवातीला पतीच्या पावलावर पाऊल टाकत व पुढे वैधव्यानंतर स्वयंनिर्णयाने अविचलपणे त्या चालत राहिलेल्या दिसतात. पतिभक्तीचे रूपांतर केवळ पूजेत वा अनुकरणात न होता प्रेरणाप्राप्तीत झाले,आणि मग ही आत्मजागृती स्त्री पतीचा आधार सुटल्यावर स्वतंत्र निर्णय घेत त्याच वाटेवर खूप पुढे गेलेली दिसते.

हे सर्व साधताना परंपरेच्या, रूढींच्या, कुटुंबव्यवस्थेच्या कितीतरी चौकटी मोडाव्या लागल्या.त्या मोडताना घरच्यांचा खूप विरोध सोसावा लागला.पुन्हा पतीच्याच प्रेरणा ह्यामागे असल्या तरी उघड पाठिंबा,संरक्षण पतीकडून कुटुंब-निष्ठेमुळे मिळत नव्हते.तेव्हा अशा ह्या त्रांगड्यात सर्वांना समजून घेत,आपल्या श्रेयाकडे,शक्यतो संघर्ष टाळत सातत्याने वाटचाल करताना रमाबाईंची आत्मजाणीव अधिकाधिक धारदार बनत गेलेली दिसते.

त्या काळात स्त्रियांच्या सुशिक्षितपणाचा व कुटुंबाच्या सुसंस्कृत वातावरणाचा परस्परसंबंध जसा समाजाला कळला नव्हता; तसेच पति-पत्नीच्या समान पातळीवरील, जगण्याचा आनंद समाजाच्या ओळखीचा झालेला नव्हता, असे दिसते. स्त्री शिक्षित झाल्याने संसारात जोम व उल्हास निर्माण होईल, ही जाणीव आगरकरांसारखे सुधारक वगळता त्या काळच्या समाजात दिसत नाही. (स्त्रियांना ताब्यात ठेवणे हेच मुख्य धोरण दिसते.) त्यासाठी त्या अशिक्षित व पर्यायाने परावलंबी असणे हे पुरुषप्रधान समाजाला सोयीचे होते. त्यामुळे इंग्रजी शिक्षण व विधवा पुनर्विवाह, ही आपल्या कुटुंबसंस्थेवरील संकटे आहेत, असेच बहुसंख्य स्त्री-पुरुषांना वाटत होते.

त्यामुळे रमाबाईंनी इंग्रजी शिकायला व समाजात धीटपणे वावरायला सुरवात केली, तेव्हा त्यांना समाज व कुटुंबाकडून बराच विरोध सोसावा लागला. ह्या झगड्यात त्याचे शहाणपण व दृढ निर्धार जसा उपयोगी पडला, त्याचप्रमाणे रानड्यांची प्रतिष्ठा, अधिकार, आर्थिक स्वास्थ्य ह्याचा फायदा त्यांच्या ह्या व्यक्तिविकास प्रक्रियेला निश्चित लाभलेला दिसतो. मात्र रमाबाईंना लाभलेल्या सुखवस्तू, उच्चवर्गीय जीवनाने त्यांना आत्मतृप्त करून समाजापासून विलग केलेले दिसत नाही.

परंपरेच्या बाहर पडू पाहणाऱ्या स्त्रीला सामान्यतः समाजाइतकेच मानसिक पातळीवर झगडावे लागते.

डॉ. सरोजिनी वैद्य यांनी, आपल्या श्रीमती काशीबाई कानिटकर यांच्या 'आत्मचरित्र आणि चरित्र' ह्या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत डॉ. आनंदीबाई जोशींच्या चरित्राच्या संदर्भात एक वाक्य लिहिले आहे, ते असे, की - "....चरित्राचा आकार जरी विस्तारत होता, तरी नव्या जगात जुन्या स्त्रियांची जीवनमूल्ये कशी हादरे खाऊ लागली होती, याचीही ओळख त्यातून होत होती." [१] हे वाचताना मनात येते, की त्याच काळातील अमूनही रमाबाई रानड्यांच्या मनात असा जुन्या- नव्या मूल्यांचा हादरे देण्याइतका उग्र संघर्ष झालेला दिसत नाही व ह्याला महत्त्वाचे कारण, 'त्यांची आपल्या पतीच्या जीवनदृष्टीवर असणारी नितांत श्रद्धा' हे दिसते. त्यांची स्वतःची प्रेमळ मानवतावादी वृत्तीपण त्याला पोषक ठरली असावी.

या पतिनिष्ठेमुळे, ते दिशा दाखवणार व ही उडी घेणार - She follows after अशी भूमिका सुरवातीला दिसते. पण न्यायमूर्तींच्या मृत्यूनंतर वर्षभरानच रमाबाईंचे स्वतंत्र व्यक्तिमत्व व कणखर नेतृत्व तत्कालीन स्त्रीवर्गाला चेतना व दिशा देताना दिसते. पतिजीवनात एवढी एकरूपता पावूनही त्यांचे स्वतंत्र अस्तित्व व कर्तृत्व वेगळे राहू शकले, हे विशेष.

माधवरावांच्या बोलण्यातली 'आपलं माणूस' ही संकल्पना त्यांनी पूर्णार्थाने स्वीकारलेली दिसते. दोघांचे मानबिंदू एकच झाल्याने त्या संदर्भात न्यायमूर्तींच्या वागण्या-बोलण्यात क्वचित 'नवरेशाही' डोकावली तरी त्यांच्या अहंकाराला ती डिवचू शकली नाही, असे वाटते.

पातिव्रत्य हे रमाबाईंच्या लेखी सर्वांत मोठे मूल्य होते, असे दिसते. जन्मभर त्यांनी पतीची मनोभावे व आनंदाने सेवा केली. माधवरावांच्या शेवटच्या आजारात रमाबाईंचे एक महत्त्वाचे

ऑपरेशन करावे लागले. त्यावेळच्या त्या दोघांच्या व्याकूळ मनोवस्थेचे व एकमेकांवरील उत्कट प्रेमाचे जे दर्शन घडते ते पाहताना रमाबाईंनी आपल्या प्रेमसेवेने माधवरावांना जिंकून घेतले होते, असे दिसते.

१८६७ मध्ये 'मराठी ट्रान्सलेटर' म्हणून काम करत असताना रंत्नप्रभा ह्या कादंबरीचे न्यायमूर्तींनी परीक्षण केले होते. त्यात त्यांनी लिहिले होते-"अनुराग हा मनुष्य हृदयातला मधुर विकार आहे... प्रकृतिधर्माचे सर्व बांधारे फोडून माणसाला उदात्त स्वार्थत्याग करायला लावणारा हाच मनोविकार आहे. हे कार्य पिता-पुत्रांतल्या विषम प्रीतीलाही साधत नाही. दुर्दैवाने या विकाराच्या उत्पत्ती, व विकासाला हिंदू समाजात अणुमात्र स्थळ ठेवलेले नाही."[२] हा अनुराग न्यायमूर्ती व रमाबाई यांच्या दांपत्यजीवनात शेवटी विकसित झालेला दिसतो.

रमाबाई आपल्या पतीच्या शिकवणुकीप्रमाणे अनेक नवे विचार, नवी मूल्ये स्वीकारत, बदलत गेलेल्या दिसतात. पण पातिव्रत्य कल्पनेवर मात्र त्या शेवटपर्यंत अतिशय खंबीर होत्या, असे आढळते. स्वतः न्या. रानडे पुनर्विवाहास अनुकूल होते. वासुदेवराव केळकरांचा पुनर्विवाह रानडे दांपत्यानेच लावून दिल्याचा उल्लेख आढळतो.[३] पण एवढ्या बाबतीत रमाबाईंची मते स्वतंत्र दिसतात.

स्त्रियांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण, व्यवसाय, अर्थार्जन, मतहक्क, राजकारणात प्रतिनिधित्व ह्या सर्व सुधारणांचा त्यांनी चळवळी, भाषणे, मोर्चे काढून कृतिशील पाठपुरावा केला. पण विधवा- विवाहाचा मात्र त्यांनी निर्विकल्प पुरस्कार कधीच केलेला दिसत नाही. वयात येण्यापूर्वी वैधव्य आल्यास पुनर्विवाह त्यांना मान्य होता. पण पतिपत्नी म्हणून संबंध आल्यानंतर मग त्याच पतीशी एकनिष्ठ राहणे त्या आपल्या आत्ममीलनाच्या संकल्पनेनुसार पवित्र कर्तव्य मानत होत्या, असे दिसते.

त्यांची पतिभक्ती ही केवळ पारंपरिक श्रद्धेतून आलेली अजाण अशी भक्ती नव्हती. हिऱ्याला पैलू पाडावेत, तसे त्यांच्या मूळच्या पातिव्रत्य कल्पनेवर अनुभवातून पैलू पडत गेलेले दिसतात. अंगदी सुरवातीपासून न्यायमूर्तींच्या वागण्या-बोलण्यातून, विचार-कृतींतून, मनाचा थोरपणा व विद्वत्तेचा उत्तुंगपणा त्यांच्या विश्लेषक बुद्धीला जाणवत गेला आणि त्यांची पतिभक्ती उजळत गेलेली दिसते. आपले पूर्वजन्मीचे सुकृत म्हणून अशा उदात्त व्यक्तीची जन्मगाठ आपल्याला लाभली, असे त्यांना मनःपूर्वक वाटत असे. त्या एके ठिकाणी म्हणतात-"माझ्यामध्ये कुलीन घराण्याशिवाय स्वतःचा संबंध जुळवण्यासारखे रूप-रंग-गुण किंवा विद्या यांपैकी काहीच नसून केवळ परमेश्वराच्या कृपाप्रसादानेच मला ही जन्माची जोड मिळून माझे जीवित धन्य झाले आहे."[४]

महात्मा गांधींनी रमाबाईंच्या पतिभक्तीचे मोठे मार्मिक वर्णन 'यंग इंडिया' ह्या आपल्या वृत्तपत्रात लिहिताना केले आहे. ते म्हणतात - "अनन्य भक्ती हाच वैधव्य शब्दाचा अर्थ आहे. ...वैधव्य या अवस्थेत ह्या भक्तीचा, सेवेचा संबंध आत्म्याशी येतो. रमाबाईंनी पतीच्या आत्म्यावरील आहे, वैधव्य शब्दाचा हा अर्थ त्यांनी लोकांना समजावून दिला, या रीतीने रमाबाईंनी स्त्री-जातीची मोठीच सेवा केली."[५]

रमाबाईंना अपत्य झाले नव्हते. पण दत्तक पुत्र नानू व भावाची संभाळलेली कन्या सखू ह्यांच्यावर त्यांनी अपत्यवत माया केली. वस्तुतः त्या काळी वंध्या स्त्रीला कुटुंबाकडून व समाजाकडूनही तुच्छता व उपहास सोसावा लागत असे. मूल नाही म्हणजे वारसा चालवायला कोणी नाही, मरणोत्तर पिंडदान, तर्पण व त्याद्वारे स्वर्गप्राप्ती- सर्वच खुंटले. म्हातारपणाला आसरा नाही वगैरे अनेक छटा वांझपणामागच्या दुःखामध्ये दडलेल्या असत. रमाबाईंचा हळवा व प्रेमळ स्वभाव पाहता हे न्यून तर त्यांच्या जिव्हारी लागावयास हवे. पण त्या म्हणतात- "संसारात मला मुलेबाळे नाहीत ही उणीवसुद्धा मला कधी भासली नाही, इतकी मी 'याच' सहवासात संतुष्ट व गर्क आहे. राजेरजवाडे, संस्थानिक, जहागिरदार यांच्या बायका संतती-संपत्तीने व अधिकार-वैभवाने कितीही थोर असल्या तरी माझ्यापेक्षा त्यांचे सुख अधिक खास नसेल. स्वतःची जोड मिळाल्याने मला आज जी धन्यता व जे समाधान होत आहे तिला उपमा नाही !"[६]

रमाबाईंचे हे शब्द मनापासून आलेले असावेत असे वाटण्याइतक्की तृप्ती, प्रतीशी समरसता व आदर त्यांच्या 'आठवणीं'च्या पानापानातून जाणवत असतो.

त्या काळातील एकंदरीत मध्यमवर्गीय स्त्रियांचे जीवन पाहता विवाहानंतर रमाबाईंच्या वाट्याला, भौतिक समृद्धी, बौद्धिक विकासाची प्रेरणा, सामाजिक कर्तृत्वाची संधी, सहजीवनाचा आनंद, पतिप्रेम, इत्यादी अनेक अपूर्व गोष्टी आल्या होत्या व त्या सर्वांना मनःपूर्वक लाभ घेताना त्या तल्लीन झालेल्या दिसतात.

श्रीमती काशीबाई कानिटकर ह्या त्यांच्या समकालीन सहकारी मैत्रिणीला आणखी एक गोष्ट अशी जाणवते, की रमाबाई जरी पारंपरिक वातावरणात बालपणी वाढल्या होत्या तरी त्या फारशा भाविक वा माधवरावांसारख्या आध्यात्मिक प्रवृत्तीच्या नसाव्यात. त्यांनी केलेल्या धर्मस्थळांच्या वर्णनात कुठेही देवळे वा मूर्ती पाहून त्या भारावल्यासारख्या वा धर्मभावनेने उचंबळून आलेल्याही दिसत नाहीत. हरिद्वार क्षेत्री, गंगेच्या काठावर, तिच्या पाण्यात हात सोडून बसल्यावर माधवरावांची गंगामय झालेली तल्लीन वृत्ती रमाबाईंनी वर्णिलेली आहे.[७] पण अशा प्रकारची भक्तिमय अवस्था रमाबाईंची झालेली, त्यांच्या कोणत्याही वर्णनात अप्रत्यक्षपणेही दिसत नाही. प्रार्थना समाजाचा संस्कार माधवरावांमुळे त्यांच्यावरही झालेला होता, त्यामुळे त्यांनी मूर्तिपूजा केलेली दिसत नाही. प्रथम घरातील वडिलधाऱ्या स्त्रिया व त्यांच्या निधनानंतर उपाध्याय येऊन देवाची पूजा करीत, असे त्यांचे नातू माधवराव विद्वांस सांगतात. मात्र रमाबाई माहेराहून आणलेल्या छोट्या गणपतीची पूजा शेवटपर्यंत करीत. पण त्यांची ही गणपती पूजा हा पतिपूजेचा एक वेगळा आविष्कार वाटतो. कारण त्यांचे चरित्रकार उमाकांत म्हणतात त्यानुसार, बालपणी त्यांना कुणी साधूने ती मूर्ती दिली होती व ह्यांची पूजा केल्यास उत्तम पती मिळेल असे सांगितले, त्यामुळे रमाबाईंची गणपती पूजा महान पती लाभल्याबद्दल कृतज्ञतेतूनच आली असावी, असे वाटते. मात्र मूर्तिपूजा करणाऱ्यांविषयी त्यांनी कधी तुच्छता मानलेली दिसत नाही. उलट माधवरावांच्या निधनानंतर घरातील वडिलधाऱ्यांना मागावे लागू नये म्हणून त्यांच्या पूजापाठासाठी त्या गुपचूप पैसे ठेवत असत, हे आपण

पाहिलेच आहे.

रमाबाईंनी कधी फारशी व्रतवैकल्येपण केलेली दिसत नाहीत. गणपतीची पूजा करत तरीपण संकष्टीसुद्धा धरली नव्हती असे त्यांचे नातू सांगतात. फार पूर्वी सुरवातीच्या काळात त्यांनी चातुर्मासात काही नेम धरण्याचा विचार केला होता. पण न्यायमूर्तींनी त्यांना त्यापासून परावृत्त करून विद्याभ्यासाचा नेम धरण्यास सांगितले.

रमाबाईंचे धार्मिक ग्रंथांचे व संताच्या काव्याचे वाचन विस्तृत असून पाठांतरही मोठे होते. प्रार्थनासमाजाच्या वार्षिकोत्सवात त्या प्रवचन व प्रार्थना करीत. तुरुंगातील अजाण, अशिक्षित, निराश अशा कैदी स्त्रियांपुढे त्या सदाचारपर अभंग म्हणत असत, असे दिसते.

वरील माहिती वाचताना वाटते, की रमाबाईंच्या ह्या सर्व पाठांतर, वाचन व उपासनेच्या मागे परमेश्वरविषयक आंतरिक ओढीपेक्षा, न्यायमूर्तींचा संस्कार व आध्यात्मिक गरजेपेक्षा, नैतिक प्रेरणाच अधिक प्रबल असाव्यात.

पं. रमाबाईंच्या येशूवरील अनन्यश्रद्धेपेक्षा येशूचा दया व प्रेमाचा संदेश देणारा मानवतावाद रमाबाईना जास्त भावलेला दिसतो. त्यांची अनन्यश्रद्धा दिसते ती न्यायमूर्तींच्या उपदेशावर; त्यांच्या विचारांवर. म्हणूनच जन्मभर 'न्यायमूर्तींची' सावली म्हणून जरी रमाबाई वावरलेल्या दिसतात तरी, न्यायमूर्तींच्या मृत्यूनंतर ही सावली विरून गेलेली दिसत नाही. उलट अधिक ठसठशीत, कृतीशील होत गेलेली दिसते.

रमाबाईंना निसर्गतःच परमेश्वराचे अस्तित्व खऱ्या तन्मयतेने जाणवत असावे, असे वाटते. त्यांचे नातू श्री. विद्वांस सांगतात- "खोल दऱ्या, हिरवीगार वृक्षराजी आणि सौम्य आवाज करीत वाहणारे ओढे वरून पाहताना रमाबाई ईश्वरी लीलेचे अभंग म्हणू लागायच्या."

पंढरपुरास रमाबाई दोनदाच गेलेल्या दिसतात. एकदा १९१७ त टॉयफॉईडमधून उठल्यावर हवापालटासाठी व एकदा १९२२ मध्ये न्यायमूर्तींच्या पुण्यतिथीला गोरगरिबांना अन्नदान करण्यासाठी. विठोबाच्या पायावर सकेशा असल्याने डोके ठेवता आले नाही, ह्याचे त्यांना वाईट वाटलेले दिसते. पंढरपूरला जाणाऱ्या वारकरी मंडळींच्या दिंड्या पाहून त्यांना आपणही ह्या मंडळीत मिसळून भजन करीत पंढरपूरला जावे असे वाटत होते, असे त्यांचे नातू सांगतात. रमाबाई म्हणतात-- "हे लोक कसे भजनात स्वतःला विसरून आनंदात चालले आहेत. काही मनात काळजी, निरुत्साह आहे का?"[१०]

वरील वर्णनातून रमाबाईंचे विठोबावरील प्रेम नक्की जाणवते.* तरी हे विठोबा प्रेम 'व्हाया' न्यायमूर्ती त्यांच्यापर्यंत आले असावे, असे वाटते. वारीबरोबर जावे वाटत होते. पण त्या गेल्या नव्हत्या, हेपण लक्षात येते. वारकऱ्यांप्रमाणे आपण भजनात स्वतःला विसरू शकत नाही, ह्याची तत्कालिक खंतपण इथे व्यक्त झालेली दिसते.

रमाबाईंच्या स्तोत्र-अभंगांच्या वहीत सापडलेले न्यायमूर्तींना उद्देशून लिहिलेले एक पद

---

* "पंढरपूरच्या विठोबावर रमाबाईंची विशेष भक्ती होती," हे चरित्रातील वाक्य अनवधानाने आले आहे, असे विद्वांस म्हणाले.

चरित्रात दिले आहे.

त्या पदातील,

"समर्थ माझे नाथ मग मी होईन का दीन
आपण अहर्निश सन्निध, मी तर नाही एकली
केव्हा नाही एकली -

ह्या पंक्ती वाचताना जनाबाईच्या 'एकली तू गाणे गाशी दुजा शब्द उमटे पाशी' हा अभंग आठवतो. रमाबाई कवयित्री कधीच नव्हत्या. पण अशिक्षित जनीला ईश्वरभक्तीने ज्याप्रमाणे लिहिते केले, त्याप्रमाणे रमाबाईंच्या मनातील उत्कट पतिभक्तीने त्यांना लिहिते केले असावे, असे वाटते.

खऱ्या भक्ताला ज्याप्रमाणे सगुण भक्तीतच खरे सुख लाभते, भक्ती हीच त्याची शक्ती असते, त्या पलीकडील सायुज्जतेची त्याला ओढ नसते, त्याप्रमाणे रमाबाईंना पतिभक्तीपलीकडे जाऊन परमेश्वभक्ती करण्याची तीव्र ओढ वा गरज वाटलेली दिसत नाही. किंबहुना रमाबाईंचे व माधवरावांचे नाते गुरु-शिष्या, प्राल्य-पालक, नेता-अनुयायी ह्या पायऱ्या ओलांडत माधवरावांच्या मृत्यूनंतर भक्त व परमेश्वर अशाच पातळीवर जाऊन पोहोचले होते, असे वाटते. 'पावले प्रसाद धन्य झाली काया' या त्यांच्या काव्यातील पालुपदातून, तसेच आपल्या 'आठवणीं'च्या सुरवातीला त्यांनी तुकोबाचा परमेश्वराला उद्देशून लिहिलेला एक अभंग उद्धृत केला आहे; त्यातील 'पवित्र होईन चरित्र उच्चारे' ह्या पंक्तीतून त्यांचा 'भक्तिभाव' सहज स्पष्ट होतो असे वाटते.

उत्तरायुष्यात ह्या 'भक्तिभावाचा' आणखी एक परिणाम रमाबाईंच्या मनोवृत्तीवर झालेला दिसतो.

न्यायमूर्ती हे प्रथमपासून अतिशय संयमी व स्थिरचित्त होते, असे त्यांच्या चरित्रावरून तसेच रमाबाईलिखित 'आठवणीं'तून दिसून येते. त्यांच्या ह्या अविचल वृत्तीबद्दल रमाबाईंनी अनेकदा आश्चर्य प्रकट केले आहे. १८९१ मध्ये पुण्यात जे 'चहा' प्रकरण झाले, त्या वेळी न्यायमूर्तींनी दाखवलेली स्थितप्रज्ञता आपण पाहिलेली आहे.

उतारवयात अशीच संयमी व समतोल वृत्ती रमाबाईंमध्ये बाणलेली आपल्याला त्यांच्या चरित्रातील काही प्रसंगांतून दिसून येते. पतीच्या इच्छेखातर ज्याला दत्तक घेऊन पोटच्या मुलासारखा सांभाळला त्या मुलाने मोठा झाल्यावर इतरांच्या सांगण्यावरून रमाबाईंवर इस्टेटीचा गैरव्यवस्थेबद्दल दावा केला, तेव्हा त्याचा रमाबाईंवर केवढा मोठा आघात झाला असेल, ह्याची कल्पना येते. परंतु ती बातमी कळल्यावरही त्या विचलित झालेल्या दिसत नाहीत. किंवा या मंडळीविषयी रागाचे कटु शब्दही उच्चारलेले आढळत नाहीत. हा दैवी गुण त्यांनी न्यायमूर्तींच्या सहवासाचे आणि नंतर केलेल्या सहनशीलतेच्या व मनोनिग्रहाच्या तपश्चर्येचे फळ आहे, असेच चरित्रकर्त्याप्रमाणे वाटते.

रमाबाईंचे एकंदर जीवन पाहता त्यांच्या मनात 'कुटुंब की करिअर' असा संघर्षही फारसा झालेला दिसत नाही. दोन्हीचा समतोल त्यांनी आपल्या जीवनात सहजपणे साधलेला दिसतो.

आपल्या सर्व नात्यांतून समोर आलेली कौटुंबिक कर्तव्ये मनापासून पार पाडतानाच त्यांनी- 'पतीविषयी लिहिणारी पहिली स्त्री, अखिल भारतीय स्त्री-संमेलनाची पहिली अध्यक्षा, स्त्री-गुन्हेगार, बाल-गुन्हेगार, मनोरुग्ण इत्यादींना तुरुंगात जाऊन भेटून मदत करणारी पहिली स्त्री, सक्तीच्या स्त्री-शिक्षणासाठी मोर्चा नेणारी पहिली स्त्री,' असे अनेक विक्रम केलेले आढळतात.

कुटुंबसंस्था ही चार निराधार नातेवाईकांना आधार देणारी, लहान मुलांना अभय व संस्कार देणारी आहे, म्हणून ती टिकली-टिकवली गेली पाहिजे, अशी त्यांची धारणा दिसते. जुन्या लोकांची मते चूक असली तरी ते त्यांचे संस्कार आहेत म्हणून सोडून द्यावे; अनादर करू नये; न बोलता, कमीत कमी संघर्ष आणत आपले इष्ट कार्य करावे, हे त्यांचे धोरण दिसते. पण त्या पलीकडे जाऊन जातिभेद, मूर्तिपूजा, व्रतवैकल्यांचे अवंडबर, नवसायास, अंगारेधुपारे, साधुबाबा, स्त्रियांची गुलामगिरी, वैधव्यपातक इत्यादी रूढ कल्पना त्यांनी कधीच मानलेल्या दिसत नाहीत. उलट स्त्री-शिक्षणाचे महत्त्व, सार्वजनिक जीवनात स्त्रियांचा सहभाग, उपेक्षित समाजाविषयी सुशिक्षित समाजाची कर्तव्यभावना, सामाजिक बांधिलकी, उद्यमशीलता, आदर्श नागरिकत्व इत्यादी चौकटीबाहेरची नवी मूल्ये त्यांनी स्वीकारलेली दिसतात. स्त्रियांना घराबाहेर काढणे, त्यांच्यात संघभावना निर्माण करणे, एकमेकींच्या मदतीचे सामर्थ्य वाढवणे, स्त्री-मदतकेंद्र स्थापन करणे, प्रकाशन संस्था काढणे, वैचारिक जागृती व वैचारिक देवाण-घेवाणीची स्त्रियांना सवय करणे, गरजू स्त्रियांना अर्थार्जनाचा मार्ग उपलब्ध करून देणे, अर्थपूर्ण जीवनाची संकल्पना उभी करणे, इत्यादी कार्य स्त्री-मुक्तीच्या संदर्भात रमाबाईंनी सेवासदनाच्या माध्यमातून केलेले दिसते.

थोडक्यात, समर्पण व अस्मिता, आत्मभान व समाजभान ह्यांचा मेळ आपल्या जीवनात साधून रमाबाईंनी एक नवी 'स्त्री-प्रतिमा' उभी केलेली दिसते. पं. रमाबाई आपल्या अगदी सुरवातीच्या प्रवचनांत जुन्या पतिव्रतांचे दाखले देऊन त्यांच्यातली तेजस्विता, मनोबल, स्वाभिमान वगैरे मूल्यांचे अनुसरण करा, असे सांगत असत. रमाबाई रानड्यांच्या जीवनातून तसा आदर्श उभा झालेला दिसतो. त्यामुळेच इतक्या प्रकारे चौकटीबाहेर पडूनही समाजाचा त्यांच्याविषयी राग झालेला दिसत नाही. उमाकांतलिखित चरित्राच्या सुरवातीच्या अभिप्रायात ना. सी. फडके म्हणतात त्याप्रमाणे - "त्यांनी शिक्षणाच्या मार्गात येणाऱ्या अडचणी कुशलपणे दूर सारल्या. एवढेच नव्हे, तर शिक्षण व आपली संस्कृती ह्यांत काही विरोध आहे, असा आभासही लोकांना येऊ नये असेच आपले वर्तन ठेवलेले दिसते. प्रेमाने व नम्रतेने वागल्यास कार्य सफल होऊन लोकांचा आदरपण मिळवता येतो, हे रमाबाईंनी सिद्ध करून दाखवले." अशा अर्थाचा अभिप्राय ह्याच पुस्तकाच्या प्रस्तावनेत काशीबाई कानिटकरपण मांडताना दिसतात.

'आदर्श गृहिणी' ही सुरवातीच्या काळात त्यांच्या मनात असलेली स्त्री-प्रतिमा हळूहळू विकसित होत जाऊन 'आदर्श नागरिक' ही नवी प्रतिमा त्यांनी उभी केलेली दिसते. त्या काळात स्त्रीचा विचार चांगली आई, चांगली पत्नी, चांगली सून ह्याच अंगाने केला जात होता. रमाबाई

रानड्यांनी एक चांगली व्यक्ती, चांगले माणूस हे आणखी एक परिमाण तिला लावायला समाजाच्या नकळत पचनी पाडलेले दिसते.

मात्र रमाबाईंनी भारतीय स्त्रीची मातेची व गृहिणीची पारंपरिक भूमिका नाकारलेली दिसत नाही. स्त्रीचे पुरुषाहून असलेले वेगळेपण, वेगळी भूमिका, वेगळे निसर्गदत्त कर्तव्य व घडण, हे सर्व रमाबाईंनी स्वीकारलेले दिसते. मात्र त्या भूमिकेत त्यांना कमीपणा वाटत नसून त्यात स्त्रीचे फार मोठे सामर्थ्य व आनंद आहे, असे त्या मानताना दिसतात. मात्र स्त्रीने कुटुंबातील मातृत्व व गृहिणीपद, एवढ्या मर्यादेत जन्मभर घोटाळत न राहता, ती कर्तव्ये पार पाडून व्यापक देशहिताची कामेपण मातृत्वभावनेचा विकास म्हणून व एक जबाबदार समाजघटक म्हणून यथाशक्ती करावीत, असा त्यांचा दृष्टिकोन दिसतो. २९ डिसेंबर १९१४ रोजी मद्रास येथील शारदा लेडीज युनियनच्या तिसऱ्या वार्षिक सभेत बोलताना त्या म्हणतात - "पुरुष व स्त्रिया यांची कर्तव्यरेषां ठरवताना श्रमविभागाच्या तत्त्वाकडे लक्ष दिले पाहिजे, हे जरी खरे आहे तरी आपली कर्तव्ये व आपले हक्क ह्यांची मर्यादा आपण अधिकाधिक विस्तृत केली पाहिजे."[११]

१९७५ साली आंतरराष्ट्रीय स्त्री-वर्षात प्रसिद्ध झालेल्या आपल्या' Indian Woman' ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत देवकी जैन म्हणतात-- "अनुकरणापेक्षा अभिमानाने स्वतःचे वेगळेपण जपण्यात जास्त प्रतिष्ठा लाभते....सोशिकता, त्याग व पारंपरिक भूमिकांचा स्वीकार ह्यामुळे भारतीय समाजजीवनात एक प्रकारची हार्मनी व सौंदर्य आले आहे."

पुढे त्या प्रश्न करतात- 'भारतीय समाजात स्त्री-पुरुष भेद गृहित धरला आहे व त्याला सामावता येईल अशा संस्था, पद्धती, श्रद्धा तयार केल्या आहेत. भारतीय स्त्रीला ह्याचा गुणात्मक फायदा झाला आहे. तेव्हा ह्या श्रद्धासंस्था कोणत्या ते शोधणे व त्यापासून प्रेरणा घेऊन पाश्चात्य अनुकरणात्मक चळवळ न चालवता, स्वतंत्र चळवळ उभारता येईल, असा जीवनक्रम तयार करता येईल का, की जिथे स्त्रीत्वाचे फायदे वापरून अडथळे दूर करता येतील ?"

मला वाटते, रमाबाई रानड्यांच्या जीवनात वरील प्रश्नाला काहीसे उत्तर सापडण्यासारखे आहे. स्त्रीत्वाची पारंपरिक भूमिका व मूल्ये स्वीकारून, त्याला छेद न देता, नव्या उपलब्ध वाटा चोखाळून विकासाची दिशा त्यांनी घेतलेली दिसते.

एकदा भूमिका स्वीकारल्यामुळे स्त्रियांच्या शिक्षणाबाबतही त्यांचे विचार त्यानुसारच बनलेले दिसतात.

स्त्रियांचे गृहिणीपद व मातृत्व ह्या महत्त्वाच्या भूमिका मानल्यामुळे त्या सुजाणपणे पार पाडण्यासाठी अनुरूप शिक्षण त्यांना दिले पाहिजे, असे मत त्या सुरवातीला आग्रहाने मांडताना दिसतात.

सुशिक्षित स्त्रीनेदेखील आपल्या सांसारिक व मुलाबाळांविषयी कर्तव्यात कुचराई करणे त्यांना पसंत नव्हते, असे दिसते. वऱ्हाडमधील स्त्रियांच्या सभेत बोलताना शेवटी त्या म्हणतात- "संसार करणाऱ्या मुलीला घराचे सौंदर्य, नीटनेटकेपणा, शिवण-टिपण, रोग्याची शुश्रुषा, मुलांच्या आरोग्याचे ज्ञान असले पाहिजे. नवीन शिकलेल्या मुलींतून हे गुण जाऊ पाहत आहेत, हे बरे नव्हे. पूर्वीच्या बायका सडासंमार्जन करून, रांगोळ्या काढून घरे सुशोभित करीत, जुनेरी

फाडून लहान मुलींकरिता कपडे शिवत, लहान सहान रोगांवर काड्यातोड्याची औषधे त्यांना माहीत असत. आपण ही परंपरा आपल्यामधून जाऊ देता कामा नये."[१२]

पुढे मात्र त्यांच्या स्त्री-शिक्षणाविषयी कल्पना विकसित होत गेलेल्या दिसतात. कौटुंबिक कर्तव्ये पार पाडून स्त्रीने त्या पलीकडे विकसित झाले पाहिजे व त्या पलीकडे जिला जायचे असेल तिला इतर शिक्षणाला प्रत्यवाय नसावा, ही भूमिका त्यांनी स्वीकारलेली दिसते. त्यामुळे स्त्रियांच्या शिक्षणासाठी देशात कुठेही काही कार्य घडत असेल तर त्याला रमाबाईंचा नेहमी पाठिंबा, मार्गदर्शन, मदत होत गेली, असे दिसते.

१९१५ साली महर्षी कर्व्यांनी, सामाजिक परिषदेच्या व्यासपीठावरून 'महिला विद्यापीठाची' योजना मांडली होती. रमाबाई तेव्हा विद्यापीठ सिनेटच्या सभासद होत्या. त्या अधिकारात रमाबाईंनी कर्व्यांना खूप मदत केलेली दिसते.

महाराष्ट्रातून वा महाराष्ट्राबाहेर कुठेही महिला परिषद, स्त्री-संमेलने असली तर रमाबाई आर्वजून जाताना दिसतात. तिथे आपल्या उपस्थितीने, अनुभवी मार्गदर्शनाने व विचार परिप्लुत भाषणाने स्त्रियांना सतत उत्साहाने मार्गदर्शन करताना आढळतात. १९१९ साली औरंगाबाद येथील शारदा मंदिर कन्याशाळेच्या दुसऱ्या वार्षिक उत्सवाच्या अध्यक्षपदावरून बोलताना त्या म्हणतात-

"आजकालचा काळ हा जागृतीचा व प्रगतीचा आहे. स्त्रीला काय किंवा पुरुषाला काय, ज्ञान अवश्य पाहिजे. निदान प्रत्येक स्त्रीला स्वतः विचार करण्यापुरते व ज्ञानाची किंमत कळण्यापुरते शिक्षण पाहिजे."

पुढे एके ठिकाणी त्या म्हणतात - "मुलांना व मुलींना सारखेच शिक्षण द्यावयाचे, असा आपण निर्धार केला पाहिजे. त्यांच्यामध्ये पंक्तिप्रपंच का? मुलांना जेवायला घालताना भेद करीत नाही. दोघांवर प्रेम सारखेच करतो, मग शिक्षणाबाबत प्रतारणा का? मुलांच्या शिक्षणाची जशी काळजी तशी मुलींच्या शिक्षणाची घेतली पाहिजे. वास्तविक आयांची नजर आपल्या मुलींच्या शिक्षणावर नेहमी असली पाहिजे....स्त्रियांनी सर्व बाबतींत आता पुरुषांवर अवलंबून राहून चालणार नाही. याकरिता त्यांनी स्त्रियांची एक कमिटी स्थापन करून शाळेला शक्य त्या तऱ्हेने मदत करावी. अधूनमधून शाळेची पाहणी करावी."

शिक्षणात पालकांचा सहभाग कोणत्यातरी रूपात असावा हे ह्यातले प्रतिपाद्य, आजच्या पालक संघटनांची आठवण करून देते. स्त्रियांचे शिक्षण, स्त्रियाचे कार्यक्षेत्र, पतिपत्नी नातेसंबंध ह्या बाबत त्यांची भूमिका जरी उत्तरोत्तर मोकळी होत गेली व त्या काळातील परिवर्तनाच्या कक्षा पाहता बरीच पुढारलेली वाटली, तरीपण विशेष म्हणजे भारतीय मानसिकतेला ती सतत जवळच राहिलेली दिसते. (हिंदू लेडीज सोशल क्लबच्या सोळाव्या वार्षिक सभेच्या अध्यक्षपदावरून बोलताना मिसेस अली अकबर, रमाबाईंविषयी म्हणतात- "She has shown forth the beauties of true womanhood."[१३]

इथे विजयाबाई राज्याध्यक्षांनी सांगितलेला एक प्रसंग आठवतो. ग्वाल्हेर साहित्य संमेलनाच्या कुसुमावती देशपांडे अध्यक्षा होत्या. पुढे त्यांच्या मृत्यूनंतर विजयाबाईंनी

त्यांच्यावर १९६१ डिसेंबरच्या 'साधनेत' लेख लिहिला. त्यात त्यांनी लिहिले आहे- "संमेलनात समारोपाचे खणखणीत भाषण करण्यास निघण्यापूर्वी कुसुमावती (आपले पती) कवी अनिलांचे पाय चेपत बसलेल्या पाहिल्या."

भारतीय स्त्रीची मानसिकता इतक्या वर्षांनंतरही काही मूल्यांचे सूत्र बळकटपणे धरून ठेवताना दिसते. 'स्त्री-मुक्तीचा' विचार मांडताना ह्या मानसिकतेचा विचार होणे, आपल्या हेतूच्या यशाच्या दृष्टीने आवश्यक आहे असे वाटते.

'Awakening of the Asian womanhood' ह्या आपल्या पुस्तकात रमाबाईंच्या समकालीन स्त्री-उद्धारक मागरिट कझिन्स म्हणतात- "रमाबाई रानडे म्हणजे आदर्श भारतीय स्त्रीचा प्रातिनिधिक नमुना आहे. साधी, कष्टाळू, स्थिर बुद्धीची, पण कोमल मनाची, व्यवहारी पण आदर्शवादी, लाजाळू व शूर, पारंपरिक व पुरोगामी, अशा प्रकारे सगळ्या चांगल्या गुणांचा विरोधाभास त्यांच्यात दिसतो. पण सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्या स्त्रियांच्या कैवारी आहेत."

पण स्त्री-उद्धाराव्यतिरिक्त जातिभेद निर्मूलन, स्त्रियांचा राजकारणातील सहभाग इत्यादी उपक्रमही न्यायमूर्तींचे बोट सोडून पुढे जाऊन त्यांनी केलेले दिसतात. पण हे न्यायमूर्तींच्या विरोधात जाऊन केलेले नसून, न्यायमूर्तींच्या विचारधारेचा तो अपरिहार्य परिपाक होता, असे म्हणावेसे वाटते. न्यायमूर्ती असते तर बदलत्या काळाला अनुलक्षून त्यांनी ह्याच सुधारणांचा आग्रह धरला असता. तो काळच झपाट्याने बदलत होता. त्याचा हा पडसाद पाहा - रमाबाईंच्या आठवणींचा इंग्रजी अनुवाद 'Himself' प्रसिद्ध झाल्यावर (अनुवादिका : कॅथरिन गेटस्) तो वाचून मिसेस मूर मॅकन्झि म्हणाल्या - "ह्यातील घटना थोड्या काळापूर्वीच घडलेल्या आहेत, हे पाहून आश्चर्य वाटते."

ह्याचा अर्थ, झपाट्याने बदलत जाणाऱ्या काळाबरोबर रमाबाईपण बदलत, वाढत गेलेल्या दिसतात.

रमाबाईंचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आपले आंतराष्ट्रीय स्नेहसंबंध जाणीवपूर्वक जोपासलेले दिसतात. त्यांच्या मनातील भगिनीभाव हा जात, धर्म, राष्ट्र ह्या सर्व मर्यादा ओलांडून, पतीकडे गेलेला होता. गुन्हेगार स्त्रीपासून ते गव्हर्नरच्या पत्नीपर्यंत आणि पाश्चात्य स्त्रीपासून दलित स्त्रीपर्यंत सर्वांशी त्या संवाद साधू शकत होत्या. त्या काळचे इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, टाइम्स वगैरेंचे अंक चाळले तर आपल्याला दिसून येते, की भारतीय स्त्रियांच्या प्रश्नाविषयी सहानुभूती दाखवणाऱ्या, मदत करणाऱ्या विदेशी मैत्रिणी हा देश सोडून जात तेव्हा रमाबाई आवर्जून पानसुपारी, निरोप समारंभ, मानपत्र देणे इत्यादी कार्यक्रम आखत असत. रमाबाईंच्या जन्मशताब्दीनिमित्त काढलेल्या अनुराधेच्या अंकात लिहिताना चि. ग. कुलकर्णी लिहितात-

"विदेशी लोकांसह असलेल्या पार्टीत रमाबाई जितक्या सहजपणे हसून खेळून मिसळत, तितक्याच सहजपणे त्या मंगळागौरी समारंभातही सहभागी होताना दिसतात."[१४]

पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृतीतील जे जे स्त्री-कल्याणकारी वाटेल, त्याचा मिलाफ रमाबाई आपल्या जीवनात करत गेलेल्या दिसतात.

आता शेवटचा मुद्दा म्हणजे रमाबाईंच्या जीवनाने महाराष्ट्रीय स्त्री-जीवनाला परिवर्तनाच्या संदर्भात काय दिले ?

ह्या बाबतीत आपण निःसंदिग्धपणे म्हणू शकतो, की रमाबाई रानड्यांनी आपल्या जीवनात नव्या-जुन्याचा समतोल साधला म्हणून सामान्य स्त्रीला त्या जवळच्या वाटत राहिल्या व त्यांच्या पावलांवर पावले टाकीत पुण्यामुंबईतील फार मोठा स्त्री-समाज सुधारणेच्या, शिक्षणाच्या व स्वावलंबनाच्या दिशेने पुढे गेलेला दिसतो. सेवादसदनाद्वारे हे कार्य महाराष्ट्रभर पसरत गेले.

रमाबाई रानड्यांचे नातू श्री. विद्वांस ह्यांच्याजवळ असलेला रमाबाईंचा उपलब्ध पत्रव्यवहार चाळता, रमाबाईंच्या प्रभावाची प्रमाणे देणारी काही बोलकी पत्रे त्यात आढळतात. त्यांत मुलींसाठी आदर्श शिक्षणसंस्था काढणाऱ्या इंदूरच्या महाराणी चंद्रावतीबाईसाहेबांचे आदरपूर्ण पत्र दिसते. बडोद्यासारख्या पुरोगामी संस्थानाच्या महाराणी चिमणाबाई गायकवाडांचे स्नेहपूर्ण पत्रपण आढळते. इतकेच नव्हे, तर भोपाळ संस्थानाच्या स्त्री-शिक्षणप्रेमी राज्यकर्त्या नबाब सुलतान जहान बेगम, ह्यांच्या स्नुषा मैमुना सुलताना ह्यांचेदेखील सल्ला मानणारे पत्र उपलब्ध आहे.

वरील पत्रांवरून लक्षात येईल, की त्या काळात केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील स्त्री-सुधारणावादी व्यक्ती रमाबाईंच्या मार्गदर्शनाला महत्त्व देत होत्या, इतका त्यांच्या कार्याचा प्रभाव दूरवर पसरला होता.

महाराष्ट्रात तर रमाबाईंचे जीवन हा सुशिक्षित वर्गात एक आदर्शच झाला होता.

मला त्यांच्या जीवनाचा विशेष असा जाणवतो, की त्यांनी वरिष्ठ उच्चभ्रू समाजात समाजकार्याची गोडी व प्रतिष्ठा उभी केली. सुखवस्तू समाज हा सामान्यतः आत्मतृप्त असतो. आपल्या विशिष्ट वर्तुळातील जीवनापलीकडील जगाशी त्यांचे भावनिक नाते निर्माण होत नाही. त्यांना त्याची गरज वाटत नसेल.

अशा समाजातील स्त्रियांत.... आपण समाजाचे, देशाचे काही देणे लागतो, समाजातील दुर्बल व दुर्दैवी घटकांच्या उद्धारासाठी धडपड करणे हे सबल घटकांचे कर्तव्य ठरते, हा विचार त्यांनी ठसवलेला दिसते. कारण समाजातील सर्वांची सुखदुःखे ही परस्परांशी निगडित असतात, हे त्या जाणत होत्या. सेवा करून पीडितांचे दुःख कमी करण्यात मानवी मनाचा व जीवनाचा विकास साधत असतो, हे त्यांचे तत्त्वज्ञान होते. आत्मकेंद्रितता ही माणसाला प्राण्याच्या पातळीशी बांधून ठेवते. पण मनुष्य म्हणून खऱ्या अर्थाने योग्यता मिळवायची असेल, तर स्वतःच्या पलीकडील जगाच्या विकासासाठी, कल्याणासाठी धडपडणे आवश्यक ठरते. इथे स्त्री व पुरुष असा भेद होऊच शकत नाही. स्त्रियांनी सुद्धा आपल्या जीवनाचे सार्थक ह्या मार्गाने केले पाहिजे, असे त्या म्हणताना दिसतात.

श्री. विठ्ठलदास ठाकरसींच्या निधनानंतर समाचाराला गेलेल्या रमाबाईंनी प्रेमलीला ठाकरसींचे सांत्वन करून, स्वतःच्या दुःखातून आता बाहेर पडून, पूर्वीप्रमाणे समाजातील इतर दुःखित स्त्रियांसाठी चाललेल्या कामात सहभागी व्हायला प्रेरणा दिल्याची आठवणपण

वाचावयास मिळते.[१५]

त्या काळी गावोगावी स्थानिक थोरामोठ्यांच्या घरच्या सुशिक्षित बायका, तसेच न्यायाधीशांच्या व इतर सरकारी अधिकाऱ्यांच्या बायका एकत्र येऊन मंडळे काढून स्त्री-उद्धाराची कामे करताना दिसतात. स्वतः रमाबाई यवतमाळ, अकोला, अमरावती, धुळे, औरंगाबाद इत्यादी अनेक गावच्या अशा मंडळांत वेगवेगळ्या निमित्ताने जाऊन, भाषणे देऊन उत्साह व प्रेरणा देताना दिसतात. दुर्दैवाने असा आदर्श पुन्हा न झाल्याने कालांतराने ह्या वरिष्ठ वर्गातील स्त्रिया पुन्हा स्वतःच्या कोशांत गेलेल्या दिसतात.

पाश्चात्य सुधारणांचा स्वीकार करताना आपली भातीय 'बैठक' रमाबाईंनी न सोडल्यामुळे सामान्य स्त्री-वर्गातूनही त्यांना भरघोस प्रतिसाद मिळालेला दिसतो. स्त्री-शक्तीचा आविष्कार करताना उच्चवर्गीयांप्रमाणे सामान्य स्त्रियांना सेवासदनाच्या माध्यमातून रमाबाईंनी सहभागी करून घेतलेले दिसते.

२६-१२-१९१० च्या 'ज्ञानप्रकाशात' एक सातारचे बातमीपत्र आले आहे. त्यात बातमीदार लिहितो- "रविवार १८ व सोमवार १९ हे दोन दिवस, सातारा शहराच्या इतिहासात बराच काळ पावेतो संस्मरणीय होऊन राहतील.... याचे बरेच श्रेय पुण्याच्या सेवासदनातील तीन विदुषी स्त्रिया (सौ. कानिटकर, श्रीमती आपटे व श्रीमती भट) यांच्या आगमनास दिले पाहिजे.... येथील मुलींच्या शाळेत भरलेल्या स्त्रियांच्या सभेस, जेवढा मोठा समाज जमला होता तेवढा मोठा स्त्री-समाज यापूर्वी कोणत्याही स्त्री-सभेस एकवटलेला दृष्टोत्पत्तीस आला नाही."

पुढे १९१० त हुजुरपागा शाळेच्या बक्षीस समारंभप्रसंगी त्या वेळचे गव्हर्नर क्लार्क ह्यांचे भाषण झाले. भाषणात गव्हर्नर म्हणाले.-

"The claims of women for equality of opportunity with men are subject of acute controversy... It will be long before women in this land will clamour to be municipal councillors or members of legislative council. तरी पण त्यांनी शिक्षण घ्यावे. शिक्षणाने त्या सर्व क्षेत्रात अप्रत्यक्ष प्रभाव पाडू शकतील."

पण त्यानंतर बारा वर्षांच्या आतच मताधिकारासाठी रमाबाईंच्या आधिपत्याखाली झालेले आंदोलन व त्यांनी त्यांत मिळवलेला विजय आपण पाहिला आहे. त्या वेळचे नामदार लॉरेन्स ह्यांचे उद्‌गारही वाचले आहेत. पाठोपाठ कौन्सिलच्या सदस्यत्वाचा हक्क स्त्रियांना मिळावा म्हणूनही रमाबाईंनी सुरू केलेली धडपड आपण पाहिली आहे.

बारा वर्षांत रमाबाई .व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुण्यातील स्त्री-जीवनाचे चित्र थोरामोठ्यांच्या कल्पनेबाहेर किती वेगाने बदलून टाकले होते ... ह्याचा पडताळा इथे येतो.

रमाबाईंच्या व्यक्तिमत्वाचा मुक्तीच्या दिशेने झालेला हा धीमा पण चढा प्रवास व त्यांनी दाखवेलेले कर्तृत्व.... हे मराठी स्त्रीच्या मुक्तीच्या धडपडीतील एक प्रेरणापर्व आहे.

* *

संदर्भ सूची

१. काशीबाई कानिटकर, आत्मचरित्र आणि चरित्र: सरोजिनी वैद्य प्रस्तावना, पृष्ठ १२
२. महादेव गोविंद रानडे, चरित्र: न. र. फाटक, पृष्ठ ४९
३. प्रार्थना समाजाचा इतिहास
४. आमच्या आयुष्यातील काही आठवणी: रमाबाई रानडे, पृष्ठ २४१
५. श्रीमती रमाबाई रानडे: मा. श्री. विद्वांस, पृष्ठ १०६
६. आमच्या आयुष्यातील काही आठवणी: रमाबाई रानडे, पृष्ठ २६९
७. कित्ता: पृष्ठ १२७
८. श्रीमती रमाबाई रानडे: मा. श्री. विद्वांस, पृष्ठ १६३
९. कित्ता: पृष्ठ २७९
१०. कित्ता: पृष्ठ २८३
११. ज्ञानप्रकाश, २ जानेवारी १९१५
१२. श्रीमती रमाबाई रानडे: मा. श्री. विद्वांस, पृष्ठ १९०
१३. टाइम्स ऑफ इंडिया, १८-१-१९१०
१४. अनुराधा: जानेवारी, १९६२
१५. कित्ता
१६. ज्ञानप्रकाश २२-११-१९११ यवतमाळ महिला समाजातील सन्मानाला उत्तर

प्रकरण ११ वे

दोन रमाबाई

आतापर्यंत आपण १९ व्या शतकात होऊन गेलेल्या ह्या दोन रमाबाईंच्या जीवनाचा व त्यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेतला. त्यातून त्या काळातील इतर स्त्रियांच्या तुलनेत, त्यांच्या जगण्यातले, त्यामागच्या जीवनदृष्टीतले वेगळेपण, आपल्या लक्षात येत गेले. ह्या दोघी स्त्रिया इतरांपेक्षा जशा वेगळ्या होत्या, तसेच दोघींतही वेगळेपण होते. ते कशा प्रकारचे होते ते आता आपण पाहणार आहोत.

ह्या दोघी स्त्रिया त्यांच्या वाट्याला आलेले जीवन, आले तसे जगत गेलेल्या दिसल्या नाहीत. त्यांची काही मते घडली होती, विचार तयार झाले होते व त्यानुसार त्या धडपडत जगताना दिसतात. स्वतः जगताना काहीतरी आणखी उभे करण्याचा त्यांचा प्रयत्न होता, जिद्द होती, हेपण लक्षात येते. काय हवे होते ह्या दोघींना ? कशी होती त्यांची विचारांची दिशा ?

आपण स्त्री आहोत. सुदैवाने आपल्याला खंबीर व्यक्तीचा आधार लाभला, आपण सुशिक्षित झालो, परिस्थितीचे आकलन वाढले, समाज बदलायला हवा, हे जाणवू लागले. समाज बदलायचा, सुधारायचा तर आधी स्त्रियांच्या जीवनातील साचलेपण मोकळे व्हायला हवे. त्यांची ज्ञानाची, विचारांची दारे उघडायला हवीत. त्यासाठी त्यांना शिक्षण द्यायला हवे. बालविवाहाने शिक्षणांत खंड पडतो म्हणून ते बंद करायला हवेत. वैधव्य हा स्त्रीचा दोष वा पाप नाही, हे तिला पटवून द्यायला हवे. त्यांना स्वतःच्या पायावर स्वाभिमानाने उभे करायचे, तर पुस्तकी शिक्षणाच्या जोडीने त्यांना काहीतरी व्यवसाय-शिक्षण द्यायला हवे. हे सर्व करायचे, तर त्यासाठी त्यांची मानसिकता बदलायला हवी. त्यासाठी स्त्रियांना एकत्र आणणे, त्यांच्यात भाषणे, चर्चा, गप्पा इत्यादींतून हळूहळू जागृती करायला हवी. त्यांच्यातील पारंपरिक संस्काराखाली दबून गेलेला आत्मजाणिवेचा स्फुल्लिंग पुन्हा प्रज्वलित करायला हवा. त्याचबरोबर जगणे अर्थपूर्ण करण्यासाठी सामाजिक सेवा, कार्याचे महत्त्व दाखवून द्यायला हवे. अशा तऱ्हेची दोघींच्या विचारांची दिशा एकच दिसते व त्यानुसार दोघींचे प्रयत्न चाललेले

दिसतात. ह्या प्रयत्नांत दोघींनी समाजाचा विरोध पत्करलेला दिसतो. दोघींनी वैधव्यानंतर स्त्रियांच्या सेवेसाठी स्वतःला वाहून घेतलेले दिसते. स्त्रियांसाठी, खास करून विधवांसाठी शाळा, राहण्यासाठी सदने, अर्थार्जनाची सोय म्हणून शिवणकाम, विणकाम वर्ग, छापखाने काढले. दोघींचे पाश्चात्य स्त्रियांशी खूप जवळिकीचे संबंध होते आणि त्यातून मैत्रीचे व सहकार्याचे नाते निर्माण झालेले दिसते.

दोघींच्या जीवनातले आणखी एक योगायोगाचे साद्धर्म्य म्हणजे दोघींना आपापली शेवटची आकांक्षा पूर्ण झाल्याबरोबर आलेले मरण ! पं. रमाबाईंनी बायबलचे भाषांतर हे आपले शेवटचे जीवनकार्य मानले होते. ते ज्या दिवशी पूर्ण झाले व प्रुफे छापखान्यात गेली त्याच रात्री त्या तृप्त मनाने मृत्यूच्या स्वाधीन झालेल्या दिसतात. रमाबाई रानड्यांची पण शेवटची इच्छा न्यायमूर्तींचे अधिकृत चरित्र प्रसिद्ध व्हावे ही होती. श्री. न. र. फाटकांनी ते पूर्ण केले. रमाबाईंनी तृप्त मनाने त्याला आशीर्वाद लिहून दिले, आणि पंधरा दिवसांच्या आत त्यांनी इहलोकाचा निरोप घेतला.

(ह्या दोघींपेक्षा थोड्या लहान असलेल्या, व रमाबाई रानड्यांप्रमाणेच पतीच्या सहकार्याने स्वतंत्र व्यक्तिमत्व जोपासत गेलेल्या लक्ष्मीबाई टिळकांच्या जीवनातही असाच योगायोग दिसतो. त्यांचे पती ना. वा. टिळक ह्यांचे अपुरे राहिलेले 'ख्रिस्तायन' काव्य पूर्ण करणे हे त्या आपले जीवनाचे ध्येय मानत होत्या आणि ते पूर्ण झाल्याबरोबर लगेचच त्या ख्रिस्तवासी झालेल्या दिसतात.)

दोघींच्या मृत्यूनंतर स्त्री-समाज फार मोठ्या प्रमाणात शोक व्यक्त करताना दिसतो. दोघींचे वैयक्तिक जीवन अत्यंत साधे व व्रतस्थ शैलीचे दिसते. त्यांच्या वैयक्तिक गरजा खूपच कमी होत्या.

वैयक्तिक आयुष्याबाबतच्या ह्या निःसंग व व्रतस्थ वृत्तीमुळे दोघींच्या जगण्यात 'निर्भयतेचे' एक समान सूत्र सापडते. ही निःसंगता त्यांच्यावर लादलेली नसून, त्यांनी स्वेच्छेने स्वीकारलेली होती, असे दिसते. चिरंतन व उदात्त सुखाच्या प्राप्तीसाठी, लौकिक सुखे इतकेच काय, पण 'स्व'चापण लोप व्हायला हवा हा भारतीय तत्त्वज्ञानाचा संस्कार दोघींच्या पिंडात कुठेतरी रुजलेला असावा, असे वाटते. हा 'स्व'चा लोप, ही तडजोड नसते; ही हारपण नसते, तर आध्यात्मिक माणसाच्या आत्मविजयाप्रमाणे तो आत्मबलाचा मार्ग असतो व असे आत्मबल दोघींनी मिळवले होते, असे म्हणता येईल.

आणखी एक गमतीचे व त्या काळाच्या संदर्भात दुर्मिळ असणारे भाग्य दोघींना लाभलेले दिसते. ते म्हणजे दोघींना सेवाभावी व कर्तृत्ववान आया लाभल्या होत्या, तसेच दोघींची स्त्री-उद्धाराची प्रेरणा तिथेच न थांबता दलितमुक्ती व मानवमुक्तीच्या विचाराला जाऊन भिडलेली दिसते. दोघींनी पण तत्कालीन स्त्रियांच्या तुलनेने खूपच प्रवास केलेला दिसतो. भारतभर भ्रमण केल्याने, वेगवेगळ्या प्रांतांतील जनजीवन, भाषा, साहित्य ह्यांच्या परिचयाने दोघींच्या जीवनसृष्टीला एक खंबीर व्यापकपण आलेले दिसते. पण ह्या प्रवासात पाहिलेल्या धार्मिक स्थळांबाबत दोघींच्या प्रतिक्रिया मात्र अतिशय भिन्न झालेल्या दिसतात. पं. रमाबाईंचे

बालपण तर तीर्थस्थळांच्या सोबतीतच गेले. रमाबाई रानड्यांनी न्यायमूर्तींबरोबर अनेक धार्मिक स्थळांना भेटी दिल्या. त्यांच्या सश्रद्ध वृत्तीमुळे त्यांना ह्या स्थळी (काशी, पुष्कर, मथुरा, वृंदावन, हरिद्वार इत्यादी) मानसिक समाधानाचा अनुभव आलेला दिसतो. काशीपासून वाराणसीपर्यंतचे अनेक घाट व देवळे त्यांनी पाहिली. त्याबद्दल लिहिताना त्या म्हणतात - "रात्र चांदणी व भोवतालचा देखावा रमणीय असल्यामुळे आणि विशेष करून काशी क्षेत्राबद्दल पवित्र भावना व पूज्य बुद्धी यांची त्यांत भर पडल्यामुळे ती वेळ व तो देखावा चिरस्मरणीय होऊन राहिला." मथुरा, वृंदावन, आग्रा इत्यादी ठिकाणच्या देवळांचे पण रमाबाईंनी असेच वर्णन लिहिलेले आहे.

इथे एक प्रश्न मनात आल्यावाचून राहत नाही. ह्या सर्व तीर्थक्षेत्रांच्या वर्णनात कुठेही तिथली अस्वच्छता, भोंदूगिरी, तीर्थकरूंचे व विधवांचे हाल व फसवणूक, पंड्यांच्ने लोभी वर्तन ह्यांविषयी रमाबाईंनी काहीच म्हटलेले नाही. हे कसे ? त्यांच्या सश्रद्ध वृत्तीमुळे ते त्यांना जाणवलेच नाही का ? माधवरावांच्या हुद्यामुळे त्यांची जी व्यवस्था ठेवली जात असेल, त्यात सामान्य प्रवाशाला बोचणाऱ्या ह्या अमंगल गोष्टी त्यांच्या अनुभवविश्वात शिरू शकल्या नाहीत ? हीच धर्मक्षेत्रे पंधवा वर्षांपूर्वी पायी फिरून पाहताना पं. रमाबाईंची झालेली कटू प्रतिक्रिया आपण पाहिलेलीच आहे. वास्तवाविषयीचे संवेदनशील व्यक्तीचे आकलन, हेदेखील पुष्कळदा, ते वास्तव तो कुठून पाहतो आहे व कशा मानसिक अवस्थेत पाहतो आहे, त्यानुसार निर्धारित होत असते का ?

अशा प्रकारे ह्या दोन स्त्री-उद्धारक नेत्यांच्या जीवनाची व कार्याची स्थूल रूपरेषा खूपशी सारखी दिसते. तथापि, त्यांच्यातले तपशील पाहू जाता दोघींतील वेगळेपणा ठळक होऊ लागतो. त्यांची ध्येयदृष्टी सारखी असली तरी त्यांच्या प्रत्यक्ष कृतीचे स्वरूप, त्यांच्या कार्याचा समाजावर झालेला परिणाम, समाजाची त्याबाबतची प्रतिक्रिया, ही मात्र बरीच भिन्न झालेली दिसतात. ह्याचे प्रमुख कारण असे दिसते, की दोघींची प्रकृती भिन्न होती. ही प्रकृतिभिन्नता आता आपण थोडी तपशिलाने पाहू.

पं. रमाबाई वाढल्या त्या एका छोट्याशा विभक्त कुटुंबात. त्यांचे जीवन सुरवातीपासूनच अस्थिर, खूप कष्टाचे, संघर्षाचे व चढउताराचे गेलेले दिसते. त्यांच्या वडिलांनी त्यांना शिक्षण, खंबीर ध्येयनिष्ठा, एक ठाम जीवनदृष्टी दिली, त्याचबरोबर एक आध्यात्मिक प्रेरणेचा वारसाही दिलेला दिसतो. त्याचप्रमाणे आपल्या जीवनदृष्टीशी समाज व परंपरांचा विरोध झाल्यास समाजाकडे पाठ फिरवून त्याला धुडकावून आपली तत्त्वे आचरण्याचा आदर्शपण त्यांनी पं. रमाबाईंसमोर ठेवलेला दिसतो.

ह्याउलट रमाबाई रानड्यांचे जीवन सुखवस्तू, सरळमार्गी अशा एकत्र कुटुंबात गेलेले दिसते. त्यांच्या वडिलांनी त्यांना कुटुंबात वेळप्रसंगी नमते घेऊन, जुळवून घेत जगण्याचा संस्कार दिलेला दिसतो. त्यांना शिक्षण, जीवनदृष्टी देणारा त्यांचा पतीपण समन्वयवादी दिसतो. समाजाच्या श्रद्धास्थानांना फारसा धक्का न देता त्यांच्यात विचार व आचारक्रांती घडवून आणण्याचे धोरण त्यांनी रमाबाईंना दिलेले दिसते. त्यांच्या जीवनसरणीतला हा विरोध त्यांच्या

स्वभावाच्या ठेवणीतही उमटलेला दिसतो.

पं.रमाबाई ह्या विजेसारख्या तेजस्वी,करारी व धडाडीच्या झालेल्या दिसतात;तर रमाबाई रानडे समईप्रमाणे सौम्य,सोज्वल,बाणेदार,पण हळव्या मनाच्या दिसतात.विधवांची करुण अवस्था पाहून पं.रमाबाई त्याला कारणीभूत झालेल्या धर्म व समाजपरंपरांविषयी उबगल्या व प्रतिकाराला निकराने सिद्ध झालेल्या दिसतात;तर रमाबाई रानडे ती दुःखे पाहून कळवळल्या आणि समाज परंपरांचे शुद्धिकरण करण्यासाठी धीमेपणाने पण निर्धाराने कटिबद्ध झालेल्या दिसतात.

दोघींच्या व्यक्तिमत्त्वातील भिन्नतेचा आणखी एक पैलू आढळून येतो.पं.रमाबाई ह्या विलक्षण व्यक्तिस्वातंत्र्यवादी झालेल्या दिसतात. आपल्या सदसद्विवेकबुद्धीला जे योग्य दिसते,ते आचरण्यात त्या समाज वा कुटुंबियांशी पण तडजोड करताना दिसत नाहीत.उलट रमाबाई रानडे ह्या अत्यंत महत्त्वाच्या बाबी सोडता एरवी सतत तडजोड करीत मार्गक्रमण करताना दिसतात.

पं.रमाबाईंची स्वातंत्र्याची भावना अतिशय प्रखर होती,असे दिसते.ह्याउलट रमाबाई रानड्यांनी आपली 'स्व'ची भावना सुरवातीला पतीमध्ये व त्यानंतर आपल्या कार्यात विलीन करून टाकली होती,असे वाटते.

पं.रमाबाई ह्या प्रथमपासून महत्त्वाकांक्षी व स्वतंत्रपणे ध्येयधोरण ठरवून जीवनाची वाट चोखाळताना दिसतात.रमाबाई रानडे मात्र पतीच्या पावलावर पावले टाकीत,त्या वाटेचे सूत्र पकडून पायरी पायरीने जीवनाचा आवाका विस्तारत गेलेल्या दिसतात.

रमाबाई रानडे सश्रद्ध असल्या तरी पं.रमाबाईंप्रमाणे तीव्र धर्मप्रेरणा व आध्यात्मिक आकांक्षा त्यांच्याजवळ दिसत नाहीत.त्यामुळे पं.रमाबाईंचे स्त्री-मुक्ती व दलित-उद्धाराचे सर्व कार्य शेवटी धर्माधिष्ठित पारलौकिक श्रेयात विलीन झालेले दिसते.उलट रमाबाई रानडे मात्र जीवनभर धर्मनिरपेक्षपणे स्त्री-जातीचे लौकिक जीवन उन्नत करण्यासाठी धडपडलेल्या आढळतात.

पं.रमाबाईंनी आपल्या जीवनाची आधारभूत मूल्ये आधीच निश्चित केलेली दिसतात व त्याला अनुसरून त्या समाजाची पर्वा न करता आपल्या ध्येयपथावरून चालत गेलेल्या दिसतात. रमाबाई रानड्यांचा मार्ग नेमका उलट दिसतो. त्या प्राप्त परिस्थितीत सदसद्विवेकबुद्धीला स्मरून हळूहळू कार्य करीत गेल्या व त्यातून नवी मूल्ये स्वतःशी दृढ करून मग समाजाच्या गळी उतरवत गेलेल्या दिसतात.एकीला आपला अढळ ध्रुवतारा सापडला होता व त्याच्या दिशेने ती निघाली होती.दुसरीला दूरस्थ ध्रुवताऱ्याच्या ओढीपेक्षा भोवतीच्या अधिकाधिक स्त्रिया विकासाच्या वाटेवर आपल्याबरोबर पुढे कशा सरकतील ह्याची जास्त कळकळ वाटत होती,असे दिसते.

दोघींच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनांतही खूप भिन्नता आढळते.पं.रमाबाई स्त्रीकडे एक 'व्यक्ती' म्हणून पाहताना दिसतात व म्हणून एक व्यक्ती म्हणून पुरुषांइतकेच अधिकार, व्यवसाय-स्वातंत्र्य, शिक्षण स्वातंत्र्य, धर्म-स्वातंत्र्य स्त्रीला मिळाले पाहिजे, असे त्यांचे

विचारधोरण दिसते.

रमाबाई रानड्यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन त्या मानाने खूप वेगळा आहे. स्त्री व पुरुष ह्यांच्या घडणीत व जीवितकार्यात निसर्गतःच भेद आहे व हे भिन्नत्व हे त्यांचे वैशिष्ट्य असून ते त्यांनी जपले पाहिजे, स्त्रियांनी आपले निसर्गदत्त कर्तव्य अधिक डोळसपणे व समर्थपणे पार पाडले पाहिजे, असे रमाबाईंचे मत दिसते.

"घरासंबंधी काय अगर देशासंबंधी काय, ह्या दोनही वर्गांची कामे निरनिराळी असावयाची.... परक्या पुरुषाशी पत्रव्यवहार करणे, त्यांना जाऊन भेटणे, व्याख्याने वा वर्गणी देण्यासंबंधी आग्रह करणे वगैरे कामे भिडस्तपणामुळे बायकांच्या हातून होत नाहीत. ह्यासाठी पुरुषांचे साहाय्य हवे व ते आम्हांस सुदैवाने मिळत आहे," असे रमाबाई रानडे म्हणतात. तर ही सर्व कामे पं. रमाबाई स्वतः सहजपणे करताना दिसतात. अमुक कामे पुरुषांची वा अमुक स्त्रियांची असा भेदभाव त्या फारसा मानताना दिसत नाहीत. म्हणूनच की काय, रमाबाई रानड्यांचे सहकारी श्री. गोपाळराव देवधरांना सेवासदनात जे स्थान होते तसे स्थान पं. रमाबाईंचे सहकारी श्री. गंगाधरपंत गद्रे यांना मुक्ती मिशनमध्ये लाभले होते, असे वाटत नाही.

दोघींच्या कार्याची परिणती पण खूप भिन्न झालेली दिसते.

स्त्रियांना शिक्षण देऊन आपल्या पायावर उभे करण्याच्या ध्येयबिंदूपासून दोघी निघाल्या तरी शेवटी दोघींचे मुक्काम फार भिन्न दिशांना झालेले दिसतात. पं. रमाबाईंच्या मुक्तिसदनात, राष्ट्र-जीवनाचा, समाज जीवनाचा विचार मागे पडत गेलेला दिसतो. इतकेच काय पण कुटुंब जीवनही समृद्ध व सुखपूर्ण करण्याच्या प्रेरणा मंदावत गेलेल्या दिसतात. ख्रिस्तशरण होऊन आत्मोद्धार करून घेण्याच्या ध्येयावरच त्यांनी आपले व आपल्या मुलींचे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्याचा परिणाम म्हणून पं. रमाबाई समाजापासून विलग होत गेलेल्या दिसतात. देशभर सहजपणे वावरणाऱ्या, नाना भाषा आत्मसात करणाऱ्या, लग्नासारख्या जिव्हाळ्याच्या विषयातही भाषिक वा प्रांतिक अडथळे झुगारून देणाऱ्या, थोडक्यात 'राष्ट्रीय' व्यक्तिमत्त्व लाभलेल्या पं. रमाबाई, शेवटी शेवटी केडगांवच्या लहानशा मुक्ती मिशनमध्ये बंदिस्त होत गेल्या. ह्याउलट रमाबाई रानड्यांचे जीवन मात्र देवराष्ट्रासारख्या लहानशा ग्रामातून आरंभ होऊन कौटुंबिक जीवनाच्या परिसरात फुलत पुढे अखिल भारतीय पातळीवर स्थिरावलेले दिसते. आपल्या जगण्यातून त्यांनी स्त्रियांपुढे आदर्श गृहिणीबरोबरच आदर्श नागरिक कसे बनता येते, ह्याचा आदर्श उभा केलेला दिसतो.

तर्काचे, युक्तिवादाचे धारदार शस्त्र हातात घेऊन, हे विश्वचि माझे घर अशा वृत्तीने सत्यान्वेषण करत निघालेल्या पं. रमाबाई शेवटी निर्विकल्पणे श्रद्धेला शाश्वत मूल्य म्हणून स्वीकारताना दिसतात. तर पारंपरिक सश्रद्ध घरातून वाढलेल्या रमाबाई रानडे मनुष्यनिर्मित धर्मकल्पनांच्या पलीकडे जाऊन मानवतावाद, उदारमतवाद, सर्वधर्म समभावाच्या पायावर उभ्या झालेल्या दिसतात.

एकाकी पडत गेलेल्या पं. रमाबाईंचा परमेश्वर, हाच त्यांचा शेवटी सखा, पथप्रदर्शक, मित्र, गुरू सर्व काही झालेला दिसतो. तर रमाबाई रानड्यांचा प्रवास नेमका उलटा झालेला दिसतो.

त्यांचा पति-गुरू-सखा हाच शेवटी त्यांचा परमेश्वर झालेला दिसतो.

दोघींच्या कार्याविषयी समाजाच्या प्रतिक्रियापण फार भिन्न झालेल्या दिसतात. पं. रमाबाईंना सुशिक्षित समाजाकडून प्रचंड विरोध सोसावा लागला. ख्रिस्ती बांधवांनीपण त्यांना फारसे आपले मानलेले दिसत नाही व राज्यकर्ते पण त्यांच्यावर अनेकदा नाराजच झालेले दिसतात. अर्थात ह्या साऱ्याचा विरोध पचवून त्या शेवटपर्यंत ताठ मानेने पुढे जात राहिल्या हा भाग वेगळा. तथापि, त्या जिवंत असेपर्यंत त्यांच्या कार्याला शिक्षित समाजाने मान्यता दिलेली दिसत नाही. इतकेच नव्हे, तर धर्मांतरामुळे त्यांनापण आपले मानले नाही. ह्याउलट रमाबाई रानड्यांना मात्र समाजाकडून बराच आदर व सहकार्य लाभलेले दिसते. त्यांच्या कार्याचा सुशिक्षित समाजात खूप प्रसार होऊन त्यांना अनुयायीपण खूप लाभलेले दिसतात. असे घडण्यामागे परंपरेने घडलेली भारतीय मानसिकता थोडीफार कारणीभूत आहे, असे वाटते. स्वातंत्र्य व समता ही मूल्ये आपल्या संस्कृतीने मूलभूतपणे स्वीकारलेली दिसत नाहीत.

स्त्री हीपण एक स्वतंत्र व्यक्ती आहे आणि म्हणून पुरुषाप्रमाणे सर्व प्रकारचे स्वातंत्र्य व सन्मानाची ती अधिकारी आहे. हा विचार मूल्य म्हणून समाजात रुजलेला दिसत नाही. फुले व आगरकर ही दोनच माणसे तत्त्व म्हणून स्त्रियांचे स्वतंत्र व समान व्यक्तिमत्त्व मानताना दिसतात.

पण ही दोनही माणसे समाजाला पचवता आली नाहीत. तेव्हा हीच भूमिका घेणाऱ्या पं. रमाबाई समाजाला न रुचणे अपरिहार्य दिसते. समाजाच्या रूढ कल्पनांना धक्का देणारी माणसे, थोर असली तरी, समाजाकडून नाकारली जातात, हा नेहमीचा अनुभव आहे.

भारतीय मानसिकता स्त्रीला आदिशक्ती म्हणून पूजनीय मानते व शिव-शक्ती, पुरुष-स्त्री ह्यांच्या सायुज्जतेतूनच विश्वनिर्मिती होते, असेही मानते. मात्र ह्या दोघांचे कार्यस्वरूप व म्हणून घडण व मनोधर्म हे निसर्गतःच भिन्न असतात. त्यातही प्रथम पुरुष मग प्रकृती ही आपली धारणा असते. म्हणून जे जे पुरुषाला मिळते ते ते स्त्रीने मिळवावे हा समानतेचा अर्थ आपल्या मानसिकतेत रुजत नसावा.

कुटुंब हेच स्त्रीचे खरे क्षेत्र. मातृत्व हेच तिच्या स्त्रीत्वाचे सार्थक. त्यानुरूप सहनशीलता व क्षमाशीलता, हे तिचे निसर्गदत्त गुणधर्म आहेत. स्त्रियांच्या ह्या मूलभूत घडणीला अनुरूप जी क्षेत्रे तीच तिची कार्यक्षेत्रे होऊ शकतात. ही धारणा प्रबळ दिसते. ज्या मिल्ल, स्पेन्सर इत्यादी पाश्चात्य विचारवंतांच्या विचारांचा फार मोठा पगडा तत्कालीन सुशिक्षित उदारमतवादी पुरुषांवर होता, त्या मिल्ल व स्पेन्सरचे मतपण कुटुंब हे स्त्रीचेच क्षेत्र आहे, असेच होते.

पुढे अण्णासाहेब कर्व्यांनी महिला विद्यापीठ स्वतंत्र उभारण्यामागे 'स्त्रियांना चरितार्थ संपादनाचे शिक्षण हवे.' हा आगरकरांचा विचार त्या काळातील चळवळीला पुढे पटला होता. पण हे चरितार्थ संपादन - ठराविक, स्त्री अनुकूल क्षेत्रांशी मर्यादित हवे, असा दृष्टिकोन दिसतो.

भारतीय मानसिकतेचा दुसरा एक विशेष म्हणजे तिला वाटणारे कुटुंबसंस्थेचे अनन्यसाधारण, अपरिहार्य महत्त्व. आणि कुटुंबसंस्था सुस्थिर ठेवण्यात स्त्रीचा महत्त्वाचा वाटा असतो हा विचार भारतीय स्त्रीच्या मानसिकतेततही फार खोलवर रुजलेला दिसतो. त्यामुळे

तत्कालीनच नव्हे, तर आजच्याही बहुसंख्य जागृत स्त्रिया समानतेसाठी धडपडताना, आपली कौटुंबिक जबाबदारी एकतर्फी वाटली तरी नाकारू शकत नाहीत.

भारतीय मानसिकतेचा तिसरा विशेष दिसतो, तो म्हणजे 'तडजोड' करण्याची वृत्ती. संसार म्हटला, की त्यात थोडी तडजोड स्त्रीने करायलाच हवी. त्यात कमीपणा नसून, मनाचे ते एक सामर्थ्य असते. समस्येशी झगडत बसण्यापेक्षा ती बाजूला सारून, त्यातून सोयीस्कर असा काढलेला तो मार्ग असतो.

'समानतेची' जी स्थिती तीच काहीशी 'स्वातंत्र्य' कल्पनेबाबत दिसते. भारतीय समाजरचना ही कुटुंबप्रधान समाजरचना आहे. कुटुंब हा समाजाचा मूलभूत घटक मानलेला आहे. व्यक्ती नाही. ही कुटुंबव्यवस्था सुरळीत चालण्यासाठी काही मूल्यकल्पना समाजात दृढ होत जातात. कुटुंबाच्या स्थैर्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्याचा, आवडीनिवडींचा संकोच करणे अपरिहार्य ठरत जाते. 'त्यजेदेकं कुलस्यार्थे' ही आपली शिकवण. स्त्री असो वा पुरुष भारतीय कुटुंबव्यवस्थेत सर्वांना वडिलधाऱ्यांच्या आज्ञेप्रमाणे व उतरंडीच्या व्यवस्थेतच व्यक्तिगत आवडीनिवडी बाजूला सारून वावरावे लागते.

त्यामुळे पाश्चात्यांची व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना भारतीय मनांला पूर्णपणे रुचू शकत नाही. त्याला आपल्या दृष्टीने स्वार्थीपणाचा, आत्मकेंद्रित अहंकाराचा वास येऊ लागतो.

आणखीपण एक घटक ह्या मानसिकतेत दडलेला दिसतो. 'स्वतःच्या अस्मितेचा विलोप' ही सर्वांत उदात्त अशी मानवी मनाची स्थिती आहे, ही भारतीय तत्त्वज्ञानाची शिकवण आहे. त्यामुळे स्वतःच्या अस्तित्वाचा आनंद, स्वतःच्या आवडीनिवडीचे महत्त्व, स्वतःच्या संवेदनसुखाचे स्वातंत्र्य ह्या 'अहं'शी निगडित अशा आजच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना भारतीय मनात पूर्णपणे रुजत नसाव्यात. ह्यातून एका देशातील घोषणा, युक्तिवाद हे दुसरीकडे तंतोतंत लागू पडणार नाहीत, हेच सत्य लक्षात येते.

चळवळ करू इच्छिणाऱ्यांनी ह्या भारतीय मानसिकतेचा विचार करणे आवश्यक ठरले. रमाबाई रानड्यांनी तो केलेला दिसतो. म्हणून आपल्या बरोबरीने त्या अनेक स्त्रियांना नव्या वाटेवर, फारशा संघर्षाविना नेऊ शकलेल्या दिसतात.

त्यांचे व्यक्तिमत्त्व, कार्यपद्धती, जीवनदृष्टी ही परंपरागत सामाजिक मानसिकतेला जवळची असल्यामुळे त्यांच्या चळवळीला व्यवहारात खूप यश मिळवता आले असावे.

अशा प्रकारे ह्या दोन स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वांत व कार्यांच्या फलश्रुतीत भिन्नता असली, तरी इतर प्रांतांच्या तुलनेत १९ व्या शतकापासून मराठी स्त्री वेगळी व मोकळी दिसू लागली ह्याचे श्रेय काही प्रमाणात ह्या दोन्ही स्त्रियांना द्यावे लागेल. रमाबाई रानड्यांनी आपल्या धीम्या पण ठाम चालीने अनेक स्त्रियांना विकासाच्या अनेक वाटा उपलब्ध करून दिल्या. त्या वाटेवरून पुढे जाण्यास प्रेरणा देऊन भारतीय मानसिकतेस जुळणारी आदर्श स्त्री-प्रतिमा उभी केली. तर पं. रमाबाईंनी स्त्रीच्या सामर्थ्याचा आविष्कार दाखवून स्त्री-जातीला सैद्धांतिक व तात्त्विक प्रतिष्ठा प्राप्त करून दिलेली दिसते.

एकीने स्त्री-मुक्ती विचाराची दिशा व अंतिम उद्दिष्ट ह्यांची ठाम जाणीव दाखवलेली

दिसते. तर दुसरीने समाजाला संभाळूनही तत्त्वांचा पाठपुरावा कसा करता येतो व कार्याची व्याप्ती किती वाढवता येते, - ह्याचा दाखला आपल्या जीवनातून पुढे ठेवला आहे. खरे सांगायचे, तर ह्या दोन भिन्न प्रवृत्तीच आहेत व चळवळीला दोन्हींची गरज असते.

शरदबाबू एकदा, स्वतः व रवींद्रनाथांमधील फरक स्पष्ट करून सांगताना म्हणाले होते, की मी लोकांचा लेखक आहे, पण रविबाबू लेखकांचे लेखक आहेत. त्याच चालीवर मला इथे म्हणावेसे वाटते, की रमाबाई रानडे ह्या स्त्रियांच्या नेत्या होत्या पण पं. रमाबाई ह्या नेत्यांच्या नेत्या होत्या. दोघींनी मिळून मराठी स्त्रीची, मुक्तीच्या दिशेने पुढे झालेली वाटचाल आधीच रेखलेली दिसते. आतापर्यंत आपण ह्या दोन स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचा तुलनात्मक विचार केला. पण इथे त्याच्याही मागे जाऊन एक मूलभूत विचार करावासा वाटतो व तो म्हणजे इतर प्रांतीय स्त्रीच्या तुलनेत जाणवणाऱ्या मराठी स्त्रीच्या पुरोगामीपणाचा.

भारतीय मानसिकतेच्या वर पाहिलेल्या सर्व मर्यादा मान्य करूनसुद्धा असे दिसते, की भारतातील इतर प्रांतांपेक्षा महाराष्ट्रात स्त्री-मुक्तीची चळवळ अधिक जोमाने रुजलेली, पसरलेली दिसते. इतर प्रांतांपेक्षा आजच नव्हे, तर १९ व्या शतकात देखील मराठी स्त्री अधिक स्वतंत्रपणे, अधिक धीटपणे वावरताना दिसते. ही वस्तुस्थिती पं. रमाबाईंनी आपल्या एका पत्रातून सिस्टर जिराल्डिनला कळवलेली आपण पाहिली आहे. वस्तुतः ब्रिटिश राज्यसत्ता महाराष्ट्राच्या अगोदर बंगालमध्ये स्थिरावली होती. ब्राह्मो समाजासारखी पुरोगामी संस्थापण महाराष्ट्राच्या अगोदर तिकडे कार्यरत झाली होती. स्त्री-शिक्षणाला देखील महाराष्ट्राच्या अगोदर बंगालमध्ये प्रारंभ झाल्याचा दाखला १९ व्या शतकाचा इतिहास देतो. तरीदेखील बंगाली स्त्रीपेक्षाही मराठी स्त्री १९ व्या शतकात अधिक मोकळे, निर्भय जीवन जगत होती, असे रवींद्रनाथांनी आपल्या 'बोम्बाई शहर' ह्या लेखात स्पष्ट नमूद केलेले आहे. ते म्हणतात -- "जे दृश्य पाहून मन सर्वांत अधिक तृप्त होते ते म्हणजे तेथील स्त्री-पुरुषांचा संमिश्र समाज. स्त्रीवर्जित कलकत्याचे दैन्य किती मोठे आहे ते मुंबईला आल्यावर पाहायला मिळते."[१]

भारतातील इतर सर्व प्रांतांपेक्षा बंगाल व महाराष्ट्र हे दोन प्रांत १९ व्या शतकातील संक्रमण काळात पुरोगामी विचारांत अधिक आघाडीवर होते. तरीदेखील पं. रमाबाई किंवा रमाबाई रानड्यांसारख्या स्त्री-चळवळी उभारणाऱ्या स्त्रिया बंगाल प्रांतात त्या काळात झालेल्या दिसत नाहीत.

ह्याचे कारण काय असावे ? असा विचार करू लागल्यास असे जाणवते, की मराठी स्त्रीच्या जीवनात इतर प्रांतांच्या तुलनेत अधिक प्रमाणात आढळणाऱ्या स्वातंत्र्याचे, परिवर्तनशीलतेचे बीज महाराष्ट्राच्या भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक जडणघडणीत असावे. मराठी लोकांची संस्कृती ह्या आपल्या संशोधनपर पुस्तकात सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. इरावतीबाई कर्वे म्हणतात - "दक्षिणेकडील 'मातृसत्ताक' जीवनपद्धतीच्या छायेमुळे मराठी स्त्री उत्तरेच्या तुलनेत जास्त स्वतंत्र दिसते. माहेरच्या कुळांत मुलगी देण्याच्या दक्षिणेकडील पद्धतीमुळे व साटेलोटे पद्धतीमुळे छळ कमी. हुंड्याचे प्रस्थ कमी, सासुरवाशीण सुद्धा अधिक निर्भय व विश्वासाने वावरू शकत असेल का ?"

उत्तरेच्या मानाने मराठी स्त्रियांनी राजकारणात पण खूप भाग घेतला.* पितृप्रधान उत्तरेत मुलगी देय... दोन भिन्न कुळे जोडणारी, मित्र मिळवणारी, स्वगोत्रांत, स्वकुळांत, जवळच्या नात्यात देत नाहीत. म्हणून तिच्या दृष्टीने ते फार मोठे स्थित्यंतर असते. जास्त भयआशंकेमुळे ती अधिक दडपली जाते. मराठी गीतात पण स्त्रीचे श्रेष्ठत्व खूपच वर्णिले आहे. मराठी पुरुषांनी देखील आईचे वेड वाङ्मयात अजरामर केले आहे. सूर्याचे तेजस्वी प्रतीक विष्णु, महाराष्ट्रात सावळा विठोबा बनून व मग पुरुषजात बदलून विठाई माऊली होतो. इरावतीबाई म्हणतात - "हा वस्तुस्थितीवर (इथल्या वेगळ्या) संस्कृतीने मिळवलेला विजय आहे. मराठ्यांची राष्ट्रदेवता पण भवानी आईच आहे. मराठी भाषा व वाङ्मय हेदेखील प्रथमपासून कणखर बुद्धिवादी, युयुत्सु आहे. महाराष्ट्र सुरवातीपासून शिव व देवीभक्त. हेदेखील त्याच्या युयुत्सु, तेजस्वी वृत्तीचे दर्शक आहे. विष्णुभक्ती महानुभावानंतर आली. कलेच्या क्षेत्रांत संस्कृतीचे वैशिष्ट्य जेवढे दिसते तेवढे इतरत्र दिसत नाही. महाराष्ट्रातील कलांकडे पाहिल्यास ज्यात बुद्धिविलासाला जास्त वाव आहे अशा नाट्य, संगीत ह्या कला इथे जास्त रुजल्या. ज्यांत जास्त आव्हान, सामर्थ्य अशी लेणी व किल्ले भरपूर, नाजूक कलाकुसर, विणकाम, कशिदा, चित्र, नृत्य, कला म्हणूनच इथे कमी प्रमाणात फोफावल्या असाव्यात का ?

इरावतीबाईचे हे विवेचन त्यांच्या विद्वत्तेचा व व्यासंगाचा अधिकार लक्षात घेता अधिकृत मानायला हरकत नाही. आपल्या अनुभवाला सुद्धा ते वस्तुनिष्ठ असल्याचे जाणवतेच. तेव्हा असे म्हणता येईल, की मराठी माणसाच्या कणखर व रोखठोक प्रवृत्तीमुळे बुद्धिनिष्ठ व तर्कसिद्ध सुधारणावादाचा अंगिकार मराठी स्त्री-पुरुषांकडून अधिक सहजपणे केला गेला असावा.

आणखी एक संभाव्यता जाणवते ती अशी, की महाराष्ट्रात बंगालसारखी प्रबळ जमीनदारी प्रथा व तिच्या अनुषंगाने पोसणारी घट्ट सरंजामशाही फारशी नसल्याने स्त्री-शूद्रांच्या स्वातंत्र्याच्या वाटा अधिक सुलभतेने खुल्या झाल्या असाव्यात. नवे विचार, नवी मूल्ये समाजाच्या इतर स्तरांत झिरपत जाणे शक्य झाले असावे.

समाजाची घडण व त्यातले परिवर्तन ही प्रक्रिया इतकी गुंतागुंतीची असते, की त्याविषयी ठामपणे निष्कर्ष काढता येत नाहीत. काढूही नयेत.

तरीपण १९ व्या शतकातील संक्रमणाला सामोऱ्या गेलेल्या ह्या दोन धीट मराठी स्त्रियांच्या जीवनाचा विचार करताना एक जाणवते, की मराठी स्त्री ही भारतीय स्त्रीचाच वारसा घेऊन आलेली असली तरी तिची घडण थोडी वेगळी आहे. आणि म्हणून स्त्री-स्वातंत्र्याच्या दिशेने परंपरेचे सूत्र धरून तिने अधिक जोमाने प्रवास केला आहे.

---

* १९ व्या शतकाच्या शेवटी व २० व्या शतकाच्या सुरवातीस झालेल्या क्रांतिकारी उठावात हातात शस्त्रे घेऊन बऱ्याच बंगाली स्त्रिया सहभागी झालेल्या दिसतात. असे दृश्य इतक्या प्रमाणात इतर कोणत्याही प्रांतात आढळत नाही. हा बंगालमधील दुर्गापूजा काली पूजेचा अप्रत्यक्ष प्रभाव म्हणायचा का ?

संदर्भ सूची

१. रवींद्रनाथ आणि महाराष्ट्र - श्रीपाद जोशी - पृष्ठ १०५



REFBK-0026531

स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा

स्त्रीअस्मितेचा आविष्कार : एकोणिसावे शतक

भाग २ - रमाबाई रानडे

मृणालिनी जोगळेकर

'स्व'च्या शोधासाठी चाललेला स्त्रीचा आजचा झगडा समजून घेण्यासाठी इतिहासात शक्यतो पाठी जाऊन शोध घ्यावा लागेल. त्या काळी हे झगडे स्त्रीमुक्तीच्या नावाने ओळखले गेले नसले, तरी आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीची बीजे त्यातच सापडतात. या संशोधन प्रकल्पात अशा प्रकारच्या झगड्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

हा शोध घेताना कालक्रमानुसार मालिकेचे पाच अभ्यासखंडांमध्ये विभाजन केले आहे. संतकाळ म्हणजेच साधारणपणे तेराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतचा काळ, नंतर पेशवेकाळ, एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्ध व उत्तरार्ध आणि विसाव्या शतकातील सुरवातीचा काळ असे या अभ्यासखंडांचे टप्पे मानता येतील. त्याचप्रमाणे विषयाची मांडणी करताना आवश्यकतेनुसार वाङ्मयविचार, व्यक्तिचित्रण, ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे केलेली चर्चा, प्रत्यक्ष मुलाखती अशा विविध माध्यमांचा केलेला वापर हे या मालिकेचे वैशिष्ट्य ठरावे.

'स्त्रीप्रश्नांची चर्चा : एकोणिसावे शतक' हे या मालिकेतले तिसरे पुस्तक एकोणिसाव्या शतकातील स्त्रीप्रश्नांचा शोध घेणारे होते. त्यानंतरच्या 'स्त्रीअस्मितेचा आविष्कार एकोणिसावे शतक' ह्या पुस्तकांत एका वेगळ्या कोनातून एकोणिसाव्या शतकाकडे पाहिले आहे. या काळातील सुधारकांच्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर शिक्षणाची संधी लाभलेल्या महाराष्ट्रातील चार स्त्रियांचे जीवनदर्शन या पुस्तकात घडते. कुशाग्र बुद्धीच्या पंडिता रमाबाई, समाजसेवेचे अखंड व्रत चालवणाऱ्या रमाबाई रानडे, सडेतोड लिहिणाऱ्या ताराबाई शिंदे आणि आपल्या भावाच्या, म. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या, खांद्याला खांदा लावून झटणाऱ्या जनाक्का शिंदे या सर्वांचेच व्यक्तिगत जीवन, दृष्टिकोन वेगवेगळे होते. स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाच्या या चौघींच्या आचारविचारांचा परिचय या पुस्तकांतून होतो.

वाचकांच्या सोयीसाठी या पुस्तकाचे पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे आणि ताराबाई शिंदे – जनाक्का शिंदे असे तीन भाग पाडले असून ते तीन स्वतंत्र पुस्तकांच्या रूपात उपलब्ध आहे.

किंमत रु. १०० .००
(म- ७६६)
ISBN 81 - 7185 - 599 -7

पॉप्युलर प्रकाशन

मुखपृष्ठ : बाळ ठाकूर